# ''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४–२०१४''

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे – ४११०३७

## तात्विक आणि सामाजिक विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरीता सादर करण्यात आलेला

## शोधप्रबंध

**संशोधक**

**प्रा.सौ. संगिता भालचंद्र काटकर**

(एम.ए., एम.फिल)

कायम नोंदणी क्रमांक – २११३००७७८५

मार्गदर्शक

**प्रा.डॉ.एल.एन. घाटगे** (एम.ए., एम.फिल., पीएच.डी)
उपप्राचार्य व व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा

**जानेवारी २०१९**

# प्रतिज्ञापत्र

मी **प्रा. सौ.संगिता भालचंद्र काटकर** प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, **''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल–एक अभ्यास २००४–२०१४''** या विषयातील शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीकरिता सादर करीत आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली आहे. त्या माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्य कोठेही उपयोग केलेला नाही. अथवा माहिती प्रकाशित केलेली नाही.

**संशोधक विद्यार्थीनी**

**प्रा.सौ. संगिता भालचंद्र काटकर**

दिनांक : २५ /०१/२०१९

ठिकाण : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी प्रा.सौ. संगिता भालचंद्र काटकर यांनी ''**कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४–१४**'' या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर प्रबंधाचे काम केलेले आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. एल.एन. घाटगे**

**उपप्राचार्य व व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख**

**धनंजयराव गाडगीळ वाणिज्य**

**महाविद्यालय, सातारा**

दिनांक : २५/०१/२०१९

ठिकाण : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# प्रतिज्ञापत्र

मी **प्रा. सौ.संगिता भालचंद्र काटकर** प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, **''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल–एक अभ्यास २००४–२०१४''** या विषयातील शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीकरिता सादर करीत आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली आहे. त्या माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्य कोठेही उपयोग केलेला नाही. अथवा माहिती प्रकाशित केलेली नाही.

**संशोधक विद्यार्थीनी**

**प्रा.सौ. संगिता भालचंद्र काटकर**

दिनांक : २९ /०१/२०१९

ठिकाण : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी प्रा.सौ. संगिता भालचंद्र काटकर यांनी ''**कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४–१४**'' या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर प्रबंधाचे काम केलेले आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. एल.एन. घाटगे**

**उपप्राचार्य व व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख**

**धनंजयराव गाडगीळ वाणिज्य**

**महाविद्यालय, सातारा**

दिनांक : २९/०१/२०१९

ठिकाण : टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेल्या प्रबंधासाठी अनेक संबंधित व्यक्तींनी दिलेले सहकार्य आणि बहुमूल्य मार्गदर्शन याबद्दल त्यांचा अभार व्यक्त करणे हे माझे आद्य कर्तव्य आहे.

सर्वप्रथम माझे गुरूवर्य डॉ. एल.एन. घाटगे, उपप्राचार्य, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा यांच्या ऋणात कायम राहणेच पसंत करीन. कारण त्यांनी संपूर्ण संशोधन कार्यासाठी अमूल्य वेळ दिला व बहुमोल असे मार्गदर्शन केले, यामुळेच मी हे संशोधन कार्य पूर्ण करू शकले. डॉ. श्रीरंग कर्देकर माजी कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ दापोली तसेच मार्गताम्हाणे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री. मधुकरराव चव्हाण साहेब आणि मान्यवर सर्व संचालक यांचेही मी ऋण व्यक्त करते.

कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी आशिर्वाद अतिशय महत्त्वाचे असतात. माझे बाबा कै. अमृतराव यशवंतराव सूर्यवंशी यांचे आशिर्वाद सदैव माझ्या पाठीशी आहेत . त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आहे. माझे पती श्री. भालचंद्र नामदेव काटकर (यु.एस.व्ही. उद्योगसमूह), प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड (धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय सातारा), आदरणीय गुरूवर्य प्रा. रूपा शांतीलाल शहा (महावीर महाविद्यालय कोल्हापूर), प्राचार्य डॉ. व्ही.ए. खोत (डॉ. तात्यासाहेब नातू कॉलेज) माझे सहकारी प्रा. डॉ. दिनेश यादवराव पारखे (पाटपन्हाळे महाविद्यालय ), प्रा. विकास माधव मेहेंदळे (डॉ. तात्यासाहेब नातू महाविद्यालय) , श्री. राजेंद्र तानोजी विचारे, डॉ. सुरेश सिताराम नाळे (आय.सी.एस. महाविद्यालय), प्रा. डॉ. नितीन मुटकुळे , प्रा. गिरीराज पांडे (डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण) यांनी मला संपूर्ण प्रबंधाची मांडणी करण्यास मदत केली त्यामुळे मी त्यांची सदैव ऋणी आहे. तसेच संपूर्ण प्रबंधाचे टंकलेखन सुहास इंगळे (कोल्हापूर) यांनी योग्य वेळेत केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

**संशोधक विद्यार्थीनी**

**प्रा.सौ.संगीता भालचंद्र काटकर**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरण शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | प्रस्तावना व संशोधन पद्धती | १–३९ |
| प्रकरण दुसरे | संदर्भ साहित्याचा आढावा | ४०–७४ |
| प्रकरण तिसरे | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल | ७५–११९ |
| प्रकरण चौथे | कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक असमतोल | १२०–१६७ |
| प्रकरण पाचवे | कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचे विश्लेषण | १६८–२३० |
| प्रकरण सहावे | निष्कर्ष व शिफारशी | २३१–२४१ |
| | संदर्भग्रंथ सूची | २४२–२४७ |
| | परिशिष्ट्ये<br>१) प्रश्नावली<br>• कुटुंबप्रमुखांची प्रश्नावली<br>• कृषी अधिकाऱ्यांची प्रश्नावली<br>• उद्योजकांची प्रश्नावली<br>२) नकाशा | <br>२४८<br><br><br><br>२६० |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्याचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | भारतातील दारिद्र्याचा असमतोल | ११ |
| १.२ | राज्यनिहाय निव्वळ देशांतर्गत उत्पादन | १३ |
| १.३ | दरडोई उत्पन्न | १४ |
| १.४ | पंचवार्षिक योजना काळातील राज्यांतर्गत उत्पादनाचा वृद्धीदर | १६ |
| १.५ | गुंतवणूक प्रस्ताव आणि निधी वितरण टक्केवारी | १८ |
| १.६ | पायाभूत सुविधांच्या विकासाचे स्तर व प्रादेशिक असमतोल | २० |
| १.७ | मानव विकासाचे प्रमुख निर्देशक व त्यामधील तफावत | २३ |
| १.८ | पंचवार्षिक योजना काळातील दरडोई खर्चातील तफावत | २५ |
| ३.१ | महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष | ८५ |
| ३.२ | जिल्हा विकास निधी वाटपाचे सूत्र | ९२ |
| ३.३ | महाराष्ट्रातील विभागीय दरडोई उत्पन्नाचे वर्गीकरण | ९३ |
| ३.४ | महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचे प्रादेशिक असमतोलाबाबतचे वर्गीकरण | ९५ |
| ३.५ | महाराष्ट्रातील प्रादेशिक शेती उत्पन्नातील वार्षिक व संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दराची स्थिती | ९७ |
| ३.६ | महाराष्ट्रातील विभागीय जलाशये, प्रकल्पीय साठा व उपयुक्त साठा आणि प्रादेशिक असमतोल | ९९ |
| ३.७ | महाराष्ट्रातील विभागनिहाय जलसिंचनाचा अनुशेष | १०३ |
| ३.८ | महाराष्ट्रातील सहकारी औद्योगिक वसाहतीचे वर्गीकरण | १०५ |
| ३.९ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या गुंतवणूकीतील तफावत | ११० |
| ३.१० | विभागीय शिक्षण विषयक निर्देशांक व घटक | ११२ |
| ३.११ | सार्वजनिक बांधकाम विभागाने साध्य केलेली रस्ते निर्मिती | ११४ |
| ३.१२ | प्रादेशिक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता | ११६ |

| | | |
|---|---|---|
| ४.१ | कोकण विभागातील लोकसंख्यचे वर्गीकरण | १३६ |
| ४.२ | दरडोई उत्पन्न | १३८ |
| ४.३ | कोकण विभागातील एकूण पिकाखालील क्षेत्र | १४१ |
| ४.४ | कोकण विभागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची स्थिती | १४३ |
| ४.५ | कोकणातील वीज वापराची तफावत | १४५ |
| ४.६ | औद्योगिक क्षेत्रातील कार्यरत कारखाने व कामगार यातील तफावत | १४७ |
| ४.७ | कोकणातील मत्स्य उत्पादन | १५० |
| ४.८ | कोकण विभागातील पशुधन उपलब्धतेतील तफावतीचे विश्लेषण | १५३ |
| ४.९ | कोकणातील बँक सेवा क्षेत्रातील तफावत | १५५ |
| ४.१० | कोकण विभागातील डाक कार्यालये | १५८ |
| ४.११ | कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सुविधाबाबतची स्थिती | १६० |
| ४.१२ | प्राथमिक शाळांची उपलब्धता | १६२ |
| ४.१३ | महाविद्यालयांची उपलब्धता | १६४ |
| ५.१ | नमुनाकुटुंब प्रमुखांचे प्रवर्ग निहाय वर्गीकरण | १६९ |
| ५.२ | नमुना कुटुंबातील एकूण व्यक्तींचे वयोगटानुसार वर्गीकरण | १७१ |
| ५.३ | कोकण विभागातील शैक्षणिक पातळीचे विश्लेषण | १७३ |
| ५.४ | कुटुंबाच्या राहण्याच्या सुविधाबाबतची माहिती | १७५ |
| ५.५ | पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतची माहिती | १७७ |
| ५.६ | स्वच्छता विषयक सुविधांची माहिती | १७९ |
| ५.७ | भौतिक सुविधांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण | १८१ |
| ५.८ | शेतजमीनीची माहिती | १८२ |
| ५.९ | कुटुंब प्रमुखांच्या उपत्नाच्या मार्गाचे वर्गीकरण | १८४ |
| ५.१० | कुटुंबप्रमुखांच्या शेती उत्पन्नाचे स्वरूप | १८६ |
| ५.११ | कोकण विभागातील कुटुंबाच्या खर्चाबाबतची माहिती | १८९ |
| ५.१२ | कोकणातील रस्त्याबाबतची माहिती | १९० |

| | | |
|---|---|---|
| ५.१३ | कोकण विभागातील रस्त्यांच्या देखभालीच्या कालावधीबाबतची माहिती | १९१ |
| ५.१४ | दळणवळण व संदेश वहन साधनांची उपलब्धता | १९३ |
| ५.१५ | आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण | १९७ |
| ५.१६ | शैक्षणिक सुविधांची उपलब्धता | २०० |
| ५.१७ | कोकण विभागातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक अडचणीबाबतची माहिती | २०१ |
| ५.१८ | कोकणातील रोजगार संधीबाबतची माहिती | २०५ |
| ५.१९ | स्थलांतराचे स्वरूप | २०६ |
| ५.२० | शेतीच्या मागासलेपणाचे स्वरूप | २०८ |
| ५.२१ | परिसराच्या मागासलेपणाची कारणे | २१० |
| ५.२२ | प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना | २१२ |
| ५.२३ | मागासलेल्या व प्रगत गावांची माहिती | २१४ |
| ५.२४ | औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील अडथळे | २२६ |

# आलेखसूची


| आलेख क्र. | आलेखाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.१ | सर्वेक्षित गावांचे भौगोलिक स्थान | ३२ |
| ५.१ | नमुना कुटुंब प्रमुखांचे प्रवर्ग निहाय वर्गीकरण | १७० |
| ५.२ | नमुना कुटुंबातील एकूण व्यक्तींचे वयोगटानुसार वर्गीकरण | १७२ |
| ५.३ | कुटुंबाच्या राहण्याच्या सुविधाबाबतची माहिती | १७६ |
| ५.४ | पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतची माहिती | १७८ |
| ५.५ | स्वच्छता विषयक सुविधांचे वर्गीकरण | १८० |
| ५.६ | शेतजमीनीबाबतचे वर्गीकरण | १८३ |
| ५.७ | कुटुंब प्रमुखांच्या उपत्नाच्या मार्गाचे वर्गीकरण | १८५ |
| ५.८ | कुटुंब प्रमुखांच्या शेती उत्पन्नाचे वर्गीकरण | १८८ |
| ५.९ | दळणवळण व संदेश वहन साधनांची उपलब्धता | १९४ |
| ५.१० | आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण | १९८ |
| ५.११ | कोकण विभागातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक अडचणीबाबतची माहिती | २०२ |
| ५.१२ | शेतीच्या मागासलेपणाची कारणे | २०९ |
| ५.१३ | परिसराच्या मागासलेपणाची कारणे | २११ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना व संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना

विसाव्या शतकात आर्थिक विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विकासाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. युद्धानंतर पुनर्निमाण हा काही देशांपुढे प्रश्न होता तर परकीय राजवटीतून मुक्त झालेल्या भारतासारख्या अनेक देशांपुढे मागासलेपणा दूर करण्याचा प्रश्न होता. 'आर्थिक विकास' हे या प्रश्नांचे उत्तर असले तरी पूर्वीसारखी परिस्थिती आता नाही. वसाहतवादी देशांनी शोषण केल्यामुळे आलेली निर्धनता, वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले दारिद्र्य, विकासासाठी अत्यावश्यक संसाधनासाठी निर्माण झालेली तीव्र स्पर्धा असे गंभीर प्रश्न विकास करू इच्छिणाऱ्या राष्ट्रांपुढे होते. पूर्वीच्या काळी आर्थिक विकास म्हणजे 'औद्योगिकरण' असे साधे समीकरण मांडले जात असे. यानुसार देशातील कार्यकारी लोकसंख्येचे शेतीवरील अवलंबित्त्व ८०% वरून २०% पर्यंत कमी करणे म्हणजे आर्थिक विकास होय. शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या इतर क्षेत्रांकडे वळविण्यासाठी उद्योगांचा विकास आवश्यक आहे. विकास घडवून आणण्यासाठी निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येचे स्थानांतर आधुनिक क्षेत्रात केले जात असे परिणामी पडून असलेली संपत्ती उपयोगात येऊन उत्पादन वाढते. या धारणेमुळे आर्थिक विकासाचे दुसरे नाव 'औद्योगिकरण' असे करण्यात आले.[१]

निसर्गात अनेक बाबतीत विविधता आहे. लोकसंख्या, प्रदेशरचना, स्थिती इ. बाबतीत फरक आढळतो, याला 'विविधता' असे म्हणतात. मानव नेहमी आपल्या विकासाचा मार्ग शोधत असतो. विकास करत असताना निसर्गाच्या बळजबरीपणाचा कमीत कमी कसा परिणाम होईल हे पाहत असतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक बाबतीत फरक असतो यालाच 'विषमता' असे म्हणतात. या सर्वांमध्ये आर्थिक विषमता ही निसर्गामध्ये फारच जटील बनली आहे व ती सध्याच्या आधुनिक जगाचा महत्त्वाचा विषय बनली आहे. आर्थिक विषमतेमुळे इतर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. म्हणूनच आर्थिक विषमता कमी केल्यास समता प्रस्थापित होण्यास मदत होते.

विकसनशील देशामध्ये आर्थिक विषमता ही विकासातील अडथळा ठरते. ज्यामुळे अशा देशांचे नियोजन विकास आराखडे आणि प्रत्यक्ष फलश्रुती यांच्यातील दरी रूंदावत जाऊन तेथील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जडण–घडण बिघडून ताण–तणाव निर्माण होतात. यातूनच विकासाच्या प्रक्रियेतही प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.[२]

## १.२. प्रादेशिक असमतोलाची संकल्पना :

'प्रदेश' म्हणजे समान गुण समान नैसर्गिक स्वरूप असणारे क्षेत्र होय. प्रदेश ही गतिमान संकल्पना आहे. एखाद्या भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या मानवाच्या प्रगतीसाठी आर्थिक, सामाजिक, भौगोलिक स्थितीच्या संदर्भात विषमता कमी करण्याच्या दृष्टीने जे नियोजन केले जाते त्याला 'प्रादेशिक नियोजन' असे म्हणतात. विविध देश किंवा प्रदेशाच्या आर्थिक विकासात एक प्रमुख समस्या निर्माण झाली आहे, ती म्हणजे विषमता होय. प्रत्येक देशाच्या प्रदेशाचा विकास एकसारखा आढळत नाही. काही प्रदेशात विकासात गतिमानता आढळते तर काही प्रदेशात विकासाची गतिमानता कमी आढळते, यालाच 'प्रादेशिक विषमता' किंवा 'प्रादेशिक असमतोल' असे म्हणतात.

प्रादेशिक विषमता ही साधनसंपत्तीचे असमान वितरण किंवा उपलब्धता, आर्थिक विकासाचे घटक आणि त्यांचा विकासाच्या प्रक्रियेत कमी–अधिक वापर यामुळे निर्माण होते. प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यास नैसर्गिक व मानवी घटकही कारणीभूत ठरतात. साधनसंपत्तीच्या असंतुलनातून आणि असमान विकास प्रक्रियेतून निर्माण होणारी प्रादेशिक विषमता ही राज्यांतर्गत, समग्र आणि खंडीय असू शकते. प्रादेशिक असमतोल ही जागतिक पातळीवरील एक महत्त्वाची समस्या आहे. प्रादेशिक असमतोलाची समस्या जगातील विकसित व अविकसित अशा दोन्हीही प्रकारांच्या देशांमध्ये असल्याचे दिसते. एवढेच नाही, तर रशिया व चीनसारख्या समाजवादी देशांमध्येही प्रादेशिक विषमतेची समस्या असल्याचे दिसते. सध्या जगातील काही देशांनी विकासाची अत्युच्च पातळी गाठली आहे. तर काही देश विकासासाठी धडपडत आहेत. काही देश विकासात बरेच मागे आहेत. भारतात पंजाब, गुजरात, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू,आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल या घटक राज्यांनी विकासात उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. आसाम, राजस्थान, ओरिसा, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश ही राज्ये विकासात अद्यापही मागे आहेत.

जागतिक बँकेने भारतातील बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश या राज्यांना 'बिमारू राज्ये' म्हणून घोषित केलेले आहे. या राज्यात अतितीव्र विषमता आहे. यावरून भारतातील आर्थिक प्रादेशिक विषमता लक्षात येते. मात्र या राज्यांचा विकास झाला तर भारत भविष्यात महासत्ता बनू शकतो, असे मत जागतिक बँकेने नोंदविले आहे.[३]

**१.२.१ प्रादेशिक असमतोलाच्या व्याख्या :** प्रादेशिक असमतोलाची संकल्पना अधिक योग्यरितीने स्पष्ट होण्यासाठी पुढील व्याख्यांचा आधार घेणे उचित ठरेल.

१) **अर्थशास्त्र कोष –**''प्रादेशिक असमतोल म्हणजे निरनिराळ्या प्रदेशातील आर्थिक विकासाचा असमतोल होय. ज्याप्रमाणे समाजात व्यक्तीगत उत्पन्नात तफावत असते त्याचप्रमाणे काही प्रदेश आर्थिकदृष्ट्या खूप प्रगती करतात व इतर प्रदेश मागास राहतात. याचा परिणाम म्हणजेच प्रादेशिक असमतोल होय.''[४]

२) **कुलकर्णी प्रभाकर रामचंद्र** यांच्या मते ''तुलनात्मक दृष्ट्या विकसित प्रदेश आणि अविकसित प्रदेश यांचे सहअस्तित्त्व एकाच देशात असेल तर अशा स्थितीला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात.''[५]

३) **बहिर लक्ष्मण** यांच्या मते, ''देशातील विभिन्न लोक व विभाग यांच्यामध्ये आर्थिक विकासाच्या पाळांचे असमान वितरण व त्यामुळे आर्थिक विकासात विषमता व असमानता निर्माण होणे म्हणजे प्रादेशिक विषमता होय.''[६]

४) **रायखेलकर ए. आर, दामजी बी.एच.** यांच्या मते प्रादेशिक असमतोल म्हणजे , ''जेव्हा देशातील सर्व प्रदेशाचा, विभागाचा सारखाच विकास न होता काही विभागाचा, प्रदेशाचा विकास होता तर काही विभाग, प्रदेश मागास राहतात तेव्हा त्यास 'प्रादेशिक असमतोल विकास' असे म्हणतात.''[७]

नैसर्गिक संपत्तीची कमतरता, निरक्षरांचे मोठे प्रमाण, उद्यमशीलतेचा अभाव व भांडवलशाहीची कमतरता ही प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची मुलभूत कारणे होत. कोणत्याही देशातील प्रादेशिक असमतोल योग्य धोरणे आखून कमी करता येतो, पण तो पूर्णपणे दूर करता येत नाही.'[४]

प्रत्येक राष्ट्रात काही भाग पुढारलेला तर काही भाग मागासलेला असतो. सामान्यत: आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान झाल्यानंतर सर्व राज्यांचा व प्रदेशाचा विकास

साधण्याचा प्रयत्न केला जातो. सरकार 'संतुलित प्रादेशिक विकास' साधण्याचे ध्येय बाळगते. प्रादेशिक संतुलनात सर्व प्रदेशांचा समान विकास साधणे अभिप्रेत नसते. सर्व प्रदेशातील उद्योगांचा एकसमान विकास घडवून आणणे यात अपेक्षित नसते. साधारणपणे बिघडलेल्या प्रदेशात उद्योगधंदे सुरू करून त्या भागाच्या विकासाला प्रोत्साहन देणे, तेथील लोकांचा जीवनस्तर उंचावणे आणि मागासलेल्या व पुढारलेल्या भागातील लोकांच्या जीवनमानातील तफावत दूर करणे याला 'प्रादेशिक संतुलन' म्हणतात. मागासलेल्या प्रदेशात शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण यांना उत्तेजन देऊन प्रादेशिक संतुलन साधता येते.

### १.२.२ प्रादेशिक असमतोलाचे सैद्धांतिक विवेचन

प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न हा केवळ एखाद्या राज्यापुरताच मर्यादित नसून त्याचे अस्तित्त्व आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय व राज्य पातळीवरही असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट होते. जगातील प्रत्येक देशात प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न अस्तित्त्वात असून अमेरिका, इंग्लंड, इटली, स्पेन इत्यादी प्रगत देशसुद्धा यातून सुटलेले नाहीत. ज्याप्रमाणे गरीब आणि श्रीमंत वर्गाच्या उत्पन्न पातळीत अनेक कारणांमुळे उदा. शिक्षण, कौशल्य, संपत्ती फार मोठी तफावत आढळते. तसेच प्रदेशा–प्रदेशामध्ये काही मुलभूत कारणांमुळे उदा. नैसर्गिक संपत्ती, जमीन, भांडवल, उद्योजकता प्रादेशिक असमतोल निर्माण होणे अपरिहार्य ठरते. एक गोष्ट येथे स्पष्ट करावयास हवी, ती म्हणजे गरीब आणि श्रीमंत गटांच्या उत्पन्नातील विषमता जशी पूर्णपणे दूर करता येत नाही, त्याचप्रमाणे विकसित आणि अविकसित प्रदेशातील असमतोल पूर्णपणे दूर करणे अशक्य असते. परंतु योग्य प्रकारची आर्थिक धोरणे राबवून हा असमतोल शक्य तेवढा कमी करणे मात्र सहज शक्य असते, हे येथे नमुद करावयास हवे. अशा प्रकारचा प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे उपाय प्रगत आणि विकसनशील देशांमध्ये सातत्याने चालू असून भारतही त्याला अपवाद नाही. या संदर्भात पुढील ३ दृष्टीकोन विचारात घेणे उचित ठरेल.

**१. सायमन कुझनेट** : सायमन कुझनेट या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रादेशिक असमतोल का निर्माण होतो याचा अभ्यास केला आहे. सायमन कुझनेट यांच्या सिद्धांताप्रमाणे, भांडवलशाही स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेत सुरूवातीच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतच, देशातील प्रादेशिक असमतोल वाढत जातो व ती अर्थव्यवस्था पूर्ण विकासाच्या

टप्प्यावर येईपर्यंत ही प्रक्रिया चालूच राहते. परंतु त्यानंतर मात्र प्रादेशिक असमतोल हळूहळू कमी होत जातो. अर्थातच एवढी विकासाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी त्या अर्थव्यवस्थेस दीर्घकाळातून जावे लागते. (५० ते १०० वर्ष) कुझनेट यांनी अनेक भांडवलशाही देशांच्या अर्थव्यवस्थेचा दीर्घकालीन अभ्यास करून हा सिद्धांत मांडला आहे. त्यांनी मांडलेला असमतोलाचा वक्र उलट्या इंग्रजी यु आकाराचा आहे.

**२. जे.जी. विल्यमसन :** जे.जी. विल्यमसन यांनी अमेरिकेतील ४८ राज्यांत प्रादेशिक असमतोल किती प्रमाणात आहे हे दरडोई उत्पन्नाच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे. सायमन कुझनेट यांच्या सिद्धांतांची पडताळणी करून पाहण्याचा प्रयत्न नंतरच्या काळात अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केला त्यामध्ये जे.जी. विल्यमसन यांचा अमेरिकेतील राज्याराज्यातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास महत्त्वपूर्ण समजला जातो. राज्याचे दरडोई उत्पन्न व लोकसंख्या या प्रमुख बल घटकांच्या सहाय्याने विल्यमसन यांनी 'असमतोल गुणकाच्या' सहाय्याने प्रादेशिक असमतोलाचे मापन केले.

**३) जी.ऑफ्रे जे.टी.टी. विंग्ज :**जी.ऑफ्रे जे.टी.टी. विंग्ज यांनी उच्च विकासदराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक उद्दिष्ट साध्य करण्याचे मत व्यक्त केले आहे. या ब्रिटीश अर्थतज्ञाने आपल्या ग्रंथात प्रादेशिक असमतोलाची सैद्धांतिक बाजू अतिशय उत्तम रितीने मांडली आहे. त्यांच्या मते कोणत्याही देशात भांडवली गुंतवणूक करताना सरकारला उच्च विकासदराचे उद्दिष्ट साध्य करताना सामाजिक उद्दिष्टाकडे कानाडोळा करून चालणार नाही. मोठ्या विकासदराचे राष्ट्रीय उद्दिष्ट कार्यक्षमतेशी निगडीत असते. तर अविकसित प्रदेशाच्या विकासाचे उद्दिष्ट हे सामाजिक न्यायावर आधारलेले असते. साहजिकच भांडवल गुंतवणूकीवर मिळणारा परतावा अविकसित प्रदेशात कमी असतो. त्यामुळे उच्च विकासदर उद्दिष्ट व सामाजिक न्याय प्रादेशिक उद्दिष्ट या दोन उद्दिष्टात परस्पर विरोध असतो असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे मागास प्रदेशाचा विकास करावयाचा झाल्यास एकूण गुंतवणूकीचा योग्य तो वाटा प्रगत प्रदेशाकडून मागास प्रदेशाकडे वळविणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही क्षणी एकूण भांडवलाचा साठा हा सिमित असतो. अर्थात असे धोरण अंमलात आणल्यास राष्ट्रीय व राज्य पातळीवरील सर्व साधारण विकासदरात घट होणार हे उघड आहे. विकास दरातील ही घट म्हणजे सामाजिक न्यायासाठी दिलेली किंमत होय.

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी वरील सिद्धांतांचा स्विकार करणे आवश्यक आहे असे मला वाटते. महाराष्ट्र सरकारने पंचवार्षिक योजनेच्या सहाय्याने मागासप्रदेशांच्या विकासासाठी कालबद्ध विकास योजनांची तरतूद केली आहे. [८]

**१.२.३ प्रादेशिक संतुलनाचे महत्त्व** : प्रादेशिक संतुलनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर** : विकासाबाबत प्रादेशिक संतुलन साध्य झाल्यास साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करता येतो. डॉ. आर. बाळकृष्ण म्हणतात की, ‘साधनांच्या पर्याप्त वापराची कार्यक्षमता निर्माण करणे हे प्रादेशिक संतुलनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. संतुलित प्रादेशिक विकास साधताना साधनांचा पर्याप्त वापर होतो. साधनसंपत्तीचा अपव्यय टाळला जातो. मागास प्रदेशाच्या विकासाच्या उद्देशाने अनेक उद्योगधंदे काढले जातात. अशा उद्योगांमुळे संसाधने पूर्ण कार्यक्षमतेने वापरली जातात. जलसंपत्ती, खनिजे, इतर नैसर्गिक साधने, मानवी संसाधने यांचा कार्यक्षम वापर होण्यास चालना मिळते.’

**२) रोजगार निर्मिती** : मागासलेल्या भागातील लोकांचे उत्पन्न अल्प असते. उत्पादन पातळी व रोजगार निर्मिती कमी असते. मागास भागाच्या विकासासाठी तेथे पायाभूत सोयींचे प्रमाण वाढविल्यास निरनिराळ्या उद्योगांची वाढ होते. औद्योगिकरणाला चालना मिळून रोजगार निर्मिती वाढते.

**३) प्रतिसारक परिणाम टाळण्यासाठी** : प्रा. मिर्डाल यांच्या मते,एखाद्या प्रदेशातील विकासाचे विपरीत परिणाम जेव्हा इतर प्रदेशांवर घडून येतात तेव्हा त्यांना ‘प्रतिसारक परिणाम’ असे म्हणतात. भांडवलशाहीमुळे अधिक नफा मिळवून देणाऱ्या क्षेत्रात अधिक गुंतवणूक केली जाते, अशा ठिकाणी उद्योग, व्यापार, बँका, वाहतूक, दळणवळण इत्यादींचे केंद्रीकरण होते. अशा भागाचा जलद विकास घडून येतो. इतर प्रदेशातील श्रमिक भांडवल व व्यापार यांचे विकसित प्रदेशाकडे स्थलांतर होते. यामुळे इतर प्रदेशाचा विकास मागे पडतो. परिणामी आर्थिक विषमता वाढते. यासाठी सरकारने हस्तक्षेप करून योग्य धोरणांद्वारे प्रादेशिक संतुलन साधून या परिणामाचा प्रभाव कमी करणे आवश्यक आहे.

**४) परस्पर सहकार्याने विकास** : सर्व प्रदेशाचा योग्य विकास घडून आला तर एकमेकांच्या सहकार्याने विकासाचा वेग वाढविता येतो. आर्थिक विषमता असल्यास मागास प्रदेशातील लोकांचे उत्पन्न कमी असल्याने त्यांच्याकडून येणारी मागणी कमी राहते. पुरेशा मागणीच्या

कमतरतेने विकसित प्रदेशांच्या विकासावर मर्यादा पडतात. जर संतुलित प्रादेशिक विकास झाला तर राष्ट्रीय पातळीवरील मागणीप्रमाणे पुरवठा वाढविता येतो. याद्वारे चलनवाढीचा दर कमी करणे शक्य होते.

**५) केंद्रीकरणाचे तोटे टाळण्यासाठी** : देशाचा आर्थिक विकास असंतुलित असेल तर ठराविक ठिकाणी उद्योगांचे केंद्रीकरण होते. केंद्रीकरणाच्या ठिकाणी लोकांची गर्दी वाढते. गलिच्छ वस्त्या व झोपडपट्ट्या निर्माण होतात. आरोग्याच्या सोयीवर ताण पडतो. भाववाढीमुळे सर्वसामान्य व्यक्तींना किंवा श्रमिकांना दैनंदिन जीवन जगणे कठीण जाते. यासाठी समतोल विकासाची गरज असते.

**६) राजकीय स्थैर्य** : उत्पन्न, संपत्ती व विकास याबाबत प्रदेशा प्रदेशामध्ये तफावत असल्यास राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण होतो. मागासलेले प्रदेश संघराज्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला तडे जाण्याची भीती असते. राजकीय स्थैर्य व एकसंघ भावना टिकवून ठेवण्याकरिता संतुलित प्रादेशिक विकासाला महत्त्व देण्यात येते.

**७) सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्व** : काही प्रदेश प्रगत आणि काही प्रदेश मागासलेले असतील तर युद्धजन्य परिस्थितीत शत्रू राष्ट्र अशा प्रगत प्रदेशावर हल्ला करण्याची भीती असते. यांमुळे संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था संकटात सापडू शकते. सर्व प्रदेशाचा चांगला विकास झालेला असेल, सर्वत्र उद्योगधंदे निघाले असतील तर शत्रू राष्ट्रांच्या हल्ल्याने फार मोठे नुकसान होत नाही. यावरून सुरक्षितता व संरक्षणाच्या दृष्टीने संतुलित प्रादेशिक विकास महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट होते.

**८) जलद आर्थिक विकास** : राष्ट्राचा आर्थिक विकास सर्व प्रदेशांच्या विकासावर अवलंबून असतो. प्रत्येक प्रदेशाने आपल्याकडील साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर केल्यास सर्व राज्यांचा व प्रदेशांचा विकास होतो. यामुळे एकंदरीत संपूर्ण देशाचा आर्थिक विकास घडून येतो. यामुळे संतुलित विकास महत्त्वाचा असतो.

**१.२.४ प्रादेशिक असमतोलाची कारणे** : दांडेकर समितीने प्रादेशिक असमतोलाची पुढील कारणे दिलेली आहेत.

**१) पायाभूत सुविधांचा असमान विकास** : राज्यातील विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याबाबत रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणी, वीज यासारख्या पायाभूत सुविधांची असमान

उपलब्धता कारणीभूत आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या भागात या सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे जास्त विकास झाला. तर इतर भागात कमी विकास झालेला आढळतो.

**२) बँका व वित्तीय संस्थांची असमान वाढ** : महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे या जिल्ह्यांच्या ठिकाणीच बँका व वित्तीय संस्थांचे केंद्रीकरण झालेले आढळते. साहजिकच या भागात उद्योग सुरू केले तर कर्जपुरवठा उपलब्ध होण्यात अडचणी येत नाहीत. उदा. मार्च २०१० अखेर मुंबईत १३% लोकसंख्या होती. व्यापारी बँकांच्या शाखा २१% होत्या. एकूण ठेवी ७५% गोळा झालेल्या होत्या. ७८% कर्जवाटप झालेले होते. याउलट विदर्भात २२% लोकसंख्या २०% बँकशाखा उपलब्ध होत्या. ५% ठेवी निर्माण होऊन ५% कर्ज वाटप झाले होते. याचाच अर्थ बँकांच्या शाखांची असमान वाढ झाल्यामुळे राज्यात प्रादेशिक असमतोल वाढला आहे.

**३) जलसाठवणूक व वितरण सोयींची असमान उपलब्धता** : पाणी हा अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक असणारा मूलभूत घटक आहे. राज्यात पाणी साठवणारे तलाव, पाण्याचे वितरण करणारे पाट यांच्या सोयी सारख्या प्रमाणात नाहीत. विदर्भ–मराठवाड्याच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात या सोयी जास्त प्रमाणात आहेत. त्यामुळे या भागात जलसिंचनाखालील क्षेत्र वाढ होऊन आर्थिक विकासाला मदत झालेली आहे. मराठवाडा, विदर्भ या भागात जलसिंचन सुविधांच्या अभावी मागासलेला असल्याचे दिसते. जलसिंचनाचा अनुशेष दांडेकर समितीने १३८६ कोटी रू. निश्चित केला असून कोकण, विदर्भ, मराठवाडा यांचा एकत्रित अनुशेष ९५० कोटी रू. आहे.

**४) राजकीय नेतृत्त्व** : राज्याला लाभलेले राजकीय नेतृत्त्व कोणत्याही प्रदेशातील असले तरी आजपर्यंत त्या नेतृत्त्वावर पश्चिम महाराष्ट्राचा दबाव राहिला आहे. त्यामुळे विकासाबाबतची धोरणे तयार करताना आणि राबवताना त्याची सुरूवात पश्चिम महाराष्ट्रापासून झालेली दिसते. आजही पश्चिम महाराष्ट्राच्या विकासासाठी उर्वरित महाराष्ट्राचा निधी वळवला जातो, अशी विरोधकांकडून ओरड होते. यामध्ये तथ्य आहे. विदर्भ, मराठवाडा या भागातील लोकांचा फारसा राजकीय प्रभाव नसल्याने हा भाग मागासलेला आढळतो

**५) शासकीय धोरण** : उद्योग स्थापन करण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध असणाऱ्या भागातच उद्योग सुरू करण्याची परवानगी सरकार देते. जेथे पाणी, रस्ते, वीज, उपलब्ध आहे

तेथे परवाने मिळणे सुलभ होते. अशा ठिकाणी उद्योजकही उद्योग सुरू करण्यास पसंती देतात. त्यामुळे मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या भागात जास्त औद्योगिक प्रगती झालेली पाहायला मिळते. मात्र मराठवाडा, विदर्भ या भागातील प्रगती कमी झालेली दिसते.

**६) शैक्षणिक सुविधांची असमान उपलब्धता** : मानवी साधनसंपत्तीच्या विकासासाठी पुरेशा व दर्जेदार शैक्षणिक सुविधांची आवश्यकता असते. मानवी साधनसंपत्तीचा दर्जा चांगला असेल तर विकासाला चालना मिळते. शैक्षणिक सुविधांची उपलब्धता मुंबई,पुणे, ठाणे, नाशिक या भागातच जास्त प्रमाणात आढळते. इतर भागात शैक्षणिक सुविधांचे प्रमाण गरजेपेक्षाही कमी आहे. इतर ठिकाणच्या शैक्षणिक दर्जाबाबत शंकाही निर्माण झाल्या आहेत. थोडक्यात, महाराष्ट्रात कौशल्यपूर्ण शिक्षणाचा अभाव जाणवतो. शैक्षणिक सेवांचा मोठा असमतोल असल्याने राज्याच्या आर्थिक विकासातही असमतोल निर्माण झाला आहे.

**७) सहकाराचा एकांगी विकास** : महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने पश्चिम महाराष्ट्रात रूजली आणि वाढली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सहकारी पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतामुळे येथील शेतीचा विकास इतर भागाच्या तुलनेत अधिक झाला. परिणामी शेती उत्पादनावर आधारित असणारे अनेक उद्योगधंदे याच भागात स्थापन झाले आहेत. उदा. साखर कारखाने व त्यामुळे वित्तीय संस्थांची स्थापना याच भागात झाली. सहकारी तत्त्वावरील अनेक संस्था पश्चिम महाराष्ट्रात स्थापन झाल्या. उदा. कोल्हापूर विभागात ४९, पुणे विभागात २९, औरंगाबाद विभागात २०, लातूर विभागात ३२, अमरावती विभागात ०५ आणि नागपूर विभागात ०५ सहकारी साखर कारखाने ३१ मार्च २०१० अखेर होते. लातूर विभागात ३२ साखर कारखाने असले तरी या विभागातील नांदेड जिल्ह्यात फक्त चारच साखर कारखाने आहेत. सहकाराच्या असमान वाढीमुळे राज्याचा विकास असंतुलित झालेला आढळतो.

**८) आरोग्य सेवांमधील असमतोल** : राज्यांत निरनिराळ्या जिल्ह्यांत आरोग्य सेवांचा असमतोल आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, सरकारी रूग्णालये यांची पुरेशी उपलब्धता आढळत नाही. दांडेकर समितीने या संदर्भातील निकष वापरला आहे. आरोग्य सेवेच्या बाबतीत राज्यात, कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यात असणारा अनुशेष अनुक्रमे ६.५ कोटी रू., २७ कोटी रू., ४७ कोटी रू. आहे. या असमतोलामुळे येथील जनतेला योग्य वेळी, योग्य ठिकाणी व दर्जेदार

आरोग्य सेवा उपलब्ध होत नाहीत. याचा मानवी साधनसंपत्तीवर आणि अर्थव्यवस्थेच्या विकासावर परिणाम होतो.

**९) शेती क्षेत्रातील असंतुलित विकास** : महाराष्ट्राच्या शेतीचा असंतुलित विकास झालेला आहे. कालवे, भूजल, विहीरी यांची संख्या विदर्भात कमी आहे. भू–विकास, बांधबंदिस्ती, पाटबंधारे प्रकल्प यांची कामे अपुरी आहेत. त्यामुळे विदर्भातील मराठवाड्यातील शेती मागासलेली आढळते. पश्चिम महाराष्ट्रातील शेतीचा जास्त विकास झाला आहे. कोकणातील शेती व्यवसाय पुरेशा प्रमाणात विकसित झाला नाही. शेतीच्या असमान विकासामुळे आर्थिक विकासातही मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल झालेला आढळतो.[९]

## १.३ भारतातील प्रादेशिक असंतुलनाचे स्वरूप :

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने संतुलित प्रादेशिक विकास साधण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत. तरीही प्रादेशिक असंतुलन मोठ्या प्रमाणात आढळतो. प्रदेशांचे दरडोई उत्पन्न, कृषी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, आर्थिक संरचना, सामाजिक संरचना या निकषांवरून विभागीय असमतोल कसा आहे हे स्पष्ट करता येते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात बरीच वाढ झाली आहे तरी ही वाढ समतोल पद्धतीने झाल्याचे दिसत नाही. नियोजनाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, हरियाणा ही राज्ये खूपच विकसित झाली असून त्यामानाने बिहार, ओरीसा, मध्यप्रदेश, राजस्थान ही राज्ये बरीच मागास राहीली आहेत. यावरून भारतातील विभागीय असमतोल दिसून येतो. भारतातील काही राज्ये शेती, उद्योग, व्यापार या सर्व क्षेत्रांमध्ये भरभराटीत आलेली दिसतात. तर काही राज्यात शेतीशिवाय इतर व्यवसायांचे अस्तित्त्वच नाही. सरकारने नियोजन काळात प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी कृषी व औद्योगिक क्षेत्र यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. देशातील शेती उत्पन्नातील तफावतीबाबत आर्थिक आणि शास्त्रीय अनुसंधान संस्थेच्या मते, १९६०–६१ ते १९७०–७१ या दहा वर्षाच्या काळात पीक वाढीमुळे प्रगत राज्यातील शेतकऱ्यांना शेतीपासून अधिक उत्पन्न मिळाले. इतर राज्यातील शेतकऱ्यांना कमी उत्पन्न मिळाले. या दशकात शेती उत्पन्नाची राष्ट्रीय सरासरी १४२.६% वाढ झाली. पंजाबमध्ये हा दर २२४.२% होता. हरियाणामध्ये २२३.५%, गुजरात २०३%, राजस्थान २००% होता. कर्नाटक, जम्मू–काश्मीर, केरळ या राज्यांतील

शेती उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक होते. इतर राज्यातील शेती उत्पन्न मात्र राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होते.

### **१.३.१. भारतातील दारिद्र्याचा असमतोल :**

भारतात आर्थिक विषमता ही मोठ्या प्रमाणात आहे. दारिद्र्य प्रमाणानुसारही प्रादेशिक विषमतेचा विचार करता येतो. भारतातील आर्थिक दृष्ट्या प्रगत राज्यात दारिद्र्याचे प्रमाण कमी आहे तर मागासलेल्या राज्यात उदा. बिहार, उत्तरप्रदेश या ठिकाणी जास्त आहे. भारतातील राज्यनिहाय दारिद्र्याचे प्रमाण तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र. १.१**

**भारतातील दारिद्र्याचा असमतोल (२००९–१०)**

| • **प्रगत राज्ये** | **ग्रामीण (%)** | **शहरी (%)** | **एकूण(%)** |
|---|---|---|---|
| पंजाब | १४.०६ | १८.०१ | १५.०९ |
| महाराष्ट्र | २९.०५ | १८.०३ | २४.०५ |
| हरियाणा | १८.०६ | २३.०० | २०.०१ |
| गुजरात | २६.०७ | १७.०९ | २३.०० |
| पश्चिमबंगाल | २८.०८ | २२.०० | २६.०७ |
| कर्नाटक | २६.०१ | १९.०६ | २३.०६ |
| केरळ | १२.०० | १२.०१ | १२.०० |
| तामिळनाडू | २१.०२ | १२.०८ | १७.०१ |
| आंध्रप्रदेश | २२.०८ | १७.०७ | २१.०१ |
| • **मागासलेली राज्ये** | | | |
| मध्यप्रदेश | ४२.०० | २२.०९ | ३६.०७ |
| आसाम | ३९.०९ | २६.०१ | ३७.०९ |
| उत्तरप्रदेश | ३९.०४ | ३१.०७ | ३७.०७ |
| राजस्थान | २६.०४ | १९.०९ | २४.०८ |
| ओरिसा | ३९.०२ | २५.०९ | ३७.०० |
| बिहार | ५५.०३ | ३९.०४ | ५३.०५ |
| • **संपूर्ण भारत** | ३३.०८ | २०.०९ | २९.०८ |

* **स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१८) भारतीय अर्थव्यवस्था, ७२ वी आवृत्ती संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चांद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र.५२२

तक्ता क्र. १.१ मध्ये भारतातील दारिद्र्याबाबत ग्रामीण व शहरी वास्तविकता पाहिली आहे. भारतात दारिद्र्याचे एकूण प्रमाण २९.०८% असून त्यापैकी ग्रामीण भागात ३३.०८ टक्के तर शहरी भागात २०.०९% आहे. विकसित राज्यात दारिद्र्याचे प्रमाण भारतीय प्रमाणापेक्षा

कमी आहे. मागासलेल्या राज्यात राजस्थानचा अपवाद वगळता सर्वाधिक दारिद्र्य बिहारमध्ये ५३.०५% असून त्याखालोखाल आसाम, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा असा क्रम लागतो.

### १.३.२. प्रादेशिक असमतोलाचे निर्देशक :

प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी भारतातील १५ मोठ्या राज्यांचे आर्थिकदृष्ट्या विकसित आणि मागासलेले राज्ये असे वर्गीकरण करण्यात आले आहे. विकसित राज्यांमध्ये पंजाब, गुजरात, पश्चिमबंगाल, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश यांचा समावेश आहे. पश्चिम बंगालचा यात समावेश होण्याचे मुख्य कारण म्हणजे पश्चिम बंगालचे दरडोई उत्पन्न कर्नाटक व केरळपेक्षा अधिक आहे. तसेच साक्षरता (पुरूष व स्त्री दोन्ही), बालमृत्यूदर, मृत्यूदर आणि जन्मदर याबाबतीत इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. पश्चिम बंगालचे निव्वळ राज्यांतर्गत उत्पादनाचा वृद्धीदर केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांपेक्षा अधिक आहे. मागासलेल्या राज्यांमध्ये मध्यप्रदेश, आसाम, उत्तरप्रदेश, राजस्थान, ओरिसा, बिहार या राज्यांचा समावेश होतो. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ४२% लोकसंख्या मागासलेल्या राज्यात राहते तर ४८% लोकसंख्या विकसित राज्यात असल्याचे दिसून आले आहे. विकसित आणि मागासलेल्या १५ राज्यात एकूण ९०% लोकसंख्या राहते.

#### अ) निव्वळ देशांतर्गत उत्पादन –

प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप करताना निव्वळ देशांतर्गत उत्पादन हा महत्त्वाचा निर्देशक वापरला जातो. निव्वळ देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत विकसित राज्ये व मागासलेली राज्ये असे वर्गीकरण करण्यात येते. गुजरात राज्याचे निव्वळ देशांतर्गत उत्पादन सर्वाधिक १०.०% तर सर्वात कमी आसाम आणि ओरिसा या राज्याचे प्रत्येक ५.७% आहे. यावरून विकसित व मागास राज्यातील प्रादेशिक असमतोलाबाबत तफावत दिसून येते. देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत विकसित व मागासलेली राज्ये यांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक १.२ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक १.२**

**राज्यनिहाय निव्वळ देशांतर्गत उत्पादन** **(कोटी रू.)**

| **राज्ये** | **२००४–०५** | **२०१३–१४** | **वार्षिक वृद्धीदर २००४–०५ ते २०१३–१४ (टक्केवारीत)** |
|---|---|---|---|
| • **विकसित राज्ये** | | | |
| हरियाणा | ८६,२२२ | १,७८,४५८ | ८.४ |
| पंजाब | ८६,१०८ | १,४९,९४५ | ६.४ |
| महाराष्ट्र | ३,७०,०२३ | ८,११,२६८ | ९.१ |
| केरळ | १,०४,७७६ | १,९६,०७७ | ८.२ |
| गुजरात | १,७२,२६५ | ३,६८,९०७ | १०.० |
| तामिळनाडू | १,९३,६४५ | ४,२७,१८२ | ९.२ |
| आंध्रप्रदेश | २,०१,३०३ | ४,०५,४८२ | ८.१ |
| कर्नाटक | १,४८,७२९ | २,७५,५३१ | ७.१ |
| • **मागासलेली राज्ये** | | | |
| आसाम | ४७,१८१ | ७७,३७६ | ५.७ |
| राजस्थान | १,१२,६३६ | २,१२,५२३ | ७.३ |
| ओडिसा | ६७,९८७ | १,१२,२५३ | ५.७ |
| मध्यप्रदेश | ९९,९४० | २,०९,८०६ | ८.६ |
| उत्तरप्रदेश | २,३१,०२९ | ४,०३,५२३ | ६.४ |
| बिहार | ७०,१६७ | १,५८,११७ | ९.५ |

***स्त्रोत**– दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१८) भारतीय अर्थव्यवस्था, ७२वी आवृत्ती, एस. चांद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ट क्र. ५१८

तक्ता क्रमांक १.२. मध्ये भारतातील राज्यनिहाय निव्वळ देशांतर्गत उत्पादन दर्शविले आहे. विकसित राज्यांचे २००४–०५ ते २०१३–१४ या काळात विकसित राज्यांचे निव्वळ देशांतर्गत उत्पादनातील वृद्धीदर हरियाणा ८.४%, पंजाब ६.४%, महाराष्ट्र ९.१%, केरळ ८.२%, गुजरात १०.०%, तामिळनाडू ९.२%, आंध्रप्रदेश ८.१%, कर्नाटक ७.१% इतका आहे. मागासलेल्या राज्यांचा वृद्धीदर आसाम ५.७%, राजस्थान ७.३%, ओरिसा ५.७%, मध्यप्रदेश ८.६%, उत्तरप्रदेश ६.४%, बिहार ९.५% इतका असल्याचे आढळून येते. विकसित राज्याचा सरासरी वृद्धीदर ८.३१% तर मागास राज्याचा ७.२% इतका असल्याचे आढळून आले आहे .

### ब) दरडोई उत्पन्न –

दरडोई उत्पन्नाच्या संकल्पनेस आधुनिक अर्थशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचे कारण त्यावरून त्याप्रदेशातील सामान्य जनतेचे जीवनमान कोणत्या पातळीवर आहे हे समजते. दरडोई उत्पन्न हा निकष कोणत्याही राष्ट्रातील किंवा विभागातील जनतेचे

राहणीमान दर्शविणारा प्रमुख निकष आहे. या दृष्टीकोनातून पाहिल्यास भारतातील विविध राज्यात आणि महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागात दरडोई उत्पन्नात बदल होत गेले आहेत. महाराष्ट्राच्या बाबतीत विदर्भ व मराठवाडा विभाग पूर्वीपेक्षा मागे गेलेले असून उर्वरित महाराष्ट्राची स्थिती मात्र सुधारत असल्याचे चित्र स्पष्ट होते.

राज्यांतर्गत निव्वळ दरडोई उत्पनाची पातळी आणि त्याचा वृद्धीदर त्यातील तफावत हा देशाच्या आर्थिक विकासातील वाढत्या प्रादेशिक असमतोलाचा एक प्रमुख निर्देशक आहे. देशातील दरडोई उत्पन्नाच्या आधारे प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप केले जाते. विकसित राज्ये व मागासलेल्या राज्यातील दरडोई उत्पन्नाची तफावत पाहिल्यास राज्या राज्यातील प्रादेशिक असमतोल सहज लक्षात येतो. २००४–०५ ते २०१३–१४ याकाळातील दरडोई उत्पन्नाची विभागणी करण्यात आली आहे. विकसित आणि मागासलेली राज्ये यांच्या आधारे दरडोई उत्पन्नाचे वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक १.३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक १.३**

**दरडोई उत्पन्न** **(रूपयांत)**

| राज्ये | २००४–०५(%) | २०१३–१४(%) | वार्षिक वृद्धीदर २००४–०५ ते २०१३–१४ |
|---|---|---|---|
| **विकसित राज्ये** | | | |
| हरियाणा | ३७,९७२ | ६७,३१७ | ६.६ |
| पंजाब | ३३,१०३ | ४९,४११ | ४.६ |
| महाराष्ट्र | ३६,०७७ | ६९,५८४ | ७.६ |
| केरळ | ३१,८७१ | ५६,११५ | ७.३ |
| गुजरात | ३२,०२१ | ६१,२२० | ८.४ |
| तामिळनाडू | ३०,०६२ | ६२,३६१ | ८.४ |
| आंध्रप्रदेश | २५,३२१ | ४६,७८८ | ७.१ |
| कर्नाटक | २६,८८२ | ४५,०२४ | ५.९ |
| **मागासलेली राज्ये** | | | |
| आसाम | १६,७८२ | २४,५३३ | ४.३ |
| राजस्थान | १८,५६५ | ३०,१२० | ५.५ |
| ओरिसा | १७,६५० | २५,८९१ | ४.४ |
| मध्यप्रदेश | १५,४४२ | २७,९१७ | ६.८ |
| उत्तरप्रदेश | १२,९५० | १९,२३४ | ४.५ |
| बिहार | ७,९१४ | १५,६५० | ७.९ |

***स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१८) भारतीय अर्थव्यवस्था, ७२ वीआवृत्ती, एस. चांद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र.५१८

तक्ता क्रमांक १.३ मध्ये भारतातील देशांतर्गत राज्यीय दरडोई उत्पन्नाचे अध्ययन करण्यात आले आहे. २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील दरडोई उत्पन्नाचा वृद्धीदर विकसित राज्यांमध्ये सर्वाधिक गुजरात ८.४%, तामिळनाडू ८.४% असून त्याखालोखाल महाराष्ट्र७.६%, केरळ ७.३%, आंध्रप्रदेश ७.१%, हरियाणा ६.६% असा क्रम आहे. मागासलेल्या राज्यामध्ये सर्वात कमी आसामचा ४.३% इतका वृद्धीदर असून त्याखालोखाल ओरिसा ४.४%, उत्तरप्रदेश ४.५%, राजस्थान ५.५% मध्यप्रदेश ६.८%, बिहार ७.९% इतका असल्याचे दिसून येते. दरडोई उत्पन्नातील तफावतीवरून राज्यांतील आर्थिक असमतोल स्पष्ट होतो.

**क) योजना काळातील वृद्धीदर –**

पंचवार्षिक योजना काळातील राज्यांतर्गत उत्पादनाच्या वृद्धीचा उपयोग करून प्रादेशिक असमतोल मोजला जातो. योजना काळातील वृद्धीदराच्या बाबतीत झारखंड, छत्तीसगड, ओरिसा या मागासलेल्या राज्यात वृद्धीदरात वाढ होत गेली आहे. याचाच अर्थ प्रादेशिक असमतोल कमी होत असल्याचे स्पष्ट होते. तक्ता क्रमांक १.४ मध्ये आठवी योजना ते अकरावी पंचावार्षिक योजना या काळातील वृद्धीदर दर्शविला आहे.

### तक्ता क्रमांक १.४

### पंचवार्षिक योजना काळातील राज्यांतर्गत उत्पादनाचा वृद्धीदर (%)

| राज्ये | आठवी पंचवार्षिक योजना | नववी पंचवार्षिक योजना | दहावी पंचवार्षिक योजना | अकरावी पंचवार्षिक योजना |
|---|---|---|---|---|
| • **विकसित राज्ये** | | | | |
| गुजरात | १२.४ | ४.० | १०.६ | ९.६ |
| तामिळनाडू | ७.० | ६.३ | ८.० | ८.३ |
| महाराष्ट्र | ८.९ | ४.७ | ७.९ | ९.४ |
| गोवा | ८.९ | ५.५ | ७.८ | ८.९ |
| हरियाणा | ५.२ | ४.१ | ७.६ | ९.१ |
| केरळ | ६.५ | ५.७ | ७.२ | ८.० |
| कर्नाटक | ६.२ | ७.२ | ७.० | ८.० |
| आंध्रप्रदेश | ५.४ | ४.६ | ६.७ | ८.३ |
| पश्चिमबंगाल | ६.३ | ६.९ | ६.१ | ७.३ |
| पंजाब | ४.७ | ४.४ | ४.५ | ६.८ |
| • **मागासलेली राज्ये** | | | | |
| झारखंड | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | ११.१ | ७.० |
| छत्तीसगड | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | ९.२ | ८.४ |
| ओरिसा | २.१ | ५.१ | ९.१ | ८.२ |
| राजस्थान | ७.५ | ३.५ | ५.० | ७.७ |
| बिहार | २.२ | ४.० | ४.७ | १२.० |
| उत्तरप्रदेश | ४.९ | ४.० | ४.६ | ६.९ |
| मध्यप्रदेश | ६.३ | ४.० | ४.३ | ८.९ |
| भारत | ६.५ | ५.३ | ७.६ | ७.९ |

***स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, ५२वा संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चांद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८७

तक्ता क्रमांक १.४ मध्ये भारतातील प्रमुख राज्यांतील राज्यीय देशांतर्गत उत्पादनाचा पंचवार्षिक योजना काळातील वृद्धीदर दर्शविला आहे. गुजरातने अकराव्या पंचवार्षिक काळात ९.६% वृद्धीदर नोंदविला आहे. यानंतर महाराष्ट्र, हरियाणा, गोवा, तामिळनाडू, आंध्रप्रदेश केरळ आणि कनार्टक या सर्व राज्यांचा वृद्धीदर भारताच्या सरासरी वृद्धीदरापेक्षा (७.९%) अधिक आहे. पंजाब या राज्यात या योजना काळात वृद्धीदर ४.७% ते ६.८% या दरम्यान राहिला आहे. हा वृद्धीदर अतिशय कमी व निराशाजनक आहे. कारण ते १९६० ते १९७० च्या दशकात पंजाबमध्ये वृद्धीदर सर्वाधिक स्थानावर होता. पश्चिम बंगाल या राज्यात वृद्धीदर राष्ट्रीय वृद्धीदरापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

मागासलेल्या राज्यांचा विचार करता झारखंड, छत्तीसगड आणि ओरिसा या राज्यांचा वृद्धीदर वाढत आहे. राजस्थानच्या बाबतीत आठव्या योजना काळात ७.५% इतका वृद्धीदर निश्चित करण्यात आला. दहाव्या योजनेत मात्र ५.०% पर्यंत पोहोचला. उत्तरप्रदेश अजूनही वृद्धीदराच्या बाबतीत मागासलेला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, मागासलेल्या राज्यांत विकास दर वाढविण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रादेशिक असमतोल कमी करता येईल.

### ड)गुंतवणूक प्रस्ताव आणि सहाय्यतेसाठी निधी वाटप

योजना आयोगाचे डॉ. सी.टी. कुरियन यांनी भारतातील वाढत्या प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन केले आहे. यासाठी गुंतवणूक प्रस्ताव आणि त्यासाठी सहाय्यता निधी यांचा आधार घेतला. विकसित व अविकसित राज्यांतील गुंतवणूकीच्या प्रस्तावांची व निधीची टक्केवारी यांचे वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक १.५ मध्ये करण्यात आले आहे.

## तक्ता क्रमांक १.५.

## गुंतवणूक प्रस्ताव आणि निधी वितरण टक्केवारी

| राज्ये | गुंतवणूक प्रस्ताव | अखिल भारतीय संख्याद्वारे वित्तीय सहाय्यतेचा संचयी भाग | राज्य वित्तीय महामंडळ मार्फत वितरित निधीचा संचयी भाग |
|---|---|---|---|
| • **विकसित राज्ये** | | | |
| पंजाब | ३.४ | २.४ | ३.६ |
| महाराष्ट्र | १८.० | २१.० | ११.५ |
| हरियाणा | ३.६ | २.५ | ४.८ |
| गुजरात | १८.७ | १३.५ | ९.३ |
| पश्चिम बंगाल | ३.३ | ३.९ | २.५ |
| कर्नाटक | ५.६ | ६.१ | ११.५ |
| केरळ | १.१ | १.७ | ४.४ |
| तामिळनाडू | ७.२ | ९.० | १०.६ |
| आंध्रप्रदेश | ८.३ | ७.२ | ७.८ |
| एकूण | ६९.२ | ६७.३ | ७०.० |
| • **मागासलेले राज्ये** | | | |
| मध्यप्रदेश | ७.४ | ५.१ | ३.२ |
| आसाम | ०.७ | ०.५ | ०.५ |
| उत्तरप्रदेश | ९.४ | ७.९ | ११.१ |
| राजस्थान | ३.९ | ४.५ | ६.१ |
| ओरिसा | २.२ | १.८ | ३.७ |
| बिहार | १.२ | १.४ | २.० |
| एकूण | २४.८ | २१.२ | २६.६ |
| **संपूर्ण भारत** | **१००.० (७३७५१६)** | **१००.० (३१२५०२)** | **१००.० (२०८९६)** |

***स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, ५२वा संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८८

तक्ता क्रमांक १.५ मध्ये गुंतवणूक प्रस्ताव व निधीच्या वितरणाचे अध्ययन करण्यात आले आहे. गुंतवणूक प्रस्तावांचे केंद्रीकरण झाले आहे. गुंतवणूक प्रस्तावांचा २/३ (६९.२%) पेक्षा अधिक भाग विकसित राज्यांत केंद्रित झाला आहे. अखिल भारतीय वित्तीय संस्थांनी यामध्ये भारतीय औद्योगिक विकास बँक, भारतीय औद्योगिक वित्त निगम,

आय.सी.आय.सी.आय., भारतीय जीवन विमा निगम, सामान्य विमा निगम, भारतीय लघुउद्योग विकास बँक यांनी विकसित राज्यात ६७.३% निधीचे वितरण केले. ९ विकसित राज्यांपैकी महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू अणि आंध्रप्रदेश या राज्यांत ५१% हिस्सा मिळाला. राज्या वित्त महामंडळांनी ७०% निधी विकसित राज्यांत वितरित केला. आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेतही गुंतवणूक प्रस्ताव स्वीकारणे आणि वित्तीय निधीच्या वितरणातही विकसित राज्यांना महत्त्व दिले आहे. परिणामी विकसित राज्ये सुरूवातीपासूनच चांगल्या स्थितीत आहे. विकासाची प्रक्रिया ते त्वरित करू शकतात. मागासलेल्या राज्यात योग्य निधी प्राप्त झाल्यामुळे विकासाची गती कमी आहे. मागासलेल्या राज्यांचे निव्वळ राज्यांतर्गत उत्पादन आणि दरडोई उत्पन्न यांतील असमानतेवरून यांची कल्पना येते.

**इ) पायाभूत सुविधांची उपलब्धता–**

पायाभूत सुविधांमध्ये प्रतिव्यक्ती वीजेचा उपभोग हा महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. तसेच रेल्वे रस्ते यांची उपलब्धता, वाहतूकींच्या साधनांची उपलब्धता या आधारे पायाभूत सुविधांचा निर्देशांक तयार केला जातो. यामध्ये प्रामुख्याने परिवहन सुविधा, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, बँक, सिंचन आणि वीज या घटकांना महत्त्व दिले आहे. आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन करण्यासाठी पायाभूत सुविधांचा निकष वापरला जातो. दरडोई वीज वापर, वाहने, रस्ते, टेलिफोन, सिंचन, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचे प्रमाण तक्ता क्रमांक १.६ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक १.६**

**पायाभूत सुविधांच्या विकासाचे स्तर व प्रादेशिक असमतोल**

| राज्ये | दरडोई वीज वापर | नोंदणीकृत वाहने दर हजारी | रस्त्यांची लांबी (१००० चौकिमी) | टेलिफोन सुविधा (दर १०० व्यक्ती मागे) | सिंचित क्षेत्र (लाख हे.) | सामाजिक आर्थिक पायाभूत सुविधांची उपलब्धता |
|---|---|---|---|---|---|---|
| • **विकसित राज्ये** | | | | | | |
| पंजाब | ११५५ | १५४८ | ८९७ | ५.८३ | ९७.७ | १८७.६ |
| महाराष्ट्र | ६८० | १०४६ | ७२६ | ३.७९ | १९.६ | ११२.८ |
| हरियाणा | ३०९ | १३२४ | ६७२ | ४.३८ | ८६.० | १३७.५ |
| गुजरात | १११६ | १५६८ | ७४३ | ४.५२ | ४१.७ | १२४.३ |
| पश्चिम बंगाल | ३२१ | ३३७ | २३३६ | २.५५ | ५६.९ | १११.३ |
| कर्नाटक | ६६१ | ११०६ | १३३१ | ४.५२ | २९.४ | १०४.९ |
| केरळ | ३५२ | १०७० | ५२६९ | ५.८५ | १६.५ | १७५.७ |
| तामिळनाडू | ८९६ | १५४४ | १३९३ | ५.०५ | ५५.९ | १४९.१ |
| आंध्रप्रदेश | ६५१ | ८९४ | १२५४ | ३.९६ | ४६.३ | १०३.३ |
| • **मागासलेले राज्ये** | | | | | | |
| मध्यप्रदेश | ३९५ | ६९४ | ५३८ | ३.०१ | ३२.२ | ७६.८ |
| आसाम | १२४ | ३१९ | २९३७ | २.०७ | २.४ | ७७.७ |
| उत्तरप्रदेश | २४१ | ८६७ | ११८२ | २.४९ | ७५.५ | १०१.२ |
| राजस्थान | ४४३ | ७६३ | ५०१ | ३.७२ | ३६.४ | ७५.९ |
| ओरिसा | ५२० | ४९७ | १३८३ | २.३३ | ३६.७ | ८१.० |
| बिहार | ४९ | १५८ | १२७६ | २.२२ | ६०.६ | ८१.३ |
| **संपूर्ण भारत** | **५०९** | **७६८** | **१२८८.७** | **३.३** | **४४.६** | **१००.०** |

***स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, ५२वा संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८९

तक्ता क्रमांक १.६ मध्ये भारतातील पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेतील व वितरणातील असमतोलाचे विवेचन करण्यात आले आहे. वीजेचा दरडाई वापर हा उर्जा वापराचा निर्देशक आहे. केरळ आणि पश्चिम बंगाल ही दोन राज्ये वगळता इतर विकसित राज्यांमध्ये २००७–०८ च्या भारतीय प्रमाणापेक्षा (५०९) किलोवॅट पेक्षा अधिक आहे. याऊलट मागासलेल्या राज्यांत विशेषत: आसाम आणि बिहार या राज्यांत वीज वापर अनुक्रमे

१२४ किलोवॅट आणि ४९ किलोवॅट इतका आहे. या राज्यांत औद्योगिकीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली नाही तर असमतोल आणखीनच वाढेल.

राज्यनिहाय प्रति १००० व्यक्तींसाठी नोंदणीकृत वाहनांची संख्या हा एक महत्त्वाचा निर्देशांक आहे. मात्र वाहतुकीच्या विकासाचा व्यापक निर्देशक होवू शकत नाही. रेल्वे आणि प्रति १०० किमी रस्ते, रस्त्यांची लांबी हा वाहतुकीचा मुख्य स्त्रोत आहे. पायाभूत सुविधांचा वापर राज्याच्या निव्वळ देशांतर्गत उत्पादनावर आणि दरडोई उत्पन्नावर परिणाम करतात. उदा. ओरिसा मध्ये प्रत्येकी १००० चौ.कि.मी. क्षेत्रासाठी १३८३ कि.मी. लांबीचे रस्ते उपलब्ध आहेत परंतु दरडोई राज्यीय देशांतर्गत उत्पादन कमी असल्यामुळे रस्त्यांचा वापर कमी होत आहे.

दरहजारी नोंदणीकृत वाहने आणि टेलिफोन यांचे परीक्षण केले असता यातील कोणताही निर्देशक वापरताना कसोटीच्या वापरावर आणि विकासावर संबंध प्रस्थापित करत नाही. पायाभूत सुविधांचा विकास मागणी प्रेरित होतो. प्रत्यक्षात या उत्पादक गुंतवणूक होत असते. तसेच पायाभूत सुविधांचा विकास हा पुरवठा प्रेरित सुद्धा होवू शकतो. जेव्हा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अगोदरच गुंतवणूक केली असेल. मागणी प्रेरित पायाभूत सुविधांचा विकास थोड्या काळानंतर होण्यास सुरूवात होते.

अखिल भारतीय स्तरावरील निर्देशांक मूल्य १०० मानले जाते. पायाभूत सुविधा निर्देशांक मूल्य तक्ता क्रमांक १.६ मधील शेवटच्या रकान्यात दर्शविले आहे. पंजाबचा सापेक्ष निर्देशांक १८७.६ सर्वाधिक आहे. यानंतर महाराष्ट्र ११२.८, हरियाणा १३७.५, गुजरात १२४.३, पश्चिमबंगाल १११.३, कर्नाटक १०४.९, केरळ १७५.७, तामिळनाडू १४९.१, आंध्रप्रदेश १०३.३ आहे. मागासलेल्या राज्यांच्या बाबतीत मध्यप्रदेश ७६.८, आसाम ७७.७, उत्तरप्रदेश १०१.२, राजस्थान ७५.९, ओरिसा ८१.०, बिहार ८१.३ आहे. यावरून सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांची उपलब्धता पुरेशा प्रमाणात झाली नाही. यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.

सिंचन आणि पायाभूत सुविधांचा संबंध आहे असे मानले तर पंजाबमध्ये एकूण पिकाखालील शेतजमीनीपैकी ९५% सिचिंत क्षेत्र आहे. आणि दर हेक्टरी उत्पादकता सर्वात जास्त आहे. उत्तर प्रदेशात ६३% क्षेत्र सिंचित असून दर हेक्टरी उत्पादकता अतिशय कमी

आहे. याचाच अर्थ असा की पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्ये सिंचन पायाभूत सुविधेचा वापर शेतीसाठी करण्यात यशस्वी झाली आहेत. मात्र उत्तरप्रदेश या बाबतीत मागासलेला आहे. यावरून प्रादेशिक असमतोलाची समस्या अधिक प्रकर्षाने असल्याचे दिसून येते.

**ई) सामाजिक पायाभूत सुविधा आणि मानव विकासातील तफावत** :

एखादे राज्य विकसित होण्यासाठी त्या राज्याचे दरडोई उत्पन्न अधिक असणे आवश्यक असते. तसेच मानव विकास निर्देशांक अधिक असावा लागतो तरच ते राज्य प्रगत मानले जाते. आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप करताना मानव विकास निर्देशांकांच्या काही प्रमुख निकषांच्या अर्थात सरासरी आयुर्मान, साक्षरता (पुरूष व स्त्रिया), बालमृत्यूदर, जन्मदर व मृत्यूदर या संबंधीच्या आकडेवारीवरून अर्थव्यवस्थेतील सामाजिक पायाभूत सुविधा आणि मानवविकास पातळी यामध्ये असलेल्या असमतोलाची स्पष्ट कल्पना येते. सर्व प्रकारच्या विकासाचा उद्देश जीवनाची गुणवत्ता सुधारणे हा आहे तर मानवी विकासाचा परिणाम या निर्देशांकावर होतो. तक्ता क्रमांक १.७ मध्ये मानव विकासाच्या प्रमुख निर्देशांकाचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

## तक्ता क्रमांक १.७

## मानव विकासाचे प्रमुख निर्देशांक व त्यामधील तफावत (टक्केवारी)

| राज्ये | जन्मापासूनचे आयुर्मान | साक्षरता एकूण | दर हजारी(२०११) | | बाल मृत्यूदर | मृत्यूदर | जन्मदर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरूष | स्त्रिया | | | |
| • **विकसित राज्ये** | | | | | | | |
| पंजाब | ६९.४ | ७६.७ | ८१.५ | ७१.३ | ३४ | ७.० | १६.६ |
| महाराष्ट्र | ६७.२ | ८२.९ | ८९.८ | ७५.५ | २८ | ६.५ | १७.१ |
| हरियाणा | ६६.२ | ७६.६ | ८५.४ | ६६.८ | ४८ | ६.६ | २२.३ |
| गुजरात | ६४.१ | ७९.३ | ८७.२ | ७०.७ | ४४ | ६.७ | २१.८ |
| पश्चिम बंगाल | ६४.९ | ७७.१ | ८२.७ | ७१.२ | ३१ | ६.० | १६.८ |
| कर्नाटक | ६५.३ | ७५.६ | ८२.९ | ६८.१ | ३८ | ७.१ | १९.२ |
| केरळ | ७४.० | ९३.९ | ९६.० | ९२.० | १३ | ७.० | १४.८ |
| तामिळनाडू | ६६.२ | ८०.३ | ८६.८ | ७३.९ | २४ | ७.६ | १५.९ |
| आंध्रप्रदेश | ६४.४ | ६७.६ | ७५.६ | ५९.७ | ४६ | ७.६ | १७.९ |
| • **मागासलेल्या राज्यातील स्थिती** | | | | | | | |
| मध्यप्रदेश | ५८.० | ७०.६ | ८०.५ | ६०.३ | ६२ | ८.३ | २७.३ |
| आसाम | ५८.९ | ७३.२ | ७८.८ | ६७.३ | ५८ | ८.२ | २३.२ |
| उत्तरप्रदेश | ६९.० | ६९.७ | ७९.२ | ५९.३ | ६१ | ८.१ | २८.३ |
| राजस्थान | ६२.० | ६७.१ | ८०.५ | ५२.७ | ४८ | ६.८ | २६.७ |
| ओरिसा | ५९.६ | ७३.४ | ८२.४ | ६४.४ | ६१ | ८.६ | २०.५ |
| बिहार | ६१.६ | ६३.८ | ७३.४ | ५३.३ | ४७ | ६.८ | २८.१ |
| **भारत** | **६३.५** | **७४.०** | **८२.१** | **६५.५** | **४७** | **७.२** | **२२.१** |

***स्त्रोत–** दत्त गौरव आणि महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, ५२वा संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४९०

तक्ता क्रमांक १.७ मध्ये मानव विकासाच्या प्रमुख निर्देशांकाचे अध्ययन करण्यात आले आहे. मानव विकासातील निर्देशांकाच्या आधारे सामाजिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या बाबतीत विविध राज्यांत असमतोल दिसून येतो. केरळ आणि काही प्रमाणात तामिळनाडू या राज्यांनी मानव विकासाबाबत चांगली प्रगती केली आहे. न्यूनतम पातळीच्या आर्थिक विकासातून हे शक्य करून दाखवले आहे. मानवी विकासाची उच्च पातळी गाठण्यासाठी शिक्षण आणि आरोग्य यात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. मागासलेल्या राज्यांमध्ये बिहार, राजस्थान, उत्तरप्रदेश या राज्यांची साक्षरता विशेषत: स्त्री साक्षरता खूपच कमी आहे. या आरोग्याच्या बाबतीतील पायाभूत सुविधेमध्ये पुरेशी, योग्य गुंतवणूक करू शकले नाहीत. यामुळे जन्मापासूनचे सरासरी आयुर्मान बालमृत्युचे अधिकप्रमाण, उच्च जन्मदर अधिक आहे. खाजगी

क्षेत्रामार्फत आर्थिक सुधारणांना प्राधान्य देत परिचारिका महाविद्यालये, शिक्षणसंस्था स्थापन केल्या आहेत. उच्चवर्णीय लोक गरीबांच्या तुलनेत अधिक फी देवून या सुविधा प्राप्त करून घेतात. खाजगी क्षेत्राने सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून गरीबांच्या कल्याणासाठी मदत करणे आवश्यक आहे. राज्य सरकारने शिक्षण आणि आरोग्य या पायाभूत सुविधेत अधिक खर्च करणे आवश्यक आहे.

सी.टी.कुरियन यांनी आर्थिक सुधारणांच्या पूर्वी प्रादेशिक असमतोलाबाबत असे मत मांडले की, १९८० च्या दशकात खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे प्रादेशिक असमतोलात वाढ झाली आहे. १९९१ नंतर आर्थिक सुधारणांमध्ये स्थिरीकरण आणि विनियमन यात खाजगी क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळेच राज्याराज्यामध्ये प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. विकसित राज्ये आपल्या आर्थिक विकासासाठी देश व विदेशातून खाजगी गुंतवणूक आकर्षित करतात. अनुकूल गुंतवणूकीच्या वातावरणाचा परिणाम सामाजिक, आर्थिक पायाभूत सुविधेवर होतो. मागासलेले राज्ये खाजगी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात आकर्षित करत नाहीत कारण गुंतवणूकीला प्रतिकुल वातावरण, पायाभूत सुविधांचा अभाव, साधनसंपत्तीचा अभाव असतो. साधन संपत्तीच्या अभावी विकासाचा उच्च स्तर गाठला जात नाही. हे दुष्टचक्र सतत कार्यरत असते.

**उ) विविध पंचवार्षिक योजना काळातील खर्च –**

१९५१ पासून भारतात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाचे पर्व सुरू झाले. भारताने नियोजनाच्या माध्यमातून १२ पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या आहेत. या योजना काळात काही राज्यांचा आर्थिक विकास अधिक वेगाने झाला आहे तर काही घटकराज्ये अविकसित राहिली आहेत.पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते अकराव्या पंचवार्षिक योजना काळातील दरडोई खर्चाचे वर्गीकरण तक्ता क्रमांक १.८ मध्ये दर्शविले आहे. प्रत्येक राज्यात खर्च हा कमी अधिक असल्याचे दिसून आले.

## तक्ता क्रमांक १.८

## पंचवार्षिक योजना काळातील दरडोई खर्चातील तफावत(रूपयांत)

| | पंचवार्षिक योजना | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **राज्ये** | **१९५१–१९५६** | **१९५६–१९६१** | **१९६१–१९६६** | **१९६९–१९७४** | **१९७४–१९७८** | **१९८०–१९८५** | **१९८५–१९९०** | **१९९२–१९९७** | **२००७–२०१२** |
| पंजाब | १७५ | १४६ | २१२ | ३१६ | ५३१ | ११७९ | १६९५ | २९५१ | ११८७३ |
| महाराष्ट्र | ३७ | ५७ | १०३ | १९९ | ३७२ | ९८३ | १४३४ | ३१०१ | १३१६४ |
| हरियाणा | –– | – | – | ३५८ | ४८१ | १३८५ | १८७१ | २८३८ | १५७८३ |
| गुजरात | ५८ | ७६ | १०८ | २०४ | ३७६ | १०३७ | १४८५ | २७०० | २११०० |
| प.बंगाल | ५४ | ४८ | ८० | ८२ | २०० | ६०० | ६५९ | ११४४ | ७९५५ |
| कर्नाटक | ४६ | ६२ | १०० | १२८ | २७६ | ६१४ | ७४९ | ३१३८ | १९२३५ |
| केरळ | ३१ | ४९ | १०१ | १५६ | २२४ | ५७८ | ७२७ | २३७८ | १३१७२ |
| तामिळनाडू | २८ | ५७ | ९८ | १३४ | २०१ | ६५१ | १०६३ | २४२७ | १३६७६ |
| आंध्रप्रदेश | ३३ | ५२ | ९१ | ९८ | २३६ | ५८४ | ८४१ | १८५८ | १९३४० |
| मध्यप्रदेश | ३४ | ४८ | ८४ | ११४ | २५४ | ६८४ | ११४६ | १७४२ | ११६५३ |
| आसाम | २९ | ५७ | १०३ | १३६ | १९० | ५२६ | ८५० | २०६६ | ८९८६ |
| उत्तरप्रदेश | २५ | ३२ | ७२ | १३२ | २३७ | ५३५ | ८०३ | १३७२ | १०८९६ |
| राजस्थान | ३९ | ५३ | ९७ | १२० | २३७ | ५७७ | ७१८ | २५४८ | १२६९४ |
| ओरिसा | ५६ | ५४ | १२० | ११३ | २०७ | ५३६ | ८९७ | २१२३ | ३७५५ |
| बिहार | २५ | ४० | ६७ | ८५ | १५५ | ४५६ | ६२६ | ५९२ | ७३०५ |
| **एकूण भारत** | **३८** | **५१** | **९२** | **१४२** | **२६२** | **६८७** | **१०२६** | **१९६५** | **१४४६६** |

***स्त्रोत–** दत्त गौरव, महाजन अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था, ५२वा संशोधित संस्करण, हिंदी आवृत्ती, एस. चाँद पब्लिकेशन, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४९५

तक्ता क्रमांक १.८ मध्ये पंचवार्षिक योजना काळातील दरडोई खर्चाचे अध्ययन करण्यात आले आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेतील १९५१–५६ काळात केवळ ३८ रू. दरडोई खर्च भारताचा असून त्यापेक्षा कमी खर्च महाराष्ट्र ३७ रू, केरळ ३१रू, तामिळनाडू २८ रू., आंध्रपदेश ३३ रू, मध्यप्रदेश ३४ रू., आसाम २९ रू. उत्तरप्रदेश २५ रू., बिहार २५ रू. इतका आहे. राष्ट्रीय प्रमाणापेक्षा हा खर्च खूपच कमी आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेचा विचार करता दरडोई खर्च भारताचा १४४६६ रू. इतका आहे. भारतीय प्रमाणापेक्षा अधिक खर्च हरियाणा १५७८३ रू. गुजरात २११०० रू. कर्नाटक १९२३५रू, मध्यप्रदेश ११६५३ रू रूपये इतका आहे. पंजाब, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, मध्यप्रदेश, आसाम, उत्तरप्रदेश, राजस्थान, ओरिसा, बिहार या राज्यांचा योजना खर्च खूपच कमी आहे. यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.[८]

## १.४ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वीच महाराष्ट्र राज्य म्हणजे जुन्या मुंबई प्रांतात आर्थिक विकासाचा असमतोल निर्माण झाला होता. राज्यांकडून आर्थिक व तांत्रिक सर्वेक्षण करून सरकारला एक अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालात 'मागासलेल्या विस्तृत प्रदेशातील औद्योगिक दृष्ट्या प्रगत भागाची बेटे' असे आर्थिक समतोलाचे वर्णन करण्यात आले. जेव्हा खूप मोठा प्रदेश हा अविकसित असतो आणि खूप थोडा प्रदेश विकसित असतो. तेव्हा विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण झाला असे म्हणतात.

महाराष्ट्रात मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ असे विभाग आहेत. मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही शहरी भागांचाच विकास झाला आहे. सतीश देशपांडे यांनी १९७३ मध्ये संपादित केलेल्या व समाजप्रबोधन संस्थेने प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. वि.म.दांडेकर यांनी असे म्हटले आहे की, मुंबईचा विकास होत असल्याने महाराष्ट्राचा विकास होत असल्याचे भासते आहे. परंतु उर्वरित महाराष्ट्र मात्र विकासापासून वंचित आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या पूर्वीपासून ते अगदी राज्याची स्थापना झाल्यानंतर आणि आजही विकासाच्या प्रादेशिक असमतोलाचे चित्र कायम पाहायला मिळते.

कोणतीही अर्थव्यवस्था असंतुलित विकासाच्या परिस्थितीत अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास करू शकत नाही. म्हणूनच असा प्रादेशिक असमतोल निर्माण होऊ न देणे महत्त्वाचे आहे. यासाठी १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला. त्यानंतर प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ प्रा.वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली १९८३ मध्ये एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने १९८४ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यानंतर पुन्हा ३ जानेवारी १९९६ रोजी प्रा. आर.पी.कुरूलकर यांची समिती नियुक्त केली. या समितीने प्रा.दांडेकर समितीचा अहवाल नवीन समितीचा पाया म्हणून वापरला. या समितीने महत्त्वाचा निष्कर्ष मांडला. तो म्हणजे महाराष्ट्राच्या प्रादेशिक विकासाचा असमतोल सतत वाढत आहे. विदर्भाचा अनुशेष दांडेकर समितीच्या काळात ३९.१२% होता. तो वाढून ४४.२३% झाला आहे. उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष ३७.३२% वरून २४.५४% पर्यंत घटला. याचा अर्थ महाराष्ट्रात प्रादेशिक विकासाचा असमतोल वाढत आहे असा होतो. दांडेकर समितीने 'जिल्हा' हे एकक मानून तेथील रस्ते,

जलसिंचन, वीजपुरवठा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन या निकषांचा वापर करून आपला अहवाल सादर केला.

## १.५ प्रादेशिक विभागात कोकणचे महत्त्व

कोकण हा महाराष्ट्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या दृष्टीकोनातून अतिशय संपन्न प्रदेश आहे. कोकणातील स्वाभाविक रचना आणि हवामान त्यासाठी पूरक आहे. कोकणाला प्रदीर्घ समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकण प्रदेशाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्यापारी पिके –** कोकणची भूमी आंबा, काजू, सुपारी, नारळ, फणस आणि कोकम या व्यापारी पिकांसाठी अनुकूल आहे. या वस्तूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत महत्त्व आहे. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर पर्याप्त केला जात नाही.

**२) बौद्धिक क्षमता** – कोकणाने आजवर देशाला सर्वच क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्ती व नेतृत्त्व दिले आहे. या क्षमतेचा वापर स्थानिक दृष्टीकोनातून होण्याची गरज आहे. सर्वाधिक ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त व्यक्ती कोकण विभागातील आहेत.

**३) मच्छिमारी** – कोकणाला ७२० कि.मी. लांबीचा सागरकिनारा लाभला आहे. कोकण किनारपट्टीवर जगातील सर्वोत्कृष्ट जातीचे मासे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. उत्पादनाच्या तुलनेने त्यांच्यावरील प्रक्रिया उद्योगांची संख्या वाढविण्याची गरज आहे. कोकणचा किनारा माशांच्या निर्मितीसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देतो. उपलब्ध क्षेत्रातून तसेच जलाशय निर्मितीतून पिण्यासाठी पाणी, शेतीसाठी पाणी आणि मत्स्यसंवर्धन झाले तर पाण्याचा योग्य उपयोग होईलच परंतु रोजगार निर्मिती व कोकणच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार लागेल.

**४) पर्यटन** – कोकणला निसर्ग विपुल सृष्टी लाभलेली आहे. कोकणात पर्यटनासाठी स्वच्छ, सुंदर व विस्तीर्ण स्वरूपाचे समुद्र किनारे उपलब्ध आहेत. पश्चिम घाटांमधील जैवविविधता, प्राचीन मंदिरे व लेणी आहेत. तसेच सागरी किल्ले हे कोकणचे ऐश्वर्य दाखविते. पर्यटनातून कोकणच्या दरडोई उत्पन्नात भर घातली जाईल  तसेच कोकणच्या व्यक्तींच्या राहणीमानात सुधारणा होईल.

**५) बंदरे** – कोकणच्या समुद्रकिनारे आणि नद्यांच्या काठावर प्राचीन काळापासून नैसर्गिक दृष्टीकोनातून संपन्न बंदरे अस्तित्त्वात आहेत. प्राचीन काळापासून या बंदरांमधून देशातील अंतर्गत व विदेशामधील आयात निर्यातीचा व्यापार सुरू आहे. भारतात युरोपियन व्यापाऱ्यांनी कोकणामध्येच आपले व्यापारी संबंध निर्माण केले. मुस्लिम कालखंडात भारताचा परदेशी व्यापार प्रामुख्याने कोकणातील बंदरांमधूनच चालविला जात होता. समुद्रकिनारा व समुद्रांची खोली हे कोकणचे शक्तीसाधने आहेत. कोकणातील बंदरे ही कोकण विकासाला मोठा हातभार लावतील व तरूण वर्गाला रोजगार मिळवून देतील व आर्थिक समृद्धी प्राप्त होईल.

**६) वनौषधी वनस्पती व खनिजे** – कोकणातील हवामान फलउत्पादनाला तसेच फुलशेतीला अनुकूल असे आहे. कोकणात आज अनेक वनौषधे रानावनात मिळतात त्यांची व्यापारी तत्त्वावर लागवड करून अर्क निर्मितीचे छोटे छोटे उद्योग निर्माण केले तर स्थानिकांना रोजगार मिळेल. सामाजिक वनीकरण खात्याने वनशेतीच्या संदर्भात कोकणात बऱ्यापैकी काम केले आहे. आरोग्य ही मानवाची प्रमुख गरज आहे. त्यासाठी कोकण प्रांतातील जंगलांमध्ये विविध आजारांवर गुणकारी ठरणाऱ्या वनस्पती आहेत हा देखील कोकणचा ठेवा आहे. कोकणामध्ये बॉक्साईड व लोहखनिज यांच्या खाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याची निर्यात परकीय देशांना केली जाते.

कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासाला विकासा संबंधातील समस्यांचा वेध घेण्याचा विचार करता तेथील साधनसंपत्तीच्या प्राधान्याने विचार केला पाहिजे. कोकणातील जमीन व पाणी हे दोन नैसर्गिक स्त्रोत खऱ्या अर्थाने पूर्णत: विकसित झालेले नाहीत. उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त व योग्य क्षमतेने वापर केला जात नाही. कोकण प्रदेश प्रादेशिक असमतोल असणारा प्रदेश आहे. याचा विचार करून संशोधन करताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शिफारशी करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## १.६ संशोधन समस्येची निवड:

महाराष्ट्र राज्याचे बृहन्मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ असे एकूण पाच विभाग पडतात. मात्र महाराष्ट्राचा विकास हा असंतुलित स्वरूपाचा असून बृहन्मुंबई

व पश्चिम महाराष्ट्र हे विकसित प्रदेश आहेत. तर मराठवाडा, कोकण आणि विदर्भ हे तुलनात्मकदृष्ट्या अधिक मागासलेले आहेत. मागासलेल्या प्रदेशातील मागासलेपणा दूर करण्यासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्र राज्यातील विकसित भागाचा अभ्यास करता कोकण विभागात असमतोल जाणवतो. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या विकासात असमतोल आहे. १९६० नंतर विविध अभ्यासगटांनी कोकणातील आर्थिक मागासलेपणाचे विश्लेषण आकडेवारीच्या सहाय्याने दिले आहे. त्यानंतरही कोकणातील मानवी घटकांचा व नैसर्गिक घटकांचा विकास होण्यासाठी मर्यादित प्रमाणातच प्रयत्न झाले.

कोकणातील ठाणे व रायगड जिल्ह्यामध्ये काही भागात औद्योगिक प्रगती झाली आहे. तर अन्य भागात असमतोल आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये औद्योगिक प्रगतीचा वेग अत्यंत कमी आहे. तेथील अनेक उद्योग विविध कारणांमुळे बंद पडलेले आहेत.

प्रादेशिक असमतोलाचे कृषी, औद्योगिक क्षेत्र, दरडोई उत्पन्न, आर्थिक संरचना हे निर्देशांक विशेष करून अभ्यासले जातात. या निकषांच्या सहाय्याने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांची परिस्थिती अभ्यासता या जिल्ह्यात आर्थिक व सामाजिक असमतोल आहे हे लक्षात येते. वरील विश्लेषण केलेल्या परिस्थितीच्या व जिल्ह्यातील मानवी, नैसर्गिक परिस्थिती जाणून घेवून त्याचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करत संशोधन करणे, प्रादेशिक असमतोलाची कारणे शोधून ती निवारण्यासाठी उपाययोजना सुचविणे ही काळाची गरज आहे म्हणूनच **''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल–एक अभ्यास २००४–२०१४'' या विषयाची निवड केली आहे.**

## १.७ संशोधन विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत प्रबंधाच्या संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे मांडता येईल.

१) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलामुळे ठाणे, मुंबई, पुणे–नाशिक, औरंगाबाद जालना, नागपूर या जिल्ह्यांचा अधिक विकास झाला. यासाठी कारणीभूत असणाऱ्या घटकांचे अध्ययन करणे तसेच कोकण व महाराष्ट्रामधील प्रादेशिक असमतोलाचे तुलनात्मक स्वरूप अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

२) मुंबई–ठाणे परिसरातच आर्थिक शक्तीचे झालेले केंद्रीकरण याचा औद्योगिक विकासावर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी या संशोधनाचे महत्त्व आहे. ग्रामीण भागातून या परिसराकडे झालेले मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर यांचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

३) कोकणातील मुंबई लगतचा प्रदेश, ठाणे, कल्याण, पनवेल या प्रदेशाचा विकास झाला याशिवाय उर्वरित कोकणाचा (उत्तर कोकण व दक्षिण कोकण) विकास झाला नाही अशी परिस्थिती सद्यस्थितीत आहे. आर्थिक–सामाजिक, राजकीय–शैक्षणिक, घटकांचा या सद्यस्थितीवर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी कोकणातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो.

४) कुटुंब प्रमुखांना उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधा उदा. रस्ते, पिण्याचे पाणी, राहते घर, शौचालये, शिक्षण, रोजगाराच्या संधी, गॅस व रेशनवरील अन्नधान्य, वैद्यकिय सुविधा, माहिती तंत्रज्ञान सुविधा यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचा आहे.

५) कोकणातील लोकसंख्या, साक्षरता, विविध स्तरावरील नावनोंदणी प्रमाण, आर्थिक व सामाजिक विकासात स्त्री व पुरूषांचा असणारा सहभाग, सामाजिक प्रश्नांची जाणीव व त्यासाठी केले जाणारे प्रयत्न यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

६) आर्थिक, सामाजिक, राजकीय, प्रादेशिक असमतोलातील विविध दिसून येणाऱ्या समस्यांचे वास्तववादी दृष्टीकोनातून अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. विशेषत: कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्याच्या बाबतीत प्रादेशिक वाद कमी करण्यासाठी शासन, कुटुंबप्रमुख, सामाजिक संस्था व त्यांचे कार्येकर्ते यासाठी धोरणात्मक विकासाच्या दृष्टीने उपाय सुचविणे यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे मानता येईल.

## १.८ संशोधन विषयाची उद्दिष्टे :

संशोधन विषयाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा आढावा घेणे.

२) कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणे.

३) कोकण प्रदेशातील असमतोलाचे कारणे अभ्यासणे व त्यावर उपाययोजना सुचविणे.

## १.९ गृहितकृत्ये :

संशोधिकेने आपल्या संशोधन विषयाची पुढील गृहितकृत्ये तपासून पाहिली आहेत.

१) कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे.

२) कोकण विभागात आर्थिक व सामाजिक प्रादेशिक असमतोल आहे.


## १.१० संशोधन पद्धती :

प्रादेशिक विकासासंदर्भात राष्ट्रीय पातळीवर परीक्षण केले असता काही विभाग हा आर्थिक दृष्ट्या विकसित तर काही विभाग मागासलेला असल्याचे दिसून येते. दरडोई उत्पन्न, गुंतवणूक, मुलभूत सोईसुविधा, मानवी विकास हे याघटकांमधील विषमता दाखविणारी लक्षणे आहेत. या घटकांच्या सहाय्यानेच प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास केला जातो.

प्रस्तुत संशोधनाचा प्रकार विश्लेषणात्मक आहे. सदर विषयाची निवड करीत असताना कोकण विभागाची निवड केली आहे. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे चार जिल्हे निवडले आहेत. कोकणातील चार जिल्ह्यांमध्ये एकूण ३९ तालुके आहेत. एकूण ११ तालुके व तालुक्यातील ४४ गावे निवडली आहेत. सर्वेक्षित गावे कोकणच्या नकाशात दाखविता येईल. निश्चित केलेल्या संशोधन उद्दिष्टानुसार संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे.

### आलेख क्रमांक १.१

### सर्वेक्षित गावांचे भौगोलिक स्थान



### १.१०.१ प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक स्त्रोतापासून प्रथम स्तरावरील संकलन केलेली तथ्ये, माहिती मिळते. कोकणातील कुटुंब प्रमुख, उद्योजक व तालुक्यातील कृषी अधिकारी यांच्याकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली आहे. तसेच यांच्याकडून माहिती जमा करण्याकरीता चर्चा, मुलाखत, अनुसूचित, प्रश्नावली, सखोल निरीक्षण या माध्यमांचा वापर केला आहे.

प्राथमिक तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. प्रश्नावलीत मुक्त आणि बंदिस्त प्रश्नांचा समावेश केला आहे. अतिशय महत्त्वाच्या बाबीमध्ये उत्तर देण्याचे पूर्ण स्वातंत्र्य कोकणातील नमुना कुटुंब प्रमुखांना दिले आहे. तर काही बाबतीत पर्याय निवडण्याला स्वातंत्र्य दिले आहे. यामुळे कोकणातील प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी तयार केलेली प्रश्नावली ही संमिश्र स्वरूपाची निर्माण करण्यात आली आहे.[१८]

### १.१०.२ दुय्यम स्त्रोत :

संशोधनासाठी प्रादेशिक असमतोलावर निर्णय घेण्यासाठी शासनाने नेमलल्या विविध समित्यांच्या अहवालांचा वापर करण्यात आला आहे. दुय्यम माहिती संकलनासाठी सार्वजनिक प्रलेखांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रादेशिक असमतोलावर आधारित संशोधन प्रबंध, संशोधन अहवाल, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र यांचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय प्रसार माध्यमांनी दिलेल्या वार्ता, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याची सामाजिक आर्थिक पाहणी, महाराष्ट्राची आर्थिक सामाजिक पाहणी, इंटरनेटवर यांच्या साहाय्याने योग्य ती माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.[१९]

विस्कळीत स्वरूपातील माहिती संकलित करून त्या माहितीचे व आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी साधी सरासरी पद्धती (टक्केवारी) या साधनांचा अवलंब केला आहे. गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण-विश्लेषण करण्यासाठी तक्ते, आलेख, विभाजित वर्तुळ इत्यादींचा वापर केला आहे.

## १.११ नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांची निवड केली आहे. २०१२-१३ च्या आकडेवारीच्या आधारे ठाणे जिल्ह्यात ७

तालुके, रायगड जिल्ह्यात १५, रत्नागिरी जिल्ह्यात ९, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८ तालुके आहेत. **यापैकी** संशोधनासाठी **२५%** तालुक्यांची निवड केली आहे. तालुके व गावांची निवड करताना यादृच्छिक आणि सहेतूक सोईस्कर नमुना निवड पद्धत निवडली आहे. तसेच ग्रामीण व शहरी निकष लक्षात घेतला आहे. संशोधनासाठी प्रत्येक तालुक्यातील ४ गावे नमुना म्हणून निवडली आहेत. प्रत्येक गावातील १० कुटुंबप्रमुखांची निवड करण्यात आलेली आहे. कुटुंब प्रमुखांची निवड करताना १,११,२१,३१ या प्रमाणे नियमित अंकपद्धतीने निवड करण्यात आलेली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या ११ तालुक्यातील ११ कृषअधिकारी व १० उद्योजकांची निवड करण्यात आली आहे. संशोधनासाठी एकूण ४४ गावांची निवड करण्यात आली. नमुना निवडलेल्या गावांचे एकूणाशी असलेले प्रमाण ३.१७ टक्के इतके आहे.

**नमुना निवडीचा आकृतिबंध**

| **अ. क्र.** | **जिल्हे** | **एकूण तालुके** | **प्रत्येक जिल्ह्यतील निवडलेले तालुके** | **एकूण गावे** | **निवडलेली गावे** | **कुटुंब प्रमुखांचा एकूण नमुना** | **तालुका कृषी अधिकारी** | **उद्योजक** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **ठाणे** | ७ | कल्याण | ६९ | ०४ | ८० | ०१ | ०३ |
| | | | एहापूर | २२८ | ०४ | | ०१ | |
| २ | **रायगड** | १५ | मुरूड | ७२ | ०४ | १६० | ०१ | ०२ |
| | | | उरण | ५३ | ०४ | | ०१ | |
| | | | खालापूर | ११९ | ०४ | | ०१ | |
| | | | पोलादपूर | ८६ | ०४ | | ०१ | |
| ३ | **रत्नागिरी** | ९ | राजापूर | २३८ | ०४ | १२० | ०१ | ०२ |
| | | | खेड | २१५ | ०४ | | ०१ | |
| | | | मंडणगड | १०९ | ०४ | | ०१ | |
| ४ | **सिंधुदुर्ग** | ८ | मालवण | १३५ | ०४ | ८० | ०१ | ०२ |
| | | | सावंतवाडी | ८५ | ०४ | | ०१ | |
| | **एकूण कोकण** | ३९ | ११ तालुके | १४०९ | ४४ | ४४० | ११ | १० |

***स्त्रोत–** : ठाणे,रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक–सामाजिक समालोचन (२०१२–१३)

## १.१२ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

- **संशोधनाची व्याप्ती** : प्रस्तुत संशोधन केवळ महाराष्ट्रातील कोकणच्या प्रादेशिक असमतोल संदर्भात आहे. संशोधनाचा अभ्यास हा कोकण विभागापुरता मर्यादित आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यातील २५% तालुक्यांचे अध्ययन केले आहे. सदरहू अभ्यास हा २००४–०५ ते २०१३–१४ या कालावधीतील आहे.

- **संशोधनाच्या मर्यादा** :

  १) प्रस्तुत संशोधन मर्यादा कोकणापुरतीच मर्यादित आहे.

  २) कोकण विभाग दुर्गम व लांबीच्या दृष्टीकोनातून अधिक अंतरावर असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी प्रवास करण्यासाठी अधिक कालावधी व वेळेची आवश्यकता आहे. म्हणून निवड करीत असताना ११ तालुके व ४४ गावांची निवड केली आहे.

  ३) एकूण लोकसंख्येंच्या तुलनेत निवडलेला कुटुंबप्रमुखांचा नमुना अल्प आहे.तथापि प्रादेशिक असमतोलाबाबतचे दुय्यम साधनसामग्रीतील विवेचन महत्त्वाचे मानून विषयाची मांडणी केली आहे.

## १.१३ संशोधन विषयाचे विकास प्रक्रियेतील योगदान :

**''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल –एक अभ्यास २००४–१४''**या विषयाचे संशोधन करीत असताना कोकणातील असमतोलाची कारणे पाहणे हे या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रादेशिक असमतोलावरील विविध शासकीय अहवाल व उपलब्ध आकडेवारीनुसार कोकणातील प्रादेशिक असमतोलाचे विवेचन केले आहे. संशोधन करताना कोकणातील प्रादेशिक असमतोलाची कारणमीमांसा लक्षात येते. नैसर्गिक व मानवी साधन संपत्तीचा पर्याप्त वापर करणे कितपत शक्य आहे, याचे अध्ययन केले आहे. विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होत असल्याचे दिसून येते. त्यामध्ये गती वाढविण्यासाठी संशोधन शिफारशींचा वापर करून घेऊन योजनांचे पुर्नरचना करणे शक्य होईल. कोकणच्या ग्रामीण भागातून मुंबई, ठाणे येथे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगाराच्या संधी स्थानिक स्तरावर उपलब्ध असणाऱ्या साधनांचा अभ्यास करून तयार

करता येथील त्यानुसार ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यासाठी उपाययोजना मांडल्या आहेत.

संशोधनाचे निष्कर्ष सर्व सामान्य जनता, अंमलबजावणी करणारे विविध शासकीय अधिकारी यांच्यामार्फत शासनापर्यंत पोहोचवणे हा प्रमुख उद्देश आहे.कोकण विभागातील कुटुंब प्रमुख, नागरिक यांचे प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी कृतीशील सहकार्य अपेक्षित आहे तरच खऱ्या अर्थाने प्रादेशिक असमतोल दूर होऊ शकतो.

## १.१४ संशोधन प्रबंधाची प्रकरणानुसार मांडणी

### १) प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

या प्रकरणात संपूर्ण संशोधन प्रकल्पाची ओळख मांडली आहे. प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची पार्श्वभूमी, संकल्पना, व्याख्या, प्रादेशिक समतोलाचे महत्त्व, भारतातील व महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप, प्रादेशिक असमतोलाची कारणे, प्रादेशिक असमतोलाचे निकष, संशोधन पद्धती, नमुना निवड इत्यादी घटकांचे सखोल विवेचन करण्यात आले आहे.

### २) प्रकरण दुसरे – संदर्भ साहित्याचा आढावा

या प्रकरणात प्रादेशिक असमतोलावर आधारित सैद्धांतिक दृष्टीकोन, संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संशोधन लेख, अहवाल यातील तथ्यांचे अवलोकन व वापर करण्यात आला आहे.

### ३) प्रकरण तिसरे – महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल

या प्रकरणात दरडोई उत्पन्न, रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, बँका, पोस्ट ऑफिस इ. पायाभूत सोयी सुविधांची उपलब्धता, लागवडीखालील व एकूण जमीनीखालील क्षेत्र, शेतीउत्पन्न, उद्योग–रोजगार निर्मिती या घटकांमधील असलेल्या सुविधांधील तफावतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

### ४) प्रकरण चौथे – कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक असमतोल

या प्रकरणात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न,

पायाभूत सुविधा, शेती व उद्योग यांतील असमतोल यांचे विविध निकषांच्या आधारे विवेचन करण्यात आले आहे.

**५) प्रकरण पाचवे – कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचे विश्लेषण**

या प्रकरणात कुटुंब प्रमुखांकडून प्रश्नावलीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. एकूण नमुना ४४० कुटुंब प्रमुखांचे, ११ कृषी अधिकारी, १० उद्योजक सर्वेक्षण करून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

**६) प्रकरण सहावे – निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात गृहितकृत्याची पडताळणी (सत्यता), निष्कर्ष आणि शिफारशी यांचा समावेश आहे. पुढील संशोधकांना प्रेरणा मिळावी यासाठी भावी संशोधनाची क्षेत्रे यांत अंतर्भूत करण्यात आली आहेत.

## १.१५ मूल्यमापन

भारत देशामध्ये प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारांनी स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत प्रयत्न केलेले आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय विषमतेमुळे काही प्रदेश मागासलेले राहिले याचा परिणामी प्रादेशिक असमतोल वाढतच गेलेला दिसून येतो. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चारही जिल्ह्याच्या विकासात असमतोल आहे. कोकणातील ८०% लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील इतर विभागांपेक्षा कोकण विभागात कृषी उत्पन्न कमी आहे. रोजगाराचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे कोकणचा विकासही कमी झालेला आहे. कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करून प्रादेशिक असमतोल कमी करता येईल. दांडेकर समितीने सांगितलेली प्रादेशिक असमतोलाची कारणे कोकण विभागाला लागू पडतात. महाराष्ट्रामध्ये कोकण विभागाचे विशेष असे महत्त्व आहे.

या प्रकरणात प्रादेशिक असमतोलाची संकल्पना, सैद्धांतिक विवेचन, महत्त्व, कारणे यांचे विश्लेषण केले आहे. भारतातील व महाराष्ट्रातील, प्रादेशिक असमतोल प्रादेशिक विभागात कोकणचे महत्त्व, प्रादेशिक असमतोलाचे निर्देशक यांची चर्चा केली आहे. प्रामुख्याने संशोधन विषय निवड, महत्त्व, उद्दिष्टे, गृहितकृत्ये, नमुना निवड, संशोधन पद्धती, व्याप्ती व मर्यादा योगदान यांची तपशीलवार चर्चा केली आहे.

# संदर्भ सूची


१) कविमंडन विजय, (सहावी आवृत्ती, २०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १, २

२) कुरूलकर र.पु. आणि एकताटे अरविंद (प्रथमावृत्ती जून १९९१), 'विकासाचे अर्थशास्त्र', विद्याप्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १ ते १५

३) कुरूलकर र.पु. आणि एकताटे अरविंद (प्रथमावृत्ती जून १९९१), 'विकासाचे अर्थशास्त्र', विद्याप्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. २६ ते ३८

४) डायमंड अर्थशास्त्र कोश (२००८), डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. ६३६

५) कुलकर्णी प्रभाकर रामचंद्र (१९९९) भारतीय अर्थव्यवस्था विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. कृ. १९७.

६) बहिर लक्ष्मण भा. (डिसेंबर २००७) "महाराष्टातील आंतर प्रादेशिक औद्योगिक विषमता एक परिक्षण " योजना मुंबइ, पृष्ठ क्र. ७४

७) रायखेलकर ए. आर. दामजी बी. एच. (२००५) औद्योगिक अर्थशास्त्र, विद्याबुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ११४

८) अर्थविचार (२०१६), मराठी अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणे खंड–२, पृष्ठ क्र. ३९ ते ६०,

९) Ministry of Finance, Indian Public Finance Statistics (2004-05), Statistical Abstract of India, 2007, Page No. 29

१०) दत्त गौरव आणि महाजन आश्विनी, (५२ वी सुधारित हिंदी आवृत्ती २०१४), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस.चन्द एण्ड कंपनी, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८६

११) दत्त गौरव आणि महाजन आश्विनी, (५२ वी सुधारित हिंदी आवृत्ती २०१४), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस.चन्द एण्ड कंपनी, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८५ ते ४९५

१२) भोंग जंगले, आडक, आडदांडे (प्रथमावृत्ती २०१४), 'भारतीय अर्थव्यवस्था : समस्या आणि भवितव्य', इंटरनॅशनल बुक हाऊस, मुंबई, पृष्ठ क्र. ११४ ते ११७

१३) जिल्हा आर्थिक–सामाजिक समालोचन (२०१२–१३)ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, माहिती व प्रकाशन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

१४) आगलावे प्रदीप (जानेवारी २०००), 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १३०

१५) Seltiz C.M., Jahoda, Deutseh and Cook (1959), Research Methods in social relations', Richant and Winston Inc. Publication, New York, Page No. 38

१६) Lundberg G.A. (1951), ' Social Research', Long Mans, Green and company, New York, Page No. 9

१७) आगलावे प्रदीप (जानेवारी २०००), 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १२३ ते १२४

१८) Yaung Pouline V. (1982), 'Scientific Social Surveys and Research', Prentice Hall of India Private Limited, New Delhi, Page No. 9

१९) Good and Hatt (1981) ' Methods and Social Research' MacGraw Hill Internatioinal Book company, New Delhi, Page-133

२०) रायखेलकर दामजी, (जानेवारी २०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. १८५ ते १८८

२१) Fairchild : Dictionary of Sociology, Page No. 265

२२) धुरी निलम, (जुलै २००८), 'संशोधन पद्धती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ६७ ते ६८

# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

जगातील बहुतेक सर्व विकसित व अविकसित देशात विविध प्रदेशात असमतोल आहे. प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात सर्वच देशामध्ये वेगवेगळ्या पातळीवर संशोधन झाले आहे. सायमन कुझनेट, विल्यमसन, विंग्ज या शास्त्रज्ञांनी असमतोल दूर करण्यासाठी सिद्धांत मांडले ते आजही उपयुक्त ठरतात. सर्वच देशांमध्ये जो प्रदेश मागासलेला आहे त्याचा विकास करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. राष्ट्रीय व राज्यस्तरावर प्रादेशिक असमतोलावर अनेक अभ्यास गटांचे व शासकीय समित्यांचे अहवाल प्रसिद्ध झाले आहेत. अनेक तज्ञ व्यक्तींनी प्रबंध, लघुप्रबंध, पुस्तके, वृत्तपत्रे, संशोधन लेखातून प्रादेशिक असमतोलावर विवेचन केलेले आहे. हे संशोधित विवेचन आजही अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारे आहे. अशा सर्व साहित्यांचा आढावा घेणे शक्य नसले तरी प्रातिनिधीक स्वरूपात प्रस्तुत विषयाच्या संदर्भातल साहित्याचा संक्षिप्त आढावा प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने घेतला आहे.

आर्थिक व सामाजिक विकासात एक दुसऱ्यावर अवलंबून असणाऱ्या घटकांची सातत्याने बदल करणारी एक यंत्रणा आहे. या यंत्रणेचे कार्यसतत बदलत असते. यातूनच समाजात परिवर्तन घडून येत असते. जीवनात दृष्टीक्षेपात येणाऱ्या समस्यांचे अन्वेषण करणे म्हणजे संशोधन होय. संशोधन करताना भूतकाळाचे सिंहावलोकन केल्यास वर्तमानाचे धागेदोरे आढळतात. म्हणून संशोधनात विविध संदर्भ साहित्याचा आढावा हा संशोधनाचा अविभाज्य घटक आहे.

**२.२ संदर्भ साहित्याचा आढावा –** प्रस्तुत शोधप्रबंध लेखनासाठी एम.फिल., पीएच.डी. प्रबंध, संदर्भपुस्तके, वृत्तपत्रे अहवाल इत्यादी संदर्भ साहित्याचा तपशीलवार आढावा आपणास पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

## २.२.१ संदर्भग्रंथ–

प्रस्तुत शोधप्रबंध लेखनासाठी संदर्भग्रंथांचा घेतलेला आढावा पुढीलप्रमाणे मांडला आहे.

**१) भट कमलाताई (२००३), 'मागास भागाचा आर्थिक विकास', सेंटर फॉर बिझनेस ॲण्ड इंडस्ट्री, आशीर्वाद शाहु कॉलेज रोड, पर्वती पुणे,** या ग्रंथात महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे समालोचन करताना अतिमागास भाग म्हणून कोकणचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्र राज्य सरकारने विदर्भ मराठवाड्याबरोबर कोकणच्या प्रगतीकडे लक्ष आहे व तो प्रश्न सरकार महत्त्वाचा मानते असे वेळोवेळी घोषित केले. मात्र  अजूनही कोकणच्या आर्थिक विकासाकडे सरकार लक्ष देत नाहीत. दक्षिण कोकण (रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे) अति मागास आहेत. मुंबई लगतच ठाणे, रायगडचा औद्योगिक विकास काही प्रमाणात झाल्यामुळे विकास झाल्याचे दिसते. परंतु ग्रामीण भागाचा विचार करता संपूर्ण कोकण मागासलेला दिसतो, असे मत व्यक्त केले.

**२) संपादक जे.एफ. पाटील (मार्च २००४), 'वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर,** या ग्रंथात असे मत मांडले की, अविकसित राष्ट्राचा विकास करताना समतोलित विकासाबाबत प्रा. रोझेन्स्टीन रोडान, प्रा.रॅग्नर नर्क्स, ऑर्थर लेविस या अर्थतज्ज्ञांच्या दृष्टीकोनातून संतुलित विकास स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. देशाचा विकास समतोलित असावा याचा अर्थ अर्थव्यवस्थेत केली जाणारी गुंतवणूक ही जास्तीत जास्त विस्तारित, विविध क्षेत्रामध्ये व्हावी व उत्पादनाच्या या क्षेत्रामध्ये पुरकता असावी. पुरकता असल्यामुळे विविध क्षेत्रे परस्परांच्या मदतीने विकसित होतील व प्रादेशिक असमतोल कमी होईल.

**३) संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र जोशी (२००८), 'मराठी विश्वकोष', खंड १०, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ,** या ग्रंथात प्रादेशिक विषमता कमी करण्याच्या हेतूने मुख्यत: मागासप्रदेशाच्या विकासार्थ व्यष्टी स्तरावर केलेले आर्थिक–सामाजिक–भौगोलिक नियोजन ते प्रादेशिक नियोजन होय असे मानले जाते. प्रादेशिक नियोजनात जिल्हा नियोजन महत्त्वाचे मानले आहे. जिल्हा नियोजनाचा मुख्य हेतू राज्यांतील जिल्ह्या जिल्ह्यांमध्ये असणारी प्रादेशिक विषमता दूर करणे, प्रत्येक जिल्ह्याच्या साधनसामुग्रीचा वापर करून त्यास विकासाची

पूर्ण संधी प्राप्त करून देणे. जिल्ह्यातील लोकांना नियोजन प्रक्रियेत प्रत्यक्षपणे सहभागी करून घेणे हा आहे. यामुळे प्रादेशिक विषमता कमी होवून आर्थिक विकासाला गती प्राप्त होते.

**४) रसाळ राजेंद्र (जानेवारी २०१०), 'भारतीय अर्थव्यवस्था', सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे,** या संदर्भग्रंथात भारतातील औद्योगिक क्षेत्रातील असमतोलाचे विवेचन मांडले आहे. देशातील विविध राज्यांत औद्योगिक विकास समतोल प्रमाणात झाला नाही, असे मत मांडले असून यासाठी ब्रिटीश राजवट, भौगोलिक रचना व हवामान, पायाभूत सुविधांचा अभाव, राज्य सरकारचे धोरण, विशिष्ट राज्याला गुंतवणुकीसाठी असलेली गुंतवणुकदारांची पसंती ही कारणे जबाबदार आहेत. यावर उपाय योजना सुचविताना वित्तीय साधन सामुग्रीचे हस्तांतरण, गुंतवणुकीला प्रोत्साहन, सवलतीने वित्तपुरवठा, सार्वजनिक प्रकल्प मागासलेल्या राज्यांत उद्योजकांना प्रोत्साहन यांचा समावेश आहे.

**५) कविमंडन विजय (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर** या संदर्भग्रंथात विशाल भूप्रदेश असणाऱ्या भारतासारख्या देशात असंतोषाच्या उद्रेकाचे एक मुख्य कारण प्रादेशिक विषमता हे आहे. खाजगीकरण, उदारीकरणाने प्रादेशिक समतेला हातभार लागला नाही. १९९०–९१ ते २००२–०३ या काळात पुढारलेल्या राज्यांचे निव्वळ राज्य उत्पन्न दरवर्षी ५.६% वाढले. मात्र भागास राज्यात हा दर केवळ १.७% होता. आर्थिक सुधारणांच्या काळात प्रादेशिक विषमता वाढत गेल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**६) रायखेलकर दामजी (जानेवारी २०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद** या ग्रंथात भारतातील सर्व राज्यांमध्ये पर्जन्य, हवामान या बाबतीत विभिन्न आहे. यामुळे शेतीचा सारखा विकास होऊ शकला नाही. म्हणून आर्थिक विकासाच्या पातळीवर असमतोलपणा वाढला आहे. लघुउद्योग, कुटिरउद्योग, हस्तोद्योग यांना प्रोत्साहन देऊन मागासलेल्या राज्यांचा विकास साधता येतो. ग्रामीण भागात कृषीउद्योगांना चालना दिल्यास संतुलित आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठता येईल. औद्योगिकीकरणाद्वारे मागासलेल्या भागात नवे उद्योग सुरू करून समतोल प्रादेशिक विकास साधता येतो असे स्पष्ट केले.

**७) बिराजदार शैला (२०१४, 'भारतीय अर्थव्यवस्था', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, जळगाव,** या संदर्भग्रंथात भारतीय नियोजनाचे प्रादेशिक असमतोल दूर करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. देशातील शेती, उद्योग, वाहतूक व दळणवळण क्षेत्र, वित्त व विमा क्षेत्र या सर्वांचा

संतुलित विकास घडवून आणण्याबरोबरच देशातील सर्व घटक राज्ये, केंद्रशासित प्रदेश, यांचाही संतुलित विकास घडवून आणणे महत्त्वाचे आहे. यासाठी भारतीय नियोजनात प्रादेशिक असमतोल कमी करण्यावर भर दिल्याचे दिसते.

**८) कद्रेकर श्रीरंग (मार्च २०१५), 'कोकणचं पाणी समस्या आणि उपाय', उत्कर्ष प्रकाशन, पुणे,** या ग्रंथात वीजनिर्मितीसाठी सोडण्यात येणारे पाणी म्हणजे 'अवजल' हे चिपळूण परिसरातील वाशिष्ठी नदीवरील पुलाखालून वाहून अरबी समुद्राला मिळते. या अवजलाचा उपयोग शेती, पिण्यासाठी व उद्योगासाठी होवू शकतो. टेंबू, म्हैसाळ या प्रकल्पातून शेतीसाठी पाण्याचा उपयोग होतो. याच धर्तीवर कोकणात योजना आखून शेतीसाठी पाणी द्यावे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकांना पिण्यासाठी पाण्याची उपलब्धता होईल. वाशिष्ठी नदीत धरण बांधल्यामुळे खेड, दापोली, मंडणगड या तालुक्यांना व लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्र यांना या पाण्याचा उपयोग होईल. याच जिल्ह्यात कागद निर्मिती उद्योग, उर्जा प्रकल्प व इतर उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा होईल. फक्त योग्य नियोजन आखणे गरजेचे आहे.

### २.२.२ संशोधन लेख –

प्रादेशिक असमतोलावर आधारित विविध तज्ञ व्यक्तींनी लिहिलेल्या लेखांचा संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. हे लेख वर्तमानपत्र त्रैमासिके, मासिके यामध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे मांडले आहे.

**१) सोनवणे बच्छाव (मे २००९), 'विशेष आर्थिक क्षेत्र आणि पायाभूत सुविधांचा विकास' 'विकास समर्पित योजना', मासिक वर्ष ३६, अंक १०, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार** या मासिकातील लेखात पायाभूत सुविधांच्या संदर्भातील प्रादेशिक असमतोल दूर होईल का? असा प्रश्न उपस्थित केला. ज्या राज्यामध्ये पायाभूत सुविधा पूर्वीपासूनच उपलब्ध आहेत. तेथेच उद्योग काढणे कमी खर्चात व त्वरित शक्य असल्यामुळे उद्योजक त्याच राज्यांना पसंती देतात. त्यामुळे राज्याराज्यामधील स्पर्धा व विषमता वाढत आहे. परवानगी मिळालेले सेझ ४०३ असून सर्वाधिक क्षेत्रे ७५ इतके महाराष्ट्रात आहे. म्हणजेच इतर राज्यांच्या तुलनेत औद्योगिकीकरणाचे केंद्रीकरण वाढणार. या क्षेत्रात ७५ पैकी ७ विदर्भात, ८ मराठवाड्यात, ६० पुणे, नाशिक, ठाणे, मुंबई, रायगड या प्रदेशात आहेत. त्यामुळे

प्रादेशिक असमतोल, उत्पन्न,रोजगार, विषमता, स्थलांतर या सर्वांचे जात–धर्म, भाषा यानुसार होणारे सामाजिक–सांस्कृतिक परिणाम कसे असतील याचे स्पष्टीकरण केले गेले असून प्रगत राज्यात अधिक विशेष आर्थिक क्षेत्र असल्यामुळे त्यांची आणखी झपाट्याने प्रगती होवू शकते. इतर राज्ये मागेच राहतील. देशातील भौगोलिक असमतोल दूर होणे त्यामुळे शक्य नाही. उलट तो अधिकच वाढेल. याबरोबर उत्पन्न व मालमत्ता असमतोल वाढण्याची स्थिती कारणीभूत होईल, असे मत मांडले.

**२) धेंडे धर्मा (२००९) , 'कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती व भू–जैविक विविधता आणि प्रादेशिक विकास एक अभ्यास','अर्थसंवाद'** या नियतकालिकात शोधनिबंध मांडताना जमीनीची धूप, पायाभूत सुविधांचा अभाव, जलसिंचनाचा अभाव, खडकाळ डोंगराळ प्रदेश, लोकांचे स्थलांतर, निरक्षरता या समस्यांमुळे विकासाच्या प्रक्रियेत तालुकामागे पडला असा निष्कर्ष मांडला आहे.

**३) इंगळे जे. एस. (एप्रिल २०१२), 'अंदाजपत्रक : आर्थिक व सामाजिक विकासाचे साधन', 'योजना',** या मासिकातील लेखात प्रादेशिक असमतोल ही भारतासमोरील एक अत्यंत महत्त्वाची आणि गंभीर समस्या आहे. आजही भारतातील काही राज्ये प्रगत आहेत तर काही राज्ये अप्रगत आहेत. प्रादेशिक असमतोलामुळे अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांना जनता व सरकार दोघांनाही तोंड द्यावे लागते. अंदाजपत्रकाच्या माध्यमातून देशातील प्रादेशिक असमतोल दर करता येतो. देशांतर्गत, राज्यांतर्गत, जिल्ह्यातंगर्तत व तालुक्यांतर्गत विकासातील असमतोल दूर करणे शक्य होते. भारत सरकार आपल्या अंदाजपत्रकात अप्रगत राज्ये, अप्रगत जिल्हे व अप्रगत तालुके यांच्या विकासासाठी भरीव तरतुद करताना दिसते. यांमुळे प्रादेशिक असमतोलाची व त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची तीव्रता कमी होताना दिसते. आसाम, नागालँड या राज्यांत उद्योजकांनी गुंतवणूक करावी यासाठी आयकरात व इतर करात सवलती दिल्या जातात. तसेच अशा राज्यांच्या विकासासाठी अंदाजपत्रकात मोठ्या खर्चाची तरतूद केली जाते. याचा चांगला परिणाम अनुभवास येतो असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

**४) सरदेशमुख सुहास (फेब्रुवारी २०१४), 'अनुशेषाचा शेष' , दै. लोकसत्ता** मधील लेखात असे मत मांडले की, असमतोल विकासाचा मुद्दा पाण्याभोवती केंद्रित आहे. राज्याच्या दरडोई

उत्पन्नाच्या तुलनेत मराठवाडा ४० तर विदर्भ २७% नी मागे आहे. निधी वाटपाच्या सुत्रानुसार आर्थिक नियोजन करताना ३०% रक्कम जलसंपदा निर्मितीसाठी खर्च करावी. तीव्र पाणी टंचाई असलेले ४४ तालुके आहेत या तालुक्यांना प्राधान्याने निधी दिला जावा. समतोल विकासासाठी आर्थिक योजनेतील ३०% निधी सलग ८ वर्षे देण्यात यावा. शहरी व ग्रामीण भागात दरडोई किमान १४० लिटर पाणी दिले जावे. एका पाणलोटासाठी दर हेक्टरी २५ हजार रूपयांची तरतुद वाढवावी. असे मत व्यक्त केले.

**५) चौधरी दिपक व खाचणे अशोक (एप्रिल जून २०१४), 'महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल'** 'अर्थसंवाद' या मासिकातील लेखात प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सिंचनाच्या सुविधा सर्व जिल्ह्यांमध्ये समप्रमाणात उपलब्ध कराव्यात. औद्योगिकीकरणाचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण किंवा मागासलेल्या भागामध्ये उद्योगांच्या स्थलांतरावर भर द्यावा. आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी इ. सुविधा मुबलक व समप्रमाणात उपलब्ध असाव्यात. ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट ठेवून जिल्हावार नियोजन करायला हवे. माागसलेल्या विभागांच्या विकासासाठी विशेष वित्तीय तरतुद करायला हवी. या उपाययोजना मांडल्या आहेत. या उपाययोजनांची सरकारने प्रभावी अंमलबजावणी केल्यास महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाची समस्या नक्कीच कमी होईल. तसेच आर्थिक–सामाजिक विकास वेगाने होईल असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**६) केशवा एस.आर. (डिसेंबर २०१४), 'भारतीय राज्यामधील थेट परकीय गुंतवणूकीचा प्रादेशिक असमतोल', 'योजना'** या मासिकातील लेखात ७०% थेट परदेशी गुंतवणूक एकवटलेल्या सहा राज्यांत प्रादेशिक असमानता वाढली आहे. जास्त परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, दादरा नगर हवेली, दमन व दीव, दिल्ली, हरियाणा, तामिळनाडू, पाँडेचेरी, कर्नाटक, गुजरात आंध्रप्रदेश या राज्यांत असून ७०% गुंतवणूक आहे. मध्यम गुंतवणूकीचा ओघ पश्चिम बंगाल, सिक्कीम, अंदमान व निकोबार, राजस्थान, चंदीगड, पंजाब, मध्यप्रदेश, छत्तीसगड, केरळ व लक्षद्विप या राज्यांत २.५% इतकी गुंतवणूक आहे. अतिशय कमी गुंतवणूक असलेली राज्ये ईशान्येकडील राज्ये, बिहार, झारखंड, गोवा, ओरिसा यांचा समावेश आहे. या राज्यामध्ये १% पेक्षा ही कमी गुंतवणूक आढळते. थेट परकीय गुतंवणुकीतील प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी मोठ्या बाजारपेठा, कौशल्यपूर्ण

मनुष्यबळाची उपलब्धता, चांगल्या पायाभूत सुविधा, उद्योगास अनुकुल वातावरण ही त्यांची महत्त्वाची कारणे मांडली आहेत. कमी गुंतवणूक असलेल्या राज्यांनी परदेशी गुंतवणूकदारांना सवलती देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रशासनात सुधारणा, पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचार कमी केला, पायाभूत सुविधा दिल्या तसेच राज्ये गतीक्षम व संवेदनक्षम बनवले तर त्यांच्याकडेही थेट परदेशी गुंतवणूक वाढू शकेल आणि प्रादेशिक अमसतोल कमी होईल असे मत मांडण्यात आले आहे.

**७) भांडवलकर रामदास (एप्रिल–जून २०१५), 'महाराष्ट्रातील आंतरप्रादेशिक विषमता', 'अर्थसंवाद'** या त्रैमासिकातील लेखात देशातील विभिन्न लोक, समाज व प्रदेश यांच्यामध्ये आर्थिक विकासाच्या यशाचे असमान वितरण आणि त्यामुळे आर्थिक विकासात असमानता आणि अंतर निर्माण होणे म्हणजेच प्रादेशिक विषमता होय. प्रादेशिक विषमतेची समस्या जगातील विकसित व अविकसित अशा दोन्ही प्रकारच्या देशामध्ये आढळून येते. रशिया, चीन सारख्या समाजवादी देशामध्ये प्रादेशिक विषमतेची समस्या असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रातील विदर्भात प्रचंड प्रमाणात अनुशेष आढळून येतो. विदर्भातील रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करून नवीन सिंचन प्रकल्पाला मंजूरी देताना भविष्यात विदर्भाच्या दृष्टीने उपयोग होईल याचा विचार करणे आवश्यक आहे. विदर्भात उपलब्ध असणाऱ्या खनिज संपत्तीचा उपयोग करण्यासाठी त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग त्याच परिसरात निर्माण करून स्थानिक तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास मदत होईल. बुटीबोरी, हिंगणा, मिहान प्रकल्पांचा विकास करणे आवश्यक आहे. विदर्भातील उत्पादित होणाऱ्या कृषीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे विदर्भातच उभारले जावे. उदा. कापसावर आधारित सुतगिरण्या, कापडगिरण्या, संत्र्यावर प्रक्रिया उद्योग, ज्वारीपासून माल्ट व इथेनॉल उद्योग उभारल्यास रोजगार निर्मिती होईल असे मत मांडले आहे.

### २.२.३ राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासगट –

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना राष्ट्रीय व राज्य स्तरावरील खालील अभ्यासकांच्या अहवालांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## १) पांडे समिती

देशातील मागास भाग कोणते ते ठरविण्याच्या उद्देशाने १९६८ साली भारत सरकारने एका अभ्यासगटाची (वर्कींग ग्रुप आयडेंटीफिकेशन ऑफ बॅकवर्ड ऑफ एरियाज) नेमणूक केली. पांडे समिती म्हणून हा अभ्यास गट ओळखला जातो. औद्योगिक विकासाला प्रोत्साहन अशा खास उपाययोजना करण्याच्या दृष्टीनेच मुख्यत: या गटाने मागास भाग कोणते याचा विचार करावयाचा होता. कोणते जिल्हे मागास आहेत हे ठरविण्यासाठी पांडे समितीने पुढील गमके वापरण्याची शिफारस केली.

१) मोठी शहरे व मोठे औद्योगिक प्रकल्प यांच्या पासूनचे अंतर
२) दरडोई उत्पन्न
३) द्वितीय व तृतीय व्यवसायामध्ये असलेली लोकसंख्या
४) कारखानदारी रोजगार
५) आर्थिक व नैसर्गिक साधनसंपत्ती तशीच पडून राहणे वा तिचा पुरेपूर उपयोग न केला जाणे त्यावर विचार करून राष्ट्रीय योजना आयोगाने राष्ट्रीय विकास मंडळाच्या सल्लामसलतीने पुढील गमकाची शिफारस केली.
६) अन्नधान्ये किंवा नगदी पिके यांचे दरडोई उत्पादन
७) शेतीमध्ये काम करून पोट भरणाऱ्या लोकसंख्येमधील प्रमाण
८) दरडोई औद्योगिक उत्पादन
९) कारखानदारी रोजगार द्वितीय व तृतीय व्यवसायांमध्ये रोजगारांचे प्रमाण
१०) विजेचा दरडोई वापर
११) लोकसंख्येच्या प्रमाणात पक्के रस्ते आणि रेल्वे मार्ग यांची लांबी

योजना आयोगाने निर्धारित केलेल्या कसोट्यांचा वापर करून महाराष्ट्रातील पुढील तेरा जिल्ह्यांचे औद्योगिकदृष्ट्या मागास भाग असे वर्गीकरण पांडे समितीने केले होते. बीड, उस्मानाबाद, भंडारा, रत्नागिरी, औरंगाबाद, यवतमाळ, चंद्रपूर, धुळे, बुलढाणा, नांदेड, परभणी, जळगाव, कुलाबा (रायगड)

## २) चक्रवर्ती समिती

मागास भाग निश्चित करणे आणि त्यांचे वर्गीकरण करणे या प्रश्नाच्या अभ्यासासाठी नेमलेल्या चक्रवर्ती समितीने याविषयी अधिक पद्धतशीर चिकित्सा केली आहे. मागास भागाच्या विकासाच्या संदर्भात शिफरशी करण्यासाठी नेमलेल्या राष्ट्रीय समितीने आपल्या अहवालामध्ये चक्रवर्ती समितीच्या अहवालाच्या मसुद्यात सारांश दिला आहे.

चक्रवर्ती समितीने मागासलेपणा ठरविण्याच्या दृष्टीने पुढील चौदा गमके सांगितली आहेत.

i. लोकसंख्येची घनता
ii. पोटापाण्यासाठी काम करणाऱ्या एकूण लोकसंख्येमध्ये शेतीवर उपजिविका करणाऱ्याचे प्रमाण
iii. ग्रामीण लोकसंख्येच्या दरडोई अन्नधान्याच्या उत्पादनाचे स्थुल निर्देशांक
iv. ग्रामीण लोकसंख्येच्या दरडोई अन्नधान्य सोडून इतर पिकांच्या उत्पादनाचे स्थुल निर्देशांक
v. ग्रामीण लोकसंख्येच्या दरडोई सर्व पिकांच्या उत्पादनाचे स्थुल निर्देशांक
vi. नवे उत्पादन व दुरूस्ती काम करणाऱ्या एकूण कारखान्यापैकी विजेचा वापर करणाऱ्या कारखान्याचे प्रमाण.
vii. खाजगी, कौटुंबिक, एकूण घरांशी विजेचा वापर करणाऱ्या खाजगी कौटुंबिक घरांचे प्रमाण
viii. खाजगी कुटुंबे परिवार वगळता इतर उत्पादकात वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण
ix. नोंदणी केलेल्या कारखान्यांमधील कामगारांचे दर एक लाख लोकसंख्येशी प्रमाण
x. दर १०० चौरस किमी क्षेत्रामागे पक्क्या रस्त्यांची लांबी
xi. दर एक लाख लोकसंख्येसाठी पक्क्या रस्त्यांची लांबी
xii. पुरूषांच्या लोकसंख्येशी साक्षर पुरूषांचे प्रमाण
xiii. स्त्रियांच्या लोकसंख्येशी साक्षर स्त्रियांचे प्रमाण
xiv. एकूण लोकसंख्येशी एकूण साक्षरांचे प्रमाण

याच्या माध्यमातून भारतात मागास भागाचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

### २.२.४ राज्य स्तरावरील अभ्यासगट –

प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी केंद्र व राज्य सरकारने नेमलेल्या अभ्यासगटांचे अहवाल प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त आहेत. विविध आयोग, समित्या, अभ्यासगटांच्या संदर्भ साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे मांडला आहे.

**१) महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग, (श्री. स.गो. बर्वे आयोग)(१९६२), महाराष्ट्र शासन –** महाराष्ट्र राज्यातील असमतोल सिंचना विषयक प्रश्न आणि जलसंपत्ती विकासाच्या संबंधित बाबी यांची चौकशी करून त्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी सरकारने ७ डिसेंबर १९६० रोजी श्री.स.गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना केली. आयोगाने त्यांचा अहवाल ९ जून १९६२ मध्ये सादर केला त्यात पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१) ज्या प्रदेशात प्रवाही सिंचनाने पाणी पोहचू शकत नाही. त्या प्रदेशात विहिरीसारखी सिंचन साधने केंद्रीभूत केली जावीत. यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होईल.

२) वैयक्तिक शेतकऱ्यांना ज्या क्षेत्रास सिंचन पाणी घ्यावयास परवानगी द्यावी व त्या क्षेत्रावर विशेषत: रोखीच्या पिकासाठी कमाल मर्यादा बसवून शेतकऱ्यांमध्ये सिंचित  क्षेत्राचे न्याय विभाजन साधले जावे. यामुळे आर्थिक विषमता कमी होईल.

३) पाण्याच्या विविध उपयोगातील अग्रकमाचे धोरणात घरगुती गरजांना प्रथम प्राधान्य व नंतर उद्योगांना अग्रक्रम मिळावा. पण ज्या उद्योगाची पाण्याची गरज मोठी आहे असे उद्योग ज्या खोऱ्यात पुरेसे पाणी आहे, तेथेच केंद्रित करावे.

४) सिंचनाच्या विकासाचा कालावधी हा बांधकामास सुरूवात झाल्यापासून ८ वर्षे किंवा सिंचनास सुरूवात झाल्यापासून ५ वर्षे इतका कमी करण्यात यावा.

५) कालवे आणि चाऱ्या ज्या भागातून जाणार आहेत, त्या ग्रामीण भागातील घरगुती पाणी पुरवठ्याच्या गरजा विचारात घेतल्या जाव्या. खेड्डुताच्या उपयोगासाठी कालव्यावर घाट बांधावे पक्के रस्ते बांधावे. या सुधारणा प्रकल्प आखणीत समाविष्ट कराव्यात.

६) कोणत्याही प्रकल्पामुळे निर्वासित झालेल्या लोकांचे प्रत्यक्ष पुनर्वसन करण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारावी.

७) प्रत्येक प्रकल्पाकरिता अभियांत्रिकी बाजूशिवाय इतर बाजूंचा विकास असणारी व्यापक योजना तयार करावी यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होईल. सदर शिफारशी अत्यंत महत्त्वपूर्ण मानता येतील.

**२) अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन (सुकथनकर) समिती १९७३, महाराष्ट्र शासन, मुंबई –**

१९७२–७४ या काळातील भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळी भागाच्या अभ्यासासाठी शासनाने १९७२ साली सुकथनकार समिती नेमली या समितीने १९७३ साली शासनाला जो अहवाल सादर केला त्यात पुढील महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत.

१) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी जुन्या सिंचन प्रकल्पांचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण करून दुष्काळग्रस्त भागात प्रोटेक्टीव्ह सिंचन सुविधा उपलब्ध करावी.

२) राज्यातील ८३ तालुके अवर्षण प्रवण म्हणून जाहीर करण्यात यावेत.

३) या क्षेत्रात मृदा व जलसंधारणाची कामे एकात्मिक पद्धतीने पाणलोट क्षेत्र आधारावर करण्यात यावीत.

४) जादा पर्जन्यमानाच्या क्षेत्रातील जलाशयातून या क्षेत्रात उपसासिंचन पद्धतीने सिंचन करण्यास परवानगी द्यावी व ठिंबक सिंचनाला प्रोत्साहन द्यावे.

५) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सर्व सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात भू–सुधारणेची कामे करावीत. सिंचनाचा फायदा ज्या जमिनीला मिळू शकतो अशा सर्व जमिनीवर कर आकारणी करावी.

६) पाण्याचे वाटप करताना टंचाईग्रस्त भागाला अधिक प्राधान्य द्यावे. यामुळे मराठवाडा विदर्भ यांतील प्रादेशिक असमतोल कमी होईल.

७) पाण्याची उपलब्धता व वापर यांचा हिशोब ठेवण्यासाठी एक कायमस्वरूपी संघटना स्थापन करावी. या महत्त्वाच्या शिफारसी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपयुक्त आहेत.

**३) कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती १९८०, बी.जी. खताळ, महाराष्ट्र शासन, मुंबई**

कोकणची भौगोलिक रचना, हवामान, पर्जन्य लागवडयोग्य क्षेत्र, नवीन पीक रचना यांचा विचार करून कोकण विभागाच्या सिंचन विकासाचा समयबद्ध आणि सुविहीत बृहत

आराखडा तयार करून सिंचन विकास करण्याकरिता शासनाने पाटबंधारे मंत्री बी.जी. खताळ यांच्या अध्यक्षतेखाली १७ ऑक्टोबर १९८० मध्ये समिती नेमली. या समितीच्या शिफारशी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) मुंबई शहरातील लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी कोकणातील ग्रामीण भागात सिंचन, पिण्याचे पाणी, औद्योगिक पाणी वापरासाठी जलसाठे व इतर सुविधा तातडीने निर्माण कराव्यात.

२) 'खार जमिनी बोर्डाकडून' पाटबंधारे खात्याकडे आलेल्या सर्व खार भूमी योजनांची तातडीने दुरूस्ती करावी.

३) मुंबई महानगर प्राधिकरणाने 'हिरवा पट्टा' राखण्यासाठी घरगुती पाणी पुरवठ्या खालोखाल सिंचनास अग्रक्रम द्यावा.

४) भारजा नदी खोऱ्यापासून दक्षिणेस तिल्लारी खोऱ्यापर्यंतच्या क्षेत्रास विपुल पाणी लागणारे उद्योगधंदे उभारल्यास खास सवलती व आकर्षणे निर्माण करून द्यावीत.

५) कोकणात कर्मचारी आकर्षित करण्यासाठी त्यांना जरूर ते प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

६) जलाशयातून पाणी उलचण्याची मर्यादा कोकणात १०% असावी.

**४) कोकण बृहत आराखडा, स्वामीनाथन समिती (१९८१), महाराष्ट्र शासन, मुंबई –**

पश्चिम घाटातील जलसंपत्तीचा अभ्यास करण्यासाठी सरकारने नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली १४ जानेवारी १९८१ साली समिती स्थापन केली. या समितीने मार्च १९८१ ला अहवाल सादर केला व त्यात पुढील शिफारशी केल्या आहेत.

१) हवामानविषयक माहितीसाठी संशोधन केंद्र स्थापन करावे.

२) धरणग्रस्तांना शेतीसाठी पर्यायी जमीन उपलब्ध नसल्याने फळबागा, मत्स्य व्यवसाय वनशेती इत्यादी बाबींचे वेगळे धंदे व प्रशिक्षण देण्याबाबत विचार करण्यात यावा.

३) कोकणासाठी स्वतंत्र लाभक्षेत्र विकास प्राधिकरण सन १९८१–८२ पासून प्रस्थापित करावे. त्यांच्या प्रशासकीय रचनेत शेतकऱ्यांच्या संघटनेस स्थान द्यावे.

४) जलविद्युत प्रकल्पांच्या आखणीसाठी ७५% किंवा ९०% विश्वासार्हता विचारात न घेता आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असल्यास सरासरी उपलब्ध पाणी विचारात घेण्यासाठी विचार व्हावा.

५) जांभ्या मातीमध्ये पाणी व्यवस्थापनासाठी वेगळी पद्धत विकसित करण्यासाठी चाचणी व प्रात्यक्षिक केंद्र रत्नागिरी जिल्ह्यात विकसित करावे.

६) खार जमिनीच्या संदर्भात प्रात्यक्षिक केंद्र रत्नागिरी जिल्ह्यात विकसित करावे.

७) खार जमिनीच्या वापरातून भात शेती, मत्स्य शेती, मीठ उत्पादन यांचा विचार करून जमिनीचा कार्यक्षम वापर करण्यात यावा.

**५) खारभूमी विकास समिती, श्री.रा. वि. बेलोसे (१९८१), महाराष्ट्र शासन मुंबई**

महाराष्ट्र शासनाने श्री.रा.वि. बेलोसे अध्यक्षतेखाली खार भूमी विकास समिती जून १९८१ मध्ये नेमली. या समितीने आपला अहवाल मार्च १९८३ मध्ये सादर केला. या अहवालात पुढील शिफारसी महत्त्वाच्या आहेत.

१) कोकणातील एकूण खार भूमीपैकी ठाणे जिल्ह्यात ३१.७% , रायगड ४८.५%, रत्नागिरी ९.०% , सिंधुदुर्ग १०.८% आहेत. या खार भूमीच्या विकासाची जबाबदारी सरकारने स्विकारली.

२) बेलोसे समितीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान एक तरी खाडी मुखबंदीचा प्रकल्प हाती घेण्याची शिफारस केली.

३) दिवसातील दोन वेळच्या भरती–ओहटीचा विचार करता बंधाऱ्याचे काम समुद्राच्या लाटांमुळे टिकणार नाही.

४) मच्छीमारी व्यवसायावर विपरित परिणाम होईल.

५) तिवराची जंगले ही खार जमिनीच्या परिसंस्थेचा मुख्य भाग असतो. त्यांना आवश्यक ते खारे पाणी बंद झाले तर ते नाहिशी होतील.

**६) प्रादेशिक–अनुशेष विषयक दांडेकर समिती (१९८४), महाराष्ट्र शासन, मुंबई**

प्रा.वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याबाबत सत्यशोध समितीची स्थापना ३ ऑगस्ट १९८३ साली केली. या समितीने आपला

अहवाल ३० एप्रिल १९८४ रोजी सादर केला. त्यात पुढील महत्त्वाच्या शिफारशी मांडल्या आहेत.

१) समितीने सिंचनाच्या संदर्भात 'जिल्हा' हा सुयोग्य घटक ठरत नसल्याने राज्याच्या सर्वच प्रदेशांतील सिंचनाबाबतची अनुशेषाची मोजणी तालुका पातळीवर करणे आवश्यक आहे. अशी महत्त्वाची शिफारस केली होती.

२) विविध प्रदेशांत वेगवेगळी पीक रचना अस्तित्त्वात असल्यामुळे सिंचन विकासाच्या संदर्भात सर्वांच्या सिंचन क्षेत्राची मोजणी समान निर्देशकानुसार होण्यासाठी 'रब्बी समतुल्य क्षेत्राची संकल्पना' अनुशेष मोजण्यासाठी स्विकारली.

३) विवक्षित अनुशेष भरून काढण्यासाठी राज्याच्या निधीपैकी १५% रक्कम राखून ठेवावी.

४) विकासातील प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी कार्यान्वित केलेली धोरणे, कार्यक्रम व प्रक्रिया यावर नजर ठेवण्यासाठी एक संवैधानिक प्राधिकरण स्थापन करावे अशी सूचना केली.

५) समितीने रस्ते, सिंचन, ग्रामीण विद्युतीकरण, सर्वसामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी, भूविकास व मृदासंधारण आणि पशुविकास या नऊ प्रमुख क्षेत्रांची निवड केली. तसेच प्रत्येक क्षेत्रातील उपक्षेत्रात लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्र हे दोन प्रमुख घटक निवडले.

६) समितीने दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी महत्त्वपूर्ण शिफारशी मांडल्या आहेत.

७) अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया ही १९८२–८३ चा अनुशेष दूर झाला म्हणजे संपणारी नव्हती. म्हणून दांडेकर समितीने दर पाच वर्षांनी आढावा घ्यावा असे सुचविले होते.

**७) दुसरा सिंचन आयोग (१९९५), महाराष्ट्र शासन, मुंबई**

डिसेंबर १९९५ मध्ये डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा सिंचन आयोग नेमण्यात आला. आयोगाने १९९९ मध्ये शासनाला अहवाल सादर केला. या अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत

१) ग्रामीण भागातून नागरी भागाकडे होणारे लोकसंख्येचे स्थलांतरण थांबविण्यासाठी पाणी व जलसिंचनाचे नियोजन करताना लोकसंख्या विकेंद्रीकरणास मदत होईल या दृष्टीकोनातून धोरण राबवावे. रोजगार व उत्पादनाच्या प्राथमिक क्षेत्रावरील भार कमी

करून द्वितीय व तृतीय स्तरावरील उद्योग व्यवसायाचे विविध जिल्ह्यांत विकेंद्रीकरण करावे लागले.

२) ज्या भागात कापूस पिकतो त्या भागात सुतगिरण्या व कापडगिरण्या उभारण्यात प्रोत्साहन द्यावे.

३) ग्रामीण भागात शिक्षण घेणारा विद्यार्थीवर्ग हा येथील सिंचन व कृषी आधारित औद्योगिक विकासाच्या नव्या गरजांसाठी उपयुक्त व्हावा म्हणून शैक्षणिक अभ्यासक्रमांत बदल करून योग्य ते प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण केले जावे.

४) वैनगंगा खोऱ्यात व कोकणात (सिंचनाच्या दृष्टीने मागासलेल्या भागात) तुषार सिंचन पद्धतीस प्रोत्साहन देण्यासाठी सिंचन प्रकल्पाच्या किंमतीत यासाठी लागणाऱ्या व्यवस्थेच्या खर्चाची तरतूद करावी.

५) उद्योगासाठी वापरलेल्या पाण्याचे शुद्धीकरण करून किमान ७५% पाणी पुनर्वापरासाठी उफलब्ध करून देण्याच्या अटीवरच उद्योगांना पाणीपुरवठा करण्यात यावा.

६) पर्वतीय किनारपट्टी, चिंचोळा भाग, उपलब्ध जलस्त्रोतात यांचा योग्य वापर करून वीजनिर्मितीला प्रोत्साहन द्यावे.

७) कोकणात बागायत शेती पद्धती राबवून शेतमालाची विक्री व्यवस्था उपलब्ध झाल्यास कोकणचा आर्थिक मागासलेपणा कमी होईल.

८) कोकणात सर्वाधिक पाण्याची उपलब्धता असल्यामुळे नदी प्रवाह व पर्जन्यमानाचा विचार करता संपूर्ण दख्खनच्या पठाराला पावसाळ्याशिवायच्या काळात पाणी पुरेल या दृष्टीने पीक पद्धतीचा विचार व्हावा.

९) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शिक्षण व रोजगार यांना प्राधान्य द्यावे. या दोन बाबींवर लक्ष केंद्रित केल्यास समतोल निर्माण होईल.

**८) कोयना अवजल वापर अभ्यासगट (२००६), अहवाल महाराष्ट्र शासन, मुंबई**

कोयना अवजल वापर करण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र अभ्यासगट महाराष्ट्र शासनाने २००५ मध्ये नेमला. या अभ्यासगटचा अहवाल २००६ मध्ये शासनाला सादर केला. त्यात पुढील महत्त्वपूर्ण शिफारशी आहेत.

१) कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे राज्याची १/३ वीजेची गरज भागविली जाते. या वीजेचा उपयोग वीजेची मागणी असते तेव्हा होतो. वीजनिर्मितीनंतर सोडण्यात येणारे पाणी म्हणजे 'अवजल' हे दरवर्षी १९११ दशलक्ष घनमीटर निर्माण होते. यापैकी ५% अवजल सध्या चिपळूण परिसरात उद्योग व शेती साठी वापरले जाते. ९५% अवजलाचा वापर होण्यासाठी प्रयत्न करावेत.

२) प्रतिदिन ६ द.ल.घ.मी पाणी नदी पात्रात सोडले जाते. त्यापैकी शेतीसाठी १ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध होऊ शकेल.

३) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेती, उद्योग व पिण्यासाठी पाण्याचा उपयोग करून घेता आला तर प्रादेशिक असमतोल कमी होईल.

४) या अभ्यासगटाने या पाण्याचा बाटली बंद निर्जंतूक पाणी तयार करण्यासाठी उद्योग सुरू करता येईल.

५) जलवाहिन्यांना कोकण रेल्वे मार्गाचा मार्गदर्शक म्हणून विचार करता येईल.

**९) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समिती – विजय केळकर (ऑक्टोबर २०१३),**

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी या समितीने पुढील शिफारशी सुचविल्या आहेत.

१) योजनांतर्गत साधन संपत्तीची सर्वप्रथम सर्वसाधारण क्षेत्र व जलक्षेत्र यामध्ये ७०:३० या प्रमाणात विभागणी करावी.

२) प्रादेशिक पातळीवरील साधनसंपत्तीची प्रादेशिक जिल्हा व गट पातळ्यांवर विभागणी झाली पाहिजे. राज्यामध्ये राज्यस्तरीय योजना, प्रदेशस्तरीय योजना, जिल्हास्तरीय योजना आणि गटस्तरीय योजना असे योजनांचे चार स्तर असावेत.

३) जनजाति क्षेत्र उपाययोजनेच्या निधीच्या मर्यादा व नियतवाटप ग्रामसभा ५०%, ग्रापंचायत १५%, पंचायत समिती १५%, जिल्हा स्तर १०% आणि राज्यस्तर १०% असे असावे.

४) राज्यात दोन जनजाति विद्यापीठे असावीत. त्यापैकी एक गडचिरोली मधील गोंडवन विद्यापीठ व दुसरे ठाणे किंवा नाशिक जिल्ह्यात स्थापन करावे.

५) कोरडवाहू जमिनीची उत्पादकता वाढविण्याकरिता, कोरडवाहू जमीन कृषी विकास कार्यक्रमाची पाणलोट क्षेत्र अभियानासह अंमलबजावणी करावी.

६) नवीन शेतीच्या मानवी साधनसंपत्तीचा गरजा भागविण्यासाठी प्रत्येक तालुक्याकरिता एक कृषी तंत्रनिकेतन असावे तसेच गावांच्या समुहासाठी एक कृषी तंत्रनिकेतन असावे.

७) प्रत्येक प्रदेशाकरिता एक 'शेतकरी महिला प्रशिक्षण' संस्था असावी.

८) सूक्ष्म लहान व मध्यम उपक्रम क्षेत्राकरिता भांडवल मिळण्यामध्ये सुधारणा करण्याकरिता सूक्ष्म, लहान व मध्यम उपक्रम पत हमी महामंडळ निर्माण करण्यात यावे.

९) प्रादेशिक पर्यटन विकास महामंडळामार्फत पर्यटन उद्योगास विशेष करून जोमदारपणे चालना द्यावी.

१०) ग्रामीण तसेच शहरी भागात पाण्याची उपलब्धता करून द्यावी. त्याचे किमान दरडोई प्रमाण १४० लिटर इतके असावे. ग्रामीण भागात १४० लिटर पशुधन पाण्याचा समावेश आहे.

११) कोकण प्रदेशात 'जलकुंड' आणि लघुसिंचन योजना तातडीने राबविण्यात याव्यात.

१२) कोकण प्रदेशात पूर नियंत्रणाकरिता स्वतंत्र व विशेष तरतुदीचा शोध घेण्यात यावा.

१३) आरोग्य क्षेत्रात प्रादेशिक असमतोल आहे. तुटीच्या मोजमापाच्या परिभाषेत आरोग्याची अंदाजे तुट ही विदर्भ १२१.८, मराठवाडा १०८.९ आणि उर्वरित महाराष्ट्र ६९.३ इतकी आहे.

१४) राज्याच्या विविध भागातील नामांकित संस्थांना मागास क्षेत्रात, त्यातही खास करून जनजाति क्षेत्रात, त्यांचे परिसर सुरू करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यांत माध्यमिक आणि तंत्रशिक्षण अशा दोन्ही स्तरावरील शिक्षणाचा समावेश असावा.

१५) राज्यशासनाने रत्नागिरी ते नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा.

### २.२.५ शोधनिबंध–

प्रस्तुत शोधप्रबंध लेखनासाठी प्रादेशिक असमतोलावर आधारित विविध तज्ञ व्यक्ती आणि मार्गदर्शकांनी सादर कलेले शोधनिबंध पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

**१) कद्रेकर श्रीरंग (नोव्हेंबर १९९९), 'कोकणच्या आर्थिक विकासाच्या समस्या आणि दिशा',२३ व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेत शोधनिबंध सादर केला असून,** या शोधनिबंधात कोकणातील १९८९–९० ते १९९१–९२ मध्ये रत्नागिरी जिल्ह्याचे दरडोई वार्षिक उत्पन्न केवळ ४७६३ रू. इतके असून कोकणातील इतर जिल्ह्यांपेक्षा खूपच कमी आहे. कारखान्यातील कामगारांची संख्या कमी असल्याचे दिसून आले. वीजेचा दरडोईवापर रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात कमी होता. शेतीमधील कामगारांची संख्या रत्नागिरी जिल्ह्यात २४% ते ३१% होती. कारखान्यातील कामगारांची संख्या रत्नागिरीमध्ये ५३.६% आणि सिंधुदुर्गमध्ये ३०.८% होती. ठाणे, रायगड या जिल्ह्यांत औद्योगिकीकरणामुळे अधिक आहे. सिंचनाखालील क्षेत्र ठाणे, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यात कमी असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात अधिक आहे. कारण युरोपिय आर्थिक समुदायाच्या मदतीने बंदिस्त पाईपद्वारे पाणी पुरवठा केलेला आढळतो. भुईमुगासारखे पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसतो. ठाणे जिल्हा वगळता सहकारी बँकाकडून कर्ज घेणारे कोकणातील इतर तीन जिल्ह्यात बरेच कमी आहेत. यातूनच कोकणातील मागासलेपणा दिसून येतो.

२) **Somik V. Lall (March 1999), ' The Role of Public Infrastructrue Investments in Regional Development' ' Economic and Political Weekly'** या शोधनिबंधात भारतीय प्रादेशिक विकासात सार्वजनिक पायाभूत गुंतवणूकीची भूमिका मांडली आहे. सरकारचे चलनविषयक धोरण आणि सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून चिरंतन आर्थिक विकास घडवून आणणे गरजेचे आहे. उत्पन्न व रोजगारात वाढ होणे अपेक्षित आहे. अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती हा चिरंतन विकासातील महत्त्वाचा मोठा अडथळा आहे. प्रादेशिक असमतोल कमी करून सार्वजनिक स्वरूपाचा मुलभूत सुविधांमध्ये गुंतवणूकीचा ओघ वाढविणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने आपले राजकोषीय धोरणात बदल करणे गरजेचे आहे.

३) **Kurian N.J. (2000), ' Widening Regional Disparities in India', Economic and Political Weekly,**या शोधनिबंधात असे मत मांडले की गेल्या ५० वर्षात प्रत्येक राज्यात

प्रादेशिक असमतोल वाढला असून अलिकडे प्रत्येक घटकराज्यात प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जातात. विकासासाठी स्वतंत्र वैधानिक महामंडळाची निर्मिती, शेती–उद्योग, रोजगार, रस्ते, वीज या क्षेत्रात गुंतवणूकीला प्राधान्य प्रादेशिक असमतोल कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. उत्तरप्रदेशात या राज्यात विशिष्ट प्रादेशिक नियोजन, हे दुर्गम, टेकड्या व पर्वतीय प्रदेशासाठी करण्यात आले. उदा. उत्तराखंड प्रदेश यावरून जो भाग खरोखरच मागास आहे. त्याच भागासाठी प्रादेशिक नियोजन करणे गरजेचे आहे.

४)**B.B. Bhattacharya and S. Sakthivel (2005), ‘ Regional Growth and Disparity in India : A comparision of Pre and post reform decades’ , Research paper prepared Institute of Economic Growth, University of New Delhi, Enclave,**या शोधनिबंधात प्रादेशिक असमतोलाचा संबंध दरडोई उत्पन्नाशी जोडला आहे. मागासलेली राज्ये लोकसंख्या वाढीवर पुरेसे नियंत्रण ठेवू शकली नाही. लोकसंख्या वाढीचा वेग दरडोई उत्पन्नापेक्षा अधिक आहे. सेवा व उद्योग क्षेत्र हे वृद्धीचे इंजिन आहे. प्रादेशिक असमतोल वाढण्यासाठी खाजगी गुंतवणूक हा घटक कारणीभूत ठरला आहे. मागास राज्यात लोकसंख्या अधिक असते. सार्वजनिक गुंतवणूक आकर्षित होत नाही, कमी उत्पन्नपातळी, पायाभूत सुविधांचा अभाव, अकार्यक्षम प्रशासन, बेकारीचे प्रमाण अधिक, धर्म–भाषा यांचा प्रभाव, स्थलांतर, शिक्षणाचा अभाव यांमुळे प्रादेशिक विषमता निर्माण होवून त्यांचे रूपांतर असमतोलात झाले आहे.

**५) भिसे रामेश्वर (जानेवारी २०१०), महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचे मूल्यमापन, ‘अर्थशलाका’ मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३३ वे राष्ट्रीय अधिवेशन, बारामती** या शोधनिबंधात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल हा ब्रिटीश काळापासून सतत वाढत आहे. यासाठी आर्थिक, भौगोलिक, सामाजिक, राजकीय घटक कारणीभूत आहेत. दांडेकर समितीच्या अहवालानुसार एकूण ३१८६.७८ कोटी रू. रकमेचा अनुशेष असून त्यापैकी रस्ते ६००.२९ कोटी रू. , पाटबंधारे १२८५.९२ कोटी रू., ग्रामीण विद्युतीकरण २४०.६५ कोटी रू., सामान्य शिक्षण ९१.५५ कोटी रू. , तांत्रिक शिक्षण ४३.४० रू., आरोग्य सेवा २२१.२१ कोटी रू., पाणी पुरवठा ७८.२४ कोटी रू., भूविकास व मृदासंधारण १७७.७७ कोटी रू. , पशुसंवर्धन ७.७५

कोटी रू. खर्च भरून काढण्यासाठी आवश्यक आहे. सातव्या योजनेत हा अनुशेष भरून काढावा असेही सूचित करण्यात आले.

**६) मुजावर रमजान (२०१०), महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल, अर्थमंथन', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर,** या शोध निबंधात महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या आघाडीवर असणारे राज्य असले तरी महाराष्ट्रात विविध प्रदेशात उच्च आर्थिक विषमता दिसून येते. त्यामुळे प्रादेशिक अमसतोल दिसून येतो. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये औद्योगिकदृष्ट्या विकसित भाग आहे. पूर्वेकडील जिल्हे दुष्काळग्रस्त गरीब व अविकसित आहेत. प्रादेशिक असमतोलासाठी सामाजिक निकषांचा आधार घेताना नागरिकरणाची गती, महिला साक्षरता, विजेचा दरडोई वापर, दर लाख लोकसंख्येमागे दवाखाने, सार्वजनिक आरोग्य केंद्रे, पक्के रस्ते, रेल्वे मार्ग यांचे प्रमाण राज्यात वेगवेगळ्या विभागात वेगवेगळे असल्याने प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात दिसून येतो. महाराष्ट्रात १७ जिल्हे मागास आहेत. प्रादेशिक असमतोलाचा विपरित परिणाम राज्यातील जनतेच्या सामान्यांना एकात्मकतेच्या भावनेवर होत असतो. त्यासाठी प्रादेशिक समतोल साधून विकासाची प्रक्रिया गतिमान करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राने शेती, उद्योग, सेवा क्षेत्रात जरी उल्लेखनीय प्रगती केली असली तरी दुसऱ्या बाजूला प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात दिसून येतो. तो दूर करून राज्याचा समतोल विकास साधणे गरजेचे आहे.

**७) घाटगे, वावरे (२०१०), 'अर्थमंथन', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर**, या शोधनिबंधात सहाव्या विभागात महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीतील प्रादेशिक असमतोल मांडला आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास समतोल प्रमाणात झाला नाही. मुंबई–कोकण, नाशिक, पुणे व  कोल्हापूर हे विभाग सहकारी संस्थांच्या विकासातील पुढारलेले आहेत. लातूर–अमरावती, नागपूर व औरंगाबाद विभागात सहकारी संस्थांची संख्या तुलनेने कमी आहे. परिणामी राज्याच्या प्रादेशिक अमसतोलाचा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनत चालला आहे. सहकारी संस्थांच्या प्रादेशिक असमतोलात राज्यात विविधता आढळून येते. ३१ मार्च २००८ अखेर कोकण विभागात १६.१८%, मुंबई विभागात १३.८०% संस्था कार्यरत आहेत. कोकण विभागात कार्यरत असणाऱ्या ३४६०१ संस्थांपैकी २४२४५ सहकारी संस्था (७०%) एकट्या ठाणे जिल्ह्यात आहेत. मुंबई व कोकण विभागात

सहकारी संस्थांची उभारणी करताना स्थानिक, नैसर्गिक व मानवनिर्मित साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करण्याच्या दृष्टीने पतपुरवठा, खरेदी–विक्री प्रक्रिया या प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास अपेक्षित प्रमाणात झालेला दिसून येत नाही. यामुळे कोकण विभागाचे आर्थिक मागासलेपण प्रकर्षाने दृष्टीस येते.

८) **बागवाले विनोद (२०१०), महाराष्ट्राचा आर्थिक विकास व विभागीय असमानता, अर्थमंथन', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर**, या शोधनिबंधात महाराष्ट्राचा उत्तम आर्थिक विकास झालेला असला तरी आर्थिक विकासाला असमानतेचे ग्रहण लागलेले पाहावयास मिळते. २००८–०९ मध्ये महाराष्ट्राच्या राज्य उत्पन्नात पुणे विभागाचा वाटा सर्वाधिक २२.६% तर सर्वात कमी अमरावती विभागाचा ६.१% इतका आहे. औरंगाबाद, नागपूर, अमरावती यांचा वाटा अल्प आहे. २००७–०८ मध्ये चालू किंमतीनुसार राज्यातील विभागनिहाय दरडोई उत्पन्न पाहिल्यास सर्वाधिक मुंबई विभागाचे ७३.९३० रू. व सर्वात कमी दरडोई उत्पन्न उत्पन्न २९.५०३ अमरावती विभागाचे आहे. राज्यात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र व कोकण या क्षेत्रातील विभागाचे प्रति व्यक्ती उत्पन्न निम्न स्वरूपाचे आहे. या प्रकारे राज्यात दरडोई उत्पन्नाबाबात असमानाता दिसून येते. विविध आयोग व समित्यांच्या अहवालामध्ये सुद्धा विकासाबाबत विभागनिहाय असमानता दिसून येते. भविष्यात महाराष्ट्राचा संतुलित व सर्वसमावेशक आर्थिक विकासाकरिता सरकारने मुलभूत व रचनात्मक उपाय करणे अपेक्षित आहे असे मत लेखकाने व्यक्त केले आहे.

९) **Satyaki Roy (2012), ' Regioanl Disparities In Growth And Human Development In India, Research Paper Prepared For The Institute For Studies In Industrial Development, New Delhi,**या शोधनिबंधात असा महत्त्वाचा निष्कर्ष मांडला की, मागील चार दशकात भारतातील बहुतेक राज्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. बाजाराचे उदात्तीकरणामुळे हा बदल झाला असावा. मात्र शेतीवरील अवलंबित्त्व कमी झाल्याचे दिसत नाही. उद्योगधंद्यांचे वितरण, सेवा क्षेत्रातही भरीव वाढ झाली आहे. या शोधनिबंधात ग्रामीण व शहरी भागाचा तुलनात्मक प्रादेशिक अभ्यास केला आहे. ग्रामीण व शहरी भागाच्या विकासासाठी अजूनही संधी आहेत. गेल्या चार दशकात मानवी विकासाचाही मागोवा या

शोधनिबंधात मांडला आहे. शहरी व ग्रामीण भागातील साक्षरता, स्थूल नावनोंदणी प्रमाण, जन्मापासूनच्या आयुमर्यादा या आधारे मानव विकासातील प्रादेशिक असमतोल स्पष्टपणे मांडला आहे. दरडोई उत्पन्नात वाढ झाली असली तरी मानव विकास निर्देशांक खूपच कमी आहे. याचाच अर्थ विकासाचे लाभ योग्य घटकांपर्यंत पोहोचले नाहीत. यामुळे आर्थिक–सामाजिक विषमता अधिक वाढली असल्याचे मत नोंदविण्यात आले आहे.

**१०) कुरलकर र.पु. (जानेवारी , मार्च २०१३), श्वेतपत्रिका आणि सिंचनावरील संभाव्य प्रादेशिक असमतोल 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक,** या शोधनिबंधात महाराष्ट्रातील जलसंपदा विभागाने २९ नोव्हेंबर २०१२ रोजी 'राज्यातील सिंचनाची प्रगती व भविष्यातील वाटचाल' या विषयावर एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे. मराठवाडा व विदर्भासारख्या भागास प्रदेशातील सिंचन क्षेत्रावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा उहापोह केला आहे. सिंचन प्रकल्पांच्या किंमतवाढीमुळे प्रकल्पांच्या आर्थिक व्यवहार्यतेवर झालेले परिणाम मांडले आहेत. कोणतेही धरण बांधताना त्या धरणाचे लाभ–खर्च गुणोत्तर तपासून त्यास मंजूरी दिली जाते. सर्वसाधारणपणे हे प्रमाण १:१:५ इतके असावे. याचा अर्थ १ रूपया धरणावर गुंतवल्यास त्यापासून किमान १.५ रूपयाचा लाभ मिळवयास हवा. तरच ते धरण आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरते. आदिवासी व डोंगराळ भागासाठी मात्र हे प्रमाण १:१ असते किंवा १ रूपया गुंतविल्यास किमान १ रूपयाचा फायदा व्हावा. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १५ डिसेंबर २००१ रोजी अध्यादेश काढून सिंचन क्षेत्राच्या निधी वाटपाचे सुत्र निश्चित केले. ५०% निधी अनुशेष प्रमाणात, २५% निधी लोकसंख्येच्या प्रमाणात, २५% निधी लागवडीखालील क्षेत्रानुसार याप्रमाणे निधीवाटपाची तरतुद आहे. पण यानुसार तरतुदीचे वाटप झाले नाही यामुळे प्रादेशिक असमतोल दिवसेंदिवस वाढत आहे.

**११) Samik Chowdhary (August 2014) , ' Regional Disparity in India A Study of Three Decades, Paper presented for IARIW 33rd General conference, Rotterdan Nethevlands** या शोधनिबंधात आर्थिक मागासलेपणा अभ्यासण्यासाठी वास्तव दरडोई उत्पन्नाचा वापर करण्यात आला. यासाठी अल्प, मध्यम, उच्च या तीन गटात विभागणी करण्यात आली. १९८१ ते २००९–१० या काळात आसाम राज्याचे मध्यम दरडोई उत्पन्न असून सर्वाधिक दरडोई उत्पन्नातील गटांत ओरिसा, बिहार, झारखंड, छत्तीसगड, उत्तरप्रदेश,

मध्यप्रदेश, राजस्थान यांचा समावेश आहे. ज्या राज्यांचे दरडोई उत्पन्न ५०००० रूपयांपेक्षा अधिक आहे. त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, केरळ या राज्याचा समावेश आहे. याचाच अर्थ भारतातील राज्यनिहाय दरडोई उत्पन्नात तफावत आढळते. यामुळे प्रादेशिक असमतोलाची समस्या अधिक तीव्र बनते. याशिवाय प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्रातील वास्तव वृद्धीतही तफावत आढळते. शेती–उद्योग, बांधकाम, वीज, पाणीपुरवठा, रेल्वे, दळणवळण, व्यापार, हॉटेल, बँका व वित्तसंस्था, वास्तव मालमत्ता, दलाली व्यावसायिक सेवा यांच्या वृद्धी दरातही फरक आहे. यांमुळे त्या त्या प्रदेशाचा कमी अधिक विकास झाल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.

**२.२.६ एम. फिल. प्रबंध –**

कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल एक अभ्यास या शोध प्रबंधासाठी विविध एम.फिल.च्या संशोधकांनी सादर केलेल्या लघुशोध प्रबंधाचा आढावा पुढीलप्रमाणे मांडला आहे.

**१) कानवडे वैशाली (ऑगस्ट २०१७), 'संगमनेर तालुक्यातील प्रादेशिक अमसतोल – एक चिकित्सक अध्ययन', एम.फिल. प्रबंधिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सादर केलेल्या** प्रबंधात संगमनेर तालुक्यातील शेती विकासातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणे, शेतीच्या विकासासाठी तालुक्यात उपलब्ध असणाऱ्या जलसिंचन साधनांचे अध्ययन करणे, प्रादेशिक असमतोलाची कारणे अभ्यासून त्यावर उपाययोजना मांडणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. संशोधिकेने जलसिंचन सुविधांच्या अपुऱ्या विकासामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. या गृहितकृत्याची तपासणी केली असून संशोधिकेने पुढील महत्त्वाचे निष्कर्ष मांडले आहेत.

अ) संगमनेर तालुक्यातील साकूर गावातील कुटुंब प्रमुखाला दरमहा सरासरी १०७४२ रू.(१७.९%), सारोळेपठार १०४३४ रू.(१७.४%), आश्वी १०९११ रू.(१८.२%) , धांदरफळ ९२७१ रू. (१५.४%), सायखिंडी ११२६९ रू. (१८.८%), तळेगाव ७३२७ रू. (१२.३%) दरडोई उत्पन्न प्राप्त झाले असून सायखिंडी गावातील व्यक्तींना सर्वाधिक दरडोई उत्पन्न मिळाले याचे प्रमुख कारण या गावातील सर्वाधिक व्यक्ती गृहबांधणीचे काम करतात असे दिसून आले आहे.

ब) प्रादेशिक असमतोलाच्या सर्वेक्षणातून असे दिसून आले की, शेतीच्या मागासलेपणाची पारंपरिक दृष्टीकोन २६(१४.०%), शेतमालाला कमी बाजारभाव ४७(२५.२%) , काम करण्याची इच्छा नाही २२(११.९%) , शेतीसाठी पाणी टंचाई ९१(४८.९ %) ही कारणे आहेत.

क) संगमनेर तालुक्यातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी जलसिंचन सुविधांचा पुरवठा करणे ९५(५१.०%), कोरडवाहू शेतीच्या विकासाला प्राधान्य ३०(१६.१%) , समतोल विकासाला अग्रक्रम देणे २८(१५.१%), शेती क्षेत्रात पाणी, वीज, शाश्वत बाजारभाव देणे १५(८.१%) , शेतीत व्यावसायिक दृष्टीकोनातून गुंतवणूक करणे, ०५(२.७%) पीक रचनेत बदल करणे १३(७.०%) या उपाययोजना मुलाखतकारांनी मांडल्या आहेत.

संशोधिकेने शेतीला १२ महिने पाणी पुरविण्याची सुविधा करणे, निळवंडे धरणांतर्गत कालवे कार्यान्वित करणे, कोरडवाहू शेतीला पाणी, वीज पुरवठा करणे, प्रवरा पट्ट्यातील शेतीसाठी हक्काचे पाणी शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सरकारकडे प्रयत्न करावेत. दुष्काळी व पठार भागातील शाळा महाविद्यालयांना १००% अनुदान द्यावे या प्रमुख शिफारशी केल्या आहेत.

### २.२.७ पीएच.डी. प्रबंध –

कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल एक अभ्यास या शोधप्रबंधासाठी पीएच.डीच्या शोधप्रबंधाचा संदर्भ साहित्य आढावा पुढीलप्रमाणे मांडला आहे.

१) **Ratul Mahanta (2003), An Analysis of Regional Disparities in Agricultural Development in Assam Ph.D. Thesis submitted to department of Humanities and social science, Indian Institute of Technologies Guwahati** या शोधप्रबंधात आसाममध्ये शेतीच्या मागासलेपणामुळे प्रादेशिक असमतोलाची समस्या निर्माण झाली आहे. शेती विकासाला प्राधान्य देण्यात आले नाही. आर्थिक मागासलेपण यामुळे शेती उत्पादन व उत्पादकता फारशी वाढू शकली नाही. शेतीविषयक धोरणांमध्ये सातत्य व नियमितपणा नाही. शेती विकासाचे धोरण धरसोड वृत्तीचे दिसते. शेतीच्या मागासलेपणामुळे निर्माण झालेल्या प्रादेशिक असमतोलाच्या अध्ययनासाठी १३ निर्देशंकाचा वापर संशोधन कर्त्याने केला आहे.

जलसिंचन, संकरित बियाणे, खते, ट्रॅक्टर सारखी यंत्रे, फवारणी यंत्रे, बँकांकडून होणारा वित्तपुरवठा यांचा परिणाम आसाममधील प्रादेशिक असमतोलावर झाला आहे. पीक रचना, शेती उत्पादनाचे मूल्य, साक्षरता, ग्रामीण लोकसंख्या यांचा परिणाम शेती उत्पादनावर झाला. चहाचे पीक वगळता इतर बाबतीत पूर्णत: मागासलेली असल्याचे स्पष्ट मत संशोधनकर्त्याने  मांडले असून भौतिक–भौगोलिक रचना, हवामान, वाहतूकीच्या व दळणवळण साधनांचा पूर्णत: अभाव यामुळे आसाम राज्यात असमतोल वाढला आहे.

२) **Muhammad Butt (2006), ' Impact of Tariff cuts on Pakistan : A Computable General Equilibrium analysis with particular focus on main export and regional disparities, Ph.D. Thesis submitted Griffith University** या शोधप्रबंधात पाकिस्तानमधील व्यापार धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे, विविध सामाजिक आर्थिक प्रक्रियेवर झालेला परिणाम अभ्यासणे, व्यापार धोरणाचा प्रादेशिक असमतोलावर झालेला परिणाम अभ्यासणे, जकात कमी करण्याचे प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावरील व्यापाराचे अल्प व दीर्घकालीन प्रतिमानांचा अभ्यास करणे. औद्योगिकीकरण व रोजगारनिर्मिती यामधील समन्वयावर झालेले परिणाम अभ्यासणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. या अभ्यासातून लष्करी सरकारच्या ध्येय धोरणांमुळे व्यापार उदारीकरणातून पाकिस्तान मध्ये प्रादेशिक असमतोल अधिक प्रमाणात निर्माण झाला. हा महत्त्वाचा निष्कर्ष मांडला आहे. जागतिक बँकेच्या पाहणीत पाकिस्तानमधील निर्यात व्यापारात घट झाल्याचे मत नोंदविले असून पंजाब आणि बलुचिस्तान प्रांतात प्रादेशिक असमतोल अधिक आहे, असा निष्कर्ष मांडला आहे.

**३)तलवारे जितेंद्र (२०१०), 'शहरी रोजगार योजनांचे आर्थिक व सामाजिक मूल्यमापन : खानदेश एक अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, उत्तरमहाराष्ट्र विद्यापीठ जळगाव,** या  शोधप्रबंधात असा निष्कर्ष मांडला की, कोकण विभागात नागरिकरणाचे प्रमाण (७५.१%) आहे. तर औरंगाबाद विभागात सर्वात कमी नागरिकरणाचे प्रमाण (२६.१%) आहे. कोकण व औरंगाबाद यांची तुलना करता असे दिसते की, औरंगाबाद पेक्षा कोकण विभागात तिपटीपेक्षाही अधिक प्रमाणात नागरिकरण झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि विदर्भातील नागपूर विभागात नागरिकरणाचे स्वरूप व प्रवृत्ती स्वरूप आणि प्रवृत्ती यामध्ये विभागीय असमतोल मोठ्या प्रमाणात आहे. मुंबई–ठाणे–पुणे–कोल्हापूर नागरीपट्टा, नाशिक–मालेगाव–धुळे–भुसावळ,

अकोला–नागपूर नागरीपट्टा हा विकसित आहे. थोडक्यात महाराष्ट्रातील नागरिकरणाच्या विभागीय असमतोल विकासात भौगोलिक आणि आर्थिक–सामाजिक घटक जबाबदार असल्याचे दिसून येते. या समस्येवर प्रादेशिक नियोजनाचा उपाय महत्त्वाचा आहे. शहराच्या सभोवतालची उपनगरे, नवीन शहरे बसविण्यापूर्वी संभाव्य लोकसंख्या गृहित धरून नवीन शहरांचे उपनगरांचे नियोजन केल्यास नागरिकरणामुळे निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल कमी करता येईल.

४) **Deeba Jahangir (2011), ' Regional Disparities in Economics Development in the Post referm period, Ph.D. Thesis submitted Aligarh Muslim University Aligarch** या शोधप्रबंधात आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल मोजमापासाठी दरडोई उत्पन्न हा महत्त्वाचा निर्देशक आहे. आर्थिक सुधारणांच्या अगोदर  पंजाब राज्याचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक होते. यानंतर महाराष्ट्र, हरियाणा, गुजरात, तामिळनाडू याचा क्रम आहे. आसाम, बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश यांचे दरडोई उत्पन्न फारच कमी आहे. कारण या राज्यांत लोकसंख्या अधिक, मागासलेला प्रदेश, आर्थिक विकासाचा कमी दर, गुंतवणुकीची कमी पातळी दिसून आली. पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश या राज्याचे दरडोई उत्पन्न भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या जवळजवळ आहे. दरडोई उत्पन्नाबरोबरच प्रादेशिक असमतोलाचा महत्त्वाचा निर्देशक साक्षरता आहे. सरासरी आयुर्मान पिण्याचे स्वच्छ पाणी, दारिद्र्याची पातळी, पायाभूत सुविधांची उपलब्धता, आरोग्य सुविधा, मानवी भांडवालाचा विकास या बाबतीत अध्ययन करण्यात आले.

५) **Mangade Ganesh (2011), ' Human Development in Socially and Economically bakwarded Region -  A Study of marathwada, Ph.D thesis submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad** या शोधप्रबंधात मानवी विकासात मागासलेल्या मराठवाड्यासाठी योग्य धोरण राबविण्याची गरज आहे. मानव विकास मिशन हे मागासलेल्या जिल्ह्यांसाठी कार्य करते. विशिष्ट प्रदेशासाठी कार्य करत नाही तर संपूर्ण जिल्ह्यासाठी कार्यरत आहे. सरकार व स्वयंसेवी संस्था ह्या मानव विकासात मागासलेल्या घटकांच्या विकासावर लक्ष केंद्रित करते. संशोधनकर्त्याने अशी महत्त्वाची शिफारस या प्रबंधात मांडली की, सरकार, शैक्षणिक संस्था (विद्यापीठे व महाविद्यालये) यांनी एकत्रित येऊन

मागासलेल्या प्रदेशातील मानव विकासासाठी उत्कृष्ट प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

६) **Adiwan Fahlan Aritenang (2012), ‘ The Impact of State Restructuring on Indonesia’s Regional Economic Convergence’, Ph.D. thesis submitted in University of London**या शोधप्रबंधात आर्थिक-सामाजिक विकासातील प्रादेशिक असमतोल चे अध्ययन केले आहे. विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून मालमत्ता हक्क, प्रशासन, राजकीय आणि वित्तीय अवमूल्यन, औद्योगिक धोरण, बाजारपेठ व उदात्त व्यापार या घटकांच्या आधारे प्रादेशिक असमतोल अभ्यासला आहे. विकेंद्रीकरणाच्या इंडोनेशियाच्या पुनर्रचनेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास, प्रादेशिक विषमतेत झालेल्या वाढीचा अभ्यास ही महत्त्वाची उद्दिष्टे आहेत

**७) मासल सिदू (जून २०१२) ‘दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकासातील प्रादेशिक असमतोल – एक भौगोलिक अध्ययन’, पीएच.डी प्रबंध कोल्हापूर विद्यापीठात सादर शोधप्रबंधात** त्यांनी आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी ग्रामीण भागात उद्योगांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. उदा. कृषी उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग, दूध प्रक्रिया उद्योग इ. मागासलेल्या प्रदेशात वाहतूक, दळणवळण, वीज, बँका या सुविधा पोहोचविणे आवश्यक आहे. आज जिल्हा नियोजन आणि विकास ही योजना राबवली जाते. या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून तालुका स्तरावर राबविणे आवश्यक आहे. सूक्ष्म पातळीवरील नियोजन प्रादेशिक असमतोल कमी करेल. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी तालुका पातळीवर निधीचे वाटप करण्यात यावे. यासाठी लोकसंख्या व भौगोलिक प्रदेश हा निकष असावा या शिफारसी मांडल्या.

**८) लड्डा राखी (२०१६) , ‘महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाच्या तुलनात्मक अभ्यास’, संदर्भ विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर** या प्रबंधात खालील उद्दिष्टे मांडली आहेत.

१) महाराष्ट्रातील विविध विभागाचा औद्योगिक विकासामध्ये असमतोल कसा आहे याचा शोध घेणे.

२) प्रादेशिक असमतोल हा औद्योगिक क्षेत्राच्या कोणकोणत्या घटकांसंबंधी आहे याचा सखोल अभ्यास करणे .

३) औद्योगिक विकाससंबंधी स्थापित विविध समित्यांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

४) केंद्र व राज्य सरकारने अमसतोल दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास हा विदर्भाच्या तुलनेत अधिक झाला आहे ही दोन गृहितकृत्ये तपासून पाहिली आहेत. त्यांनी पुढील निष्कर्ष मांडले

१) महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात प्रादेशिक विषमता आढळते.

२) स्थूल मूल्यवृद्धी व कामगार वेतन यामध्ये अखिल भारतीय स्तरावर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र उच्च स्थानावर आहे.

३) महाराष्ट्रात उद्योगांना वित्तीय साहाय्य देण्यात वित्तीय संस्थांचा समावेश आहे. उदा. भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ, लघु उद्योग विकास बँक, भारतीय आयुर्विमा महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ या संस्थांचा समावेश असल्याचे दिसून येते. सदरचे संशोधन आणि कोकणातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास हे संशोधन पूर्णत: भिन्न आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन भागातील औद्योगिक विकासामध्ये प्रादेशिक असमतोल आहे.

## २.४ संदर्भ साहित्याचा परामर्श

संतुलित विकासाबाबत विविध अर्थतज्ज्ञांचे सैद्धातिक विश्लेषण जे.एफ. पाटील यांनी केले तर रायखेलकर, दामजी यांनी मागासलेल्या भागात लघु–कुटिर उद्योग स्थापण्याला महत्त्व दिले. रसाळ राजेंद्र यांनी औद्योगिक क्षेत्रातील मागासलेपणावर भर दिला. बिराजदार शैला यांनी आर्थिक नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट प्रादेशिक असमतोल कमी करणे हे असल्याचे स्पष्ट केले.

सोनवणे, बच्छाव यांनी मागासलेल्या प्रदेशात सेझच्या माध्यमातून गुंतवणूकीला प्राधान्य, इंगळे जे.एस. यांनी मागास प्रदेशात उद्योग उभारणीसाठी सवलती देणे, केशवा एस.आर. यांनी परकिय गुंतवणूक वाढविण्यावर भर, कद्रेकर श्रीरंग यांनी सहकारी बँकाकडून होणाऱ्या कर्ज पुरवठ्याबाबत विश्लेषण केले आहे. भारत सरकारने पांडे आणि चक्रवर्ती समिती नेमून देशातील संतुलित विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. केळकर विजय यांनी मागासलेल्या तालुक्यांवर अधिक लक्ष केंद्रित करून त्यांना योग्य वाढीव निधी द्यावा.

कोकणातील पाणी वाटपासाठी नेमलेल्या अभ्यासगटांच्या शिफारशी पाणी वाटप व प्रादेशिक अमसतोल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

समिक चौधरी यांनी तीन दशकातील प्रादेशिक असमतोलाचे विविध निकषांच्या आधारे मोजमाप केले आहे. सत्यकी राय यांनी वृद्धी व मानवी विकासातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास केला आहे. बी.बी. भट्टाचार्य यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरचा प्रादेशिक असमतोल स्पष्ट केला आहे. कुरियन यांनी प्रादेशिक नियोजनाला महत्त्व दिले. घाटगे–वावरे यांनी सहकारचळवळीच्या कमी विकासामुळे प्रादेशिक असमतोलात वाढ झाली. मुजावर रमजान, रसाळ राजेंद्र यांनी औद्योगिक क्षेत्रातील असमतोल स्पष्ट केला आहे.

कुरूलकर र.पु. यांनी सिंचनाची श्वेतपत्रिका व प्रादेशिक असमतोल यावर भाष्य केले. चौधरी दिपक यांनी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सिंचन सुविधांची सर्व जिल्ह्यात समप्रमाणात उपलब्धता करावी. भांडवलकर रामदास यांनी स्थानिक उत्पादनावर आधारित उद्योगांची स्थापना करावी. धेंडे धर्मा यांनी प्रादेशिक असमतोलाची विविध कारणे सांगितली आहेत.

कानवडे वैशाली यांनी शेतीच्या विकासात दुर्लक्ष केल्यामुळे त्याचा परिणाम प्रादेशिक असमतोल वाढण्यात आला. दिब्बा जहांगिरदार यांनी आर्थिक सुधारणांच्या काळातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचा अभ्यास केला आहे. अद्रिन यांनी विकेंद्रीकरणाच्या इंडोनेशियाच्या पुर्नरचनेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास केला आहे. रातुल महंत यांनी आसाम मधील मागासलेल्या शेती व्यवसायामुळे प्रादेशिक विषमता वाढल्याचे मत नोंदविले आहे. मुहम्मद भुत यांनी जकात कमी केल्यामुळे किंवा रद्द केल्यामुळे पाकिस्तानमधील आयात–निर्यात व्यापारावर परिणाम होऊन प्रादेशिक विषमता वाढली आहे असे मत मांडले आहे. तलवारे जितेंद्र यांनी वाढत्या शहरीकरणामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे मत मांडले. मांगडे गणेश यांनी मानवी विकासातील असमतोल स्पष्ट केला आहे.

## २.५ मूल्यमापन

देशांतर्गत प्रादेशिक असमतोल हा जगातील प्रत्येक देशात आढळतो. अमेरिका, इटली, स्पेन, रशिया, इंग्लंड या देशात सुद्धा राज्याराज्यात प्रादेशिक असमतोल असून त्यासंदर्भात अनेक अभ्याससाहित्य प्रसिद्ध झालेले आहेत.

प्रादेशिक असमतोल आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, व्यापार व वाहतूक दळणवळण या क्षेत्राबाबत एखाद्या प्रदेश विकसित असणे आणि तुलनात्मक दृष्ट्या दुसरा एखादा प्रदेश मागासलेला असणे होय. यामुळे प्रादेशिक असमतोलाची समस्या निर्माण होत असल्याचे चित्र विविध तज्ञ, व्यक्तीच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. मात्र या परिस्थितीतून बाहेर पडणे तितकेच महत्त्वाचे आहे. या दृष्टीकोनातून विविध संशोधकांनी, अभ्यास गटांनी दिलेल्या शिफारशी महत्त्वाच्या आहेत. त्यांची योग्य अंमलबजावणी सरकार, स्वयंसेवी संस्था व प्रत्यक्ष जनतेच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे.

# संदर्भसूची

## अ) संदर्भ ग्रंथ / पुस्तके


१. संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र जोशी (२००८), 'मराठी विश्वकोष', खंड १०, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई पृष्ठ क्र. ५७६ ते ५७८

२. भट कमलाताई (२००३), 'मागास भागाचा आर्थिक विकास', सेंटर फॉर बिझनेस ॲण्ड इंडस्ट्री, आशीर्वाद शाहु कॉलेज रोड, पर्वती पुणे, पृष्ठ क्र. १४७

३. कद्रेकर श्रीरंग (माच २०१५), 'कोकणाचं पाणी समस्या आणि उपाय', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ५५ ते ५६

४. संपादक जे.एफ. पाटील (मार्च २००४), 'वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र. १८७

५. रायखेलकर दामजी (जानेवारी २०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद पृष्ठ क्र. ५७९

६. कविमंडन विजय (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. ५९२

७. रसाळ राजेंद्र (जानेवारी २०१०), 'भारतीय अर्थव्यवस्था', सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे पृष्ठ क्र. ३३० ते ३३४

८. बिराजदार शैला (२०१४, 'भारतीय अर्थव्यवस्था', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, जळगाव, पृष्ठ क्र. १४३


## ब) संशोधन लेख –


१. चौधरी दिपक व खाचणे अशोक (एप्रिल जून २०१४), 'अर्थसंवाद', खंड ३८, अंक १ पृष्ठ क्र. ४८

२. भांडवलकर रामदास (एप्रिल जून २०१५), 'अर्थसंवाद', खंड ३९, अंक १ पृष्ठ क्र. ५०–५१

३. सोनवणे बच्छाव (मे २००९), 'विकास समर्पित योजना', मासिक वर्ष ३६, अंक १०, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पृष्ठ क्र. २१

४.	इंगळे जे.एस. (एप्रिल २०१३), 'योजना', वर्ष २९, अंक ९, पृष्ठ क्र. ४४

५.	केशवा एस.आर. (डिसेंबर २०१४), 'योजना वर्ष ४२, अंक ५, पृष्ठ क्र. १८ ते २६

६.	कद्रेकर श्रीरंग (नोव्हेंबर १९९९), '२३ व्या मराठी अर्थशास्त्र परिषदेने शोधनिबंध सादरीकरण, पृष्ठ क्र. २

७.	धेंडे धर्मा (एप्रिल जून २००९), 'अर्थसंवाद', खंड ३३ अंक १, पृष्ठ क्र. १० ते १७

८.	सरदेशमुख (११ फेब्रुवारी २०१४), दै. लोकसत्ता पृष्ठ क्र. ६

**क) राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासगट–**

१.	"प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल", (एप्रिल १९८४), महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग मुंबइ, पृष्ठ. क्र २५

२.	"प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल", (एप्रिल १९८४), " तत्रैव " पृष्ठ. क्र २०

३.	"प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल", (एप्रिल १९८४), " तत्रैव " पृष्ठ. क्र २४

**ड) राज्य स्तरावरील अभ्यासगट–**

१	महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग, (श्री. स.गो. बर्वे आयोग)(१९६२), महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. ६४२

२	अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन (सुकथनकर) समिती १९७३, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. ३७२

३	कोकण बृहत आराखडा, स्वामीनाथन समिती (१९८१), महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. ३४२

४	कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती १९८०, बी.जी. खताळ, महाराष्ट्र शासन मुंबई , पृष्ठ क्र. ४२७

५	प्रादेशिक–अनुशेष विषयक दांडेकर समिती (१९८४), महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. ३७९

६	दुसरा सिंचन आयोग, डॉ. माधवराळ चितळे (१९९५), महाराष्ट्र शासन मुंबई, पृष्ठ क्र. ४२१

७ कोयना अवजल वापर अभ्यासगट (२००६), अहवाल महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. ३११

८ खारभूमी विकास समिति, श्री.रा. वि. बेलोसे (१९८१), महाराष्ट्र शासन मुंबई, पृष्ठ क्र. ३८५

९ महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समिती, विजय केळकर (ऑक्टोबर २०१३), महाराष्ट्र शासन मुंबई

**इ) शोधनिबंध–**

१. Samik Chowdhary (August 2014) , ‘ Regional Disparity in India A Study of Three Decades, Paper presented for IARIW 33rd General conference, Rotterdan Nethevlands Page No. 10 to 16

२. Satyaki Roy (2012), ‘ Regioanl Disparities in growth and human development in India, Research Paper prepared for the institute for studies in industrial development, new Delhi page no. 21 to 22

३. B.B. Bhattacharya and S. Sakthivel (2005), ‘ Regional Growth and Disparity in India : A comparision of Pre and post reform decades’ , Research paper prepared Institute of Economic Growth, University of New Delhi, Enclave , Page no. 14-15

४. Kurian N.J. (2000), ‘ Widening Regional Disparities in India’, Economical and Political weekly, Vol XXXV no.7, February 2000, Page no. 12 to 18

५. घाटगे, वावरे (२०१०), ‘अर्थमंथन’, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर, पृष्ठ क्र.  १३१ ते १३४

६. मुजावर रमजान (२०१०), ‘अर्थमंथन’, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर ‘अर्थमंथन’, पृष्ठ क्र. १७९–१८०

७. बागवाले विनोद (२०२०), ‘अर्थमंथन’, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर ‘अर्थमंथन’, पृष्ठ क्र. १७९–१८०

८. भिसे रामेश्वर (जानेवारी २०१०), 'अर्थशलाका' मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३३ वे राष्ट्रीय अधिवेशन, बारामती पृष्ठ क्र. १३४ ते १३५

९. कुरलकर र.पु. (जानेवारी , मार्च २०१३), 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, खंड ३६, अंक. ४ पृष्ठ क्र. ३३१ ते ३३८

१०. Somik V. Lall(March 1999), ' Economical and Political Weekly', 20 march 1999, Page no. 717 to 725

**ई) एम.फिल. प्रबंधिका –**

१. कानवडे वैशाली (ऑगस्ट २०१७), 'संगमनेर तालुक्यातील प्रादेशिक अमसतोल – एक चिकित्सक अध्ययन', एम.फिल. प्रबंधिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सादर पृष्ठ क्र. १३५

**उ) पीएच.डी. प्रबंध –**

१. Deeba Jahangir (2011), ' Regional Disparities in Economics Development in the Post referm period, Ph.D. Thesis submitted Aligarh Muslim University Aligarch Page No. 162

२. Adiwan Fahlan Aritenang (2012), ' The Impact of State Restructuring on Indonesia's Regional Economic Convergence', Ph.D. thesis submitted in University of London, Page No. 11

३. Ratul Mahanta (2003), An Analysis of Regional Disparities in Agricultural Development in Assam Ph.D. Thesis submitted to department of Humanities and social science, Indian Institute of Technologies Guwahati Page no. 11

४. Muhammad Butt (2006), ' Impact of Tariff cuts on Pakistan : A Computable General Equilibrium analysis with particular focus on main export and regional disparities, Ph.D. Thesis submitted Griffith University Page no. 270 to 278

५. तलवारे जितेंद्र (२०१०), 'शहरी रोजगार योजनांचे आर्थिक व सामाजिक मूल्यमापन :खानदेश एक अभ्यास', पीएच.डी. प्रबंध, उत्तरमहाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, पृष्ठ क्र. १५५ ते १५६

६. Mangade Ganesh (2011), ‘ Human Development in Socially and Economically bakwarded Region - A Study of marathwada, Ph.D thesis submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad Page no. 187
७. मासल सिदू (जून २०१२) ‘दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकासातील प्रादेशिक असमतोल – एक भौगोलिक अध्ययन’, पीएच.डी प्रबंध कोल्हापूर विद्यापीठात सादर, पृष्ठ क्र. २९३
८. लड्डा राखी (२०१६) , ‘महाराष्ट्रातील औद्योगिक विकासातील प्रादेशिक असमतोलाच्या तुलनात्मक अभ्यास’, संदर्भ विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र, पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर, पृष्ठ क्र. ३५

# प्रकरण तीन

# महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल

## ३.१ प्रस्तावना

भारताच्या दख्खन पठारावर मध्यवर्ती भागात उत्तर भारत व दक्षिण भारत यांना एकत्रित असणारी विशाल भूमी म्हणजे महाराष्ट्र राज्य होय. मराठी भाषिक विदर्भ, मध्यप्रांतातून तर मराठवाडा, हैद्राबाद संस्थानातून वेगळा काढून मुंबईसह मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्त्वात आले. महाराष्ट्र राज्य हे केवळ भौगोलिक सीमांनी अधोरेखित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या, परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र राज्य हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावरच संपूर्ण कोकण वसलेले आहे.

देशांतर्गत प्रादेशिक असमतोल हा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर आढळतो. भारतात सुद्धा राज्याराज्यात फार मोठा प्रादेशिक असमतोल असल्याचे अनेक सरकारी अहवाल व अर्थतज्ञांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. महाराष्ट्र हे भारतातील प्रगत राज्यांपैकी एक राज्य म्हणून ओळखले जाते परंतु राज्यात विकासाच्या बाबतीत काही समस्या आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची समस्या म्हणजे प्रादेशिक असमतोल होय. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यावेळी पश्चिम महाराष्ट्र अनेक बाबतीत प्रगत होता तर विदर्भ व मराठवाडा हे दोन प्रदेश महाराष्ट्रात सामील होताना अतिशय मागास होते. आज महाराष्ट्र पश्चिम महाराष्ट्र, बृहन्मुंबई, कोकण, मराठवाडा, विदर्भ असा विभागला आहे. या विभागात बृहन्मुंबई पश्चिम महाराष्ट्र प्रगत आहे तर विदर्भ, मराठवाडा कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे.

महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यास अनेक घटक जबाबदार आहेत. महाराष्ट्रातील काही प्रदेश आर्थिकदृष्ट्या प्रगत आहेत. तर काही प्रदेश मागास आहेत. त्यामुळे आर्थिक विषमता पहावयास मिळते. राज्यातील विभागामध्ये नैसर्गिक संपत्तीमध्येही विषमता आहे. ज्या प्रदेशातील नैसर्गिक संपत्ती भरपूर असते. तेथील जनता उद्द्मशील व शिक्षित असते. भांडवलही भरपूर असते अशा प्रदेशातील प्रगतीचा वेग अधिक असतो याउलट ज्याप्रदेशात

नैसर्गिक संपत्तीचा अभाव, निरक्षरांचे मोठे प्रमाण, उद्यमशीलतेचा अभाव व भांडवलाची कमतरता असते असे प्रदेश मागास राहतात. त्याचप्रमाणे शिक्षित कुशल व उद्योगप्रिय व्यक्तींचे उत्पन्न साधारणत: जास्त असते. याऊलट आळशी निरक्षर, अकुशल व्यक्तींचे उत्पन्न कमी असते. वरील सर्व महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यास कारणीभूत कारणे आहेत. राज्यातील प्रगत व मागास प्रदेशातील दरडोई उत्पन्नाची तफावत पाहिल्यास महाराष्ट्राच्या विभागामध्ये प्रादेशिक असमतोल दृष्टीक्षेपास येतो.

## ३.२ महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग –

महाराष्ट्रातील एकूण सहा विभागाचा अभ्यास प्रादेशिक असमतोलासाठी महत्त्वपूर्ण ठरतो. यामध्ये कोकण पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर हे सहा महसुली विभाग आहेत. महाराष्ट्रातील प्रशासकीय विभागाचा अभ्यास करता कोकण, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे प्रशासकीय विभाग प्रादेशिक अमसतोलामध्ये सामाविष्ट होतात. पुणे व नाशिक विभागातील काही जिल्ह्यांमध्ये देखील प्रादेशिक असमतोल आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक विभागांचा विचार करीत असता प्रत्येक विभागातील काही जिल्हे व तालुके यांच्यात प्रादेशिक असमतोल दिसून येतो. या प्रत्येक विभागात समाविष्ट असणारे जिल्हे पुढीलप्रमाणे ,

**१) कोकण विभाग –** या विभागत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग असे सहा जिल्हे येतात.

**२) पुणे विभाग –** या विभागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो.

**३) नाशिक विभाग –** या विभागात नाशिक, अहमदनगर , जळगाव , धुळे, नंदूरबार असे पाच जिल्हे येतात.

**४) औरंगाबाद विभाग –** या विभागात औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर व नांदेड असे आठ जिल्हे सामाविष्ठ आहेत.

**५) अमरावती विभाग –** या विभागात अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ असे पाच जिल्हे समाविष्ट आहेत.

६) **नागपूर विभाग –** या विभागात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या सहा जिल्ह्यांचा समावेश आहेत.[३]

## ३.३ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप –

सन १९५६ साली द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आलेले होते. मुंबई या राज्यात कच्छ, राजकोटसह गुजरात, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, कोकण, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र इत्यादी प्रदेश समाविष्ट होते. त्यात भाषा विचार, विकास, शिक्षण, यामध्ये समानता नव्हती. नंतर संयुक्त व एकसंघ महाराष्ट्राच्या स्थापनेच्या आंदोलनात १०५ हुतात्मे झाले व नागविदर्भ आणि मराठवाडा यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्र म्हणजे कोकणसह, उत्तर–दक्षिण महाराष्ट्र असे मराठी भाषिक राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्त्वात आले. मराठवाडा व विदर्भ हे दोन प्रदेश महाराष्ट्रात सामील होताना अतिशय मागास प्रदेश होते. त्यामुळे नवनिर्मित महाराष्ट्र राज्यात त्यांच्या विकासाची हमी देणारा 'ऐतिहासिक नागपूर करार' १९५३ साली मान्य करण्यात आला. नागपूर कराराचे पालन केले जाईल असे निःसंदिग्ध आश्वासन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी विधिमंडळाच्या सभागृहात दिले होते. पन्नास वर्षाच्या काळात महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचे सिंहावलोकन केल्यास असे दिसून येते की, पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा व विदर्भ हे दोन्ही प्रदेश आजही आर्थिकदृष्ट्या अविकसित असून दुर्दैवाने कराराचे शासनाकडून पालन न झाल्यामुळे महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोलाची समस्या निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा विचार करता पुढील घटकांचा विचार केला आहे.

१) **विभागीय असमतोल** : महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण या विभागांचा समावेश होतो. कोणत्याही प्रदेशातील विभागांची आर्थिक प्रगती ही मुख्यतः त्या भागातील निसर्ग संपत्ती, भांडवल व मनुष्यबळ किती प्रमाणात उपलब्ध आहे या बाबींवर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याची विकासाची प्रगती, निसर्गनिर्मिती संपत्तीपेक्षा 'मानवनिर्मित घटकांवर' अधिक अवलंबून आहे. महाराष्ट्रात निसर्गसंपत्ती सर्व जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात आहे. मराठवाडा विदर्भ हे दोन्ही प्रदेश आजही आर्थिकदृष्ट्या अविकसित आहेत. या प्रदेशातील दरडोई उत्पन्न सर्वात कमी आहे. मराठवाड्यातील हिंगोली, बीड, नांदेड या जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी

आहे. विदर्भातील वाशीम, गडचिरोली, भंडारा, अमरावती या जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी आहे. खानदेशात नंदूरबार, जळगाव जिल्ह्यांमध्ये दरडोई उत्पन्न कमी आहे. कोकणामधील चारही जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे प्रगत आहेत व काही जिल्ह्यांमध्ये मागासलेपणा आहे. यावरून महाराष्ट्र राज्यातील विभागीय प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप दिसून येते.

**२) औद्योगिक क्षेत्रातील असमतोल** : महाराष्ट्र औद्यौगिक दृष्ट्या विकसित राज्य असले तरी औद्योगिक विकास प्रादेशिकदृष्ट्या अतिशय विषमस्वरूपाचा आहे. महाराष्ट्राच्या काही निवडक भागात उद्योगधंदे प्रमाणाबाहेर केंद्रिकृत झालेले असून इतर विभागात उद्योगधंदे उभारण्यात सरकारची अनास्था व दुर्लक्ष झाल्याचे आढळते. औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी लागणाऱ्या वीज, पायाभूत सोईसुविधा, कुशल कामगार, उद्योग (कारखाने) या सोईसुविधा महाराष्ट्रातील सर्वच विभागात झालेल्या नाहीत. ज्या भागात या सोईसुविधा आहेत त्या भागात औद्योगिक क्षेत्र प्रगत झाले आहे याऊलट या सुविधा नसलेल्या भागात बेकारी, दारिद्र्य यांचे प्रमाण जास्त व दरडोई उत्पन्न कमी असलेले निदर्शनास येते. यालाच औद्योगिक क्षेत्रातील असमतोल असे म्हणतात.

राज्यांतील उद्योगधंद्यापैकी बहुसंख्य उद्योगधंदे, मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, विभागात मोठ्या प्रमाणात केंद्रित झाले असून त्यामानाने उर्वरित महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या मागासलेला आहे असे चित्र दिसते. राज्यात उद्योगधंदे विकसित झालेल्या विभागाचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास झालेला आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश या विभागात तुलनात्मक दृष्ट्या उद्योगधंद्याचा विकास कमी प्रमाणात झालेला आहे. राज्याच्या विविध विभागात विकासाच्या दृष्टीने जी तफावत निर्माण झाली आहे त्यातून राज्यात विकासातील प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला दिसून येतो.

**३) कृषी क्षेत्रातील असमतोल –** महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील असमतोल हा सतत वाढत चाललेला आहे. राज्यातील कृषी क्षेत्रातील असमतोलाचे मापन करण्यासाठी संमिश्र निर्देशांकांचा वापर केला जातो. उदा. जलसिंचनाखालील जमीनीचे प्रमाण, दर हेक्टरी खतांचा वापर, भूमी मनुष्य प्रमाण, कृषी विकासासाठी सोई उपलब्ध झाल्या तर कृषी उत्पादनात वाढ होते हे निश्चितच अनुभवास येते. महाराष्ट्रातील सर्वच प्रदेशात पावसाचे प्रमाण कमी अधिक

आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेशा या विभागात दिवसेंदिवस सरासरी पावसाचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. कृषी विकासासाठी ही मोठी समस्या आहे. त्यामुळे या विभागातील कृषी उत्पादन नेहमीच अनिश्चित असते. पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा, पुणे या जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अधिक आहे. येथे व्यापारी कृषी उत्पादन घेतले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील काही भाग दुष्काळ म्हणून जाहीर केलेला आहे. खरे तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये १५० वर्षांपूर्वी नवीन धरणे बांधून झाली व कालव्यांमधून पाणी आले त्यामुळे शेतकरी सिंचित शेती करू लागला. त्यांनी पिक पद्धती आत्मसात केली. बाजारपेठा काबीज केल्या आहेत. सिंचित शेतीवर कारखानदारी उभी केली आहे. उदा. साखर कारखाने. आज महाराष्ट्र राज्यात कृषी उत्पन्नात पश्चिम महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे.

कोकण विभागात पावसाचे प्रमाण सर्वाधिक आहे. मात्र पावसाळ्यानंतरचा काळ बहुतांशी कोरडाच असल्याने शेतीसाठी विहीरी व धरणाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. मात्र कोकणातील विहीरी व धरणाच्या पाणी साठविण्याची क्षमता कमी आहे. कृषी विकासासाठी सिंचनाचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे हे अजूनही कोकणमधील जनतेने लक्षात घेतले नाही. शासकीय स्तरावर ‘सिंचन मोहीम’ जोपर्यंत राबविली जात नाही तोपर्यंत सिंचनाखालील क्षेत्रा वाढण्याची शक्यता कमी आहे. शेतकऱ्यांना या सोईसुविधा उपलब्ध झाल्या तरच कोकण कृषीउत्पादनात वाढ होईल. यावरून महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील असमतोल दिसून येतो.

**४) तांत्रिक क्षेत्रातील असमतोल :** महाराष्ट्र या नावामध्येच ‘महा’ असणारे श्रेष्ठ राष्ट्र. पुणे मुंबई शहरे प्रचंड गुणवत्तेसाठी प्रसिद्ध आहे. या शहरांमध्ये आय.टी., इंजिनिअरींग या क्षेत्रामधील प्रचंड गुणवत्ता आहे. नागपूर देखील ‘लॉजिस्टीक हब’ म्हणून उदयाला आलेले आहे. नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद याही शहरांमध्ये तांत्रिक प्रगती झालेली दिसून येते. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये तांत्रिक विकास झालेला नाही. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, विभागात तांत्रिक मागासलेपणा आहे. या विभागात तांत्रिक सुधारणा करणे आवश्यक आहे. कोकणातील ठाणे, रायगड हे जिल्हे मुंबईलगतच जिल्हे असल्याने तांत्रिक दृष्टीने प्रगत जिल्हे आहेत. तर रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात तांत्रिक मागासलेपणा दिसून येतो. राज्याच्या सर्वच विभागात तांत्रिक प्रगतीचा समतोल नाही. यातूनच राज्यातील तांत्रिक असमतोल आहे हे दिसून येते.

## ३.४. महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलावरील काही अभ्यास :

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप अधिक स्पष्टपणे जाणून घेण्यासाठी आतापर्यंत अनेक व्यक्ती, संस्था व शासनाने नियुक्त केलेल्या समित्यांनी प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या अभ्यासाचा आढावा पुढीलप्रमाणे मांडला आहे.

**अ) महाराष्ट्राची तिसरी पंचवार्षिक योजना** : या योजनेच्या मसुद्यात महाराष्ट्र राज्याचा मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या विभागाची राज्यांतर्गत उत्पादनाची वृद्धीदर, गुंतवणूक, पायाभूत सुविधा, सामाजिक सोयीसुविधा, दरडोई उत्पन्न, दरडोई खर्च हे आठ प्रमुख निकष वापरून तुलना केली आहे. कृषी उत्पादन, सिंचनाचे प्रमाण, कारखानदारीचे प्रमाण, रस्त्याची लांबी व शिक्षण या सर्वच क्षेत्रात मराठवाडा व विदर्भ मागे आहेत. वीज वापरात तर मराठवाडा फारच मागे आहे. त्यात मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी या विभागावर जादा गुंतवणूक करण्याची शिफारस करण्यात आली होती.

**ब) अशोक मिश्रा यांचा अभ्यास : (१९६४)** श्री अशोक मिश्रा यांनी १९६४ मध्ये भारतातील प्रादेशिक विकासाचे स्तर हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात देशांतर्गत उत्पादन, वृद्धीदर, दरडोई उत्पन्न, दरडोई खर्च, गुंतवणूक, रस्ते विकास, शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, उत्पन्नाची साधने अशा विविध सामाजिक व आर्थिक निकषाच्या आधारे भारतातील सर्व जिल्ह्यांचे वर्गीकरण चार विकास स्तरात केले आहे. महाराष्ट्रातील त्यांनी २६ जिल्ह्यांचे पुढील स्तरात वर्गीकरण केले आहे.

१) पहिला (सर्वात खालचा) विकास स्तर – रत्नागिरी

२) दुसरा विकास स्तर – रायगड, कोल्हापूर, परभणी, बीड, उस्मानाबाद, भंडारा, चंद्रपूर

३) तिसरा विकास स्तर – सातरा,सांगली, औरंगाबाद, नांदेड, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा

४) चौथा (उच्च) विकास स्तर – बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, पुणे, अकोला, अमरावती, नागपूर

हे स्तर तपासल्यास उच्च स्तरामध्ये मराठवाड्याचा एकही जिल्हा नाही. पश्चिम महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्हे आहेत व विदर्भाचे तीन आहेत. तिसऱ्या स्तरात मराठवाड्याचे औरंगाबाद व नांदेड हे दोन जिल्हे असून विदर्भाचे तीन व पश्चिम महाराष्ट्राचे दोन जिल्हे

आहेत. दुसऱ्या स्तरात मराठवाड्याचे परभणी, बीड, उस्मानाबाद हे जिल्हे असून पश्चिम महाराष्ट्राचे दोन व विदर्भाचे दोन जिल्हे येतात. पहिल्या स्तरात फक्त रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश होतो. अशोक मित्रा यांच्या अहवालाप्रमाणे रत्नागिरी हा जिल्हा सर्वात मागास जिल्हा म्हणता येईल.

या अहवालातील उपलब्ध माहितीनुसार उच्च स्तरावर विकास पातळीचा विचार करता मराठवाड्यातील एकही जिल्हा यात सामाविष्ट होत नाही.

**क) पांडे अभ्यासगटाचा अहवाल : (१९६८)** : भारतातील औद्योगिक दृष्ट्या मागास जिल्ह्यांच्या अभ्यासासाठी एक समिती नियुक्त केली होती. काही प्रमुख निष्कर्षांच्या आधारे या समितीने महाराष्ट्रातील त्यावेळच्या एकूण २६ जिल्ह्यापैकी १३ जिल्हे हे औद्योगिकदृष्ट्या मागासलेले म्हणून घोषित केले. यात मराठवाड्यातील सर्व ५ जिल्हे, विदर्भातील ४ जिल्हे व कोकणातील दोन जिल्ह्यांचा समावेश होतो. या अभ्यास गटाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारने महाराष्ट्रातील १३ औद्योगिक दृष्ट्या मागास जिल्ह्यांना केंद्रीय अनुदाने व प्रोत्साहन देण्याची योजना कार्यान्वित केली.

**ड) गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे यांचा अहवाल (१९७५)** : पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेने १९७५ साली 'प्रादेशिक नियोजन – मराठवाडा विभागाचा अभ्यास' हा अहवाल प्रसिद्ध केला. यामध्ये महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागाची स्थिती कशी होती या संबंधीची आकडेवारी या अभ्यासात दिली आहे. या अभ्यासातील निकष लक्षात घेता मराठवाडा आणि विदर्भ विभाग मागास आहेत हे स्पष्ट दिसते.

**इ) श्री. नरोत्तम शहा समिती अहवाल (१९८१) :** श्री नरोत्तम शहा यांनी १९८१ मध्ये 'महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आर्थिक विकासाचे स्तर' हा अहवाल प्रसिध्द केला.श्री शहा यांनी उत्पादक क्षेत्र व पायाभूत सोयी भारतातील अनेक निकषांचा वापर करून प्रत्येक जिल्ह्यासाठी एक संयुक्त निर्देशांक तयार केला. त्यांनी आपला निर्देशांक भारतीय पातळीवर १०० गृहीत धरून राज्यातील २६ जिल्ह्यांपैकी ८ जिल्ह्यांचा संयुक्त निर्देशांक १०० किंवा त्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्यांना विकसित असे म्हणता येईल. १०० निर्देशकांपेक्षा कमी असणारे जिल्हे अविकसित आहेत असे म्हणता येईल. या अभ्यासक्रमानुसार राज्यातील १८ जिल्ह्यांचा संयुक्त निर्देशांक १०० पेक्षा कमी होता. विशेष म्हणजे विकसित जिल्ह्यात नागपूर वगळता बाकीचे सात

जिल्हे पश्चिम महाराष्ट्राचे आहेत. याऊलट अविकसित जिल्ह्यात मराठवाड्याचे सर्व जिल्हे, विदर्भातील ७ जिल्हे व पश्चिम महाराष्ट्राचे ६ जिल्हे समाविष्ट होतात. त्यात मराठवाड्यातील सर्व जिल्हे व विदर्भातील ७ जिल्हे सामाविष्ठ होते.

**ई)दांडेकर समितीचा अहवाल (१९८३)** : महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील विभागीय असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी सन १९८३ मध्ये प्रा.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सत्यशोधन समितीची' स्थापना केली होती. या समितीने ९ प्रमुख आर्थिक क्षेत्रांचा अभ्यास करून राज्य सरासरी पासून विशिष्ट क्षेत्रात मागे असतील त्यांचा अनुशेष काढला. दुष्काळी तालुक्यांसाठी, तालुका घटक धरण्यात आला. तसेच अनुशेषाचे मोजमाप करण्यासाठी जिल्हा हा घटक धरण्यात आला. नऊ प्रमुख आर्थिक क्षेत्र विचारात घेऊन राज्याचा विभागीय अनुशेष काढला. त्यात विकासाचा सर्वाधिक अनुशेष विदर्भाचा होता. त्या खालोखाल पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याचा क्रमांक लागतो.

**उ) सीता प्रभू व पी.सी. सरकार यांचा अभ्यास (१९९२)** : श्रीमती सीता प्रभू व पी.सी. सरकार यांनी 'महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे विकास स्तर' हा लेख प्रसिद्ध केला. २० निकषांचा वापर करून सांख्यिकीय पद्धतीच्या आधारे उच्च विकास स्तराचे जिल्हे, मध्य विकास स्तराचे जिल्हे आणि अविकसित स्तराचे जिल्हे असे वर्गीकरण केले. यामध्ये कृषी, उद्योग, पायाभूत सोयी, सामाजिक सुविधा इत्यादी प्रमुख क्षेत्रांचा सामावेश करण्यात आला. विकासाचे स्तर ठरविण्यासाठी क्रमवारी पद्धत, निर्देशांक पद्धत, प्रमुख गुण विश्लेषण पद्धत या सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. अविकसित स्तरात मराठवाड्याचे सहा जिल्हे व विदर्भाचे सहा जिल्हे समाविष्ट होतात.

**ऊ) राज्य नियोजन मंडळाच्या अभ्यास गटाचा अहवाल (१९९३)** : महाराष्ट्र शासनाच्या राज्य नियोजन मंडळाने१९९३ मध्ये 'महाराष्ट्रातील मागास विभागाचा विकास ' या संदर्भात राज्य नियोजन मंडळाचे सदस्य श्री भुजंगराव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची स्थापना केली. या अभ्यास गटाने महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे प्रगत आणि मागास असे वर्गीकरण केले. मागास जिल्ह्यांचे स्तर ठरविण्यासाठी १२ प्रमुख निकषांचा वापर केला. त्यापैकी ५ निकष आर्थिक क्षेत्रातील, ५ निकष सामाजिक क्षेत्रातील तर बाकीचे २ निकष पायाभूत सोयीसंबंधी आहेत. या अभ्यास गटाच्या निष्कर्षावरून महाराष्ट्रातील १७ जिल्हे मागास असून

त्यापैकी कोकणातील ०२, मराठवाड्यातील०६ व विदर्भातील ०८ जिल्हे आहेत. या अभ्यास गटाने जिल्ह्याची विकासाची बलस्थाने कोणती व कमजोर स्थाने कोणती याचा अभ्यास करून जिल्हावार विश्लेषण केले आहे. अविकसित जिल्ह्यांना सहाय्य मिळण्यासाठी या समितीने अनेक मौल्यवान शिफारसी केल्या आहेत.

**ए) निर्देशांक आणि अनुशेष समितीचा अहवाल (१९९७)**:निर्देशांक आणि अनुशेष समितीने तिच्या विश्लेषणातून खाजगी स्वरूपातील गुंतवणूकीकडे दुर्लक्ष करून केवळ सार्वजनिक गुंतवणूकच विचारात घेतली होता. परंतु नव्याने उदयास येणाऱ्या आर्थिक परिस्थितीनुरूप रस्ते,सिंचन, वीज या पायाभूत सुविधासह शिक्षण व आरोग्य या सामाजिक क्षेत्रातील खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरते. अलिकडच्या काळात राज्यशासनाने रस्ते, पूल, पाटबंधारे, उर्जा प्रकल्प ही कामे सार्वजनिक–खाजगी भागीदारी पद्धतीने हाती घेण्याचे धोरण स्वीकारले आहे. सामाजिक क्षेत्रात देखील खाजगी क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात शाळा, तंत्रनिकेतन संस्था, अभियांत्रिकी व वैद्यकिय महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत. खाजगी क्षेत्रातून अधिक नफा कमाविण्याचा उद्देश असतो. असा नफा मिळणे तेव्हाच शक्य होते ते क्षेत्र अगोदरच विकसित झालेले आहे. या प्रक्रियेतून विकास साधण्याने राज्यातील विकसित जिल्हे व मागास जिल्हे यांच्यामधील दरी रूंदावत जाण्याचा अंगभूत धोका निर्माण होतो असे म्हटले आहे.

दांडेकर समितीच्या शिफारशींचा काय परिणाम झाला हे शोधण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी १९९४ मध्ये निर्देशांक व अनुशेष समिती स्थापन केली. या समितीने राज्याच्या तीन प्रादेशिक विभागाची तौलनिक आकडेवारीसह जुलै १९९७ मध्ये राज्यपालांना सादर केला. या समितीच्या निष्कर्षानुसार दांडेकर समितीने काढलेला एकूण विकास अनुशेष जो ३१८६.७७ कोटी रूपयांपर्यंत वाढला होता. तो प्रत्यक्षात १५३५५.७७ कोटी रूपयांपर्यंत वाढल्याचे म्हटले आहे. सन १९८४ ते १९९४ या दहा वर्षात विदर्भाचा अनुशेष ३९.१२% वरून ४५.३३% पर्यंत वाढला. तर मराठवाड्याचा अनुशेष २३.५६% वरून ३०.१३% पर्यंत वाढला. याउलट उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष ३७.१२% वरून २०.५४% पर्यंत कमी झाल्याचे दिसून आले आहे.

**ऐ) सत्यशोधन समिती** : महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील आर्थिक विकासात फार मोठी तफावत आहे.अशी सामान्य जनतेची भावना असल्यामुळेव त्याचप्रमाणे विधानसभेतही अनेक नेत्यांनी ही भावना व्यक्त केल्यामुळे महाराष्ट्रातील विभागीय

असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी आणि हा असमतोल दूर करण्यासाठी निर्देशांक निश्चित करणे, निर्देशित निर्देशांकाच्या संदर्भात शासन कितपत अंमलबजावणी करू शकते हे ठरविणे आणि सद्यस्थितीतील विभागीय असमतोल दूर करण्यासाठी शासनाच्या उपाययोजना सुचविणे तसेच असा असमतोल पुन्हा निर्माण होवू नये म्हणून दीर्घकालीन उपाय सुचविणे , यासाठी सुप्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा.वि.म.दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने ३ ऑगस्ट १९८३ रोजी एका सत्यशोधन समितीची स्थापना केली. या समितीने आपला अहवाल एप्रिल १९८४ मध्ये प्रसिद्ध केला. हा अहवाल दांडेकर समितीचा अहवाल म्हणून जनतेला परिचित आहे.

- **दांडेकर समितीचे निर्देशक** –दांडेकर समितीने विकासाचा विभागीय अनुशेष काढण्यासाठी १) रस्ते २) सिंचन ३) ग्रामीण विद्युतीकरण ४) सर्वसामान्य शिक्षण ५) तांत्रिक शिक्षण ६) सार्वजनिक आरोग्य ७) पिण्याचा पाणी पुरवठा ८) भूविकास व मृदासंधारण ९) पशुसंवर्धन या प्रमुख ९ आर्थिक क्षेत्रांची निवड केली आहे. प्रत्येक क्षेत्रात निर्देशांक निवडण्यासाठी प्रामुख्याने लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्र हे २ प्रमुख घटक निवडण्यात आले. त्या आधारे निर्देशांकाची निवड करण्यात आली.

- **अनुषेश काढण्याची पद्धती** :
  - ➢ जिल्हा हा प्रशासकीय तसेच नियोजनाचा घटक असल्यामुळे आणि जिल्हा पातळीवर अधिक परिपूर्ण माहिती व आकडेवारी उपलब्ध असल्यामुळे दांडेकर समितीने ९ क्षेत्रांचा जिल्हावार अनुशेष काढण्यासाठी जिल्हा हा घटक मानला. याला फक्त सिंचन क्षेत्र अपवाद केले. सिंचनाचा अनुशेष काढण्यासाठी 'तालुका' हा घटक धरण्यात आला. यासाठी फक्त दुष्काळग्रस्त तालुकेच निवडण्यात आले.
  - ➢ अनुशेष काढताना प्रत्येक क्षेत्रात राज्याची सरासरी काढून नंतर प्रत्येक जिल्ह्याची त्या क्षेत्राची सरासरी काढण्यात आली. जे जिल्हे राज्य सरासरीपेक्षा कमी असतील अशा जिल्ह्यांना अनुशेष देण्यात आला.
  - ➢ प्रत्येक जिल्ह्यातील निरनिराळ्या क्षेत्रात वास्तव परिस्थिती काय आहे याचे वस्तुनिष्ठ मोजमाप करून वास्तवरूपात अनुशेष काढण्यात आला. हा वास्तवरूपी अनुषेश दूर

करण्यासाठी त्या वेळच्या किंमतीनुसार किती खर्च लागले हे लक्षात घेऊन अनुशेषाची पैशाच्या स्वरूपात मांडणी करण्यात आली.

## ३.५ अनुशेष आणि प्रादेशिक असमतोल –

महाराष्ट्रातील असमतोल घटला किंवा नाही याचा सविस्तर अभ्यास दांडेकर समितीने केला. समितीने काही महत्त्वपूर्ण शिफारशी ही केल्या. त्यामध्ये जिल्ह्यावर अनुशेष क्षेत्रांची राज्य सरासरी व जिल्हा सरासरी यातील अंतर ध्यानात घेवून काढण्याता आला. जे जिल्हे राज्यसरासरीच्या वर असतील त्यांना जादा निधी देण्यात आला नाही. फक्त राज्य सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांनाच अनुशेष देण्यात आला.

- **विभागावार अनुशेष पद्धती** : दांडेकर समितीने निवडलेल्या नऊ क्षेत्राच्या प्रत्येक जिल्ह्याच्या अनुशेषाची बेरीज करण्यात आली. विभागीय अनुशेष काढण्यासाठी त्या विभागातील जिल्ह्याच्या एकूण अनुशेषाची बेरीज करण्यात आली. महाराष्ट्रातील सर्व विभागांचा विकास अनुशेष पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ३.१**

**महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष[1] (रू.कोटीत)**

| विभाग | अनुशेष | एकूणाशी प्रमाण( %) |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | ९.७० | ०.३ |
| कोकण (मुंबई वगळून) | २९५.६५ | ९.३ |
| पश्चिम महाराष्ट्र | ८८४.०५ | २७.७ |
| मराठवाडा | ७५०.८६ | २३.५ |
| विदर्भ | १२४६.५४ | ३९.२ |
| महाराष्ट्र (एकूण) | ३१८६.८० | १००.०० |

***स्त्रोत –** बिराजदार माधव (जून २०१२) , 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. ३०९

तक्ता क्रमांक ३.१ मध्ये महाराष्ट्र राज्याचा विभागवार विकास अनुशेष दर्शविला आहे. विकासाचा सर्वाधिक अनुशेष विदर्भाचा १२४६.५४ कोटी रू. होता तर कोकणाचा अनुशेष सर्वात कमी २९५.६२ कोटी रू. आहे. अनुशेष काढताना समितीने फक्त शासकीय खर्च व शासनसहाय्य असलेल्या कार्यक्रमांचा विचार केला समितीने अनुशेष विचारात घेताना खाजगी क्षेत्र वगळले आहे.

राज्याच्या प्रत्येक विभगातील अनुशेष शक्यतो लवकर दूर व्हावा म्हणून विकासासाठी उपलब्ध असलेल्या निधींपैकी ८५% निधी अनुशेष दूर करण्यासाठी वापरावा व बाकीची १५% रक्कम चालू प्रकल्प व नैसर्गिक वृद्धी यावर खर्च करावी व ती सर्व जिल्ह्यामध्ये वाटावी अशी दांडेकर समितीने शिफारस केली. १९८२–८३ चा अनुशेष दूर झाला म्हणजे यापुढे निरनिराळ्या प्रदेशांना समान प्रमाणात निधीचे वाटप केल्यास सर्व प्रदेशाचा विकास समतोलपणे होऊ शकेल. अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया १९८२–८३ चा अनुशेष दूर झाला म्हणजे संपणारी नव्हती. म्हणून दांडेकर समितीने दर पाच वर्षांनी याबाबत आढावा घ्यावा असे सुचविले होते.

- **दांडेकर समितीच्या कार्यपद्धतीवरील टीका** :

दांडेकर समितीने वस्तूनिष्ठ भूमिकेतून विभागीय असमतोलाचा अभ्यास केला असला तरी या अहवालात काही त्रुटी होत्या. त्यामुळे समितीच्या अहवालावर पुढीलप्रमाणे प्रतिक्रिया उमटल्या होत्या.

१) दांडेकर समितीच्या शिफारशींना समितीच्या सर्व सदस्यांची सहमती नव्हती. डॉ.व्ही.व्ही. बोरकर, श्री. भूजंगराव कुलकर्णी यांनी या अहवालात आपल्या असहमतीचे टीपण जोडले होते.

२) या समितीने जिल्हा हा अनुशेष मापनाचा घटक घेण्याचे ठरविले असताना सिंचन क्षेत्राचा अनुशेष काढताना मात्र दुष्काळी तालुक्यासाठी तालुका हा घटक घेऊन अनुशेष काढला आहे. इतर क्षेत्रासाठी मात्र जिल्हा हा घटक घेतला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राचा अनुशेष अधिक निघाला अशी टिका केली जाते.

३) समितीने प्रत्येक क्षेत्राची सरासरी काढताना फक्त शासकीय खर्च व शासन सहाय्य कार्यक्रमांचा समावेश आपल्या विश्लेषणात केला. खाजगी क्षेत्राला त्यातून पूर्णपणे वगळण्यात आले. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याचे खरे चित्र पुढे येऊ शकले नाही.

४) महाराष्ट्रात कोणते जिल्हे मागास व कोणते जिल्हे प्रगत आहेत हे माहिती करण्याचे काम या समितीने टाळले आहे. तसेच समितीने निकष निश्चित करून प्रत्येक जिल्ह्याची विकासाची पातळी दर्शविली. परंतु प्रत्येक निकषाच्या आधारे विकास पातळीच्या संदर्भात जिल्ह्यांना क्रम दिले नाहीत.

५) दांडेकर समितीने अनुशेष काढण्याची प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया असे म्हटले आहे. दर पाच वर्षांनी सरकारने अनुशेष काढण्यासाठी समिती नेमावी असेही सुचविले आहे. या पद्धतीमुळे मागास व प्रगत जिल्ह्यातील विकासाचा असमतोल कमी होण्याऐवजी वाढत जाण्याची शक्यता जास्त आहे अशी टीका करण्यात आली.

## ३.६ महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलात वैधानिक विकास मंडळाची भूमिका –

१ मे १९६० रोजी भाषिक आधारावर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची निष्पती म्हणून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मराठवाडा आणि विदर्भ हे दोन विभाग महाराष्ट्रात सामील झाले. नवनिर्मित महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत हे दोन विभाग मागास होते. या मागासलेल्या विभागाच्या विकासाची हमी देणारा ऐतिहासिक नागपूर करार मान्य करण्यात आला. नागपूर कराराला अविकसित भागातील लोकांना समन्यायी तत्त्वावर विकासात्मक न्याय मिळावा म्हणून घटनात्मक स्वरूप दिले जावे असा विदर्भातील पुढाऱ्यांनी आग्रह धरला आणि त्याला महाराष्ट्रातील इतर पुढाऱ्यांनी आग्रह धरल्यामुळे भारतीय राज्यघटनेत महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळी ३७/(२) कलमाचा अंतर्भाव करण्यात आला. त्यामध्ये राज्यातील निरनिराळ्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांमधील दर्जा, सवलती आणि रोजगारविषयक संधी याबाबत असणारी विषमता, राज्यांनी कमी करण्याचा प्रयत्न करावा असे स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी नागपूर कराराचे पालन केले जाईल असे निःसंदिग्ध आश्वासन विधीमंडळाच्या सभागृहात दिले होते. परंतु वेगवेगळ्या व्यक्ती, संस्था व शासनाने नेमलेल्या समित्यांचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर मराठवाडा, विदर्भ, कोकण विभाग, पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत किती मागास आहेत हे स्पष्ट झाले. मागास भागातील राजकीय नेतृत्त्व कमजोर असल्यामुळे बहुसंख्य योजना व प्रकल्प प्रगत भागातच गेले व परिणामी लोकशाही शासन पद्धती असूनही महाराष्ट्र शासनाने मागास भागाच्या विकासाकडे

फार मोठे दुर्लक्ष केले. त्यामुळे नागपूर कराराचे शासनाकडून पालन झाले नाही हेच सिद्ध होते. मागासलेल्या भागाचे मागासलेपण दूर करण्यासाठी घटनेच्या ३७१(२) कलमाचा वापर करून राष्ट्रपतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील तीन वैधानिक विकासमंडळे स्थापन करावीत. ही मागणी पुढे आली. साहजिकच ही विकास मंडळे स्थापन करण्यासाठी मागास भागातील जनतेला सतत पाठपुरावा आणि संघर्ष करावा लागला. याचा परिणाम असा झाला की, २६ जूलै १९८४ रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगवेगळी विकासमंडळे स्थापन करावीत असा ठराव मंजूर झाला. हा ठराव पास झाल्यानंतर जवळजवळ १० वर्षानंतर ९ मार्च १९९४ रोजी केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने ३७२(२) कलमातराष्ट्रपतींच्या वतीने मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी तीन स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याचा अध्यादेश काढला. राष्ट्रपतींच्या या अध्यादेशात महाराष्ट्र राज्यांच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी टाकून विकास मंडळाचे कार्यक्षेत्र, भौगोलिक क्षेत्र निश्चित करावे असे आदेश दिले होते. राष्ट्रपतीच्या अध्यादेशाला अनुसरून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ३० एप्रिल १९९४ रोजी एक अध्यादेश काढून पुढील तीन मंडळांची स्थापना केली.

१) विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर

२) मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद

३) पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मुंबई यांचा समावेश करून या सर्वांसाठी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, मुंबई.

- **वैधानिक विकास मंडळाची कार्ये** : राष्ट्रपतींनी काढलेल्या अध्यादेशास अनुसरून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ३० एप्रिल १९९४ रोजी एक अध्यादेश काढून विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र या तीन विभागासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळांची स्थापना केली. राज्यपालांच्या आदेशानुसार प्रत्येक वैधानिक विकास मंडळावर पुढील कार्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

१) राज्याच्या सरासरी विकासाची पातळी लक्षात घेऊन त्या तुलनेत त्या त्या विभागाचा विकास स्तर कसा आहे. याचा अभ्यास करण्यासाठी योग्य निर्देशांकाचा वापर करणे.

२) त्या त्या विभागातील अनुशेष दूर करण्यात विविध योजना किती प्रमाणात यशस्वी होतात हे शोधणे आणि त्याचबरोबर त्या विभागाचा एकूण विकास साधण्याबाबतीत विकास कार्याचे मूल्यमापन करणे.

३) त्या विभागात जे विकासाचे विविध क्षेत्र व उपक्षेत्र असतात. त्यांचा विकास करण्याकरिता किती खर्च येतो. त्या संबंधीची सूचना करणे व पंचवार्षिक योजना व या काळात त्याभागात होणाऱ्या विकासखर्चाचे प्रमाण सुचविणे.

४) त्या विभागातील विकासाकडे विशेष लक्ष देऊन प्रत्येक वर्षांच्या शेवटी व तीन महिन्याच्या आत आपल्या कार्याचा अहवाल विधीमंडळापुढे सादर करण्यासाठी राज्यपालांना पाठविणे.

५) विकास खर्चासाठी निरनिराळ्या विभागांना कसा निधी वाटावा याबाबत ही वैधानिक विकास मंडळे राज्यपालांना शिफारस करू शकतात.

६) राज्यपालांनी केलेले निधीचे वाटप वार्षिक वित्तीय अहवालात नमुद करतील. हा अहवाल विधिमंडळापढे ठेवला जाईल. विभागीय वाटप झाल्यावर विकास खर्चाचा निधी इतर विभागाकडे वळविता येणार नाही.

७) राज्यपाल प्रत्येक वैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रात तांत्रिकशिक्षण, धंदेवाईक शिक्षण व राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली नोकऱ्यांना पुरेशा संधी न्याय पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतील.

मागासलेल्या विभागात पायाभूत सोयींची उपलब्धता, जलसिंचन क्षेत्राचा विकास, औद्योगिकीकरणास गती देणे, कृषी उद्योगांची स्थापना, पूरक उद्योगांना चालना देणे, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी करणे, योजनांची अंलबजावणी करणे या संदर्भात महत्त्वाची भूमिका पार पाडून त्या विभागाचे मागासलेपण दूर करण्याचे कार्य वैधानिक विकास मंडळाला करावे लागणार आहे.

## ३.७ जिल्हा नियोजन विकास मंडळ व महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल –

विशिष्ट कालावधीत विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने राष्ट्रातील एकंदर साधन संपत्तीचा जास्तीत जास्त फायदेशीर उपयोग करून घेण्यासाठी व्यूहरचना आखणे म्हणजे

नियोजन होय. देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक व्यवहाराची योजनाबद्ध आखणी करण्याच्या हेतूने भारत सरकारने २८ मार्च १९५० रोजी भारतीय नियोजन मंडळाची स्थापना केली. १९५१ पासून पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर आर्थिक विकासाची घोडदौड सुरू झाली. त्याचाच एक भाग म्हणून राज्य पातळीवर नियोजन मंडळाद्वारे विकासाला सुरूवात झाली. जिल्हा हा विकासासाठी स्वतंत्र घटक मानला जात असे.

जिल्हा विकासासाठी जिल्हा नियोजन मंडळाची स्थापना केली आहे. संपूर्ण जिल्ह्याचा विचार करून जिल्ह्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी नियोजन करून योजना आखल्या जातात परंतु त्यांच्यासाठी निधी हा केंद्र व राज्य सरकारकडून उपलब्ध होतो. बऱ्याच वेळा निधीची कमतरता असल्यामुळे नियोजन मंडळाने सुचविलेल्या योजना प्रत्यक्षात येत नाहीत. यामुळे अनुशेष कायम राहून प्रादेशिक असमतोलामध्ये वाढ होतो. जिल्हा नियोजन मंडळाचा वापर बऱ्याच वेळा राजकीय हेतूने केला जातो. त्यामुळे देखील प्रादेशिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. सरकारकडून ठरवलेला निधी वेळेत उपलब्ध होत नाही किंवा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध होतो यामुळे खर्चही होत नाही यावरून प्रादेशिक असमतोलाच्या निर्मितीमध्ये जिल्हा नियोजन मंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे लक्षात येते. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीचे वर्ष १९७४–७५ मध्ये महाराष्ट्रात जिल्हा हा नियोजनाचा प्राथमिक घटक मानून जिल्हा स्तरावर आर्थिक नियोजनाला सुरूवात झाली. पूर्वी जिल्हा स्तरावर त्यासाठी नियोजन मंडळ कार्य करीत होते. १९७४–७५ साली या नावात बदल करण्यात येऊन या मंडळाचे नाव जिल्हा नियोजन आणि विकास मंडळ असे ठेवण्यात आले.

राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास साधण्यासाठी नियोजनाच्या कार्याचे विकेंद्रीकरण घडून आणणे आवश्यक आहे. याविचारातून जिल्हा नियोजनाची सुरूवात झाली. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या नियोजनाचा आराखडा तयार करण्याची व जिल्ह्याच्या विकास कामाची रूपरेषा ठरविण्याची जबाबदारी जिल्हा नियोजन व विकास मंडळावर सोपविण्यात आली. जिल्ह्यातील उपलब्ध नैसर्गिक व इतर साधनसंपत्तीच्या क्षमतेचा पूर्ण विकास साधण्याबरोबर जिल्ह्यात सामाजिक आर्थिक समता प्रस्थापित करून जिल्ह्या–जिल्ह्यात

विकासाचे असमतोल दूर करणे या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा नियोजन व विकास मंडळाची स्थापना करण्यात आली.

- **जिल्हा नियोजन विकास मंडळाची कार्यप्रणाली** : जिल्ह्याजिल्ह्यातील प्रादेशिक असमतोल कमी करण्याच्या उद्देशाने जिल्हा नियोजन विकास मंडळ पुढील कार्य पार पाडते.

  १) जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी तयार करण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनेला सखोल अभ्यास करून त्यास मान्यता देणे.

  २) योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व त्या अनुषंगाने आवश्यकता असल्यास काही शिफारशी करणे.

  ३) शासनाने जिल्ह्यासाठी मंजूर केलेल्या वार्षिक योजनेंतर्गत बचतीचे पूर्व नियोजन, जादा खर्च याबाबत विचार विनिमय करून त्यास मान्यता देणे.

  ४) जिल्हा पातळीवर कार्यरत विविध शासकीय यंत्रणेची जे निरनिराळ्या स्वरूपाची कार्य असतात त्या कार्यात समन्वय साधला जात आहे किंवा नाही ते पाहणे.

  ५) जिल्हा पंचवार्षिक योजना तयार करण्यासाठी व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावरील विविध शासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

- **जिल्हा विकास निधी वाटप सूत्र** :

जिल्हा नियोजन व विकास कामासाठी शासनाकडून जो निधी दिला जातो त्या निधीचे वाटप कसे करावे यासंदर्भात एक सुत्र ठरवून देण्यात आले आहे. त्यामध्ये जिल्ह्याची लोकसंख्या आणि जिल्ह्याच्या निरनिराळ्या क्षेत्रातील मागासलेपणाचा विचार करण्यात आला असून निधीचे वाटप पुढीलप्रमाणे,

**तक्ता क्र. ३.२**

**जिल्हा विकास निधी वाटपाचे सूत्र**

| तपशील | एकूण निधी वाटपाची टक्केवारी |
|---|---|
| लोकसंख्या | ६०.० |
| नागरी / शहरी लोकसंख्या | ५.० |
| मागासवर्गीय लोकसंख्या | ५.० |
| उद्योगाचे मागासलेपण | ५.० |
| दळणवळण क्षेत्राचे मागासलेपण | ५.० |
| कृषी/शेती क्षेत्राचे मागासलेपण | ५.० |
| सिंचनाचे मागासलेपण | ५.० |
| अवर्षण प्रवण क्षेत्र विशेष समस्या | ३.० |
| वन क्षेत्रातील समस्या | १.५ |
| सागरी किनारपट्टीतील लोकांच्या समस्या | १.५ |
| विशेष प्रश्नासाठी राज्य स्तरावर राखीव निधी | ५.० |
| एकूण | १००.० |

* **स्त्रोत –** बिराजदार माधव (जून २०१२) , 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. ३१५

या सुत्रानुसार असे दिसून येते की, जिल्हा विकास निधीचा सर्वाधिक हिस्सा जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात वाटला जातो. लोकसंख्येच्या प्रमाणात ६०% रक्कम, मागासवर्गीय लोकसंख्येच्या प्रमाणात ५% रक्कम, तर नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात ५% रक्कम म्हणजेच एकूण रकमेच्या ७०% रक्कम लोकसंख्येच्या आधारावर वाटप केले जाते. त्यामुळे ज्या जिल्ह्याचे लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे, त्या जिल्ह्यांना या निकषानुसार जादा निधी मिळतो हे उघड आहे. उरलेली ४०%रक्कम जिल्ह्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील मागासलेपणाचा विचार करून देण्यात येते. जे वरील निकषाप्रमाणे अधिक मागासलेले आहेत त्यांना अधिक निधी मिळतो.

## ३.८ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे विभागीय विश्लेषण –

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे विविध निकषांच्या आधारे वर्गीकरण करण्यात आले आहे. प्रत्येक विभागात पुढारलेला किंवा विकसित आणि मागासलेला विभाग दिसून येतो.

### अ)दरडोई उत्पन्न –

राज्यातील प्रत्येक व्यक्तीला सरासरी मिळणारे वार्षिक उत्पन्न म्हणजे दरडोई उत्पन्न होय. राज्याच्या एकूण उत्पन्नाला राज्यातील एकूण लोकसंख्यने भागले असता दरडोई उत्पन्न मिळते. महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्नाची विभागणी विविध विभागानुसार करण्यात आली आहे. दरडोई उत्पन्नातील विभागीय असमतोल तक्ता क्रमांक ३.३ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ३.३**

**महाराष्ट्रातील विभागीय दरडोई उत्पन्नाचे वर्गीकरण (आकडे रूपयांत)**

| वर्ष | तपशील | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | संख्या | ५११०३३ | ५५७२८ | ६९१९९ | ६६१९७ | ९६३९० | १०५३७९ | १२१७६७ | १३७९०२ | १५४०८० | १७०५८४ |
| | टक्के | (२९.०) | (२७.५) | (२५.६) | (२५.५) | (२७.५) | (२७.०) | (२६.७) | (२७.०) | (२७.२) | (२६.८) |
| पुणे | संख्या | ३२१७२ | ४०३६९ | ५४१२६ | ५२०७५ | ६८४६१ | ७७२२१ | ९०३०९ | १०१३७२ | ११०७४२ | १२७८५६ |
| | टक्के | (१८.३) | (२०.०) | (२०.०) | (२०.०) | (१९.५) | (१९.९) | (१९.८) | (१९.८) | (१९.५) | (२०.०) |
| नागपूर | संख्या | २८९२२ | ३२३३४ | ४२६९९ | ४०३५९ | ५५२४१ | ६१६४० | ६८१३७ | ७८१२५ | ८८२५३ | ९६७१५ |
| | टक्के | (१६.५) | (१६.०) | (१५.८) | (१५.६) | (१५.८) | (१५.८) | (१५.०) | (१५.३) | (१५.६) | (१५.२) |
| नाशिक | संख्या | २४०८३ | २९६८० | ४२१२७ | ४०७५९ | ५१९४१ | ५५९१४ | ६६४२९ | ७२५५० | ८०३४१ | ९०७९९ |
| | टक्के | (१३.७) | (१४.६) | (१५.६) | (१५.७) | (१४.९) | (१४.४) | (१४.७) | (१४.२) | (१४.२) | (१४.२) |
| औरंगाबाद | संख्या | १८८५० | २२४५९ | ३१४८० | ३०४९९ | ३९७४६ | ४५५७५ | ५५९१७ | ६२६१३ | ६६५६१ | ७७४४० |
| | टक्के | (१०.७) | (११.०) | (११.६) | (११.८) | (११.४) | (११.७) | (१२.३) | (१२.३) | (११.७) | (१२.१) |
| अमरावती | संख्या | २०८३६ | २१९४४ | ३०७०६ | २९५०३ | ३८१६० | ४३५२७ | ५२७२४ | ५८०२६ | ६६८३६ | ७४०५७ |
| | टक्के | (११.८) | (१०.९) | (११.४) | (११.४) | (१०.९) | (११.२) | (११.५) | (११.४) | (११.८) | (११.७) |
| महाराष्ट्र | संख्या | ३२१७० | ३७०८१ | ४९०५८ | ४७०५१ | ६४२३८ | ७१३०० | ८३९९५ | ९३७४८ | १०३९९१ | ११७०९१ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

*** स्त्रोत –** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००४–०५ ते २०१३–१४

*** टीप –** कंसातील अंक दरडोई उत्पन्नाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ३.३. मध्ये महाराष्ट्रातील विभागीय दरडाई उत्पन्नाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. २००४–०५ ते २०१३–१४ या काळात कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न १०२८२५९ रू. इतके आहे. त्यापैकी सर्वाधिक दरडोई उत्पन्न २०१३–१४ मध्ये १७०५८४ रू.

(२६.८%) इतके असून संशोधन काळात दरडोई उत्पन्नात १६५०४ रू. इतकी वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

कोकण विभागात २००४–०५ मध्ये ५१०३३ रू. (२९.०%), २०१३–१४ मध्ये १७०५८४ रू. (२६.८%) दरडोई उत्पन्न असल्याचे आढळून आले आहे. संशोधन काळात गेल्या १० वर्षाच्या काळात ११९५५१ रू. वाढ दरडोई उत्पन्नात झाल्याचे दिसून आले आहे. पुणे विभागाचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये ५१०३३ रू. (१८.३%)आहे.सर्वाधिक दरडोई उत्पन्न २०१३–१४ या वर्षी १७०५८४ रू.(२०.०%) असून संशोधन काळात पुणे विभागातील दरडोई उत्पन्नात ९५६८४ रू. इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

नागपूर विभागाचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये २८९२२ रू. (१६.५%), २०१३–१४ मध्ये ९६७१५ रू. (१५.२%) इतके आहे. नागपूर विभागातील दरडोई ६७७९३ रू. इतकी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. नाशिक विभागाचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये २४०८३ रू. (१३.७%), २०१३–१४ मध्ये ९०७७९ रू.(१४.२%) इतके आहे. संशोधन काळात दरडोई उत्पन्नात ६६७१६ रू. ची वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

औरंगाबाद विभागाचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये १८८५० रू. १०.७%, २०१३–१४ मध्ये ७७४४० रू. १२.१% इतके आहे. संशोधन काळात औरंगाबाद विभागाचे दरडोई उत्पन्न ५८५९० रू. इतके वाढले असल्याचे आढळून आले आहे.

अमरावती विभागाचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये २०८३६ रू. (११.८%), २०१३–१४ मध्ये ७४०५७ रू. (११.७%) इतके आहे. संशोधन काळात अमरावती विभागाच्या दरडोई उत्पन्नात ५३२२१ रू. इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न २००४–०५ मध्ये १७५८९६ रू.,२०१३–१४ मध्ये ६३७४५१रू. इतके आहे. म्हणजेच २००४–२०१४ या काळात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नात ३१८०३१८ रू वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

कोकण विभागाचे दरडोई उत्पन्न हे नेहमीच महाराष्ट्र राज्याच्या दरडोई उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे. अमरावती, औरंगाबाद, नागपूर या विभागाचे दरडोई उत्पन्न कोकण व महाराष्ट्र च्या तुलनेत कमी आहे मात्र सर्वच विभागाच्या दरडोई उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असल्याचे आढळून आले आहे. दरडोई उत्पन्नातील वाढ ही रोजगार संधीची

उपलब्धता यावर आधारित असते. रोजगारात वाढ झाल्यामुळे रोख स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. लोकांना जर योग्य प्रमाणात रोजगार मिळत असेल तर त्यांची आर्थिक स्थिती सुधारते. परिणामी दरडोई उत्पन्नात वाढ होते. जर बेकारीची अवस्था असेल तर दरडोई उत्पन्नात कोणत्याही प्रकारची भर पडत नाही. दरडोई उत्पन्न जास्त असले म्हणजे राज्याच्या जनतेचे राहणीमान उंचावलेले असते.

**ब)महाराष्ट्राच्या शेती विकासातील प्रादेशिक असमतोल –**

महाराष्ट्रामध्ये शेतीच्या विकासात सुद्धा प्रादेशिक असमतोल आहे. पश्चिम महाराष्ट्र कोकण, विदर्भ याचा अभ्यास करता शेतीमध्ये असमतोल दिसून येतो. महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर एकूण सिंचन क्षेत्र, शेती विभागाचे अंशदान याचा अभ्यास करता हा असमतोल दिसून येतो. शेतीवर अवलंबून असणाऱ्या कार्यशकक्तीचा हिस्सा, एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी असलेली टक्केवारी या निकषाच्या आधारे प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप केले आहे. ज्या विभागात शेतीवर अवलंबून असणारी कार्यशक्ती मोठ्या प्रमाणात आहे ते विकासाच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. शेती क्षेत्रात कार्यरत असणारे शेतकरी, शेतमजूर, सिंचनाखालील क्षेत्र, प्राथमिक क्षेत्राचे विभागवार अंशदान या घटकांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ३.४.**

**महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचे प्रादेशिक असमतोलाबाबतचे वर्गीकरण**

| विभाग | शेतकरी ( लाख) | शेतमजूर (लाख) | एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी टक्केवारी | प्राथमिक (शेती) क्षेत्राचे विभागवार अंशदान(%) (२०००–०१ ते २००९–१०) |
|---|---|---|---|---|
| कोकण | १८.९० | १०.२६ | ८.०९ | १०.८ |
| नाशिक | ३६.०२ | ३०.६९ | १८.१५ | २०.६ |
| पुणे | ३५.७३ | १९.९६ | २८.०२ | २२.७ |
| औरंगाबाद | ३९.२३ | ३४.६० | १४.०८ | १८.५ |
| अमरावती | २६.२४ | ४९.२७ | ५.९९ | १३.६ |
| नागपूर | २४.६२ | ३४.९१ | २५.६७ | १३.८ |
| महाराष्ट्र | १८०.७४ | १७९.६९ | १००.०० | १००.० |

*** स्त्रोत–** उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ८६ व ८७

तक्ता क्रमांक ३.४. मध्ये महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचा प्रादेशिक असमतोल अभ्यासला आहे. महाराष्ट्रात शेती या व्यवसायावर अवलंबून असणारी कार्यशक्ती १८०.७४ लाख असून त्यापैकी कोकण १८.९० लाख , नाशिक ३६.०२ लाख, पुणे ३५.७३ लाख, औरंगाबाद ३९.२३ लाख, अमरावती २६.२४ लाख, नागपूर २४.६२ लाख आहे. महाराष्ट्रात शेतमजूर सुद्धा १७९.६९ लाख असून त्यापैकी कोकण विभागात १०.२६ लाख , नाशिक ३०.६९ लाख, पुणे १९.९६ लाख, औरंगाबाद ३४.६० लाख, अमरावती ४९.२७ लाख , नागपूर ३४.९१ लाख आहे.

महाराष्ट्रातील एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी टक्केवारी ही कोकण विभागात ८.०९%, नाशिक १८.५%, पुणे २८.०२%, औरंगाबाद १४.०८% , अमरावती ५.९९ %, नागपूर २५.६७% आहे.

प्राथमिक शेती क्षेत्राचे विभागवार अंशदान २०००–०१ ते २००९–१० या काळाच्या विचार करता कोकण १०.८%, नाशिक २०.६% पुणे, २२.७%, औरंगाबाद १८.५%, अमरावती १३.६%, नागपूर १३.८% इतके असल्याचे आढळून आले आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी सर्वात कमी प्रमाणात कोकण या विभागात तर सर्वाधिक प्रमाणात औरंगाबाद विभागात आहेत. सर्वात कमी शेतमजूर कोकण या विभागात असून सर्वाधिक शेतमजूर अमरावती विभागात आहे. त्यानंतर नागपूर, औरंगाबाद यांचा क्रम आहे. एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी असणारे प्रमाण अमरावती मध्ये सर्वात कमी ५.९९%, त्यानंतर कोकणात ८.०९% आहे. पुणे विभागात सर्वाधिक २८.०२ % इतके आहे. प्राथमिक किंवा शेती क्षेत्राचे कोकणाचे योगदान अतिशय कमी असून १०.८% सर्वाधिक पुणे २२.७% इतके आहे. कोकणातील शेती व्यवसाय अजून मागासलेला आहे. जून ते सप्टेंबर या काळात पावसाच्या पाण्याची प्रचंड उपलब्धता असूनही साठवणूक, नियोजन व वापर करण्याची पद्धती यांच्या अभावामुळे महाराष्ट्राच्या तुलनेत शेतीची पिछेहाट या विभागात झाली आहे. पुणे विभाग वगळता शेतीला पाणीपुरवठा योग्य वेळेत उपलब्ध होत नाही तरी कोकणाच्या तुलनेत इतर विभाग शेतीच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसते. यावरून असे दिसते की, शेती विकासाच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

## क) महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक, वार्षिक व संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर –

महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक व वार्षिक अभिवृद्धीदर तक्ता क्रमांक ३.५ मध्ये दर्शविला आहे. २००४–०५ च्या स्थिर किमतीनुसार २०००–०१ ते २०११–१२ या काळाचे वर्गीकरण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ३.५**

**महाराष्ट्रातील प्रादेशिक शेती उत्पन्नातील वार्षिक व संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दराची स्थिती**

**(२००४–०५ च्या स्थिर किंमतीनुसार)**

| वर्ष | मुंबई वगळून महाराष्ट्र | मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ |
|---|---|---|---|---|
| २०००–०१ | –१८.७९ | –१३.५० | –१६.३९ | –२८.७८ |
| २००१–०२ | २२.५६ | १९.३८ | १५.९८ | ३२.९७ |
| २००२–०३ | १.३० | १.५० | ८.१५ | –२.७५ |
| २००३–०४ | ७.९३ | १२.०४ | –०.७१ | ५.३६ |
| २००४–०५ | –७.५३ | –०.२४ | ७.६६ | ३०.६२ |
| २००५–०६ | ९.५० | ३.५६ | १५.४६ | २१.४३ |
| २००६–०७ | १४.२८ | १२.५४ | १६.६४ | १६.५८ |
| २००७–०८ | १३.९६ | ७.९३ | २२.९४ | २०.८१ |
| २००८–०९ | –१५.८० | –५.६१ | –२५.८६ | –२८.८५ |
| २००९–१० | १.१० | –०.९६ | १०.२८ | –१.१९ |
| २०१०–११ | १९.०५ | १७.२६ | २६.९८ | १६.३१ |
| २०११–१२ | ४.५२ | ९.०७ | –१.२९ | –२.१८ |
| संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर | ४.२४ | ५.१४ | ६.८७ | ०.३४ |

*** स्त्रोत –** उच्चस्तर समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ९४

तक्ता क्रमांक ३.५ मध्ये महाराष्ट्रातील प्रादेशिक शेती उत्पन्नातील वार्षिक व संयुक्त वार्षिक अभिवृद्धीदराचे वर्गीकरण करण्यात आले आहे. मुंबई वगळून महाराष्ट्र शेती उत्पन्नातील वार्षिक अभिवृद्धी दर २०००–०१ मध्ये –१८.७९, २०११–१२ मध्ये ४.५२ इतका आहे. या प्रदेशाचा संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर ४.२४ इतका आहे.मुंबई वगळून उर्वरित महाराष्ट्राचा शेती उत्पन्नातील वार्षिक अभिवृद्धी दर २०००–०१ मध्ये –१३.५०, २०११–१२ मध्ये ९.०७ इतका आहे. संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर ५.१४ असल्याचे दिसून येते. मराठवाडा या प्रदेशाचा शेती उत्पन्नातील वार्षिक अभिवृद्धी दर २०००–०१ मध्ये –१६.३९, २०११–१२ मध्ये –१.२९ आहे. संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर हा ६.८७ इतका आहे. विदर्भाचा शेती उत्पन्नातील वार्षिक अभिवृध्दी दर २०००–०१ मध्ये –२८.७८, २०११–१२ मध्ये –२.१८ इतका आहे. संयुक्त अभिवृद्धी दर ०.३४ इतका आहे.

महाराष्ट्रातील शेती उत्पन्नाच्या प्रादेशिक आकडेवारीच्या आधारे शेती उत्पन्नाबाबत विदर्भ सर्वात कमी ०.३४ खूपच मागे आहे. मराठवाडा या प्रदेशाचा संयुक्त वार्षिक अभिवृद्धी दर सर्वाधिक ६.८७ आहे असे दिसून येते.

## ड) महाराष्ट्रातील विभागीय जलाशये, प्रकल्पीय व उपयुक्त साठा आणि प्रादेशिक असमतोल–

महाराष्ट्र राज्यात कृषी व औद्योगिक विकासासाठी जलाशय साठ्यांचे अनन्य साधारण असे महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यातील कोकण, नाशिक, पुणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर या विभागातील २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील जलाशये, प्रकल्पीय साठा, उपयुक्त साठा यांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.६ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ३.६

## महाराष्ट्रातील विभागीय जलाशये, प्रकल्पीय साठा व उपयुक्त साठा आणि प्रादेशिक असमतोल

| वर्ष | तपशील | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | जलाशय | ११२ | ११४ | ११५ | १४० | १४४ | १४२ | १५१ | १५३ | १५५ | १५९ |
| | टक्के | (५.४) | (५.४) | (५.३) | (६.२) | (६.३) | (६.३) | (६.१) | (६.२) | (६.२) | (६.३) |
| | प्रकल्पीय साठा | ५०५ | ५१४ | ५२४ | ९२६ | १०४५ | ९३० | १६०३ | १६२० | १७०० | १७३० |
| | टक्के | (२.४) | (२.४) | (२.०) | (३.४) | (३.९) | (३.४) | (५.२) | (५.३) | (५.५) | (५.६) |
| | उपयुक्त साठा | ४८५ | ४९२ | ५१० | ६९० | ८५८ | ७९५ | १४९० | १५०० | १५१० | १५३० |
| | टक्के | (२.३) | (२.२) | (२.०) | (३.०) | (५.२) | (३.९) | (५.६) | (६.०) | (५.९) | (६.०) |
| नाशिक | जलाशय | ३१८ | ३२० | ३६४ | ३६४ | ३१९ | ३१७ | ३८४ | ३८५ | ३९५ | ४०० |
| | टक्के | (१५.३) | (१५.३) | (१६.६) | (१६.२) | (१४.१) | (१७.२) | (१५.८) | (१५.७) | (१५.९) | (१५.९) |
| | प्रकल्पीय साठा | ३५५० | ३७४३ | ३८१ | ३८७५ | ३७७२ | ३८६१ | ४७१० | ४७२५ | ४८५० | ४१९०० |
| | टक्के | (१७.१) | (१७.६) | (१४.७) | (१४.४) | (१३.८) | (१४.२) | (१५.३) | (१५.४) | (१५.७) | (१५.९) |
| | उपयुक्त साठा | ३४०० | ३४८१ | ३७८ | ३६१७ | २४६२ | ३५३९ | ३६५० | ३७०० | ३८५० | ३९०० |
| | टक्के | (१५.८) | (१५.४) | (९.५) | (१५.३) | (१४.८) | (१७.०) | (१३.८) | (१४.७) | (१५.४) | (१५.६) |
| पुणे | जलाशय | ४८५ | ४८८ | ५०५ | ५०५ | ५३९ | ५०६ | ५९४ | ६०० | ६०५ | ६०५ |
| | टक्के | (२३.४) | (२२.४) | (२२.९) | (२२.६) | (२३.८) | (२२.८) | (२४.३) | (२४.३) | (२४.३) | (२४.१) |
| | प्रकल्पीय साठा | ४८५० | ४९५९ | ९५३८ | ९५८० | ९७६६ | ९७३६ | १०७६१ | १०८१० | १०८२० | १०८२५ |
| | टक्के | (२९.४) | (२९.१) | (२४.४) | (२४.१) | (२३.७) | (२३.९) | (२१.९) | (२२.१) | (२२.०) | (२१.९) |
| | उपयुक्त साठा | ७९५० | ८६१८ | ८८६६ | ९०८५ | ८७४४ | ९३४२ | ९९०५ | ९९२५ | ९९५० | ९९५० |
| | टक्के | (३६.९) | (३८.३) | (३५.८) | (३८.६) | (५२.४) | (४४.९) | (३७.३) | (३९.२) | (३९.०) | (३९.७) |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **औरंगाबाद** | **जलाशय** | ४८० | ४८५ | ५१८ | ५३२ | ५५६ | ५५३ | ५९२ | ५९५ | ५९७ | ६०० |
| | **टक्के** | (२३.१) | (२३.१) | (२३.६) | (२३.८) | (२४.४) | (२४.९) | (२४.२) | (२४.१) | (२४.०) | (२३.९) |
| | **प्रकल्पीय साठा** | ६१०० | ६२२८ | ६४०५ | ६४४६ | ६४७६ | ६४७६ | ६७४३ | ६७५० | ६७५९ | ६७७९ |
| | **टक्के** | (२९.४) | (२९.१) | (२४.४) | (२४.१) | (२३.७) | (२२.९) | (२१.९) | (२२.३) | (२१.०) | (२१.९) |
| | **उपयुक्त साठा** | ४९०० | ४९३० | ६२२३ | ५०८२ | १४९० | ४५६२ | ५६३७७ | ५६८० | ५७०० | ५७७५ |
| | **टक्के** | (२२.८) | (२१.९) | (२५.१) | (२१.६) | (८.९) | (२१.९) | (२१.५) | (२२.४) | (२२.३) | (२२.९) |
| **अमरावती** | **जलाशय** | ३२५ | ३३१ | ३३४ | ३४१ | ३५४ | ३४६ | ३५७ | ३६० | ३६५ | ३६८ |
| | **टक्के** | (१५.८) | (१५.८) | (१५.३) | (१५.२) | (१५.६) | (१५.६) | (१४.६) | (१४.७) | (१४.६) | (१४.७) |
| | **प्रकल्पीय साठा** | २३५० | २४६० | २४३६ | २५०४ | २८७० | २५७९ | २९७७ | २९८५ | २९०० | २९०५ |
| | **टक्के** | (११.३) | (११.६) | (९.२) | (९.४) | (१०.४) | (९.६) | (९.८) | (९.७) | (९.४) | (९.३) |
| | **उपयुक्त साठा** | १८५० | १९२८ | २३९७ | २१६७ | ११२३ | १२१२ | २६६० | २६५० | २६४० | २६५० |
| | **टक्के** | (८.६) | (८.६) | (९.८) | (९.१) | (६.८) | (५.९) | (१०.०) | (१०.४) | (१०.३) | (१०.६) |
| **नागपूर** | **जलाशय** | ३५० | ३५९ | ३६० | ३६० | ३६१ | ३६१ | ३६६ | ३७० | ३७२ | ३७६ |
| | **टक्के** | (१७.०) | (१७.१) | (१६.३) | (१६.०) | (१५.८) | (१६.२) | (१५.०) | (१५.०) | (१४.९) | (१५.०) |
| | **प्रकल्पीय साठा** | ३३७० | ३४५१ | ३४४५ | ३४५० | ३४६० | ३४६० | ३८९३ | ३७९० | ३७८० | ३८०० |
| | **टक्के** | (१६.४) | (१६.१) | (१३.३) | (१२.९) | (१२.५) | (१२.८) | (१२.८) | (१२.३) | (१२.२) | (१२.४) |
| | **उपयुक्त साठा** | २९५० | ३०५२ | २९२३ | २९२६ | १९७९ | १३२९ | ३१३३ | १८०० | १८०१ | १३०९ |
| | **टक्के** | (१३.६) | (१३.६) | (११.८) | (१२.४) | (११.९) | (६.४) | (११.८) | (७.३) | (७.१) | (५.२) |

*** स्त्रोत –** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी(२००५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक विभागीय जलाशये, प्रकल्पीय साठा व उपयुक्त साठा यांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ३.६ मध्ये महाराष्ट्रातील विभागीय जलाशय, त्यांचा प्रकल्पीय साठा, उपयुक्त साठा यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

कोकण विभागात २००४–०५ मध्ये जलाशये ११२ (५.४%), २०१३–१४ मध्ये १५९ (६.३%) जलाशये होती. सर्वाधिक जलाशये २०१३–१४ मध्ये असून संशोधन काळात ४७ जलाशयांची वाढ झाल्याचे आढळून आले आहे. २००४–०५ मध्ये प्रकल्पीय साठा ५०५ (२.४%), २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ५.६% असून अभ्यासकाळात प्रकल्पीय साठ्यात १२२४५ दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. २००४–०५ मध्ये उपयुक्त साठा ४८५ (२.३%) , २०१३–१४ मध्ये सर्वाधिक १५३० (६.०%) असून संशोधन काळात उपयुक्त साठ्यामध्ये १०४५ दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. नाशिक विभागात जलाशये २००४–०५ मध्ये ३१८ (१५.३%), २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ४००(१५.९%) जलाशये आहेत. संशोधन काळात ८२ जलाशयांची वाढ झाल्याचे आढळून आले आहे. नाशिक विभागातील जलाशयांचा प्रकल्पीय साठा २००४–०५ मध्ये ३५५० (१७.१%) दशलक्ष घनमीटर, २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ४९०० (१५.९%) असल्याचे आढळून आले आहे. अभ्यासकाळात प्रकल्पीय साठ्यात १३५० दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. नाशिक विभागातील जलाशयांचा उपयुक्त साठा २००४–०५ मध्ये ३४०० (१५.८%) दशलक्ष घनमीटर, २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ३९००(१५.६%) इतका असून संशोधन काळात उपयुक्त साठ्यामध्ये ५०० दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली होती.

पुणे विभागात जलाशय २००४–०५ मध्ये प्रत्येकी ४८५(२३.४%) , २०१३–१४ मध्ये प्रत्येकी ६०५ (२४.१%) सर्वाधिक जलाशये आहेत. अभ्यास काळात जलाशयांची संख्या १२० इतकी वाढली आहे. पुणे विभागातील जलाशयांचा प्रकल्पीय साठा २००४–०५ मध्ये ४८५० (२३.९%) , २०१३–१४ मध्ये १०८२५(३४.९%) इतका असून अभ्यास काळात ५९७५ दशलक्ष घनमीटर इतका प्रकल्पीय साठा वाढलेला दिसून येतो.पुणे विभागातील जलाशयांचा उपयुक्त साठा २००४–०५ मध्ये ७९५०(३६.९%) , २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ९९५० (३९.७%) असून संशोधन काळात उपयुक्त साठ्यात २००० दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

औरंगाबाद विभागात जलाशये २००४–०५ मध्ये ४८०(२३.१%), २०१३–१४ मध्ये ६००(२३.९%) आहेत. संशोधन काळात १२० जलाशयांची वाढ झाल्याचे दिसून आले आहे. औरंगाबाद विभागातील जलाशयांचा प्रकल्पीय साठा २००४–०५ मध्ये ६१००(२३.४%), २०१३–१४ मध्ये ६७७९(२१.९%), प्रकल्पीय साठा असून संशोधन काळात ६७९ दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. औरंगाबाद विभागात उपयुक्त साठा २००४–०५ मध्ये ४९००(२२.८%), २०१३–१४ मध्ये५७७५ (२२.९%) सर्वाधिक असून संशोधन काळात ४३२ जलाशयांची वाढ झाली आहे.

अमरावती विभागातील जलाशय २००४–०५ मध्ये ३२५ (१५.८%), २०१३–१४ मध्ये ३६८(१४.८%) संशोधन काळात ४३ जलाशयांची वाढ झाल्याचे दिसून येते. अमरावती विभागातील जलाशयाचा प्रकल्पीय साठा २००४–०५ मध्ये २३५० (११.३%) २०१३–१४ मध्ये २९०५(९.३%) असून सर्वाधिक २०१३–१४ मध्ये २९८५ (९.३%) प्रकल्पीय साठा होता. अभ्यास काळात प्रकल्पीय साठ्यात ५५५ दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. अमरावती विभागातील जलाशयांचा उपयुक्त साठा २००४–०५ मध्ये १८५० (८.६%), २०१३–१४ मध्ये २६४०(१०.६%) सर्वाधिक असून संशोधन काळात उपयुक्त साठ्यामध्ये ८०० दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे.

नागपूर विभागात २००४–०५ मध्ये जलाशये ३५०(९.७%), २०१३–१४ मध्ये ३७६ (१५.०%) सर्वाधिक असल्याचे आढळून आले आहे. नागपूर विभागातील जलाशयांचा प्रकल्पीय साठा २००४–०५ मध्ये ३३७०(११.३%) , २०१३–१४ मध्ये ३८००(९.३%) सर्वाधिक असून संशोधन काळात प्रकल्पीय साठ्यात ४३० दशलक्ष घनमीटर इतकी वाढ झाली आहे. नागपूर विभागातील जलाशयांचा उपयुक्त साठा २००४–०५ मध्ये २९५० (१३.६%) , २०१३–१४ मध्ये १३०९(१५.२%) इतका असून सर्वाधिक उपयुक्त साठा २००५–०६ मध्ये ३०५२ (१३.६%) इतका आहे. संशोधन काळात उपयुक्त साठ्यात –१६४१ इतकी घट झाल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, संशोधन काळाचा विचार करता महाराष्ट्रातील कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागात जलाशय चे वितरण असमान आहे. तसेच प्रकल्पीय व उपयुक्त साठा ही कमी अधिक आहे. नागपूर विभागात उपयुक्त साठा हा

ऋणात्मक आहे. याचाच अर्थ पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट आहे. सर्वाधिक उपयुक्त साठा पुणे विभागात आहे. त्यानंतर कोकण विभागाचा क्रम आहे. यावरून महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे ज्ञान होते.

**इ) जलसिंचनाचा अनुशेष –**

पाणी हा शेतीसाठी महत्त्वाचा घटक आहे. शेती विकासाचे भवितव्य पाण्यावर अवलंबून आहे. सिंचन क्षमतेत वाढ जल उत्पादकता या शेतीविकासाला चालना देणाऱ्या प्रमुख बाबी आहेत. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी महत्त्वाची साधनसंपत्ती म्हणून पाण्याचा विचार केला जातो. महाराष्ट्रातील निर्माण करण्यात आलेली सिंचन क्षमता, जलसिंचन क्षमतेची टक्केवारी, अनुशेष व वित्तीय क्षमता यांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.७ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ३.७**

**महाराष्ट्रातील विभागनिहाय जलसिंचनाचा अनुशेष**

| **विभाग** | **निर्माण करण्यात आलेली सिंचन क्षमता(लाख हे.)** | **जलसिंचन क्षमतेची टक्केवारी** | **अनुशेष (लाख हेक्टर)** | **वित्तीय क्षमता कोटीमध्ये (रू. ३ लाख प्रति हेक्टर)** |
|---|---|---|---|---|
| कोकण | १.० | ५.५ | २७१.९ | ८१५८ |
| नाशिक | ९.७ | २४.१ | २.५ | ७६ |
| पुणे | १५.४ | ३३.८ | ०.० | ०० |
| औरंगाबाद | १०.५ | १७.७ | २६७.० | ८०१० |
| अमरावती | ४.७ | १३.१ | २८१.६ | ८४४७ |
| नागपूर | ६.१ | २२.७ | ६९.६ | २०८७ |
| एकूण महाराष्ट्र | ४७.४ | २१.० | ८९२.६ | २६७७८ |

***स्त्रोत –** उच्चस्तर समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ५०४

तक्ता क्रमांक ३.७ मध्ये महाराष्ट्रातील विभाग निहाय जलसिंचनाच्या अनुशेषाचे अध्ययन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील एकूण निर्माण करण्यात आलेली सिंचनक्षमता ४७.४ (२१.०%) असून त्यापैकी कोकण सर्वात कमी १.०(५.५%) नाशिक ९.७(२४.१%) पुणे सर्वाधिक १५.४(३३.८%), औरंगाबाद १०.५(१७.७%) अमरावती ४.७(१३.१%), नागपूर ६.१ (२२.७%) इतकी आहे. महाराष्ट्रात निर्माण करण्यात आलेल्या जलसिंचन क्षमतेचे वितरण असमान आहे. महाराष्ट्रात एकूण ८९२.६ लाख हेक्टर क्षेत्राचा अनुशेष असून कोकण २७१.९ लाख हेक्टर ,नाशिक २.५ लाख हेक्टर, औरंगाबाद २६७.० लाख हेक्टर, अमरावती सर्वाधिक २८१.६ लाख हेक्टर, नागपूर ६९.६ लाख हेक्टर इतका अनुशेष असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रातील अनुशेषाची वित्तीय क्षमता रू. ३ लाख प्रति हेक्टर नुसार कोकण ८१५८ रू. कोटी रू, नाशिक ७६ कोटी रू. , औरंगाबाद ८०१० कोटी रू. , अमरावती सर्वाधिक ८४४७ कोटी रू., नागपूर २०८७ कोटी रू. असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात अमरावती, नागपूर आणि कोकण या तीन विभागात असणारा अनुशेष हा सर्वाधिक असून त्यातुलनेत नाशिक, पुणे, औरंगाबाद या विभागात असणारा अनुशेष कमी दिसून येतो. वित्तीय समानतेच्या बाबतीतही अशीच परिस्थिती दिसून येते.

**ई) सहकारी औद्योगिक वसाहती** – .

महाराष्ट्रातील २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील सहकारी औद्योगिक वसाहतीमधील मंजूर कार्यरत वसाहती, उद्योग संख्या व रोजगार निर्मिती या घटकांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.८ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ३.८
## महाराष्ट्रातील सहकारी औद्योगिक वसाहतीचे वर्गीकरण

| वर्ष | तपशील | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | मंजूर | ०१५ | १७ | १७ | १७ | १८ | १८ | १८ | १८ | १८ | १८ |
| | वसाहती | (१२.१) | (१२.२) | (१२.२) | (१२.२) | (१२.७) | (१२.७) | (१२.७) | (१२.७) | (१२.७) | (१२.७) |
| | कार्यरत | १२ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| | वसाहती | (१४.०) | (१६.०) | (१६.०) | (१६.०) | (१५.८) | (१५.८) | (१४.९) | (१४.९) | (१४.९) | (१४.९) |
| | उद्योग | ६९३ | ७२४ | ७२४ | ७२४ | ८१२ | ८१२ | १७२४ | १७५८ | १७५८ | १७५८ |
| | संख्या | (१३.४) | (१३.०) | (१३.०) | (१३.०) | (१३.३) | (७.१) | (२४.६) | (२४.३) | (२४.३) | (२४.३) |
| | रोजगार | १९९५० | २०७७६ | २०७७६ | २०७७६ | २१४०३ | २१४०३ | २५०७३ | २८३८५ | २८३८५ | २८३८५ |
| | | (१८.१) | (१८.२) | (१८.२) | (१८.२) | (१८.३) | (१८.२) | (२०.२) | (२०.७) | (२०.७) | (२०.७) |
| नाशिक | मंजूर | ३२ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |
| | वसाहती | (२८.०) | (२३.६) | (२३.६) | (२३.६) | (२३.२) | (२३.२) | (२३.२) | (२३.२) | (२३.२) | (२३.२) |
| | कार्यरत | २४ | २६ | २६ | २६ | २६ | २६ | २८ | २८ | २८ | २८ |
| | वसाहती | (२८.६) | (२७.७) | (२७.७) | (२७.७) | (२७.३) | (२७.३) | (२७.७) | (२७.७) | (२७.७) | (२७.७) |
| | उद्योग | ११२० | १२७२ | १२७२ | १२७२ | १२७२ | १४५० | १५४५० | १४५५ | १४५५ | १४५५ |
| | संख्या | (२३.८) | (२२.८) | (२२.८) | (२२.८) | (२३.८) | (२३.८) | (२३.८) | (२०.१) | (२०.१) | (२०.१) |
| | रोजगार | ३८१४० | ३८२९४ | ३८२९४ | ३८२९४ | ३८७८५ | ३८८५७ | ३९२९४ | ४२२९५ | ४२२९५ | ४२२९५ |
| | | (३४.८) | (३३.७) | (३३.४) | (३३.४) | (३१.१) | (३३.०) | (३१.७) | (३०.८) | (३०.८) | (३०.८) |
| पुणे | मंजूर | ४२ | ४४ | ४४ | ४४ | ४५ | ४५ | ४५ | ४५ | ४५ | ४५ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वसाहती | (३४.१) | (३१.४) | (३१.४) | (३१.४) | (३०.७) | (३१.६) | (३१.६) | (३१.६) | (३१.६) | (३१.६) |
| | कार्यरत | ३० | ३३ | ३३ | ३३ | ३४ | ३४ | ३८ | ३८ | ३८ | ३८ |
| | वसाहती | (३५.८) | (३५.१) | (३५.१) | (३५.१) | (३५.८) | (३५.८) | (३४.७) | (३४.७) | (३४.७) | (३४.७) |
| | उद्योग | २६८० | २७८३ | २७८३ | २७८३ | २९८५ | ३००० | ३००० | ३१५० | ३१५० | ३१५० |
| | संख्या | (५२.२) | (५०.२) | (५०.२) | (५०.२) | (४९.२) | (४९.२) | (४२.८) | (४३.६) | (४३.६) | (४३.६) |
| | रोजगार | ४६०१० | ४८२०३ | ४८२०३ | ४८२०३ | ४९१०२ | ४९२४० | ५१२५० | ५७१५० | ५७१५० | ५७१५० |
| | | (४१.९) | (४२.०) | (४२.०) | (४२.०) | (४२.०) | (४२.०) | (४१.४) | (४१.६) | (४१.६) | (४१.६) |
| **औरंगाबाद** | मंजूर | २० | २६ | २६ | २६ | २६ | २६ | २६ | २६ | २६ | २६ |
| | वसाहती | (१६.४) | (१८.६) | (१८.६) | (१८.६) | (१८.३) | (१८.३) | (१८.३) | (१८.३) | (१८.३) | (१८.३) |
| | कार्यरत | १० | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ |
| | वसाहती | (१२.०) | (१३.९) | (१३.९) | (१३.९) | (१३.८) | (१३.८) | (१२.९) | (१२.९) | (१२.९) | (१२.९) |
| | उद्योग | ३१७ | ४३० | ४३० | ४३० | ४५५ | ४५५ | ४५५ | ४६२ | ४६२ | ४६२ |
| | संख्या | (६.१) | (७.८) | (७.८) | (७.८) | (७.६) | (७.४) | (६.७) | (६.४) | (६.४) | (६.४) |
| | रोजगार | ४३० | ५७५ | ५७५ | ५७५ | ६१५ | ६४० | ६७० | ६७७ | ६७७ | ६७७ |
| | | (२.९) | (३.५) | (३.५) | (३.५) | (३.६) | (३.६) | (३.६) | (३.८) | (३.८) | (३.८) |
| **अमरावती** | मंजूर | ०७ | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| | वसाहती | (५.८) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) |
| | कार्यरत | ०५ | ०३ | ०३ | ०३ | ०३ | ०३ | ०३ | ०३ | ०३ | ०३ |
| | वसाहती | (६.०) | (३.१) | (३.१) | (३.१) | (३.१) | (३.१) | (२.९) | (२.९) | (२.९) | (२.९) |
| | उद्योग | ६२ | ७४ | ७४ | ७४ | ८२ | ८५ | ८५ | ९२ | ९२ | ९२ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **संख्या** | (१.२) | (१.३) | (१.३) | (१.३) | (१.४) | (१.३) | (१.३) | (१.३) | (१.३) | (१.३) |
| | **रोजगार** | ४३० | ५७५ | ५७५ | ५७५ | ६१५ | ६४० | ६७० | ६७७ | ६७७ | ६७७ |
| | | (०.३) | (०.५) | (०.५) | (०.५) | (०.५) | (०.५) | (०.६) | (०.५) | (०.५) | (०.५) |
| **नागपूर** | **मंजूर** | ०७ | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| | **वसाहती** | (५.८) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) | (७.१) |
| | **कार्यरत** | ०३ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| | **वसाहती** | (३.६) | (४.२) | (४.२) | (४.२) | (४.२) | (४.२) | (३.९) | (३.९) | (३.९) | (३.९) |
| | **उद्योग** | १७० | २६७ | २६७ | २६७ | २८९ | २९५ | २९५ | ३०५ | ३०५ | ३०५ |
| | **संख्या** | (३.३) | (४.९) | (४.९) | (४.९) | (४.८) | (४.९) | (४.२) | (४.३) | (४.३) | (४.३) |
| | **रोजगार** | २११३ | २७१० | २७१० | २७१० | २९१५ | २९७० | ३१२० | ३३१५ | ३३१५ | ३३१५ |
| | | (२.०) | (२.४) | (२.४) | (२.४) | (२.५) | (२.५) | (२.५) | (२.६) | (२.६) | (२.६) |
| **महाराष्ट्र** | **मंजूर** | १२३ | १४० | १४० | १४० | १४२ | १४२ | १४२ | १४२ | १४२ | १४२ |
| | **वसाहती** | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| | **कार्यरत** | ८४ | ९४ | ९४ | ९४ | ९५ | ९५ | १०१ | १०१ | १०१ | १०१ |
| | **वसाहती** | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| | **उद्योग** | ५१४२ | ५५५० | ५५५० | ५५५० | ६०६५ | ६०९७ | ७००९ | ७२२२ | ७२२२ | ७२२२ |
| | **संख्या** | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| | **रोजगार** | १०९७४३ | ११४५१९ | ११४५१९ | ११४५१९ | ११७०३५ | ११७३२२ | १२३८६७ | १३७०८२ | १३७०८२ | १३७०८२ |
| | | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

*** स्त्रोत –** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००४–०५ ते २०१३–१४

टीप – कंसातील अंक स़हकारी औद्योगिक वसाहतांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ३.८ मध्ये महाराष्ट्रातील सहकारी औद्योगिक वसाहतींचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकण विभागात २००४–०५ मध्ये १२.१% वसाहतींना मंजूरी देण्यात आली. २०१३–१४ मध्ये १२.७% वसाहती मंजूर होत्या. केवळ ०३ वसाहतींची वाढ अभ्यास काळात झाली असून याच काळात कार्यरत वसाहती १४.०% वरून १४.९% पर्यंत वाढल्या असून निव्वळ वाढ ०३ इतकी आहे. २००४–०५ मध्ये ६.०% उद्योग संख्या असून २०१३–१४ मध्ये १५.३% संख्यांची नोंद झाली आहे. या काळात १०६५ उद्योग संख्यांची वाढ झाल्याचे दिसून आले आहेत २००४–०५ मध्ये रोजगाराच्या १८.१% संधी निर्माण झाल्या असून २०१३–१४ मध्ये २०.७% रोजगार प्राप्त व्यक्ती आहेत. संशोधन काळात ८४३५ व्यक्तींची वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

नाशिक विभागात २००४–०५ मध्ये मंजूर वसाहती २८.०% कार्यरत वसाहती २८.६% उद्योग संख्या २३.८% , रोजगार निर्मिती ३४.८% झाली असून २०१३–१४ मध्ये मंजूर वसाहती २३.२% कार्यरत वसाहती २७.७% , उद्योग संख्या २०.१% रोजगार निर्मिती ३०.८% झाली आहे. अभ्यास काळात मंजूर वसाहती ०१, कार्यरत वसाहती ०४, उद्योग घटक २३५, रोजगारात ४१५५४ इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

पुणे विभागात २००४–०५ मध्ये मंजूर वसाहती ३४.१% , कार्यरत वसाहती ३५.८% , उद्योग संख्या ५२.२% , रोजगार प्राप्त व्यक्ती ४१.९% इतक्या असून २०१३–१४ मध्ये मंजूर वसाहती ३१.६% कार्यरत वसाहती ३४.७%, उद्योग संख्या ४३.६%, रोजगार निर्मिती ४१.६% अभ्यास काळात या विभागात मंजूर वसाहती ०३, कार्यरत वसाहती ०८, उद्योग घटक ४७० , रोजगारात ११९४० इतकी वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

औरंगाबाद विभागात २००४–०५ मध्ये मंजूर वसाहती १६.४% कार्यरत वसाहती १२.०% , उद्योग संख्या ६.१%, रोजगार वसाहती २.९% असून २०१३–१४ मध्ये मंजूर वसाहती १८.३%, कार्यरत वसाहती १२.९% , उद्योग संख्या ६.४%, रोजगार ३.८% इतका वाढला असून अभ्यासकाळात मंजूर वसाहती ०६, कार्यरत वसाहती ०३, उद्योग घटक १४५, रोजगारात २१६० इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

अमरावती विभागात २००४–०५ मध्ये मंजूर वसाहती ५.८% , कार्यरत ६.०% , उद्योग संख्या १.२% , रोजगार ०.३% व्यक्तींना प्राप्त झाला असून २०१३–१४ मध्ये मंजूर

वसाहती ७.१% कार्यरत वसाहती २.९%, उद्योग संख्या १.३%, रोजगार ०.५% व्यक्तींना प्राप्त झाला आहे. या मंजूर वसाहतींच्या संख्या ०३ ने वाढली मात्र कार्यरत वसाहतीपैकी २ वसाहती बंद कराव्या लागल्या. उद्योग घटक केवळ ३० वाढले असून रोजगारातही २४७ इतकी वाढ झाली आहे.

नागपूर विभागात २००४–०५ मध्ये मंजूर वसाहती ५.८% कार्यरत वसाहती ३.६ % , उद्योग संख्या ३.३%, रोजगार २.०% असून २०१३–१४ मध्ये मंजूर वसाहती ७.१% कार्यरत वसाहती ३.९% उद्योग संख्या ४.३% , रोजगार निर्मिती २.६% इतकी वाढली आहे. अभ्यास काळात मंजूर वसाहती ०३, कार्यरत वसाहती ०१ , उद्योग घटक १३५, रोजगारात १२०२ इतकी वाढ झाल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात कोकण व पुणे विभागात सहकारी औद्योगिक वसाहती, उद्योग संख्या त्यांची रोजगार निर्मिती ही औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक या विभागाच्या तुलनेत अधिक आहे. महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या विभागामध्ये मंजूर वसाहती संख्येत, कार्यरत वसाहती संख्येत, उद्योग संख्येत व रोजगारामध्ये असमतोल निर्माण झालेला दिसून येतो. सहकार क्षेत्र हा महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या विकासाला वरदान ठरलेले आहे. पुणे, कोकण, नाशिक या विभागात सहकारी संस्थांची संख्या वाढली. त्या तुलनेत औरंगाबाद, अमरावती, नागपूर, या जिल्ह्यात सहकारी क्षेत्रात सहकारी संस्थांची वाढ झाली नाही. औरंगाबाद, अमरावती, नागपूर या ठिकाणी सहकारी संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरू करण्यात येणार आहे. औद्योगिक विकासाबाबत मुंबई पुणे हा विभाग विकसित तर इतर विभाग अजूनही मागासलेले असल्यामुळे असमतोल प्रादेशिक विकास झाल्याचे दिसून येते.

**उ) औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गुंतवणूकीतील असमतोल –**

शेती व जलसिंचनाचया अपुऱ्या विकासामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शेतीनंतर उद्योगाला प्राधान्य दिले जाते. मागास भागात सहकारी औद्योगिक वसाहती स्थापन केल्या जातात. या औद्योगिक वसाहतीमध्ये गुंतवणूक केली जाते. महाराष्ट्रातील विविध विभागातील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गुंतवणूकीचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.९ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ३.९

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या गुंतवणूकीतील तफावत (आकडे कोटी रू.)

| वर्ष | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कोकण** | ४८७० | ५०७० | ९२३७ | ६३४६ | १३१९१ | ९६५३ | १७९२९ | २१५६४ | २३४६४ | २४२१० |
| | (२०.८) | (१८.०) | (३५.६) | (२१.९) | (३५.८) | (२४.३) | (३३.३) | (२९.१) | (२६.१) | (२४.९) |
| **नाशिक** | ६९८ | ७९० | १०६० | ३३९३ | २१७६ | १६७७ | २१५१ | १२७३० | १०६८३ | १६२७७ |
| | (२.९) | (२.८) | (४.०) | (११.७) | (६.०) | (४.२) | (४.०) | (१७.२) | (११.९) | (१६.८) |
| **पुणे** | १३००० | १६००६ | ९१३८ | १०७७९ | १२०८९ | १८०९३ | २००३२ | २४६४१ | ३८७७१ | ३९०३१ |
| | (५५.२) | (५६.७) | (३५.२) | (३७४.०) | (३२.८) | (४५.६) | (३७.२) | (३३.३) | (४३.२) | (४०.०) |
| **औरंगाबाद** | ११५० | १३६९ | ११६४ | १२०० | १२५७ | १८१४ | ४३०३ | ५५७३ | ५०९२ | ५९३६ |
| | (४.९) | (४.८) | (४.४) | (४.१) | (३.४) | (४.६) | (७.९) | (७.६) | (५.८) | (६.०) |
| **अमरावती** | ३५० | ४६२ | ३७९ | ३९४ | ४५२ | ७१६ | ७६८ | ७९५ | ३०७९ | ३१२६ |
| | (१.३) | (१.७) | (१.४) | (१.३) | (१.२) | (१.९) | (१.४) | (१.०) | (३.४) | (३.२) |
| **नागपूर** | ३५०० | ४४९८ | ५०१० | ६९६५ | ७६६० | ७७०७ | ८६०९ | ८६२६ | ८६०५ | ८८४९ |
| | (१४.९) | (१६.०) | (१९.४) | (२४.०) | (२०.८) | (१९.४) | (१६.२) | (११.८) | (९.६) | (९.१) |
| **एकूण महाराष्ट्र** | २३५६८ | २८१९५ | २५९८८ | २९०७७ | ३६८२५ | ३९६६० | ५३७९२ | ७३९३१ | ८९६९४ | ९७४२९ |
| | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गुंतवणीकीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ३.९ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गुंतवणूकीचे अध्ययन करण्यात आले आहे.

२००४–०५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राच्या एकूण २३५६८ कोटी रू. गुंतवणूक करण्यात आली आहे. त्यापैकी कोकण विभागात २०.८% , नाशिक २.९% , पुणे ५५.२%, औरंगाबाद ४.९% , अमरावती १.३% , नागपूर १४.९% गुंतवणूक झाल्याचे आढळून आले. सर्वात कमी गुंतवणूक अमरावती, नाशिक, औरंगाबाद या विभागात असून सर्वाधिक गुंतवणूक पुणे ५५.२% तर कोकणात २०.८% असल्याचे दिसून आले असून यावरून गुंतवणूकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.

२०१३–१४ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील एकूण ९७४२९ कोटी रू. गुंतवणूकीपैकी कोकण २४.९% नाशिक १६.८% पुणे ४०.०%, औरंगाबाद ६.०% , अमरावती ३.२% , नागपूर ९.१% गुंतवणूक झाल्याचे दिसून आले आहे. यावर्षी सर्वाधिक गुंतवणूक पुणे, कोकण विभागात तर सर्वात कमी गुंतवणूक अमरावती विभागात झाली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील गुंतवणूक ही सर्वच क्षेत्रात सारखी नाही. पुणे, कोकण विभागात ६५% पेक्षा अधिक गुंतवणूक झाली असून अमरावती, औरंगाबाद या विभागात केवळ १०% पर्यंत गुंतवणूक आहे. नागपूर व नाशिक विभागात २० ते २५% या विभागात प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यास मदत झाली. कोकणातील पनवेल, मुंबई, ठाणे , पुणे व जवळचा परिसर येथे औद्योगिक वसाहतींचे केंद्रीकरण झाले आहे. इतर प्रदेश अजूनही मागासलेला दिसून येतो. यामुळेच प्रादेशिक असमतोलात वाढ झाली आहे.

**ऊ)महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील अमसतोल –**

महाराष्ट्रातील विविध विभागातील शैक्षणिक प्रगतीचे अध्ययन करण्यात आले आहे. शिक्षण निर्देशांक विद्यार्थी–शिक्षक प्रमाण, विद्यार्थी खोल्यांचे प्रमाण, महिला साक्षरता यांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ३.१० मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ३.१०

## विभागीय शिक्षण विषयक निर्देशांक व घटक

| विभाग | शिक्षण निर्देशांक | विद्यार्थी शिक्षक प्रमाण % | विद्यार्थी वर्ग खोल्यांचे प्रमाण % | महिला साक्षरता प्रमाण(२०११ च्या जनगणनेनुसार) |
|---|---|---|---|---|
| कोकण | २९९.१ | २८.५ | ३०.६ | ७९.१ |
| नाशिक | २६३.७ | ३१.८ | ३३.८ | ६७.१ |
| पुणे | ३०४.७ | २७.९ | २७.९ | ७५.० |
| औरंगाबाद | २७९.३ | २९.६ | ३०.८ | ६७.७ |
| अमरावती | २९२.८ | २९.९ | ३०.१ | ७६.६ |
| नागपूर | ३२९.४ | २४.६ | २४.७ | ७३.५ |

*** स्त्रोत –** उच्चस्तर समिती अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ३८४ ते ३८५

तक्ता क्रमांक ३.१०मध्ये विभागीय व प्रादेशिक शिक्षण निर्देशांक व घटकांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील विभागीय शिक्षण निर्देशांक हा कोकण २९९.१ , नाशिक २६३.७, पुणे ३०४.७, औरंगाबाद २७९.३, अमरावती २९२.८, नागपूर ३२९.४ इतका आहे. विद्यार्थी शिक्षक प्रमाण कोकण २८.५, नाशिक ३१.८, पुणे २७.९ , औरंगाबाद २९.६, अमरावती २९.९ , नागपूर २४.६, इतके आहे.

विद्यार्थी वर्ग खोल्यांचे प्रमाण विभागीय स्तरानुसार कोकण ३०.६, नाशिक ३३.८, पुणे २७.९, औरंगाबाद ३०.८, अमरावती ३०.१, नागपूर २४.७, इतके आहे.२०११च्या जनगणनेनुसार महिला साक्षरता प्रमाण कोकण विभागात ७९.१, नाशिक ६७.१, पुणे ७५.०, औरंगाबाद ६७.७, अमरावती ७६.६, नागपूर ७३.५ इतकी आहे.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या बाबतीत विभागवार विषमता देखील आढळून येते. महाराष्ट्रातील विभागीय शिक्षणविषयक निर्देशांकाच्या आधारे केलेल्या वर्गीकरणातून असे दिसून येते की, पुणे विभागाचा शिक्षण निर्देशांक सर्वाधिक सर्वात कमी नाशिक विभागाचा दिसून येतो. विद्यार्थी शिक्षण प्रमाण व विद्यार्थी खोल्याचे प्रमाण महाराष्ट्राशी तुलना करता सर्वच विभागात

महाराष्ट्राच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाण दिसून आले आहे. शिक्षणाचा प्रसार तालुका पातळीपर्यंत पोहोचला असला तरी तो विषम प्रमाणात आहे. मुंबई व पश्चिम महाराष्ट्र शैक्षणिक दृष्ट्या प्रगत आहे. विदर्भ मराठवाडा मागासलेला आहे. महिला साक्षरतेच्या बाबतीत सर्वाधिक साक्षरता कोकण विभागात आहे. तर सर्वात अल्प साक्षरता नाशिक विभागाची आहे. मराठवाड्यातील ८ पैकी ५ जिल्ह्यांमध्ये ५०% स्त्रिया साक्षर आहेत तर कोकणातील ४ पैकी ३ जिल्ह्यांत ७० टक्के पेक्षा जास्त स्त्रिया साक्षर आहेत. यातूनच शिक्षणातील प्रादेशिक असमतोल स्पष्ट होतो.

**ए)पायाभूत सुविधा व महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल –**

प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास हा बहुतांशी पायाभूत सोयीसुविधांवर निर्भर असतो. महाराष्ट्र राज्याचा विकासात रस्ते ही सुविधा महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातील जिल्ह्यांना, तालुक्यांना ,गावाना जोडण्याचे कार्य प्रमुख जिल्हा रस्ते करीत असतात. यामुळे राज्यातील बाजारपेठांना जोडण्याचे काम होते आणि राज्याच्या आर्थिक विकासाला मदत होते. महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाने साध्य केलेली रस्ते निर्मिती तक्ता क्रमांक ३.११ मध्ये दर्शविली आहे. रस्त्यांचे विविध प्रकार विभागीय स्तरावर दर्शविले आहेत.

## तक्ता क्रमांक ३.११

## सार्वजनिक बांधकाम विभागाने साध्य केलेली रस्ते निर्मिती

| विभाग | ७.० मीटर रूंदीचे रस्ते | ५.५ मीटर रूंदीचे रस्ते | ३.७५ मीटर रूंदीचे रस्ते | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कोकण | २०३२ | २५३२ | २०६२० | ९७५ | २६१५९ |
| | (१२.३) | (११.०) | (११.०) | (५.९) | (१०.८) |
| नाशिक | ३३०५ | ४५९१ | ३६९१७ | ३२८१ | ४८०९४ |
| | (२०.१) | (१९.९) | (१९.७) | (१९.८) | (१९.८) |
| पुणे | ३२६४ | ५३४० | ४२९७९ | २४९२ | ५४०७५ |
| | (२०.०) | (२३.१) | (२२.) | (१५.०) | (२२.१) |
| औरंगाबाद | ३५७८ | ४७८३ | ४०५०२ | ४९२९ | ५३७९२ |
| | (२१.९) | (२०.७) | (२१.६) | (२९.७) | (२२.०) |
| नागपूर | २१३१ | २८७३ | २७६३८ | ४३४८ | ३६९९० |
| | (१३.०) | (१२.४) | (१४.७) | (२६.१) | (१५.२) |
| अमरावती | २०८७ | २९९० | १९१९८ | ५८७ | २४८६२ |
| | (१२.७) | (१२.९) | (१०.२) | (३.५) | (१०.१) |
| एकूण महाराष्ट्र | १६३९७ | २३१०९ | १८७८५४ | १६६१२ | २४३९७२ |
| | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत –**महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३–१४पृष्ठ क्र. १५९

टीप – कंसातील अंक रस्ते निर्मितीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ३.११ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने साध्य केलेल्या रस्ते निर्मितीचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात ७.० मीटर रूंदीचे रस्ते साध्य केलेली निर्मिती एकूण १६३९७ कि.मी. असून त्यापैकी कोकण २०३२ कि.मी (१२.३%), नाशिक ३३०५ कि.मी (२०.१)% पुणे

३२६४ कि.मी (२०.०%), औरंगाबाद ३५७८ कि.मी( २१.९%) , नागपूर २१३१ कि.मी (१३.०%), अमरावती २०८७ कि.मी (१२.७%), इतकी आहे.

५.५ मीटर रूंदीचे साध्य केलेले रस्ते निर्मिती २३१०९ किमी असून त्यापैकी कोकण २५३२ कि.मी (११.०%) , नाशिक ४५९१ कि.मी (१९.९%), पुणे ५३४० कि.मी (२३.१%), औरंगाबाद ४७८३ कि.मी (२०.७%), नागपूर २८७३ कि.मी (१२.४%), अमरावती २९९० कि.मी (१२.९%) , इतकी आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने ३.७५ मीटर रूंदीचे साध्य केलेली रस्ते निर्मिती १८७८५४ किमी. असून त्यापैकी कोकण विभागात २०६२० कि.मी (११.०)% , नाशिक ३६९१७ कि.मी (१९.७%) , पुणे ४२९७९ कि.मी (२२.८%), औरंगाबाद ४५५०२ कि.मी (२१.६%) , नागपूर २७६३८ कि.मी (१४.७%), अमरावती १९१९८ कि.मी (१०.२%), झालेली आहे.

इतर स्वरूपाचे रस्ते निर्मिती १६६१२ किमी झाली असून त्यापैकी कोकण १६३९७ कि.मी ५.९%, नाशिक ३२८१ (१९.८%), पुणे २४९२(१५.०%), औरंगाबाद ४९२९(२९.७%), नागपूर २६.१%, अमरावती ३.५% , या विभागात रस्ते निर्मिती करण्यात आली.

रस्ते बांधणीला चालना मिळावी म्हणून १९९६ मध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते निर्मितीमध्ये विभागीय असमतोल दिसून येतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने साध्य केलेली रस्ते निर्मिती कोकण विभागात १०.८%, नाशिक १९.८%, सर्वाधिक पुणे २२.१%, औरंगाबाद २२.०%, सर्वात कमी नागपूर १५.२%, अमरावती १०.१% आहे. महाराष्ट्रातील सर्व विभागातील रस्त्यांचे जाळे विकसित झाल्यानंतर उत्पादनात वाढ होऊन राज्यातील बाजारपेठा जोडल्या जातील त्यामुळे रोजगार वाढेल. दरडोई उत्पन्नात वाढ होईल. यातूनच प्रादेशिक असमतोल दूर करण्यास मदत होईल.

## ऐ) वैद्यकीय सुविधांतील असमतोल –

सार्वजनिक आरोग्य सेवा म्हणजे शासनाने जनतेसाठी रोगनिवारण आरोग्य सुधारणा व आर्युमानात वाढ करण्याकरिता केलेल्या दर्जेदार कार्यक्षम, सहजगत्या उपलब्ध स्वस्त व व्यापक अशा संघटीत उपाययोजना होय. जनतेच्या आरोग्याचे रक्षण, जतन व सुधारणा करणे हे देखील सार्वजनिक आरोग्य सेवेचे उद्दिष्ट असते. महाराष्ट्रातील प्रादेशिक वैद्यकिय सुविधांमध्ये दर लाख लोकसंख्येमागे खाटांचे प्रमाण, परिचारिका, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उपलब्धता व आवश्यकता यांचे तौलनिक विवेचन तक्ता क्रमांक ३.१२ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ३.१२**

**प्रादेशिक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता**

| प्रदेश | दरलाख लोकसंख्येमागे खाटांचे प्रमाण | परिचारिका | प्राथमिक आरोग्य केंद्र | | तूट |
|---|---|---|---|---|---|
| | | | उपलब्धता | आवश्यकता | |
| मराठवाडा | १३३ | ४३९३ | ३९० | ४४३ | ७३ |
| विदर्भ | १५६ | ८६५६ | ५२७ | ५४४ | ४३ |
| उर्वरित महाराष्ट्र | २०७ | १४०२२ | ११४६ | १२०७ | १३६ |
| महाराष्ट्र | १८४ | २७०७१ | २०६३ | २२१४ | २५२ |

*** स्त्रोत –** उच्च स्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पान. ५३९ ते ५४२

तक्ता क्रमांक ३.१२ मध्ये प्रादेशिक वैद्यकीय सुविधांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. दर लाख लोकसंख्येमागे खाटांचे प्रमाण महाराष्ट्रात १८४ असून मराठवाडा १३३, विदर्भ १५६ आणि उर्वरित महाराष्ट्रात २०७ इतके आहे. याबाबतीत मराठवाडा व विदर्भ मागासलेला दिसून येतो. मराठवाडा विभागात रूग्णालयातील परिचारिका ४३९३ , विदर्भ ८६५६, उर्वरित महाराष्ट्रात १४०२२ इतक्या असून याही बाबतीत मराठवाडा व विदर्भात प्रमाण कमी आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राची मराठवाड्यासाठी ४४३ केंद्राची आवश्यकता आहे. तर ३९० उपलब्ध आहेत. ७३ केंद्राची कमतरता किंवा तूट आहे. विदर्भात ५४४ प्राथमिक आरोग्य

केंद्राची आवश्यकता असून ५२७ केंद्र उपलब्ध आहेत. ४३ केंद्राची कमतरता किंवा तूट आहे. उर्वरित महाराष्ट्रात १२०७ केंद्राची आवश्यकता असून केवळ ११४६ केंद्रे उपलब्ध आहेत. १३६ केंद्राची तूट जाणवते. महाराष्ट्रात एकूण २२१४ केंद्राची आवश्यकता असून २०६३ केंद्रे उपलब्ध आहेत. तर २५२ केंद्राची तुट आहे. सार्वजनिक आरोग्य देखभाल सेवा देण्याच्या दृष्टीने शासनाने खर्च करणे आवश्यक आहे. दांडेकर समितीच्या अहवालानुसार आरोग्य विषयक सेवांच्या बाबतीत कोकण, विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष अनुक्रमे ६.५. कोटी रू, २७ कोटी रू., ४७ कोटी रूपयांचा आहे. कोकणमधील अनुशेष कमी आहे. याचाच अर्थ आरोग्य सेवेचे वितरण असमान आहे. यामुळेच प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

## ३.९ मूल्यमापन

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल या तिसऱ्या प्रकरणात १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्त्वात आल्यानंतर आर्थिक–सामाजिक विकासात निर्माण झालेल्या असमतोलाचे अध्ययन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सहा प्रशासकीय विभागाचा विचार करता या विभागातील जिल्हे व तालुक्यांमध्ये प्रादेशिक असमतोल आहे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे विभागीय, कृषी, औद्योगिक, तांत्रिक विकासातील असमतोल असल्याचे पहावयाला मिळते. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी अनेक समिती नेमल्या गेल्या. या अभ्यास समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे प्रादेशिक असमतोल दूर झाला नाही तर तो वाढतच गेला आहे. जिल्ह्यातील उपलब्ध नैसर्गिक व इतर साधनसंपत्ती क्षमतेचा पूर्ण विकास करून, आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. जिल्ह्या जिल्ह्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यास ही मंडळी कार्य करतील.

महाराष्ट्रात शेती क्षेत्रात ही असमतोल आहे. पुणे विभाग वगळता इतर विभागात शेती क्षेत्र पिछाडीवर आहे. कोकण व विदर्भही शेती उत्पन्नात खूपच मागे आहे. महाराष्ट्रात सर्वच विभागात जलाशय, प्रकल्पीय व उपयुक्त साठ्यात तफावत आहे. कोकण, नागपूर, अमरावती या विभागात सिंचनाची बिकट परिस्थिती आहे. कोकणातील पावसाचे पाणी साठविण्यासाठी तलाव व धरणे बांधणे गजेचे आहे. राज्यातील जलसिंचन अनुशेष वाटपामध्येही तफावत आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व विभागात सहकार क्षेत्राचा विकास असमान पद्धतीने झाला आहे. मात्र या सहकार क्षेत्रात विकास करण्याची संधी आहे. त्यातून असमतोल दूर करण्यास मदत होईल. राज्यातील औद्योगिक क्षेत्रील गुंतवणूकीत असमतोल आहे. औरंगाबाद, अमरावती या विभागात गुंतवणूक फारच कमी आहे. या विभागात गुंतवणूक वाढल्यानंतर तेथील असमतोल दूर करता येईल. शैक्षणिक क्षेत्रातही सर्व विभागात असमतोल आहे. राज्यात ज्या विभागात साक्षरता कमी आहे. त्या विभागात कौशल्य, कुशल लोकांची कमतरता जाणवते. पायाभूत सोयी सुविधांमधील रस्ते विकासात राज्यात तफावत आहे. ग्रामीण भागातील रस्ते जोडणीने त्या विभागातील स्थानिक उत्पादनाला चालना मिळेल. बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे उत्पादन वाढविण्यासाठी लोकांना प्रेरणा मिळेल.

शिक्षणाचा प्रसार तालुका पातळीपर्यंत पोहोचला असला तरी तो विषम प्रमाणात आहे. मुंबई, पुणे, नागपूर, शैक्षणिकदृष्टया प्रगत आहे. तर कोकण अमरावती हे कमी प्रगत विभाग आहेत. वैद्यकीय सोयी ह्या मानवी जीवनात अनन्य महत्त्वाचे स्थान आहे. तरीही वैद्यकीय सोयीसुविधांमध्ये महाराष्ट्रात तफावत आहे. शेती, उद्योग, विविध व्यवसाय, शिक्षण–आरोग्य–गुंतवणूक, लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, सिंचन या घटकांत विभागीय व प्रादेशिक स्तरावर असमतोल असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारने अनेक अभ्यासगट नेमलेले असले तरी अजूनही असमतोल कमी झाला नाही असे दिसून आले आहे. महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल आहे तो दूर करणे शक्य आहे. त्यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे.

# संदर्भ सूची


१. बिराजदार माधव (जून २०१२) , 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. १४–१५

२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१३–१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई पृष्ठ क्र. १ व २

३. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. १६

४. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. ३०२ ते ३१६

५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२००४–०५ ते २०१३–१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई

६. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३), पृष्ठ क्र. ८६ व ८७

७. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३), पृष्ठ क्र. ९४

८. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२००४–०५ ते २०१३–१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई

९. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ५०४

१०. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ५०४

११. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पृष्ठ क्र. ३८४ ते ३८५

१२. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२००४–०५ ते २०१३–१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. १५९

१३. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२००४–०५ ते २०१३–१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. १३

१४. उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३), पृष्ठ क्र. ५३९ ते ५४२

# प्रकरण चौथे

# कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक असमतोल

## ४.१ प्रस्तावना –

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेकडील ७२० कि.मी. लांबीचा व ४५ ते ६० किमी रूंदीचा चिंचोळा भाग (अरबी समुद्र आणि सह्याद्री पर्वत यांच्यामध्ये चिंचोळा प्रदेश) म्हणजे कोकण होय. उत्तरेला गुजरात व दक्षिणेला गोवा राज्यांच्या सीमा. पूर्वेला सह्याद्रीच्या पर्वत रांगा तर पश्चिमेला अरबी समुद्र असा हा २९.७९ लक्ष हेक्टरचा भूभाग होय. कोकणमध्ये मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे सहा जिल्हे असून अलिकडे पालघर जिल्ह्याची निर्मिती ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली. कोकणातील पालघर, ठाणे, रायगड जास्त पावसाचे बिगर जांभ्या जमिनीच्या विभागात मोडतात. तर रत्नागिरी, सिंधुदुर्ग जास्त पावसाच्या परंतु जांभ्या जमिनीच्या विभागात येतात. कोकणातील सर्व नद्यांचा उगम पूर्वेला सह्याद्री पर्वतात होतो व पश्चिमेला अरबी समुद्राला त्या मिळतात.

समुद्रकिनारपट्टीवरील कोकणात मुसळधार पाऊस पडतो. कोकणमध्ये दरवर्षी २५०० ते ३००० मि.मी पाऊस जून ते सप्टेंबर या काळात पडतो. पावसाळ्यानंतरचा काळा बहुतांशी कोरडाच असल्याने शेतीसाठी विहिरी व धरणांच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागते. समुद्र किनाऱ्यापासून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते. तर दक्षिणेकडून उत्तरेकडे पावसाचे प्रमाण कमी होत जाते. कोकण विभागात आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रादेशिक असमतोल आहे. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्याच्या आर्थिक–सामाजिक रचनेच्या वैशिष्ट्यांमध्ये तफावत आढळते. दरडोई उत्पन्न, रोजगार, आद्यौगिकीकरण, गुंतवणूक, पायाभूत सुविधा या आर्थिक बाबी ठाणे जिल्ह्यामध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत. रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अल्प प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. लोकसंख्या वयोगटरचना, स्त्री–पुरूष साक्षरता, शिक्षण, आरोग्य या सामाजिक घटकांबाबतही असमतोल दिसून येतो. [१]

## ४.२ कोकण विभागाची पार्श्वभूमी –

निसर्गाच्या कृपेने समृद्ध असा कोकण प्रदेश आहे. कोकणचे हवामानानुसार उत्तर व दक्षिण असे दोन विभाग पडतात. ठाणे व रायगड जिल्हा मिळून उत्तर कोकणपट्टीत आहेत. दक्षिण कोकणपट्टीत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे मोडतात. उत्तर कोकण हे आर्थिकदृष्ट्या अतिमागास आहे असे म्हणता येणार नाही. परंतु दक्षिण कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे महाराष्ट्र राज्यातील अतिमागास विभागात मोडतात. यावरून लक्षात येते की, कोकणात असमतोल आहे. संशोधनासाठी ठाणे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

### ४.२.१ ठाणे जिल्हा :

महाराष्ट्र राज्यातील काही औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्ह्यांपैकी ठाणे हा एक कोकण विभागातील उत्तरेकडचा जिल्हा असून जनगणना २०११ नुसार लोकसंख्येच्या दृष्टीने त्याचा राज्यात तिसरा क्रमांक आहे. जिल्ह्यातील ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, या तालुक्याचे क्षेत्र औद्योगिकदृष्ट्या विकसित असून मुंबई शहराच्या आधुनिक संस्कृतीच्या प्रभावाखाली आहे. शहापूर तालुक्यांचा प्रदेश डोंगराळ असून ग्रामीण भाग आदिवासी वस्तीने व्यापलेला आहे.

पश्चिम किनारपट्टीलगत सिंचनाकरिता विहिरींच्या पाण्याची उपलब्धता असल्यामुळे भाजीपाला, फुले, नारळ, केळी, चिकू इत्यादी नगदी पिकेही घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असला तरी वाढते औद्योगिकीकरण, शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजना व राष्ट्रीय रोजगार कार्यक्रम यामुळे रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्याचा राज्यामध्ये तिसरा क्रमांक असून जिल्ह्याच्या निम्म्यापेक्षा जास्त भागाचा आर्थिक व सामाजिक विकास हा औद्योगिकीकरणामुळे झाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक वसाहतींची संख्या ८ आहे. मुंबईसारखी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ व सोयीचे बंदर दळणवळणाच्या जलद सोयी आणि शासनामार्फत पुरविल्याजाणाऱ्या सुविधा यामुळे जिल्ह्यामध्ये उद्योगधंद्यांची भरभराट झालेली आहे. विशेषत: जिल्ह्याच्या दक्षिण व पश्चिम भागामध्ये उद्योगाचे प्रामुख्याने

रसायने व औषधे यांचे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. याशिवाय प्लॅस्टिकच्या वस्तू, लोखंडी साहित्य आणि पॉवरलूम कापड यांची निर्मिती करणारे मध्यम व छोटे उद्योग मोठ्या प्रमाणात चालू आहेत. महाराष्ट्रामध्ये इचलकरंजी नंतर भिवंडी येथील यंत्रमागावर कापड विणण्याचा व्यवसाय प्रसिद्ध आहे. जिल्ह्यात केंद्रशासन अंगिकृत दारूगोळा व शस्त्र निर्मितीचा कारखाना अंबरनाथ येथे आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कुशल व अकुशल कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यामध्ये खनिज उत्पादन फारसे नसले तरी बांधकामासाठी रेती काढण्याचा व्यवसाय मुंब्रा, ठाणे, घोडबंदर, पालघर व वसई या परिसरात मोठ्या प्रमाणावर चालतो.

- **भौगोलिक स्थान**

ठाणे जिल्हा कोकणचा उत्तर भाग असून तो पूर्वेकडे असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगा व पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या किनारपट्टीच्या दरम्यान पसरला आहे. जिल्ह्याचे क्षेत्र ४२१४ चौ.कि.मी असून ते राज्याचा १.३७ टक्के आहे. ठाणे जिल्ह्याला २७ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. जिल्ह्याचे भौगोलिक स्थान ७२.४५ आणि ७३.४८ पूर्व रेखांश व १८.४२ आणि २०.२० उत्तर अक्षांश मध्ये येते.

- **प्रशासकीय विभाग**

प्रशासकीय नियंत्रण व दैनंदिन कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यातील ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून १ ऑगस्ट २०१४ रोजी पालघर जिल्हा निर्माण केला आहे. २०१४ पासून ठाणे जिल्ह्यात प्रशासकीय नियंत्रण व दैनंदिन कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यात ७ तालुके असून प्रशासकीय कामे सुलभ होण्याच्या दृष्टीने एकूण ४ महसूल उपविभाग करण्यात आलेले आहेत. २०११ च्या जनगणने प्रमाणे जिल्ह्यामध्ये एकूण ८०७ खेडी असून तालुका निहाय खेड्यांची संख्या ठाणे १४ गावे, कल्याण ८५ गावे, भिवंडी २१० गावे, उल्हासनगर १ गावे, अंबरनाथ ७१ गावे, मुरबाड २०६ गावे, शहापूर २२१ गावे आहेत. १३ वस्ती नसलेली गावे आहेत. जिल्ह्यामध्ये अंबरनाथ येथे २ नगरपालिका आहेत. इतर तालुक्यांमध्ये ४४ गट व ८२ स्वतंत्र अशा ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय ठाणे येथे आहे. ठाणे शहर मुंबई–आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असून मध्ये रेल्वेचे एक मोठे स्थानक आहे व ते मुंबईपासून ३४ कि.मी. अंतरावर आहे.

- **जिल्ह्याच्या सीमा**

जिल्ह्याचा आकार त्रिकोणी स्वरूपाचा असून पूर्वेला पूणे व अहमदनगर जिल्हे आहेत. उत्तर पूर्वेला नाशिक जिल्हा तर उत्तरेला पालघर जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र पसरलेला असून मुंबई उपनगरी व रायगड जिल्हे दक्षिणेला आहेत.

- **भुपृष्ठ रचना**

जमिनीच्या प्रकारानुसार भुपृष्ठाची प्रामुख्याने तीन भागात विभागणी झालेली दिसून येते.
अ) काळी व वाळू मिश्रीत जमीन ठाणे या तालुक्यात आढळून येते. ही जमीन सुपीक असून ती मुख्यत्त्वे भाताचे पीक, भाजीपाला व फळबागा यांच्या लागवडीस योग्य आहे.
क) तपकिरी लालसर जमीन ही बहुतेक किनारपट्टीच्या व सह्याद्री घाटमाथ्याच्या उतरणीच्या दऱ्याखोऱ्यातील पट्ट्यात आढळून येते. मुख्यत: भिवंडी, कल्याण व शहापूर तालुक्यात अशी जमीन असून ती भात लागवडीस उपयुक्त आहे.

- **पर्यटन**

महाराष्ट्र शासनाने ठाणे हा जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. ठाणे जिल्ह्यात पर्यटकांना आकर्षित करू शकतील अशी अनेक रम्य प्रेक्षणीय स्थळे आहेत. अर्नाळा, वसई, भूपतगड हे ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले आहेत. अंबरनाथ येथे ११ व्या शतकातील भगवान शंकराचे अतिभव्य असे हेमांडपंथी बांधणीने उभारलेले सोमनाथ मंदिर प्रसिद्ध आहे. बोर्डी येथील रूपेरी वाळूंचा किनारा, उदवाडा हे ठिकाण पारशी समाजाचे पवित्र स्थान ही पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहेत. ठाणे चिक्कूंच्या बागांसाठी प्रसिद्ध आहे. अकलोली येथे गरम पाण्याचे नैसर्गिक झरे आहेत. वज्रेश्वरीतील देवीचे मंदिरही प्रसिद्ध आहे. शहापूर तालुक्यातील तानसा तलाव व तलावाच्या परिसरातच अभयारण्य आहे. या सर्व प्रेक्षणीय स्थळांना असंख्य पर्यटक भेटी देतात.

### ४.२.२ रायगड जिल्हा

उत्तर कोकणातील रायगड जिल्हा निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. १९०४ मध्ये स्थापन झालेली चुंबकीय वेदशाळा हे या जिल्ह्याचे वैभव आहे. अलिबाग शहर जिल्ह्याचे

मुख्यालय ठिकाण असून उरण, मुरूड, श्रीवर्धन हे तालुके समुद्रकिनारी वसलेले आहेत. मध्यभागातील जमीनीचा पट्टा हा साधारणपणे सपाट व सुपीक आहे. पूर्व व ईशान्येकडील भाग सह्याद्री पर्वताच्या रांगांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या अतीपूर्वकडील भाग डोंगर उतरणीचा असल्यामुळे तेथे शेती करता येत नाही. त्याचप्रमाणे येथे जंगल प्रमाण फारशी नाहीत त्यामुळे या भागात राहणाऱ्या लोकांचे जीवन अत्यंत कष्टाचे आहे. मैदानी भाग वगळल्यास जिल्ह्याचा बराच भाग डोंगर व उंचसखल पर्वतरांगानी व्यापलेला आहे. जिल्हयात भिवपुरी, खोपोली, भिरा हे तीन जलविद्युत केंद्रे आहेत. जिल्ह्यातील नद्या पावसाळ्यात जोरात वाहतात. परंतु उन्हाळ्यात कोरड्या पडतात. भात, नाचणी, वरी, कडधान्य, भाजीपाला ही पिके नारळ, सुपारी यासारख्या कठीण कवचांच्या फळांचे उत्पादन थोड्या प्रमाणात घेतले जाते.

औद्योगिक क्षेत्रात विकसित असलेला ठाणे जिल्ह्यालगतच असल्याने ठाणे जिल्ह्याचा विकास झाला नाही. जिल्ह्यामध्ये रसायने औषधोद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. रायगड जिल्ह्याला लाभलेल्या समुद्रकिनाऱ्यामुळे मच्छ व्यवसाय हा तेथील प्रमुख व्यवसाय आहे. तेथे मत्स्यव्यवसाय क्षेत्र रोजगार निर्मितीस पूरक आहे. मत्स्य व्यवसायामुळे कोट्यावधी रूपयांचे परकीय चलन मिळते.

- **भौगोलिक स्थान**

जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१५२ चौ.किमी असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.२७ टक्के इतके आहे. रायगड जिल्ह्याला २४० कि.मी. समुद्रकिनारा लाभला आहे. रायगड जिल्हा १७.५१ अंश उत्तर ते १९.८० अंश उत्तर अक्षांक्ष आणि ७२.५१ अंश पूर्व ते ७३.४० पूर्व रेखांश यामध्ये पसरलेला आहे.

- **प्रशासकीय विभाग**

रायगड जिल्हा कोकण महसूल विभागात येत असून प्रशासकीय कामाच्या दृष्टीने अलिबाग, पनवेल, महाड व माणगाव असे चार उपविभाग आहेत. जिल्ह्यात एकूण पंधरा तालुके आहेत. सदर १५ तालुक्यांची विभागवार वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

१) अलिबाग – अलिबाग, पेठ, मुरूड.

२) पनवेल – पनवेल, उरण, कर्जत, खालापूर

३) महाड – महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन

४) माणगाव – माणगाव, रोहा, तळा, सुधागड

जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्रफळ महाड तालुक्याचे तर सर्वात कमी क्षेत्रफळाचा उरण तालुका आहे. जिल्ह्यात एकूण १९१९ गावे असून त्यापैकी ६० गावे ओसाड आहेत. अलिबाग तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २१२ गावे आहेत तर उरण व तळा तालुक्यात सर्वात कमी म्हणजेच प्रत्येकी ५९ गावे आहेत. जिल्ह्यात एकूण २६ गणनाशहरे असून ११ शहरांचे प्रशासन नगरपालिका चालवितात.

- **जिल्ह्याची सीमा**

जिल्ह्याची पूर्वेकडील सीमा सह्याद्री पर्वताच्या लहान मोठ्या रांगांनी वेढलेली असून त्याला लागून पुणे जिल्ह्याची हद्द सुरू होते. जिल्ह्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र असून दक्षिणेला असलेल्या सावित्री नदीने रत्नागिरी व रायगड जिल्ह्याची दक्षिण सीमा निश्चित केली आहे. आग्नेय दिशेला सातारा, उत्तरेला ठाणे तर वायव्येला मुंबई शहर हे जिल्हे आहेत.

- **भृपृष्ठ रचना**

भौगोलिकदृष्ट्या रायगड जिल्हा साधारणपणे तीन चिंचोळ्या पट्ट्यात विभागला गेला आहे. अ) समुद्र किनाऱ्यालगतचा पट्टा ब) सुपिक व सपाट जमिनीचा मध्य भागातील पट्टा
क) पूर्वेकडील सह्याद्रीचा डोंगराळ भाग या प्रमाणे विभागणी झाली आहे.

- **समुद्र किनारा**

जिल्ह्याच्या सुमारे २४० किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर बागमांडला व दिघी (तालुका) श्रीवर्धन, रेवदंडा, रेवस (तालुका अलिबाग) राजपूरी (तालुका मुरूड) इत्यादी स्थानिक महत्त्वाची बंदरे आहेत.मुंबई बंदरासमोरच या जिल्ह्यातील उरण तालुक्यातील न्हावा शेवा(जे.एन.पी.टी.) हे एक नवीन अत्याधुनिक बंदर बांधले आहे. या बंदरामुळे मुळच्या मुंबई बंदरावरील ताण कमी झाला आहे. त्याचप्रमाणे मालवाहतुकीमध्येही नियमितता व सुरळीतपणा आला आहे.

- **पर्यटन**

रायगड जिल्ह्यातील उज्ज्वल ऐतिहासिक स्मृती स्थानाप्रमाणे सांस्कृतिक चळवळीची केंद्रे व जिल्ह्यात ७५ पर्यटन स्थळे आजही लक्ष वेधून घेतात.या जिल्ह्यातील उज्ज्वल

ऐतिहासिक स्फूर्ती स्थानाप्रमाणे सांस्कृतिक चळवळीची केंद्रे व पर्यटन स्थळे आजही लक्ष वेधून घेतता. पूर्वेकडे सह्याद्री डोंगरांची अभेद्य व अजिंक्य अशी तटबंदी तर पश्चिमेला अथांग सागर आहे. तसेच मराठी आरमार प्रमुख सरदार कान्होजी आंग्रे यांची ही कर्मभूमी आहे. शिलाहार राजाची प्राचीन राजधानी चंपावती नगरी ही याच जिल्ह्यातील चौल तालुका अलिबाग या नावाने प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील खांदेरी, उदैरी व घारापुरी बेटे पुरातन आहेत. रायगड, अवचितगड, सरसगड, कर्नाळा हे इतिहास प्रसिद्ध किल्ले व मुरूड जंजिरा आणि कुलाबा हे जलदुर्ग महाराष्ट्राच्या शौर्याची साक्ष देत आहेत. अष्टविनायकांपैकी पालीचा श्री बल्लाळेश्वर, महडचा वरद विनायक आणि दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध पावलेले श्रीक्षेत्र हरिहरेश्वर, हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले कनकेश्वर व नागेश्वर ही या जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रे आहेत. घारापुरी लेणी, बौद्ध लेणी, हाणळे लेणी, शिल्प कलेची महती सांगतात. पेठच्या सुबक व सुंदर गणेश मुर्तीनी जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घातली आहे. सव व उन्हेरे येथील गरम पाण्याचे झरे भाविकांची श्रद्धास्थाने आहेत. थंड हवेचे ठिकाण माथेरान तर जगप्रसिद्ध आहे. किहिमचा निसर्गरम्य समुद्रकिनारा पर्यटकांना आकर्षित करीत आहे.[३]

### ४.२.३ रत्नागिरी जिल्हा

विपुल सृष्टी सौंदर्याने नटलेला हा जिल्हा आहे. रत्नागिरी जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राचे स्वातंत्र, स्वाभिमान आणि अस्मिता जपण्यसाठी इथल्या शूर वीरांचा आणि दऱ्याखोऱ्यांचा वापर केला. अनेक नवरत्ने या जिल्ह्याने राष्ट्राला दिली आहेत. ब्रिटीशांनी रत्नागिरी येथे बंदिवासात ठेवलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या क्रांतीकारकामुळे रत्नागिरी जिल्ह्याला इतिहासात अधिक महत्त्व प्राप्त झाले. जिल्ह्यातील बहुतांशी लोक आपली उपजिविका शेतीवरच करीत आहेत. जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्रातील फक्त ४५.९५ क्षेत्रच लागवडीखाली येते. बहुतेक भाग डोंगराळ आणि समुद्राच्या खाड्यांनी व्यापलेला आहे. सखल भागात प्रामुख्याने भात पीक घेतले जाते. डोंगर माथ्यावर वरकस जमीनीमध्ये वरी, नाचणीसारखी पिके होतात. फळांचा राजा हापूस, कोकम, कापूस ही फळे या उत्पादनासाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. या फळांपासून फळप्रक्रिया करणारे उद्योग जिल्ह्यात कार्यरत आहेत. रत्नागिरी जिल्ह्याचा औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या

दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहकार्याने एकूण १३१६ हेक्टर क्षेत्रामध्ये औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे.

लोटे परशुराम येथे रासायनिक औद्योगिक समुह आहेत. या उद्योग कंपन्यांमधून उत्पादीत केलेला माल निर्यात केला जातो. तसेच भारती शीप यार्ड, अल्ट्राटेक सिमेंट, फिनोलेक्स, जेके फाईल्स यासारखे नामांकित कारखाने जिल्ह्यात कार्यरत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात छोटी मोठी बंदरे आणि खाड्या असल्यामुळे मच्छिमारी हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने माशांवर प्रक्रिया करणारे उद्योग व कोल्ड स्टोरेज आहेत. याठिकाणच्या मासळीला जपान आणि पश्चिम आशियाई देशाकडून मागणी असल्यामुळे बरेच परदेशी चलन मिळते. या जिल्ह्याला निसर्गाने जे विपुल सृष्टीसौंदर्याचे उत्कट देणे दिले आहे. त्यामुळे या जिल्ह्याकडे पर्यटक आकर्षित होतात व रत्नागिरीच्या मोहात पडतात.

- **भौगोलिक स्थान**

रत्नागिरी जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८२०८ चौ.किमी आहे. रत्नागिरी जिल्ह्याला १६७ कि.मी. लांबीचा समुद्र किनार पट्टी लाभली आहे. रत्नागिरी जिल्हा हा १६.३० अंश ते १८.०४ अंश उत्तर अक्षांश आणि ७३.०२ अंश ७३.५२ पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यामध्ये येतो. जिल्हयातील हवामान दमट आहे.

- **प्रशासकीय विभाग**

कोकण प्रादेशिक विभागात रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश आहे. प्रशासकीय नियंत्रण व दैनंदिन कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यात ९ तालुके आहेत. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्यामध्ये एकूण १५३७ खेडी असून तालुकानिहाय खेड्यांची संख्या मंडणगड १०९, दापोली १७३, खेड २१५, चिपळूण १६५, गुहागर १२१, रत्नागिरी १९६, संगमेश्वर १९८, लांजा १२२ व राजापूर २३८ अशी आहे. या गावांपैकी चिपळूण, लांजा या तालुक्यामध्ये प्रत्येकी १ व राजापूरमध्ये दोन याप्रमाणे ४ ओसाड खेडी आहेत.

जिल्ह्यामध्ये रत्नागिरी, खेड, चिपळूण व राजापूर या चार नगरपरिषद असून त्या तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आहेत. तसेच दापोली ही एक नगरपंचायत आहे. त्याशिवाय १) जालगाव २) खेर्डी ३) गुहागर ४) नाचणे ५) लांजा ही जनगणना शहरे आहेत. जिल्ह्यात एकूण ८५१ ग्रामपंचायती असून त्यांची सभासदसंख्या ६८७७ आहे. रत्नागिरी

जिल्हापरिषद व ९ पंचायत समित्या यांच्या निवडणूका होऊन त्यांचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधीच्या हाती आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चार नगरपरिषदा व दापोली नगरपंचायतीचे क्षेत्र वगळता सर्व भाग रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात येतो.

- **जिल्हा सीमा**

रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तरेला रायगड, दक्षिणेला सिंधुदुर्ग, पश्चिमेला अरबी समुद्र, तर पूर्वेला सह्याद्री पर्वतांच्या रांगा आणि त्यापलिकडे कोल्हापूर, सातारा, सांगली हे जिल्हे आहेत.

- **रत्नागिरी जिल्ह्याची वैशिष्ट्ये**

एका बाजुला गगनाला गवसणी घालणारे उंच डोंगर तर दुसऱ्या बाजूला पाताळाचा वेध घेणाऱ्या खोल दऱ्या,डोंगरातून नागमोडी वळणे घेत धावणारे रस्ते, अथांग सागर आणि नारळी पोकळीच्या विस्तीर्ण बागातून क्षितीजावर रंगांची उधळण करणारा सूर्यास्त ही कोकणाची आणि रत्नागिरी जिल्ह्याची वैशिष्ट्ये.

- **भुपृष्ठ रचना**

जमिनीच्या प्रकारानुसार भुपृष्ठाची प्रामुख्याने चार विभागात वर्गीकरण करता येईल

१) काही प्रमाणात ओलावा धरून ठेऊ शकणारी जमीन, जेथे भाताचे पीक घेण्यात येते.

२) किनाऱ्या लगतची जमीन, जेथे नारळाच्या व सुपारीच्या बागा आहेत ही जमीन खारपट पोयाटायुक्त प्रकारची आहे.

३) डोंगर उताऱ्याची वरकस जमीन जेथे काजू, आंबा यासारख्या फळांची व नाचणी, वरी ही पीके घेतली जातात.

४) खाडी व समुद्र पाण्याने खराब झालेली क्षारयुक्त जमीन, जी कृषी उत्पादनासाठी योग्य नाही.

- **पर्यटन**

पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या गृहविभागाकडील निर्णय दिनांक १ नोव्हेंबर १९९६ अन्वये राज्यातील नागरी व ग्रामीण भागातील अनेक प्रसिद्ध यात्रास्थळे, ऐतिहासिक, सांस्कृतिक, निसर्गरम्य स्थळे इत्यादी पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे अशा स्थळांचे 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन श्रेणीमध्ये

वर्गीकरण करण्यात आले आहे. त्याप्रमाणे सद्यस्थितीत रत्नागिरी जिल्ह्यात 'अ' श्रेणीमध्ये कोणतेही पर्यटनस्थळ अंतर्भूत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये, गणपतीपुळे, पावस, वेळणेश्वर, पन्हाळेकाजी, थिबापॅलेस, माचाळ या पर्यटन स्थळांचा ब वर्गीय पर्यटन स्थळ म्हणून अंतर्भाव आहे. राज्यशासनाकडून प्राप्त होणाऱ्या अर्थसंकल्पीय साधनसंपत्तीमधून ही पर्यटनस्थळे विकसित करावयाची आहेत. रत्नागिरी जिल्हात अनेक गड आहेत. उदा. जयगड, पूर्णगड, मालगुंड, बाणकोटगड, गोवळकोटगड, महिपतगड, पन्हाळेदुर्ग गड, प्रचितगड, भवानीगड, भैरवगड या गडांना ऐतिहासकालीन महत्व आहे. शिवाजी महाराजांच्या काळात या गडांना फार महत्व होते. आज हे सर्व गड नादुरूस्त व मोडकळीस आलेले पहावयास मिळतात. रत्नागिरी तालुक्यात केशवसुत स्मारक, स्वातंत्रविर सावरकर स्मारक, भगवती मंदिर, रत्नदुर्ग किल्ला, लोकमान्य टिळक जन्मस्थान, जयगड, निवळी धबधबा, भाटे समुद्र किनारा ही पर्यटन स्थळे आहेत. संगमेश्वर तालुक्यात श्रीक्षेत्र मार्लेश्वर, छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक, राजापूरची गंगा, चिपळूण तालुक्यात श्रीक्षेत्र परशुराम, सवतसडा, अशी इतर अनेक रमणीय स्थळे या जिल्ह्यात ठिकठीकाणी आढळतात. नियोजन समितीने या पर्यटन स्थळांना 'क' पर्यटन स्थळ म्हणून मान्यता दिलेली आहे. [४] यामुळेच निसर्गरम्य रत्नागिरी कडे पर्यटक आकर्षित होतात आणि रत्नागिरीच्या मोहात पडतात.

### ४.२.४ सिंधुदुर्ग जिल्हा

कोकण विभागातील दक्षिण भागाचा औद्योगिक व कृषी क्षेत्रामध्ये, जलद विकास व्हावा आणि विकास योजनांची अंमलबजावणी कार्यक्षमतेने व्हावी या दृष्टीकोनातून स्थानिक लोकांच्या मागणीचा विचार करत १ मे १९८१ रोजी रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचा पश्चिम किनारपट्टीचा दक्षिणेकडील भाग म्हणजे 'सिंधुदुर्ग' होय.

कोकण विभागातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत या जिल्ह्याचा बराच भाग भूसपाट असून येथे प्रामुख्याने भात शेती केली जाते. तसेच नागली व कडधान्य ही पिके घेतली जातात. जिल्ह्यातील लोकांचे उपजिविकेचे शेती हेच प्रमुख साधन आहे. व भात मुख्य अन्न आहे. तसेच नारळ, सुपारी, काजू, आंबा ही नगदी पिके किनारपट्टीच्या भूप्रदेशात मोठ्या प्रमाणात घेतली

जातात. या पिकांच्या वाढीला पोषक अशी जमीन व हवामान सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहेत. जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील हापूस आंबा विशिष्ट चव व गोडीसाठी सुप्रसिद्ध असून त्याला देशात व परदेशात चांगली मागणी आहे. बंदरे, नद्या व मोठ्या खाड्या यामधून मोठ्या प्रमाणावर मच्छिमारी केली जाते. या व्यवसायास उत्तेजन देण्याकरिता शासनामार्फत युवकांना प्रशिक्षण आणि आर्थिक मदतही केली जाते.

जिल्ह्यामध्ये उद्योग व कारखान्यांची संख्या अल्प प्रमाणात आहे. मात्र लघुउद्योग व कुटीर उद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. उदा. जंगली लाकडापासून खेळणी, केरसुणी, काठ्या इ. जिल्ह्याच्या दक्षिणेला किनारपट्टी लगत लोहयुक्त अशुद्ध खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. लोहखनिजाबरोबरच अल्मेनाइट, क्रोमानाइट व मँग्नीज, बॉक्साईट, ग्रॅनाईट या खनिजांचे साठेही भरपूर प्रमाणात आहेत. औद्योगिक क्षेत्रामध्ये होणारी प्रगती, तसेच खनिज पदार्थांच्या उत्पादनातील वाढ व मच्छिमारीमुळे स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यास मदत झालेली आहे.

- **भौगोलिक स्थान**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५२०७ चौ.कि.मी. आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला १२१ कि.मी. लांबीची समुद्र किनार पट्टी लाभली आहे. ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या फक्त १.७ टक्के आहे. जिल्ह्याला १२१ किमी किनारपट्टी लाभलेली आहे. या जिल्ह्याचे दक्षिणोत्तर अक्षांश १५.३७ अंश ते १६.४० अंश व पूर्व पश्चिम रेखांश ७३.१९ अंश ते ७४.१८ अंश असे आहे.

- **प्रशासकीय विभाग**

कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यामध्ये सावंतवाडी व कणकवली असे दोन प्रशासकीय उपविभाग पाडले आहेत. सावंतवाडी उपविभागामध्ये सावंतवाडी, वेंगुर्ला, कुडाळ व दोडामार्ग या चार तालुक्यांचा तर कणकवली उपविभागामध्ये मालवण, कणकवली, देवगड व वैभववाडी या चार तालुक्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यात आठ तालुके असून ७४३ खेडी, १ गणना शहर, १ नगरपंचायत व ३ नगरपरिषदा आहेत. सर्व खेडी वस्ती असलेली असून एकही खेडे ओसाड नाही. कुडाळ १२४, मालवण १३५, देवगड ९७, वैभववाडी ५९, कणकवली १०४, सावंतवाडी ८५, वेंगुर्ला ८३ आणि दोडामार्ग ५६ याप्रमाणे तालुकानिहाय खेड्यांची संख्या आहे. जिल्ह्यात

सन २००९–१० मध्ये एकूण ४३० ग्रामपंचायती असून त्या सर्व ग्रामपंचायतीमधील एकूण सभासदांची संख्या ३६१४ आहे.

जिल्ह्यामध्ये कणकवली ही नगरपंचायत आणि सावंतवाडी, वैंगुर्ला व मालवण या तीन नगरपरिषदा आहेत. तसेच २००१ च्या गणनेप्रमाणे कुडाळ हे शहर म्हणून गणले जाते.

- **जिल्हा सीमा**

एकूण आठ तालुक्यांचा आटोपशीर सिंधुदुर्ग जिल्हा असून जिल्ह्याच्या पूर्वेस कोल्हापूर जिल्हा, दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा व गोवा राज्य, उत्तरेस रत्नागिरी जिल्हा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे.

- **भुपृष्ठ रचना**

भौगोलिक रचनेच्या दृष्टीने हा जिल्हा तीन विभागात विभागता येईल.

१) सह्याद्रीचा डोंगर भाग

२) डोंगर उतारावरील पट्टा ज्याला स्थानिक भाषेत वलाटी (वरचा पट्टा) असे म्हणतात.

३) समुद्रसपाटीला लागून असलेला सागरी पट्टा ज्याला स्थानिक लोक खलाटी म्हणतात. स्वाभाविक रचनेत सदर पट्टे दिसून येत नाहीत. त्याचे कारण सह्याद्रीच्या आडव्या मालिकांची उंची ४५ ते ५० मीटर आहे. तर काही ठिकाणी त्या थेट समुद्राला भिडलेल्या आहेत. समुद्र किनाऱ्यालगत ६ ते १८ किमी उंचीचा वाळू मिश्रीत पट्टा आहे. त्याला पोयटा म्हणतात. सदर पट्ट्यालगत उंचवट्याचा भाग असल्याने या भागाला सलगता राहिलेली नाही. या जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सर्वसाधारणपणे १२१ किमी आहे.

विशिष्ट हवामानामुळे बेसॉल्ड दगडापासून जांभा दगड तयार झाला असून ही प्रक्रिया समुद्रसपाटीपासून १५० ते १७५ मीटर उंचीपर्यंत आढळून येते. बेसॉल्ट व्यतिरिक्त काही तालुक्यात ग्रेनाईट, ग्रेईस आढळून येतात.

- **पर्यटन**

शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. इथली संस्कृती, निसर्ग, पर्यावरण यांची वैशिष्ट्ये आणि आपलेपणा जपण्यासाठी या साधनसंपत्तीचा वापर करून या भागाचा विकास साधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे पर्यटन होय. सिंधुदुर्ग जिल्ह्यात

पर्यटकांना आकर्षित करू शकतील अशी अनेक रम्य ठिकाणे आहेत. मालवण येथील समुद्रातील शिवाजी महाराजांनी बांधलेले प्रसिद्ध सिंधुदुर्ग किल्लाव  विजयदुर्ग सारखा सागर किनारी बांधलेला किल्ला पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. सावंतवाडी तालुक्यात सह्याद्रीच्या पर्वत रांगेत समुद्रसपाटीपासून २३६८  फूट उंचीवर आंबोली हे थंड हवेचे ठिकाण आहे. मालवण व वेंगुर्ला तालुक्यातील पर्यटकांना आकर्षित करणारा समुद्रकिनारा या जिल्ह्यात आहे. आरवली, शिरोडा, उभादांडा (सागरेश्वर) निवती, कोचरा, तारकर्ली, देवबांग, मालवणचा धामापूर तलाव, फोंडाघाट येथील उगवाई मंदिर आदि ठिकाणे पर्यटन विकासाला पोषक आहेत. कृषी पर्यटन, पर्यावरणुकूल पर्यटन अशा नवनवीन संकल्पना निर्माण झाल्या आहेत. पर्यटन फलोत्पादन मत्स्य व्यवसाय ही त्रिसूत्री जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका, स्थानिकांचा सहभाग स्थानिक साधन सामग्रीवर भर देणारे पर्यावरण रक्षक प्रक्रीया उद्योग यातून जिल्ह्याचा विकास होणे शक्य आहे.

सावंतवाडी हे महाराष्ट्रातील एक नावाजलेले हस्तकला उद्योगाचे केंद्र आहे. या परिसरात तयार होणारी खेळणी, लाखेच्या वस्तू संपूर्ण देशात व परदेशात प्रसिद्ध आहेत. लाकडी रंगीत खेळणी, रंगीत फळे, लाख केलेल्या वस्तू आदि उद्योगासाठी सावंतवाडी प्रसिद्ध आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याची पर्यटनाविषयी पार्श्वभूमी व भविष्यकालीन, दृष्टीकोन समोर ठेवून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग या संस्थेमार्फत दारिद्र्य रेषेखालील बचत गट व तरूण–तरूणींना व्यवसायामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

## ४.३ आर्थिक असमतोलाची संकल्पना

देशातील सर्व प्रदेशांत औद्योगिक, आर्थिक विकास  समानतेने साध्य होत नाही त्यास आर्थिक असमतोल असे म्हणतात. यामध्ये दरडाई उत्पन्न, गुंतवणूक, दरडोई वीजेचा उपभोग, जलसिंचन सुविधा, बँका, वाहनांचे प्रमाण, आयुर्मान, साक्षरता, आरोग्य, दारिद्र्य या घटकांत असमतोल निर्माण झालेला दिसतो त्यास आर्थिक असमतोल असे म्हणतात.

असंतुलित आर्थिक विकासाचे समर्थन करणारे हर्शमन, सिंगर, फ्लेमिंग, किंडल बर्जर, पॉल, स्ट्रीटेन, रोस्टो या अर्थशास्त्रज्ञांचा समावेश आहे. प्रा. हर्शमन यांच्या मते, अर्थव्यवस्थेचा

विकास मुद्दाम निर्माण केलेल्या असंतुलनातून होतो. संतुलित विकासाचे तत्त्व विकासनशील अर्थव्यवस्थेत अव्यवहार्य ठरते. म्हणून अर्थव्यवस्थेची गरज ओळखून गुंतवणूकीचा विचार करताना महत्वाच्या क्षेत्रावर अधिक भर द्यायला हवा. म्हणजेच असंतुलन निर्माण करायला हवे. सिंगरच्या मते 'आर्थिकदृष्ट्या अप्रगत अर्थव्यवस्थेचा विकास म्हणजे शेतीत गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ८०% वरून १५% पर्यंत आणणे होय.'[६]

असंतुलित वृद्धीचा सिद्धांत संतुलित वृद्धि धारणेच्या अगदी विरूद्ध आहे. हर्शमन ह्या अर्थशास्त्रज्ञाने आपल्या 'The Strategy of Economic Growth' ह्या ग्रंथात असंतुलित विकासाची संकल्पना किंवा तत्त्व मांडले आहे. ह्यांच्या मतानुसार, मागास देशात असलेले दारिद्र्याचे दुष्टचक्र मोडण्याकरिता असंतुलित आर्थिक विकास करणेच आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांचा एकाच वेळी व एकमत विकास होवू शकत नाही. ऐतिहासिक उदाहरणांवरून सुद्धा हे दिसून येते की, युरोप खंडातील प्रगत देशांचा विकास असंतुलित स्वरूपाचाच होता. ह्या तत्त्वानुसार, सर्वप्रथम काही निवडक पायाभूत उद्योगांमध्ये गुंतवणूक करावी व नंतर पुढे जावून आर्थिक विकासाची गती वाढवावयाची असते. अर्धविकसित देशांमध्ये भांडवल व तांत्रिक ज्ञान आवश्यक त्याप्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे सर्व क्षेत्रांचा विकास एकदम करता येत नाही. कारण उपलब्ध संसाधनांची सर्वच क्षेत्रात समान वाटणी करणे अनार्थीक होवू शकते व संसाधनांचा अपव्यय होऊ शकतो अशा ह्या मान्यतेवर हे तत्त्व आधारित आहे. ह्या सिद्धांताचे प्रमुख समर्थक प्रो. हर्शमन, सिंगर, फ्लेमिंग, प्रो, किंडलबर्जर इत्यादी आहेत.

## ४.४ सामाजिक असमतोलाची संकल्पना

अर्थव्यवस्थेतील लोकसंख्या स्त्री–पुरूष प्रमाण, साक्षरता लोकसंख्येची घनता, शहरी ग्रामीण विभागणी, शिक्षण, आरोग्य, दारिद्र्य, डाक व दुरध्वनी सेवा या विविध घटकांत असणारा असमतोल म्हणजे सामाजिक असमतोल होय. विविध प्रदेशात या सर्वच घटकांत समतोल दिसत नाही. यामुळे सामाजिक विषमता निर्माण होते. याचा परिणाम देशाच्या व राज्यांच्या विकासावर होतो.[७]

सामाजिक असमतोल व सामाजिक स्तरीकरण हे साधनसंपत्तीचे वितरण असमान असल्यामुळे निर्माण होते. यामुळे लैंगिक असमतोल, आर्थिक असमतोल निर्माण झालेला दिसून येतो. लोकसंख्येचे लिंग, उत्पन्न या आधारावर विविध वर्गात विभाजन केले जाते. उदा. महिलांना नेहमीच दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. हा सामाजिक स्तरीकरणातील असमतोल आहे.

समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींचे उत्पन्न आणि संपत्ती यामधील विषमता म्हणजे उत्पन्नातील विषमता किंवा आर्थिक विषमता होय. जेव्हा काही व्यक्तींचे उत्पन्न अधिक आणि संपत्ती अतिशय जास्त असते त्याच वेळेस बहुसंख्य जनतेचे उत्पन्न अत्यंत कमी आणि संपत्ती देखील अत्यंत कमी असते. तेव्हा आर्थिक विषमता आहे म्हणता येते. अर्थातच जेव्हा अर्थव्यवस्थेत उत्पन्न आणि संपत्तीचे विषम वितरण असते तेव्हा आर्थिक विषमता अस्तित्त्वात असते. याप्रमाणे आर्थिक विषमतेमध्ये खालील तीन गोष्टींची समावेश होतो.

**१) उत्पन्नातील विषमता**

**२) संपत्तीतील विषमता**

**३) संधीची विषमता**

वरील तिन्हीही गोष्टी एक दुसऱ्यांना वाढवत असतात. अर्थात पूर्ण समानता कल्पनेतील गोष्ट आहे. आर्थिक वृद्धीबरोबर उत्पन्नातील वितरणाची विषमता अधिक वाढत जाण्याची शक्यता असते. प्रो. लुईस यांच्या मते, आर्थिक विकासाच्या घोड्यावर स्वार होणे आणि आर्थिक समानतेच्या घोड्याला मात्र कुठल्याही प्रकार लगाम घातला नाही. १८ व्या,१९ व्या ,२० व्या शतकामध्ये इंग्लंड, युरोप आणि जपान यांच्या अनुभवानुसार, ज्या ठिकाणी पैसा व संपत्ती आली तिथे श्रीमंतांनी आपली बचत वाढविली व पुढे ती गुंतविली. परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी असमानतेचे समर्थन केले होते. कारण त्यांच्या मते, उत्पन्नातील समानता बचतीचे दर कमी करते. अर्थात श्रमिकांची मजुरी वाढून उपभोग वाढतो, लोकसंख्या वाढते. त्यामुळे आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे परंपरागत अर्थशास्त्रज्ञांचा विश्वास होता की, आर्थिक वृद्धीच्या मार्गातील समानता एक अडथळा ठरू शकतो.

आर्थिक सहाय्य, करांमधील सूट, मजूर संघटना या सर्वांमुळे भांडवलदारांमध्ये एक स्वार्थी वृत्तीची वाढ करीत असतो, ज्याचा परिणाम विकसनशील अर्थव्यवस्थेत संसाधनांच्या वितरणात अतिशय मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण करीत असतो. तसेच याही गोष्टींची

काहीच निश्चितता नसते की, अर्थव्यवस्थेतील श्रीमंत वर्ग वाढलेला नफा उत्पादकतेवरच खर्च करतील असे नाही तर अधिक उपभोग, प्रदर्शन, प्रभाव, जमाखोरी, आभूषण सुवर्ण, सट्टा, विदेशी यात्रा, मोठ्या इमारती बांधणे यावर खर्च करतात किंवा विदेशी अधिकोषात जमा करतात ज्यामुळे अर्थव्यवस्थेत अपव्यय वाढतो. विकसनशील देशांमध्ये विषमतेला वाढविणे हे अर्थव्यवस्थेसाठी हानिकारकच असते. कारण विषमता विकासात अडथळे निर्माण करतो. विकसनशील अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त लोकांच्या उत्पन्नाचा स्तर कमी आणि राहणीमान दोन्हीही नित्कृष्ट स्तराचे असते. ज्यामुळे ते पौष्टिक आहार, शिक्षण, प्रशिक्षण यांची व्यवस्था करू शकत नाही. त्यांची उत्पादनक्षमता कमी असते. त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या वृद्धीवर होताना दिसतो. म्हणून या वर्गातील लोकांच्या उत्पन्नक्षमतेमध्ये समानता आणल्यास उत्पादन क्षमतेत वाढ होते. परिणामतः मागणीमध्ये वृद्धी होऊ शकते, जी अधिक उत्पादनाला प्रोत्साहित करते.

## ४.५ कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक असमतोलाचे स्वरूप

कोकण विभागाग ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांचा समावेश आहे. आर्थिक असमतोल अभ्यासताना कोकणातील लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, शेती, मासेमारी, बँकांच्या शाखा, पशुधन, वीजेचा वापर, औद्योगिक क्षेत्रातील चालू कारखाने, कामगार यांचा आढावा घेतला आहे. सामाजिक असमतोल अभ्यासताना कोकणातील शिक्षण, आरोग्य, दारिद्र्य, लोकसंख्या यांचे विश्लेषण थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडले आहे.

**१) एकूण लोकसंख्या –**

कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येचे स्त्री–पुरूष प्रमाण, साक्षरता, घनता या घटकांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.१ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.१

## कोकण विभागातील लोकसंख्यचे वर्गीकरण

| जिल्हे | एकूण लोकसंख्या | | | एकूण स्त्री पुरूष लोकसंख्या | | | प्रति हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या | लोकसंख्येची घनता कमी दर चौ.किमी | साक्षरता (टक्के) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | पुरूष | स्त्रिया | एकूण | | | ग्रामीण | एहरी | एकूण | पुरूष | स्त्रिया |
| ठाणे | २५४५ (४०.३) | ८५१५ (८६.३) | ११०६० (६८.५) | ५८६५ (६९.४) | ५१९५ (६७.३) | ११०६० (६८.५) | ८८६ | ११५७ | ७०.६० | ८८.८४ | ८४.५३ | ८८.७२ | ७९.७७ |
| रायगड | १६६४ (२६.४) | ९७० (९.८) | २६३४ (१६.३) | १२९० (१५.४) | १३४४ (१७.४) | २६३४ (१६.३) | ९१२ | ३६८ | ७८.३३ | ९०.५५ | ८३.१४ | ८९.१३ | ७६.९२ |
| रत्नागिरी | १३५१ (२१.४) | २६४ (२.७) | १६१५ (९.९) | ८५४ (१०.१) | ७६१ (९.८) | १६१५ (९.९) | ११२२ | १९८ | ८०.१३ | ९२.७५ | ८२.१८ | ९०.९३ | ७४.५३ |
| सिंधुदुर्ग | ७४३ (११.९) | १०७ (१.२) | ८५० (५.३) | ४३३ (५.१) | ४१७ (५.५) | ८५० (५.३) | १०३६ | १६३ | ८४.६० | ९२.१० | ८५.७० | ९१.६० | ७९.८० |
| एकूण कोकण | ६३०३ (१००) | ९८५६ (१००) | १६१५९ (१००) | ८३८७ (१००) | ७७७२ (१००) | १६१५९ (१००) | ९८९ | ४७५ | ७८.४१ | ९०.९८ | ८३.८८ | ९०.१० | ७७.७५ |

***स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

**टीप –** कंसातील अंक लोकसंख्येची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.१ मध्ये, कोकण विभागातील लोकसंख्येचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील ग्रामीण लोकसंख्या एकूण ६३०३ हजार आहे. शहरी लोकसंख्या ९८५६ इतकी आहे. कोकणातील लोकसंख्येची विविध वैशिष्ट्ये अभ्यासली असता असे दिसून येते की, एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक ६१% लोकसंख्या शहरी भागात आहे. ही लोकसंख्या मुंबई ठाणे या पट्ट्यात आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील सर्वाधिक लोकसंख्या अनुक्रमे २१.४% आणि ११.९% इतकी ग्रामीण भागात राहते. रत्नागिरी जिल्ह्यात स्त्री पुरूष प्रमाण दर हजारी ११२२ व त्याखोलोखाल सिंधुदुर्ग १०३६ इतके आहे. ठाणे जिल्ह्याचे स्त्री–पुरूष प्रमाण कोकणातील ९८९ प्रमाणापेक्षा कमी असून ८८६ इतके आहे. लोकसंख्येच्या घनतेच्या बाबतीत ठाणे सर्वाधिक ११५७ आणि सर्वात कमी सिंधुदुर्ग १६३ इतकी आहे. साक्षरतेच्या सर्वात जास्त सिंधुदुर्ग ८४.६०% इतकी असून शहरी साक्षरतेच्या बाबतीतही सर्वात कमी ठाणे ८८.५५% आणि सर्वाधिक रत्नागिरी ९२.७५% इतकी आहे. एकूण पुरूषांपैकी ९०.१०% पुरुष आणि एकूण स्त्रियांपैकी ७७.७५% स्त्रिया असल्याचे आढळून येत. कोकणात साक्षरतेचे प्रमाण ८०% पेक्षा जास्त आहे. दर हजारी पुरूषांमागे असणाऱ्या पुरूषांचे प्रमाण कोकण विभागाच्या प्रमाणापेक्षा रत्नागिरी मध्ये जास्त आहे तर ठाण्यामध्ये कमी आहे. यावरून कोकणातील एकूण लोकसंख्या, स्त्री–पुरुष प्रमाण, साक्षरता, दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या या विविध घटकांत विषमता दिसून येते.

### २)कोकण विभागातील दरडोई उत्पन्नातील तफावत

प्रतिव्यक्तीचे उत्पन्न म्हणजेच दरडोई वास्तव उत्पन्न होय. कोकण विभागात शेतीचा फारसा विकास झाला नाही. कोकणातील लोकांकडे शिक्षणाच्या सुविधा अपुऱ्या आहेत. त्यामुळे उत्पन्नांची साधने कमी आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये शैक्षणिक सुविधा व रोजगार संधी उपलब्ध असल्यामुळे ठाणे जिल्ह्यात दरडोई उत्पन्न जास्त आहे. रायगड जिल्ह्यातही दरडोई उत्पन्न जास्त आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात शैक्षणिक सुविधा व रोजगार संधी कमी असल्यामुळे व्यक्तींचे दरडोई उत्पन्न कमी आहे. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्नाचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.२ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.२

## दरडोई उत्पन्न

(दरडोई उत्पन्न लाख रू.)

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | दरडोई उत्पन्न | ०.५५ | ०.६३ | ०.७५ | ०.८८ | ०.९६ | १.०३ | १.०९ | १.२५ | १.४० | १.५७ |
| | टक्के | (३२.७) | (३४.०) | (३५.४) | (३७.६) | (३८.७) | (३७.३) | (३३.५) | (३४.०) | (३१.५) | (३१.५) |
| रायगड | दरडोई उत्पन्न | ०.३५ | ०.३७ | ०.४४ | ०.४८ | ०.५४ | ०.६४ | ०.८५ | ०.९६ | १.१९ | १.३२ |
| | टक्के | (२०.८) | (२०.०) | (२०.७) | (२०.५) | (२१.७) | (२३.१) | (२६.१) | (२६.१) | (२६.८) | (२६.५) |
| रत्नागिरी | दरडोई उत्पन्न | ०.४८ | ०.५१ | ०.५३ | ०.५३ | ०.४७ | ०.५५ | ०.६७ | ०.७७ | ०.९३ | १.१० |
| | टक्के | (२८.६) | (२७.५) | (२५.०) | (२२.६) | (१९.०) | (२०.०) | (२०.६) | (२१.०) | (२०.९) | (२२.१) |
| सिंधुदुर्ग | दरडोई उत्पन्न | ०.३० | ०.३४ | ०.४० | ०.४५ | ०.५१ | ०.५४ | ०.६४ | ०.६९ | ०.९२ | ०.९९ |
| | टक्के | (१७.९) | (१८.५) | (१८.९) | (१९.३) | (२०.६) | (१९.६) | (१९.८) | (१८.९) | (२०.८) | (१९.९) |
| एकूण कोकण | दरडोई उत्पन्न | १.६८ | १.८५ | २.१२ | २.३४ | २.४८ | २.७६ | ३.२५ | ३.६७ | ४.४४ | ४.९८ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

* टीप – कंसातील अंक दरडोई उत्पन्नाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.२. मध्ये कोकण विभागातील दरडोई उत्पन्नाचे अध्ययन करण्यात आले आहे. २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील ठाणे जिल्ह्याचे एकूण दरडोई उत्पन्न १०.११ लाख रू. इतके असून त्यापैकी २००४–०५ मध्ये ०.५५ लाख रू. (३२.६०%) , २०१३–१४ मध्ये १.५७ लाख रू. (३५.५%) इतके आहे. ठाणे जिल्ह्याच्य दरडोई उत्पन्नात १.०२ लाख रू. इतकी निव्वळ वाढ झाल्याचे दिसून येते. रायगड जिल्ह्यामध्ये २००४–०५ मध्ये ०.३५ लाख रू. (२०.८%), २०१३–१४ मध्ये सर्वाधिक १.३२ लाख रू. (२६.५%) असल्याचे स्पष्ट झाले आहे.रायगड जिल्ह्याचे दरडोई उत्पन्नात ०.९७ इतकी कमी वाढ झाली. रत्नागिरी जिल्ह्याचे एकूण दरडोई उत्पन्न ६.५४ लाख रू. इतके असून त्या पैकी २००४–०५ मध्ये ०.४८ लाख रू.(२८.६%) , २०१३–१४ मध्ये १.१० लाख रू. (२२.१%) इतके आहे. संशोधन काळात दरडोई उत्पन्न ०.६२ लाख रू .इतके वाढले आाहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एकूण दरडोई उत्पन्न ५.७८ लाख रू. इतके असून २००४–०५ मध्ये ०.३४ लाख रू. (१७.९%), २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ०.९९ लाख रू. (१६.०%) आहे. संशोधन काळात जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नात ०.६९ लाख रू. इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.कोकण विभागाचे एकूण दरडोई उत्पन्न २९.५७ लाख रू असून त्यापैकी २००४–०५ मध्ये सर्वात कमी १.६८ लाख आहे. सर्वाधिक दरडोई उत्पन्न २०१३–१४ मध्ये ४.९८ लाख रू. इतके आहे. कोकणातील दरडोई उत्पन्नात संशोधन काळात ३.३० लाख रू. निव्वळ वाढ झाली आहे.

संशोधन काळात कोकण विभागाच्या दरडोई उत्पन्नात वाढ झालेली आहे. २०१३–१४ मधील सर्वाधिक दरडोई उत्पन्न ठाणे जिल्ह्याचे ३१.५% आहे तर सर्वात कमी दरडोई उत्पन्न सिंधुदुर्ग जिल्ह्याचे १९.९% आहे. २००४–०५ ते २०१३–१४ काळात कोकणातील दरडोई उत्पन्नातील वाढीच्या टक्केवारीत फारसा बदल झाला नाही मात्र चारही जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न हे विषम आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा नैसर्गिक संपत्तीने विपुल आहे. त्याच्या सहाय्याने या जिल्ह्यातील दरडोई उत्पन्नातील तफावत दूर करता येईल. या जिल्ह्यात कृषी पर्यटन ही संकल्पना कृषीला पूरक जोडधंदा म्हणून करता येईल. पर्यटन या व्यावसायाने कुशल व अकुशल लोकांना रोजगार प्राप्त होईल त्याने स्थानिक उत्पादने, संस्कृती जगभर प्रसिद्ध होईल. ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढल्याने राहणीमान उंचावेल. कोकणातील चारही

जिल्ह्यामध्ये दरडोई उत्पन्नात वाढ दिसत असली तरी ग्रामीण अर्थव्यवस्था लक्षात घेता चारही जिल्हे मागासलेल्या अवस्थेत आहेत.

### ३) कोकण विभातील एकूण पिकाखालील क्षेत्र

कोकण विभागात शेतीचा फारसा विकास झाला नाही. कोकणात भात, नाचणी, वरई, कडधान्ये, आंबा, कजू व सुपारी या फळांचे उत्पादन घेतले जाते. सर्व पिकाखालील क्षेत्राच्या आधारे कोकणातील एकूण पिकाखालील क्षेत्राचा अभ्यास करण्यात आला आहे. कोकण विभागातील २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील एकूण पिकाखालील क्षेत्र तक्ता क्रमांक ४.३ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.३

## कोकण विभागातील एकूण पिकाखालील क्षेत्र

(क्षेत्र हजार हेक्टर मध्ये)

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | क्षेत्र | २९३ | ३११ | ३२६ | ३३९ | ३५५ | ३६८ | ३८१ | ३९२ | ३९३ | ४०७ |
| | टक्के | (३२.४) | (३२.३) | (३२.६) | (३२.८) | (३४.२) | (३४.९) | (३६.१) | (३६.३) | (३६.३) | (३६.०) |
| रायगड | क्षेत्र | २०६ | २२१ | २३३ | २३३ | २३१ | २३१ | २३३ | २३५ | २३५ | २४२ |
| | टक्के | (२२.८) | (२३.०) | (२३.३) | (२२.५) | (२२.२) | (२१.९) | (२२.१) | (२१.९) | (२१.८) | (२१.४) |
| रत्नागिरी | क्षेत्र | २८८ | २९० | २९३ | ३१६ | ३०३ | २९० | २७२ | २८५ | २८५ | २९७ |
| | टक्के | (३९.९) | (३०.२) | (२९.३) | (३०.५) | (२९.३) | (२७.४) | (२५.९) | (२६.४) | (२६.३) | (२६.३) |
| सिंधुदुर्ग | क्षेत्र | ११७ | १३९ | १४८ | १४८ | १४८ | १६७ | १६७ | १६७ | १६७ | १८३ |
| | टक्के | (१२.९) | (१४.५) | (१४.८) | (१४.२) | (१४.३) | (१५.८) | (१५.९) | (१५.४) | (१५.६) | (१६.३) |
| एकूण कोकण | क्षेत्र | ९०४ | ९६१ | १००० | १०३६ | १०३७ | १०५६ | १०५३ | १०७९ | १०८० | ११२९ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक कोकण विभागातील एकूण पिकाखालील क्षेत्राची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.३ मध्ये कोकणातील एकूण पिकाखालील क्षेत्राचे अध्ययन करण्यात आले आहे.ठाणे जिल्ह्यात २००४-०५ मध्ये २९३ (३२.४%), २०१३-१४ मध्ये ४०७(३६.६%) इतके आहे. अभ्यासकाळात एकूण पिकाखालील क्षेत्रात ११४ हजार होक्टर इतकी वाढ झाली आहे. रायगड जिल्ह्यात २००४-०५ मध्ये २०६(२२.८%), २०१३-१४ मध्ये २४२(२१.४%) असल्याचे स्पष्ट झाले. अभ्यास काळात एकूण पिकाखालील क्षेत्र केवळ ३६ हजार हेक्टर इतकी वाढ झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात २००४-०५ मध्ये २८८(३१.९%), २०१३-१४ मध्ये २९७(२६.३%) इतके असून संशोधन काळात ०९ हजार होक्टर इतकी वाढ झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात २००४-०५ मध्ये ११७ (१२.९%), २०१३-१४ मध्ये १८३(१६.३%) आहे.

कोकण विभागातील २००४-०५ या वर्षी केवळ ९०४ हजार हेक्टर तर सर्वाधिक क्षेत्र २०१३-१४ मध्ये ११२९ हजार हेक्टर आहे. संशोधन काळात २२५ हजार हेक्टर क्षेत्र वाढले आहे. कोकण विभागातील चारही जिल्ह्यात भात पीक व फळ लागवड करणाऱ्या क्षेत्रात विषमता आहे. लागवडीखालील आणि पडीक असलेल्या जमीनीच्या क्षेत्रप्रमाणात सुद्धा विषमता आहे. जिल्ह्याची विशिष्ट भौगोलिक परिस्थिती, अल्प प्रमाणात होणाऱ्या सिंचनाच्या सोयी, विशिष्ट हवामान यामुळे दुबार पिके घेतली जात नाहीत. उपजिवीकेच्या साठी लागणाऱ्या आवश्यक असणारे उत्पादन घेण्याकडे लोकांचा कल आहे. यापैकी सर्वाधिक वाढ ठाणे जिल्ह्यात तर सर्वात कमी वाढ रत्नागिरी जिल्ह्यात झाली आहे. यावरून पिकाखालील क्षेत्र संपूर्ण विभागात सारखे वाढले नाही यातूनच प्रादेशिक असमतोल वाढत गेला.

### ४) कोकण विभागातील दारिद्र्य रेषाखालील कुटुंबे-

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, या मुलूत गरजा भागविता येत नाही अशी परिस्थिती म्हणजे दारिद्र्य होय. तसेच दारिद्र्य रेषा म्हणजे उत्पन्नाची अशी मर्यादा की, ज्यात व्यक्तीस काम करण्यासाठी शारिरीक क्षमता मिळविणे व ती टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल उष्मांक देण्याइतपत आहार न मिळणे होय. किमान उपभोग खर्च करता येत नाही अशा कुटुंबांचा समावेश यामध्ये होतो. कोकण विभागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.४ मध्ये केले आहे. .

## तक्ता क्रमांक ४.४

## कोकण विभागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची स्थिती

(संख्या लाखात)

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | कुटुंबे | १.४ | १.५१ | १.५१ | १.६३ | १.८२ | १.९६ | २.० | २.०० | २.३१ | २.४४ |
| | टक्के | (३२.३) | (३३.६) | (३३.६) | (३४.२) | (३७.२) | (३८.६) | (३८.९) | (३१.९) | (३५.०) | (३६.३) |
| रायगड | कुटुंबे | १.१० | १.१५ | १.१५ | १.१७ | १.१५ | १.१५ | १.१५ | १.१५ | १.१५ | १.१५ |
| | टक्के | (२५.४) | (२५.६) | (२५.६) | (२४.८) | (२३.४) | (२२.६) | (२२.३) | (१८.३) | (१७.४) | (१७.१) |
| रत्नागिरी | कुटुंबे | १.२० | १.२० | १.२० | १.२२ | १.२२ | १.२६ | १.२८ | १.३० | १.३० | १.३० |
| | टक्के | (२७.८) | (२६.८) | (२६.८) | (२५.८) | (२४.९) | (२४.९) | (२४.९) | (२०.८) | (१९.७) | (१९.३) |
| सिंधुदुर्ग | कुटुंबे | ०.६३ | ०.६३ | ०.६३ | ०.७१ | ०.७१ | ०.७१ | ०.७१ | १.८३ | १.८३ | १.८३ |
| | टक्के | (१४.५) | (१४.०) | (१४.०) | (१५.०) | (१४.५) | (१३.९) | (१३.९) | (२९.०) | (२७.९) | (२७.३) |
| एकूण कोकण | कुटुंबे | ४.३३ | ४.४९ | ४.४९ | ४.७३ | ४.९० | ५.०८ | ५.१४ | ६.२८ | ६.२८ | ६.७२ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र. ४.४ मध्ये कोकण विभागातील दारिद्र्य रेषेखालील कुटंबे २००४–०५ मध्ये ४.३३ लाख इतकी असून २०१३–१४ मध्ये ६.७२ लाख इतकी झाल्याचे दिसून आले आहे. अभ्यासकाळात २.३९ लाख दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण ३६.३% वाढले आहे. रायगड जिल्ह्यात दारिद्र्याचे प्रमाण ७०.१% हे सर्वात कमी आहे. कोकण विभागातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे निकष वेगवेगळे आहेत. ठाणे जिल्ह्यात औद्योगिक विकास झाला असल्याने तेथे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदिवासी लोक आहेत. त्यांचे आजही राहणीमान परंपरागत पद्धतीचे आहे. रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील स्थानिक लोकांचे साधी जीवनशैली आहे. कृषी हे उत्पन्नाचे साधन असल्याने तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात राहत असलेल्या लोकांची संख्या अल्प असल्यामुळे तेथील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबेही अल्प आहेत. चारही जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विषमता आहे.ठाणे जिल्ह्यात औद्योगिक विकास झाले असल्याने संपूर्ण कोकणातून मुंबई, ठाणे याभागात रोजगारासाठी अनेक कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत.

**५) वीज वापरातील तफावत –**

वीज  हा आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. शेती, उद्योग, सेवा क्षेत्र आणि घरगुती कारणासाठी केलेला एकूण वीज वापर तक्ता क्रमांक ४.५ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्रमांक ४.५

## कोकणातील वीज वापरामधील तफावत

(दशलक्ष किलोवॅट ताशी)

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | **वीज वापर** | ५७४३ | ५४४७ | ६९११ | ६३८० | ७२३० | ७२५० | ७७५३ | ८५६८ | ९८३४ | ११०३० |
| | **टक्के** | (३६.१) | (३३.३) | (४४.१) | (३४.८) | (३५.७) | (३४.२) | (३५.७) | (३७.४) | (४२.२) | (४५.४) |
| **रायगड** | **वीज वापर** | २७४८ | ३३२९ | १५४० | ४०७४ | ४४९८ | ४८९२ | ४९७ | ३७८४ | २८७७ | २९५२ |
| | **टक्के** | (१७.२) | (२०.३) | (९.९) | (२२.१) | (२२.१) | (२३.२) | (२०.७) | (१६.१५) | (१२.३) | (१२.१) |
| **रत्नागिरी** | **वीज वापर** | ५८५५ | ५८६० | ५८६० | ६३१३ | ६९२२ | ७२२५ | ७६१६ | ८६३५ | ८३४१ | ८०३२ |
| | **टक्के** | (३६.८) | (३५.९) | (३७.३) | (३४.३) | (३४.१) | (३४.२) | (३५.४) | (३७.८) | (३५.९) | (३३.०) |
| **सिंधुदुर्ग** | **वीज वापर** | १५५८ | १६९३ | १३६० | १५९० | १६३६ | १७७६ | १८६२ | १९०६ | २२३८ | २२७६ |
| | **टक्के** | (९.९) | (१०.५) | (८.७) | (८.८) | (८.१) | (८.४) | (८.२) | (८.३) | (९.६) | (९.५) |
| **एकूण कोकण** | **वीज वापर** | १५९१४ | १६३२९ | १५६७१ | १८३५७ | २०२८६ | २११४३ | २१७२८ | २२८९३ | २३२९० | २४२९० |
| | **टक्के** | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक वीज वापरातील तफावतीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र. ४.५ मध्ये कोकणातील वीज वापरामधील तफावतीच्या अध्ययनातून असे आढळून आले की, २००४–०५ मध्ये एकूण १५९१४ दशलक्ष किलोवॅट ताशी इतका वीज वापर झाला असून २०१३–१४ मध्ये २४२९० वीज वापर झाल्याचे दिसून आले आहे. २०१३–१४ मध्ये ठाणे जिल्ह्यात ११०३० दशलक्ष किलोवॅट वीजेचा सर्वात जास्त वापर हातो. याचे कारण ठाण्यामध्ये उद्योग व व्यापार संख्या यांच्याकडून वीजेची मागणी जास्त आहे. तसेच शहरी भाग असल्याने घरगुती वापराच्या विजेलाही मागणी जास्त आहे. रायगड जिल्ह्यात विजेची मागणी उद्योग व घरगुती वापरासाठी वेगवेगळ्या प्रमाणात आहे. रायगडमधील डोंगराळ व ग्रामीण भागात काही ठिकाणी अजून वीजही पोहोचली नाही. रत्नागिरी जिल्ह्यात विजेचा वापर ८०३२ दशलक्ष किलोवॅट वीजेचा वापर होतो. रत्नागिरी जिल्ह्यात अनके आधुनिक उद्योग स्थापन झाले आहेत. या उद्योगांसाठी वीजेचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. ठाणे खालोखाल रत्नागिरीचा वीजवापर प्रमाण आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी २२७६ दशलक्ष किलोवॅट वीजेचा वापर केला जातो. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वीज कनेक्शन संख्या जास्त आहे. मात्र त्या वीजेचा अत्यंत अल्प वापर केला जातो. याचाच अर्थ वीज वापराचे प्रमाण सर्वत्र सारखे नाही. वीज वापराबाबतही कोकणात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे.

### ६) कोकणातील औद्योगिकक्षेत्रातील कारखाने व कामगार यातील तफावत –

कोकण विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रातील कार्यरत कारखान्यांचे वितरण असमान आहे. औद्योगिक क्षेत्रातील कार्यरत कारखाने ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी आहे. कोकण विभागातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे अध्ययन करण्यात आले आहे. औद्योगिक क्षेत्राला उपलब्ध होणारा कामगार वर्ग हा संपूर्ण महाराष्ट्र व राज्याबाहेरून आलेला आहे.सन २००४–०५ ते २०१४–१५ या काळातील कोकण विभागातील औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असणारे कारखाने व कामगारांची तफावत तक्ता क्रमांक ४.६ मध्ये दर्शविले आहेत.

## तक्ता क्रमांक ४.६

## औद्योगिक क्षेत्रातील कार्यरत कारखाने व कामगार यातील तफावत

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | कारखाने | ५८४२ | ५२.३२ | ६३६९ | ६९११ | ७२७३ | ६७०३ | ७३६० | ७५१० | ७९३८ | ७४०४ |
| | टक्के | (८०.८) | (७८.३) | (८०.९) | (८३.३) | (८३.४) | (८२.६) | (८०.९) | (७९.८) | (८२.२) | (८०.६) |
| | कामगार | १.५५ | १.७८ | १.८५ | १.९२ | २.२६ | २.२८ | १.९२ | १.२८ | १.७७ | ३.९९ |
| | टक्के | (६८.३) | (७०.१) | (६८.८) | (६९.०) | (७३.७) | (७१.८) | (६२.६) | (५१.२) | (६१.२) | (७७.८) |
| रायगड | कारखाने | १०१३ | १०६० | ११३३ | १००६ | १०३१ | १००६ | १३३५ | १४४४ | १२५१ | १२८० |
| | टक्के | (१३.९) | (१५.९) | (१४.३) | (१२.२) | (११.९) | (१२.३) | (१४.७) | (१५.३) | (१२.९) | (१३.९) |
| | कामगार | ०.५८ | ०.६३ | ०.७१ | ०.७२ | ०.६६ | ०.७२ | ०.९३ | १.०१ | ०.९१ | ०.९१ |
| | टक्के | (२५.६) | (२४.८) | (२६.३) | (२५.९) | (२१.४) | (२२.७) | (३०.२) | (४०.४) | (३१.४) | (१७.८) |
| रत्नागिरी | कारखाने | २७२ | २७३ | २७६ | २७६ | २८२ | २८२ | २८३ | ३३९ | ३९ | ३७४ |
| | टक्के | (३.७) | (४.०) | (३.५) | (३.३) | (३.२) | (३.४) | (३.१) | (३.६) | (०.४) | (४.०) |
| | कामगार | ०.१२ | ०.११ | ०.११ | ०.११ | ०.१३ | ०.१५ | ०.१८ | ०.१७ | ०.१८ | ०.१९ |
| | टक्के | (५.२) | (४.३) | (४.०) | (३.९) | (४.२) | (१.६) | (५.९) | (६.८) | (६.२) | (३.७) |
| सिंधुदुर्ग | कारखाने | ११२ | ११२ | १०३ | १०३ | १२५ | १२५ | १२५ | १२६ | १३३ | १३५ |
| | टक्के | (१.५) | (१.८) | (१.३) | (१.२) | (१.५) | (१.७) | (१.३) | (१.३) | (०.५) | (१.५) |
| | कामगार | ०.०२ | ०.०२ | ०.०२ | ०.०३ | ०.०२ | ०.०३ | ०.०४ | ०.०४ | ०.०३ | ०.०४ |
| | टक्के | (०.९) | (०.८) | (०.९) | (१.२) | (०.७) | (०.९) | (१.३) | (१.६) | (१.२) | (०.७) |
| एकूण कोकण | कारखाने | ७२३९ | ६६७७ | ७८८१ | ८२९६ | ८७११ | ८११६ | ९१०४ | ९४१९ | ९६६१ | ९१९३ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| | कामगार | २.२७ | २.५४ | २.६९ | २.७८ | ३.०७ | ३.१८ | ३.०७ | ३.०७ | २.८९ | ५.१३ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक औद्योगिक क्षेत्रातील कार्यरत कारखान्यांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र. ४.६ मध्ये कोकणातील औद्योगिक क्षेत्रातील कारखाने व कामगार यातील तफावतीचे अध्ययन करण्यात आले आहे. २००४–०५ मध्ये ७२३९ तर २०१३–१४ मध्ये ९१९३कारखाने कार्यरत असून अभ्यास काळात १९५४ कारखान्यांची वाढ झाली आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ठाणे जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. ठाणे जिल्ह्यात बाजारपेठ, बंदरे, दळणवळणाच्या जलद सोयी असल्यामुळे उद्योगांचे केंद्रीकरण झालेले दिसून येते. सर्वाधिक कारखाने ठाणे जिल्ह्यात आहेत. २००४–०५ ते २०१३–१४ या काळात १५६५ एवढी औद्योगिक कारखान्यांमध्ये वाढ झाली आहे. रायगड जिल्ह्याला मुंबई बाजारपेठ जवळ असल्याने औद्योगिक क्षेत्रांचा विकास झाला आहे. २००४–०५ ते २०१३–१४ या काळात रायगड जिल्ह्यात २६७ एवढ्याच कारखान्यांची वाढ झाली होती. रत्नागिरी जिल्ह्यात औद्योगिक कारखान्यांची संख्या २००४–०५ ते २०१३–१४ याकाळात १०२ नी वाढ झाली आहे. रत्नागिरी हा रासायनिक कारखान्यांचा विभाग आहे. येथे नवीन उद्योगांना स्थानिक लोकांकडून विरोध केला जात आहे. म्हणूनच या काळात औद्योगिक कारखान्यांची संख्या कमी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठे औद्योगिक कारखाने कमी आहेत. मात्र कुटीर उद्योग प्रमाण जास्त आहे. २००४–०५ ते २०१३–१४ या काळात सर्वात कमी केवळ २३ कारखाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात असल्याचे आढळून आले. यावरून उद्योगाचे केंद्रीकरण ठाणे जिल्ह्यात अधिकप्रमाणात झाल्याचे दिसून आले आहे. याशिवाय रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते.

कोकणातील औद्योगिक क्षेत्रात २००४–०५ मध्ये २.२७ लाख कामगार असून २०१३–१४ मध्ये ५.१३ लाख कामगार कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले. ठाणे जिल्ह्यात २००४–०५ ते २०१३–१४ या काळात औद्योगिक क्षेत्रातील कामगारात २.४४ लाख एवढी वाढ झाली होती. जिल्ह्यात औद्योगिक विकास झाला असल्यामुळे सर्वाधिक कामगार ठाणे जिल्ह्यात कार्यरत आहेत. रायगड जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ठाणे जिल्ह्यापेक्षा खूपच कमी आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात काम करणारे कामगार अल्प असल्याचे दिसून आले आहे.

### ७ ) कोकणातील मत्स्य उत्पादन –

कोकण किनारपट्टीचे मत्स्य उत्पादन हे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. मत्स्य व्यवसायामुळे अन्नाचा पुरवठा, रोजगार निर्मिती, दरडोई उत्पन्न यात वाढ होते. कोकणला लाभलेल्या समुद्रकिनाऱ्यामुळे मत्स्य व्यवसाय हा कोकणातील प्रमुख व्यवसाय आहे. कोकणात सागरी मत्स्य व्यवसाय व गोडा मत्स्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. त्यामुळे कोकणच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार आहे. कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चारही जिल्ह्यात मत्स्य उत्पादनात विषमता दिसून येते. याचाच अर्थ मत्स्य उत्पादनाच्या बाबतीत कोकण विभागात प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. कोकणातील मत्स्य उत्पादन तक्ता क्रमांक ४.७ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.७

**कोकणातील मत्स्य उत्पादन** **(मत्स्य उत्पादन लाख मे. टन)**

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | मत्स्य उत्पादन | १.६ | १.१२ | १.२१ | १.१४ | १.१९ | १.२१ | १.३७ | १.१७ | १.२३ | १.२० |
| | टक्के | (५३.०) | (५५.४) | (५१.४) | (४५.७) | (४८.८) | (४६.८) | (४४.९) | (४२.१) | (४३.९) | (४२.४) |
| रायगड | मत्स्य उत्पादन | ०.३९ | ०.४० | ०.४० | ०.३३ | ०.३३ | ०.३९ | ०.४८ | ०.४८ | ०.४२ | ०.४४ |
| | टक्के | (१९.५) | (१९.९) | (१७.०) | (१३.२) | (१३.५) | (१५.०) | (१५.८) | (१७.२) | (१५.०) | (१५.६) |
| रत्नागिरी | मत्स्य उत्पादन | ०.३४ | ०.३४ | ०.४८ | ०.८५ | ०.७२ | ०.७५ | ०.८८ | ०.८८ | ०.८८ | ०.९२ |
| | टक्के | (१७.०) | (१६.९) | (२०.४) | (३४.०) | (२९.५) | (२८.९) | (३१.४) | (३१.७) | (३१.४) | (३२.६) |
| सिंधुदुर्ग | मत्स्य उत्पादन | ०.२१ | ०.१६ | ०.२६ | ०.१९ | ०.२० | ०.२४ | ०.२५ | ०.२५ | ०.२७ | ०.२७ |
| | टक्के | (१०.५) | (७.८) | (११.२) | (७.१) | (८.२) | (९.३) | (७.९) | (९.०) | (९.७) | (९.४) |
| एकूण | मत्स्य उत्पादन | २.० | २.०२ | २.३५ | २.५ | २.४४ | २.५९ | २.७८ | २.७८ | २.८० | २.८३ |
| कोकण | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक कोकणातील मत्स्य उत्पादनाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.७ मध्ये कोकण विभागातील मत्स्य उत्पादनाचे अध्ययन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात मत्स्य उत्पादन २००४–०५ मध्ये १.०६ लाख मे. टन (५३.०%), २०१३–१४ मध्ये १.२० लाख मे. टन (४२.४%) उत्पादन करण्यात आले. संशोधन काळात मत्स्य उत्पादन ०.१४ लाख मे.टन इतकी वाढ झाल्याचे दर्शविले आहे.रायगड जिल्ह्यात मत्स्य उत्पादन २००४–०५ मध्ये ०.३९ लाख मे. टन (१९.५%), २०१३–१४ मध्ये ०.४४ लाख मे. टन (१५.६%) उत्पादन करण्यात आले. संशोधन काळात मत्स्य उत्पादनात ०.०५ लाख मे.टन इतकी वाढ झाली. रत्नागिरी जिल्ह्यात मत्स्य उत्पादन २००४–०५ मध्ये ०.३४ लाख मे.टन (१७.०%) इतके असून २०१३–१४ मध्ये ०.९२ लाख मे. टन (३२.६%) मत्स्य उत्पादन करण्यात आले. संशोधन काळात मत्स्य उत्पादनात ०.५८ लाख मे.टन इतकी वाढ झाली आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यात मत्स्य उत्पादन २००४–०५ मध्ये ०.२१ लाख मे.टन (१०.५%) इतके झाले असून २०१३–१४ मध्ये सर्वाधिक ०.२७ लाख मे. टन (९.४%)असल्याचे स्पष्ट झाले. अभ्यास काळात मत्स्य उत्पादनात केवळ ०.०६ लाख मे. टन इतकी वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोकणातील मत्स्य उत्पादन २००४–०५ मध्ये २.०० लाख मे.टन. वरून २०१३–१४ मध्ये २.८३ लाख मे. टन पर्यंत पोहोचले. सर्वाधिक मत्स्य उत्पादन २०१०–११ मध्ये ३.०५ लाख मे.टन करण्यात आले आहे. संशोधन काळात मत्स्य उत्पादनात ०.८३ लाख मे. टन इतकी वाढ झाली आहे. कोकणात मासेमारी व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची संख्या फार मोठी आहे. संशोधन काळात सर्वाधिक मत्स्य उत्पादन ठाणे जिल्ह्याचे ४२.४ टक्के एवढे आहे. ठाणे व रायगड जिल्ह्यात तळी तलावाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने या जिल्ह्यामध्ये गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय करण्यात येतो. रत्नाीगरी समुद्रकिनारी छोटी मोठी बंदरे आणि खाड्या असल्यामुळे मच्छीमारी हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. सिंधुदुर्ग हा सागरी जिल्हा असल्याने गोड्यापाण्यातील मत्स्य व्यवसायापेक्षा येथे सागरी मत्स्यव्यवसायाला जास्त वाव आहे. कोकणात या व्यवसायासाठी आधुनिक यंत्र यांचा वापर होत असला तरी मत्स्य उत्पादन वाढत नसल्याचे प्रकर्षाने जाणवते. याचे प्रमुख कारण म्हणजे माशांचा प्रजोत्पादन काळ, समुद्र नदी नाल्यात रासायनिक कारखान्यातील प्रदुषित पाणी पाण्याचा व्यास यांत्रिकी नौका, मासेमारी बंदरांची दुरावस्था ही आहेत. या कारणांनी रायगड,

सिंधुदुर्ग या जिल्ह्यात मत्स्य उत्पादनात अल्प वाढ होत असल्याचे आढळते. रत्नागिरी जिल्ह्यातील मत्स्य उत्पादनातील वाढ अधिक आहे. यावरून कोकणातील मत्स्य उत्पादनात असमतोल पहावयास मिळतो.

### ८) पशुधनाच्या बाबतीत कोकण विभागाची स्थिती –

शेती, शेतकरी आणि कोकणातील अर्थव्यवस्थेला उत्पन्न प्राप्त करून देणारा पशुधन हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. पशुंच्या उपलब्धतेमध्ये गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, बदके, बैल, इत्यादी प्रकारच्या पशुंचा समावेश होतो. कोकण विभागात पशुंची उपलब्धता विषम स्वरूपात आहे. कोकणातील पशुंची उपलब्धता तक्ता क्रमांक ४.८ मध्ये दर्शविली आहे.

.

## तक्ता क्रमांक ४.८

## कोकण विभागातील पशुधन उपलब्धतेतील तफावतीचे विश्लेषण

**(पशुंची संख्या हजारात)**

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | पशुंची संख्या | ७१५ | ७६८ | ७४३ | ७८५ | ८१३ | ८३७ | ९४६ | ९४१ | १९६ | ७२५ |
| | टक्के | (२९.२) | (३०.३) | (३१.१) | (३२.०) | (३१.९) | (३३.८) | (३६.६) | (३६.४) | (१०.६) | (३०.८) |
| रायगड | पशुंची संख्या | ७४० | ७६३ | ६३८ | ६७० | ७६२ | ६६२ | ६६२ | ६६१ | ६६२ | ६६२ |
| | टक्के | (३०.२) | (३०.१) | (२६.८) | (२७.३) | (२९.९) | (२६.८) | (२५.८) | (२५.६) | (३५.७) | (२८.२) |
| रत्नागिरी | पशुंची संख्या | ६२२ | ६२६ | ६२६ | ६२० | ६१८ | ६१८ | ६१८ | ६१८ | ६१८ | ६३८ |
| | टक्के | (२५.३) | (२४.८) | (२६.२) | (२५.२) | (२४.१) | (२४.८) | (२३.८) | (२३.९) | (३३.२) | (२७.१) |
| सिंधुदुर्ग | पशुंची संख्या | ३७२ | ३७२ | ३७८ | ३७८ | ३६२ | ३६२ | ३६२ | ३६२ | ३८२५ | ३२८ |
| | टक्के | (१५.३) | (१४.८) | (१५.९) | (१५.५) | (१४.१) | (१४.६) | (१३.८) | (१४.१) | (२०.५) | (१३.९) |
| एकूण कोकण | पशुंची संख्या | २४४९ | २५२९ | २३८५ | २४५३ | २५५५ | २४७९ | २५८८ | २५८३ | १८५८ | २३५३ |
| | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक पशुधन उपलब्धतेतील तफावतीच्या विश्लेषणाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.८ मध्ये, पशुधन उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात २००४–०५ मध्ये पशुधन ७१५ (२९.२%), २०१३–१४ मध्ये ७२५ (३०.८%) असून अभ्यास काळात केवळ १० हजार पशूंची वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

रायगड जिल्ह्यात २००४–०५ मध्ये पशूंची उपलब्धता ७४० (३०.२%), २०१३–१४ या काळात प्रत्येक ६६२ (२८.२%) पशुधन आहे. अभ्यासकाळात पशूंच्या संख्येत ७८ हजार इतकी वाढ झाली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात पशुंची उपलब्धता २००४–०५ मध्ये ६२२ (२५.३%), २०१३–१४ मध्ये ६३८ (२७.१%) असल्याचे दिसून आले आहे. अभ्यासकाळात पशुंची उपलब्धता १६ हजार इतकी वाढली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात पशुधन उपलब्धता २००४–०५ मध्ये २४४९ (१५.३%) , २०१३–१४ मध्ये २३५३ (१३.९%) इतकी झाली आहे. अभ्यास काळात पशुंची संख्या कमी झाली आहे.

कोकणात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. त्याला पुरक असा दुग्ध व्यवसाय कुक्कुटपालन व्यवसाय आहेत. कोकणातील हवामान दुग्ध व्यवसायाला पुरक आहे. कोकणात भरपूर पाऊस असला तरी पावसाळ्यानंतर हिरव्या चाऱ्याची चणचण भासते. सिंचनाखालील क्षेत्रामध्ये १०% क्षेत्र जर चारापिकासाठी आरक्षित ठेवले तर हिरव्या चाऱ्याचा प्रश्न सुटू शकेल. कोकणातील महिलांना दुग्ध व्यवसायापासूनच चांगली आर्थिक मदत होऊ शकते. यावरून कोकणातील चारही जिल्ह्यांमध्ये पशुंची उपलब्धता विषम असल्यामुळे दुग्धव्यवसायाचा विकास होवू शकला नाही. कुक्कुटपालन, शेळ्या मेंढ्या व्यवसायास लागणारे हवामान कोकणात नाही. त्यामुळे या व्यवसायाचे प्रमाण कमी आहे.

### ९) कोकणातील बँक सेवा क्षेत्रातील तफावत –

कोकण विभागातील २००४–०५ ते २०१३–१४ या काळातील बँक कार्यालयांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.९ मध्ये दर्शविले आहे. कोणत्याही विभागाच्या आर्थिक विकासामध्ये बँक क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोकणातील कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी कृषीला वित्त पुरवठा करणाऱ्या बँक सेवा हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे..

## तक्ता क्रमांक ४.९

## कोकणातील बँक सेवा क्षेत्रातील तफावत

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | **बँक कार्यालये** | ३३७ | ३३७ | ३९६ | ४७२ | ५१४ | ५९७ | ६५३ | ८१२ | ९२९ | १००७ |
| | **टक्के** | (३४.८) | (३४.२) | (३७.४) | (४१.६) | (४५.९) | (५१.२) | (५२.९) | (६०.३) | (५९.३) | (५७.७) |
| **रायगड** | **बँक कार्यालये** | २०० | २०९ | २२२ | २२४ | २२८ | २५३ | २६८ | २८१ | ३२८ | ३५१ |
| | **टक्के** | (२०.६) | (२१.३) | (२१.०) | (१९.८) | (२०.३) | (२१.८) | (२१.६) | (२०.९) | (२०.९) | (२०.१) |
| **रत्नागिरी** | **बँक कार्यालये** | २४५ | २५२ | २५२ | २५२ | १९२ | १२७ | १७ | १४५ | २३० | २६८ |
| | **टक्के** | (२५.२) | (२५.६) | (२३.९) | (२२.२) | (१७.१) | (१०.९) | (१.३) | (१०.७) | (१४.९) | (१५.३) |
| **सिंधुदुर्ग** | **बँक कार्यालये** | १८७ | १८७ | १८७ | १८७ | १८७ | १८८ | १८८ | १०८ | १०८ | १२२ |
| | **टक्के** | (१९.४) | (१८.९) | (१७.७) | (१६.४) | (१६.७) | (१६.१) | (१५.२) | (८.१) | (६.९) | (६.९) |
| **एकूण** | **बँक कार्यालये** | ९६९ | ९८५ | १०५७ | ११३५ | ११२१ | ११६५ | १२३६ | १३४६ | १५९५ | १७४८ |
| **कोकण** | **टक्के** | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

.* **स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक बँक सेवा क्षेत्रातील तफावतीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.९ मध्ये कोकणातील बँक कार्यालयांची उपलब्धता दर्शविली आहे.

ठाणे जिल्ह्यात बँकांची कार्यालये २००४–०५ या वर्षी ३३७(३४.८%),२०१३–१४ मध्ये १००७(५७.७%) आहेत. संशोधन काळात बँक कार्यालयांमध्ये ६७० इतकी वाढ झाली आहे.रायगड जिल्ह्यात २००४–०५ मध्ये २००(२०.६%) , २०१३–१४ मध्ये ३५१ (२०.१%) बँक कार्यालये असून अभ्यास काळात १५१ इतकी वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात बँकांची कार्यालये २००४–०५ मध्ये २४५ (२५.२%), २०१३–१४ मध्ये (१५.३%) आहेत. अभ्यास काळात बँकांची कार्यालये २३ इतकी वाढली आहेत.सिंधुदुर्ग जिल्ह्यात बँकांची कार्यालये २००४–०५ या काळात १८७ (१९.४%), २०१३–१४ मध्ये १२२(६.९%) असून अभ्यास काळात बँक कार्यालयांमध्ये ६५ इतकी घट झाली आहे.

कोकणात बँकांची कार्यालये २००४–०५ मध्ये ९६९ असून २०१३–१४ मध्ये १७४८ आहेत. सर्वाधिक कार्यालये २०१३–१४ वर्षी असल्याचे दिसून आले आहे. ठाणे जिल्ह्यात बँकांची सर्वाधिक कार्यालये असून त्यानंतर रायगड, रत्नागिरी यांचा क्रम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात बँक कार्यालये मात्र कमी होताना दिसतात. बँक सेवांचे प्रमाण ज्या ठिकाणी अल्प आहे तेथील शेतकऱ्यांना सावकारावर अवलंबून रहावे लागते. खरे तर बँकिंग क्षेत्र हे शहरी भागातच जास्त प्रमाणात विस्तारले आहे. ठाणे हे शहर आहे म्हणून तेथे बँकांची कार्यालये सर्वाधिक आहेत. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागात ही सेवा पोहोचली नाही. याठिकाणी बँकिंग सेवेचे प्रमाण अल्प आहे. यावरून स्पष्ट होते की, कोकणात बँकिंग सेवेमध्ये प्रादेशिक असमतोल आहे.

## १०) कोकण विभागातील डाक कार्यालये –

आर्थिक विकासातील एक महत्त्वाची पुर्वअट म्हणजे संपर्क साधनांची उपलब्धता होय. माहिती पाठविण्याचे एक महत्तवाचे साधन म्हणजे डाक होय. डाक सुविधा कोकण विभागात सर्वत्र सारख्या प्रमाणात निर्माण झाली नाही यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. अलिकडच्या काळात डाक खाते बँकांची सुविधा पोहोचत आहे. यामुळे विकासाच्या दृष्टीने डाक विभागाच्या सुविधेला महत्त्व प्राप्त झाले आहे. कोकण विभागातील जिल्हा निहाय डाक कार्यालये तक्ता क्रमांक ४.१० मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.१०

## कोकण विभागातील डाक कार्यालये

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | डाक कार्यालये | ३८५ | ३९० | ३९५ | ३९५ | ४०७ | ४२१ | ४१२ | ४१४ | ४२२ | ४०७ |
| | टक्के | (२१.३) | (२१.०) | (२१.३) | (२१.३) | (२१.९) | (२२.३) | (२१.९) | (२२.०) | (२२.२) | (२१.५) |
| रायगड | डाक कार्यालये | ३९० | ४३९ | ४३० | ४३० | ४३० | ४३९ | ४३९ | ४३९ | ४३९ | ४४६ |
| | टक्के | (२१.६) | (२३.६) | (२३.२) | (२३.२) | (२३.१) | (२३.२) | (२३.३) | (२३.३) | (२३.१) | (२३.५) |
| रत्नागिरी | डाक कार्यालये | ६६० | ६६० | ६६० | ६५६ | ६५६ | ६६३ | ६६३ | ६६० | ६६८ | ६७५ |
| | टक्के | (३६.५) | (३५.५) | (३५.५) | (३५.५) | (३५.३) | (३५.०) | (३५.२) | (३५.०) | (३५.२) | (३५.६) |
| सिंधुदुर्ग | डाक कार्यालये | ३७१ | ३७१ | ३७१ | ३६८ | ३६८ | ३६८ | ३६८ | ३६८ | ३६८ | ३६८ |
| | टक्के | (२०.६) | (१९.९) | (२०.०) | (२०.०) | (१९.७) | (१९.५) | (१९.६) | (१९.७) | (१९.५) | (१९.४) |
| एकूण | डाक कार्यालये | १८०६ | १८६० | १८५६ | १८४९ | १८६१ | १८९१ | १८८२ | १८८४ | १८९७ | १८९६ |
| कोकण | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* स्त्रोत– ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक डाक कार्यालयांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.१० मध्ये डाक कार्यालयांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.ठाणे जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ३८५(२१.३%), २०१३–१४ मध्ये ४०७(२१.५%) डाक कार्यालये अस्तित्त्वात आहेत. संशोधन काळात डाक कार्यालयांची संख्या २२ इतकी वाढ झाल्याचे दिसून येते.

रायगड जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ३९०(२१.६%), २०१३–१४ मध्ये ४४६(२३.५%) ही यावर्षी असल्याचे दिसून आले आहे. अभ्यासकाळात डाक कार्यालयात ५६ इतकी वाढ झाली आहे.रत्नागिरी जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ६६० (३६.५%), २०१३–१४ मध्ये ६७५(१०.१%) यावर्षी असल्याचे दिसून आले आहे. संशोधन काळात डाक कार्यालयांची केवळ १५ इतकी वाढ झाली आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यात २००४–०५ मध्ये सर्वाधिक ३७१(२०.६%) डाक कार्यालये असून २००७–०८ ते २०१३–१४ या काळात प्रत्येकी ३६८ (१९.४%) इतकी कार्यालये आहेत. संशोधन काळात डाक कार्यालयांची ०३ इतकी घट झाल्याचे दिसून आले आहे.

कोकणात २००४–०५ मध्ये डाक कार्यालये १८०६,सर्वात कमी असून सर्वात जास्त डाक कार्यालये २०१३–१४ मध्ये १८९६ असल्याचे दिसून आले असून संशोधन काळात केवळ ९० डाक कार्यालयांची वाढ झाली आहे. ही वाढ रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त आहे. आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी आहे. यावरून डाक कार्यालयांचे वितरण समान स्वरूपात नाही. यामुळे प्रादेशिक असमोतल निर्माण झाला आहे.

### ११) कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुविधाबाबतची स्थिती–

आरोग्य सेवेत प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, जिल्हा रूग्णालये, फिरता दवाखाना, अत्यधिुनिक भ्रमणध्वनी आरोग्यसेवा यांचा समावेश होतो. कोकण विभागात आरोग्य सेवेच्या उपलब्धतेबाबत अध्ययन करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.११ मध्ये दर्शविले आहे.
.

## तक्ता क्रमांक ४.११

## कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुविधाबाबतची स्थिती

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | आरोग्य केंद्रे | १०३ | १०३ | ११० | ११५ | ११५ | १२५ | १२५ | १८० | १८४ | १८६ |
| | टक्के | (४१.८) | (३९.९) | (४१.२) | (४१.९) | (४१.८) | (४४.३) | (४४.३) | (५३.५) | (५३.९) | (५४.२) |
| रायगड | आरोग्य केंद्रे | ४५ | ५२ | ५२ | ५४ | ५३ | ५२ | ५२ | ५२ | ५२ | ५२ |
| | टक्के | (१८.४) | (२०.२) | (१९.४) | (१९.८) | (१९.८) | (१८.४) | (१८.४) | (१५.४) | (१५.२) | (१५.१) |
| रत्नागिरी | आरोग्य केंद्रे | ६० | ६५ | ६७ | ६७ | ६७ | ६७ | ६७ | ६७ | ६७ | ६७ |
| | टक्के | (२४.३) | (२५.१) | (२५.२) | (२४.४) | (२४.५) | (२३.८) | (२३.८) | (१९.९) | (१९.८) | (१९.६) |
| सिंधुदुर्ग | आरोग्य केंद्रे | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ | ३८ |
| | टक्के | (१५.५) | (१४.८) | (१४.४) | (१३.९) | (१३.९) | (१३.५) | (१३.५) | (११.२) | (११.१) | (११.१) |
| एकूण | आरोग्य केंद्रे | २४६ | २५८ | २६७ | २७४ | २७३ | २८२ | २८२ | ३३७ | ३४१ | ३४३ |
| कोकण | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* स्त्रोत– ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधाबाबच्या स्थितीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र. ४.११ मध्ये कोकणातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सुविधाबाबतच्या स्थितीचे अध्ययन करण्यात आले आहे. कोकण विभागात सर्वाधिक प्राथमिक आरोग्य केंद्रे २०१३–१४ यावर्षी ३४३ असून सर्वात कमी २००४–०५ मध्ये २४६ असल्याचे दिसून आले आहे. कोकणामध्ये ग्रामीण भागात अजूनही प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. कोकणातील ग्रामीण भागात ही सेवा अपुरी असल्याने बालमृत्यू, कुपोषित बालके, रक्तपेढ्यांची कमतरता या समस्यांचे प्रमाण जास्त आहे. कोकण विभागात आरोग्य विषयक सेवांच्या बाबतीत शासनाच्या अनुशेषाचे प्रमाण इतर विभागापेक्षा कमी आहे. संशोधन काळात कोकणातील ठाणे जिल्ह्यात ८३ प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्वाधिक वाढ झाली आहे. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकही प्राथमिक आरोग्य केंद्र वाढले नाही. रायगड आणि रत्नागिरी याजिल्ह्यात प्रत्येकी ७ प्राथमिक आरोग्य केंदांची वाढ झाली आहे, यावरून कोकणातील प्रादेशिक असमतोल स्पष्ट होतो.

### १२) कोकण विभागातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती –

कोकण विभागातील शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना आहेत. शिक्षणाचा मुलभूत हक्क उपलब्ध करून देण्यासाठी प्राथमिक शाळेमार्फत दिले जाणारे शिक्षण महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात शासन आणि विविध संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथामिक शाळा आहेत. कोकणातील प्राथमिक शाळांची उपलब्धता तक्ता क्रमांक ४.१२ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

## तक्ता क्रमांक ४.१२

## प्राथमिक शाळांची उपलब्धता

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | प्राथमिक शाळा | ५३७० | ५४६० | ५४१० | ५५४० | ५६५५ | ५६८७ | ५७९४ | ५८१५ | ५८३ | ५७५६ |
| | टक्के | (४३.८) | (४४.०) | (४३.८) | (४३.९) | (४३.६) | (४३.२) | (४३.२) | (४३.३) | (४३.३) | (४२.१) |
| रायगड | प्राथमिक शाळा | २६४० | २६९१ | २६९१ | २७९० | ३०३७ | ३११० | ३१९० | ३२२ | ३३०३ | ३५३० |
| | टक्के | (२१.६) | (२१.८) | (२१.८) | (२२.१) | (२३.३) | (२३.७) | (२३.९) | (२४.३) | (२४.३) | (१५.९) |
| रत्नागिरी | प्राथमिक शाळा | २७३० | २७३५ | २७४३ | २७६५ | २७९५ | २८३५ | २८८२ | २८६९ | २८६३ | २८७२ |
| | टक्के | (२२.२) | (२२.०) | (२२.२) | (२१.९) | (२१.६) | (२१.६) | (२१.६) | (२१.३) | (२१.०) | (२१.९) |
| सिंधुदुर्ग | प्राथमिक शाळा | १५०५ | १५०९ | १५१५६ | १५१४ | १५१३ | १५१९ | १५१८ | १५१९ | १५३० | १४९३ |
| | टक्के | (१२.४) | (१२.२) | (१२.३) | (१२.१) | (११.५) | (११.५) | (११.३) | (११.१) | (११.४) | (१०.९) |
| एकूण | प्राथमिक शाळा | १२२४५ | १२३९५ | १२३६० | १२६०९ | १३००० | १३१५१ | १३३८४ | १३४२५ | १३५७९ | १३६५१ |
| कोकण | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

* स्त्रोत– ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक प्राथमिक शाळांच्या उपलब्धतेची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.१२ मध्ये प्राथमिक शाळांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण केले आहे. ठाणे जिल्ह्यात प्राथमिक शाळा २००४–०५ यावर्षी ५३७० (४३.८%), २०१३–१४ यावर्षी ५७५६ (४२.१%) आहेत. संशोधन काळात प्राथमिक शाळांमध्ये ३८६ इतकी वाढ झाली असल्याचे दिसून येते.

रायगड जिल्ह्यात २००४–०५ या वर्षी प्राथमिक शाळा २६४० (२१.६%) , २०१३–१४ या वर्षी ३५३० (२५.९%) आहेत. अभ्यासकाळात ८९० प्राथमिक शाळांची वाढ झाल्याचे दिसून येते. रत्नागिरी जिल्ह्यात प्राथमिक शाळा २००४–०५ मध्ये २७३० (२२.२%), २०१३–१४ मध्ये २८७२ (२१.१%) आहेत. संशोधन काळात प्राथमिक शाळांमध्ये १४२ इतकी वाढ झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राथमिक शाळा २००४–०५ मध्ये १५०५ (१२.४%), २०१३–१४ मध्ये १४९३ (१०.९%) आहेत. संशोधन काळात १२ प्राथामिक शाळांची घट झाल्याचे आढळून आले आहे.

कोकणात प्राथमिक शाळा २००४–०५ मध्ये १२२४५, २०१३–१४ मध्ये १३६५१ आहेत. संशोधन काळात १४०६ प्राथमिक शाळांची वाढ झाली. प्राथमिक शाळांबाबत शासनाचे धोरण सतत बदलते आहे. इंग्रजी माध्यमिक शाळांचा सर्व सोयी सुविधांसहित विकास होत आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासकीय प्राथमिक शाळांमधील पटसंख्या ही एक मोठी समस्या आहे म्हणूनच या जिल्ह्यातील शाळांचे प्रमाण कमी होत आहे. रायगड जिल्ह्यात प्राथमिक शाळा अधिक वाढल्या असून सिंधुदुर्ग मध्ये शाळा बंद होत असल्याने घट नोंदवली आहे. यावरून प्राथमिक शाळांचे प्रमाण असमान असल्याचे दिसून येते.

### १३) कोकण विभागातील महाविद्यालयांची संख्या –

आर्थिक विकासासाठी उच्च शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते. उच्च शिक्षण क्षेत्रात वैद्यकिय अभियांत्रिकी कायदा, प्रशिक्षण आणि पारंपरिक महाविद्यालयांचा समावेश होतो. कोकण विभागातील ठाणे , रायगड रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पारंपारिक महाविद्यालयांच्या उपलब्धतेमध्ये विषमता आहे. शैक्षणिक प्रगतीसाठी कोकण विभागात कला, वाणिज्य व विज्ञान ही पारंपारिक महाविद्यालये सुरू केली आहेत. महाविद्यालयांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ४.१३ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ४.१३

## महाविद्यालयांची उपलब्धता

| जिल्हे | तपशिल | २००४–०५ | २००५–०६ | २००६–०७ | २००७–०८ | २००८–०९ | २००९–१० | २०१०–११ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | महाविद्यालये | ६५ | ७६ | ८७ | ९५ | १०२ | १०२ | ९६ | १०१ | ११० | १४९ |
| | टक्के | (५२.९) | (५३.१) | (५५.४) | (५३.०) | (५३.४) | (५१.०) | (४९.०) | (४६.५) | (५१.१) | (५७.७) |
| रायगड | महाविद्यालये | ३० | ३४ | ३४ | ३८ | ३९ | ४१ | ४१ | ४७ | ३७ | ३९ |
| | टक्के | (२४.०) | (२३.७) | (२१.६) | (२१.२) | (२०.४) | (२०.५) | (२०.९) | (२१.६) | (१७.२) | (१५.१) |
| रत्नागिरी | महाविद्यालये | १९ | २२ | २३ | २९ | ३१ | ३६ | ३३ | ४४ | ४६ | ४९ |
| | टक्के | (१५.२) | (१५.३) | (१४.६) | (१६.२) | (१६.२) | (१८.०) | (१६.८) | (२०.८) | (२१.३) | (१९.०) |
| सिंधुदुर्ग | महाविद्यालये | ११ | ११ | १३ | १७ | १९ | २१ | २६ | २५ | २२ | २१ |
| | टक्के | (८.८) | (७.९) | (८.४) | (९.६) | (१०.५) | (१०.५) | (१३.३) | (११.७) | (१०.४) | (८.२) |
| एकूण | महाविद्यालये | १२५ | १४३ | १५७ | १७९ | १९१ | २०० | १९६ | २१७ | २१५ | २५८ |
| कोकण | टक्के | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |

*** स्त्रोत–** ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन (२००४–०५ ते २०१३–१४)

टीप – कंसातील अंक महाविद्यालयाच्या उपलब्धतेची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ४.१३ मध्ये कोकणातील महाविद्यालयांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ६५ (५२.०%), २०१३–१४ मध्ये १४९ (५७.७%) महाविद्यालये आहेत. संशोधन काळात ८४ महाविद्यालयांची वाढ झाल्याचे स्पष्ट होते.रायगड जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ३०(२४.०%), २०११–१२ मध्ये सर्वाधिक ४७ (२१.६%) महाविद्यालये आहेत संशोधन काळात ०९ महाविद्यालयांची वाढ झाल्याचे दिसून आले आहे.रत्नागिरी जिल्ह्यात २००४–०५ मध्ये १९ (१५.२%), २०१३–१४ मध्ये ४९ (१९.०%) आहेत. संशोधन काळात ३० महाविद्यालयांची वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

सिंधदुर्ग जिल्ह्यात २००४–०५ मध्ये ११(८.८%) महाविद्यालये असून सर्वाधिक महाविद्यालये २०१०–११ मध्ये २६ (१३.३%) आहेत. संशोधन काळात महाविद्यालयांमध्ये १० इतकी वाढ झाली आहे.कोकणात २००४–०५ मध्ये १२५ महाविद्यालये असून सर्वाधिक महाविद्यालये २०१३–१४ मध्ये २५८ आहेत. संशोधन काळात १३३ महाविद्यालयांची वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यात वैद्यकीय अभियांत्रिकी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाणिज्य या सर्वच शाखांच्या महाविद्यालयात वाढ झाली आहे. मात्र रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात वैद्यकीय अभियांत्रिकी औद्योगिक प्रशिक्षण संस्था या संस्थांची संख्या अत्यंत अल्प आहे. अजुनही ग्रामीण भागात या शैक्षणिक सुविधा पुरेशा प्रमाणात पोहोचल्या नसल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे.

## ४.६ मूल्यमापन

प्रादेशिक असमतोल हा राज्यांतर्गत आहे. कोकण विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातही असमतोल आहे. ठाणे हा जिल्हा औद्योगिकदृष्ट्या विकसित आहे. तर रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे जिल्हे नैसर्गिक वैभवसृष्टीने विकसित आहे. या चार जिल्ह्यातील विरोधाभासामध्येच असमतोल पहावयास मिळतो. आर्थिक व सामाजिक असमतोलाच्या सिद्धांतामध्ये अनेक अर्थतज्ञांनी असमतोलाचे समर्पकपणे विश्लेषण केले आहे. हे सिद्धांत असमतोल दूर करण्यास उपयुक्त ठरतात. कोकण विभागात आर्थिक व सामाजिक असमतोलात तफावत असल्याचे आढळते. लोकसंख्या, दरडोई उत्पन्न, दारिद्र्य, रोजगार, या

आर्थिक घटकांमध्ये चारही जिल्ह्यांमध्ये तफावत आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये आर्थिक घटक विकसित आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये हे घटक मागासलेल्या अवस्थेत आहेत. वीज, बँक सेवा, डाक कार्यालय, आरोग्य सेवा, शिक्षण या सामाजिक घटकातही असमतोल आहे. ठाणे जिल्ह्यात सामाजिक घटकांचा विकास झाला आहे. तर रायगड जिल्ह्यात कमतरता पहावयासम मिळते.

कोकणातील कृषी व्यवसाय व त्यावर आधारित असलेले फळ प्रक्रिया उद्योग, पशुव्यवसाय यातील असमतोल दूर करण्यासाठी पावसाच्या पाण्याचे नियोजन करणे व सिंचन सुविधा उपलब्ध करून हा असमतोल दूर करता येईल. कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मत्स्य उत्पादन केले जाते. त्यातून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. खूप मोठा समाज या व्यवसायत गुंतलेला आहे. यातील असमतोल दूर करण्यासाठी या क्षेत्रात आधुनिक यंत्रांचा वापर करणे आवश्यक आहे. ठाणे जिल्ह्यापेक्षा रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यात निसर्गसृष्टी विपुल आहे. याठिकणी पायाभूत सुविधा निर्माण  करून पर्यटन स्थळी विकसित केली तर असमतोल दूर करण्यास मदत होईल. कोकणात साक्षरता जास्त पहावयास मिळते. मात्र उच्च शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. शैक्षणिक सुविधांमध्येही असमतोल आहे. कोकणातील लोकांना आरोग्य सुविधेसाठी मुंबई, ठाणा यावर अवलंबून रहावे लागते. याही क्षेत्रात समतोल गुंतवणूक होणे गरजेचे आहे. वरील सर्व घटकांतील असमतोल दूर करण्यासाठी पायाभूत सोयीसुविधा, रोजगार, यांत गुंतवणूक करणे आवश्यक आहे. मात्र हे करण्यासाठी कोकणातील राजकीय इच्छाशक्ती प्रबळ असणे गरजेचे आहे. यासर्व प्रयत्नांतूनच कोकणातील आर्थिक व सामाजिक असमतोल निश्चितच कमी होईल.

# संदर्भसूची


१) कद्रेकर श्रीरंग(२३ मार्च २०१५), 'कोकणचं पाणी समस्या आणि उपाय', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १३ ते १५

२) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, ठाणे जिल्हा (२०११), 'जिल्हा सांख्यिकी कार्यालय' अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, पृष्ठ क्र. १ ते १६

३) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, रायगड जिल्हा (२०११), 'जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, पृष्ठ क्र. १ ते १५

४) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, रत्नागिरी जिल्हा(२०११), 'जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, पृष्ठ क्र. १ ते १८

५) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, सिंधुदुर्ग जिल्हा, (२०११), 'जिल्हा सांख्यिकी कार्यालय अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन नियोजन विभाग , पृष्ठ क्र. १ ते १३

६) खंदारे सुखदेव (प्रथमावृत्ती २०१३), 'आर्थिक व सामाजिक विकास' दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, पृष्ठ क्र. १०९

७) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग (२००४–०५ ते २०१३–१४) वार्षिक अंक पृष्ठ क्र. १ ते २१०

## प्रकरण पाचवे

# कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचे विश्लेषण

### ५.१ प्रस्तावना –

प्रादेशिक असमतोल समस्या विभागापुरती नसून तिचे अस्तित्त्व राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर आहे. अमेरिका, इटली, इंग्लंड, स्पेन हे देशसुद्धा त्याला अपवाद नाहीत. हे विविध अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे. राज्यामध्ये प्रदेशांमध्ये काही मुलभूत कारणांमुळे उदा. नैसर्गिक संपत्ती, जमीन, भांडवल, तंत्रज्ञान आणि उद्योजकता यातील तफावतीमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. प्रदेशाचा समान विकास न होणे म्हणजेच प्रादेशिक असमतोल होय. उपलब्ध नैसर्गिक आणि मानवी संपत्तीचा वापर न झाल्याने वेगवेगळ्या विभागामध्ये आर्थिक विकासाची प्रक्रिया समान नसते. यामुळे असमतोल दिसून येतो. प्रादेशिक असमतोल योग्य आर्थिक धोरणे राबवून कमी करणे शक्य असते.

कोकणातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी नमुना कुटंब प्रमुख, कृषी अधिकारी, उद्योजक यांच्या कडून संकलित केलेली माहिती उपयुक्त ठरणार आहे. संकलित माहितीचे प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप करताना तक्ते, आलेख, साधी सरासरी पद्धती, टक्केवारी यांचा वापर करून विश्लेषण स्पष्ट करता येईल. प्रादेशिक असमतोलाचे मोजमाप करताना वापरण्यात येणाऱ्या निकषांच्या साहाय्याने कुटुंबप्रमुखांसाठी प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यामागची कारणे, उत्पन्नातील तफावत, भौतिक सुविधांमधील तफावत, पायाभूत सुविधा, कृषि व उद्योगक्षेत्र मागासलेपणा, उद्योगातून रोजगार निर्मिती या प्रादेशिक असमतोलाच्या घटकांचे अध्ययन करण्यात आले आहे. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी दिलेल्या उपाययोजना यांचे सुक्ष्म विश्लेषण मांडले आहे,

## ५.२ कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषण –

कोकण विभागातील सर्वेक्षित ४४० कुटुंब प्रमुखांकडून वैयक्तिक पायाभूत सोयी, शिक्षण, कृषी, उद्योग, आरोग्य विषयक माहिती गोळा केली आहे. ११ कृषी अधिकाऱ्यांकडून मागासलेपणाबद्दल माहिती गोळा केली आहे. १० उद्योजकांकडून उद्योगांसाठी गुंतवणूक क्षेत्रांबद्दल माहिती जमा केली आहे. सदर माहितीचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### ५.२.१ कुटुंबप्रमुखांनी दिलेली माहितीचे विश्लेषण –

सर्वेक्षित कोकणातील ४४० कुटुंबप्रमुखांनी प्रवर्ग निहाय, वयोगट, शैक्षणिक पातळी, राहण्याची सुविधा, पिण्याचे पाणी, भौतिक सुविधा, शेती व्यवसाय, उत्पन्नाचे स्त्रोत, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, सर्वाधिक गुंतवणुक, रोजगार, स्थलांतर, शेती मागासलेपणा व त्याची कारणे, परिसराचा मागासलेपणा व त्याची कारणे इत्यादि बाबींचे विविचन खालील प्रमाणे विशद करता येईल.

**१) कुटुंब निहाय माहितीचे विवेचन :** कोकण विभागातील सर्वेक्षित कुटुंबांचे प्रवर्गनिहाय वर्गीकरण तक्ता क्र.५.१ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.१**

**नमुना कुटुंब प्रमुखांचे प्रवर्ग निहाय वर्गीकरण**

| जिल्हे | खुला | इतर मागासवर्ग | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटके विमुक्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | २१ (२६.३) | ०९ (११.२) | १० (१२.५) | ३२ (४०.०) | ०८ (१०.०) | ८० (१००) |
| **रायगड** | ३० (१८.८) | ५२ (३२.५) | ५९ (३६.८) | १३ (८.३) | ०६ (३७.६) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | ३४ (२८.३) | ४६ (३८.३) | १७ (१४.१) | २१ (१७.६) | ०२ (१.७) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | २० (२५) | १८ (२२.५) | २७ (३३.८) | १० (१२.५) | ०५ (६.२) | ८० (१००) |
| **एकूण** | १०५ (२३.८) | १२५ (२८.४) | ११३ (२५.६) | ७६ (१७.४) | २१ (४.८) | ४४० (१००) |


*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक प्रवर्गाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१ मध्ये कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी निवडलेल्या नमुान ४४० कुटुंबप्रमुखांचे प्रवर्गनिहाय अध्ययन करण्यात आले आहे. कोकण विभागातील नमुना ४४० कुटुंबांपैकी इतर मागासवर्गाय संख्या सर्वात जास्त २८.४% आहे. त्या पाठोपाठ अनुसूचित जाती जमातींची संख्या २५.६% आहे. भटके विमुक्त प्रवर्गांची संख्या ४.८% अशी सर्वात कमीआहे. सर्वेक्षित कुटुंबामध्ये सर्वाधिक कुटुंबे इतर मागासवर्ग आणि त्या खालोखाल अनुसूचित जातीमधील असल्याचे दिसून येते.

**आलेख क्रमांक ५.१**

**नमुना कुटुंब प्रमुखांचे प्रवर्ग निहाय वर्गीकरण**




**२)कोकण विभागातील कुटुंबांची वयोगटाबाबतची माहिती –**

कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या अध्ययनासाठी एकूण व्यक्तींच्या वयोगटाचा आधार घेतला आहे. नमुना कुटुंबातील एकूण लोकसंख्येचे केलेले वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.२ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.२

## नमुना कुटुंबातील एकूण व्यक्तींचे वयोगटानुसार वर्गीकरण

| जिल्हे | ० ते १४ | | एकूण | १५ ते ५९ | | एकूण | ६० च्या पुढे | | एकूण | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरूष | | स्त्री | पुरूष | | स्त्री | पुरूष | | स्त्री | पुरूष | |
| ठाणे | ४८ | ५७ | १०५ | ५२ | ६३ | ११५ | ५२ | ८४ | १३६ | १५२ | २०४ | ३५६ |
| | (१३.५) | (१६.१) | (२९.६) | (१४.६) | (१७.६) | (३२.२) | (१४.६) | (२३.६) | (३८.२) | (४२.७) | (५७.३) | (१००) |
| रायगड | १०३ | ९७ | २०० | १११ | १३५ | २४६ | ८४ | ९७ | १८१ | २९८ | ३२९ | ६२७ |
| | (१६.४) | (१५.४) | (३१.८) | (७.८) | (२१.६) | (२९.४) | (१३.४) | (१५.४) | (२८.८) | (४७.६) | (५२.४) | (१००) |
| रत्नागिरी | ७२ | ७४ | १४६ | ८७ | ९५ | १८२ | ६८ | ८१ | १४९ | २२७ | २५० | ४७७ |
| | (१५) | (१५.६) | (३०.६) | (१८.३) | (१९.९) | (३८.२) | (१४.३) | (१६.९) | (३१.२) | (४७.६) | (५२.४) | (१००) |
| सिंधुदुर्ग | ८९ | ९१ | १८० | ४६ | ६७ | ११३ | ३१ | ५१ | ८२ | १६६ | २०९ | ३७५ |
| | (२३.८) | (२४.२) | (४८) | (१२.२) | (१७.९) | (३०.१) | (८.२) | (१३.७) | (२१.९) | (४४.२) | (५५.८) | (१००) |
| एकूण | ३१२ | ३१९ | ६३१ | २९६ | ३६० | ६५६ | २३५ | ३१३ | ५४८ | ८४३ | ९९२ | १८३५ |
| | (१७) | (१७.३) | (३४.३) | (१६.१) | (१९.७) | (३५.८) | (१२.९) | (१७) | (२९.९) | (४६) | (५४) | (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण


टीप – कंसातील अंक वयोगटानुसार एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.२ मध्ये कोकण विभागातील नमुना निवड केलेल्या कुटुंबातील एकूण व्यक्तीचे वयोगटानुसार अध्ययन करण्यात आले आहे.

नमुना कुटुंबातील एकूण १८३५ व्यक्तींपैकी स्त्रिया ८४३ (४६.०%) आणि पुरूष ९९२(५४.०%) आहेत. ० ते १४ वयोगटात स्त्रिया ३१२ (१७.०%) आणि पुरूष ३१९(१७.३%) आहेत. १५ ते ५९ या वयोगटात स्त्रिया २९६(१६.१%) आणि पुरूष ३६०(१९.७%) आहेत. ६० च्या पुढील वयोगटात स्त्रिया २३५ (१२.९%) आणि पुरूष ३१३ (१७.०%) असल्याचे दिसून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, रायगड जिल्ह्यात स्त्री आणि पुरूष यांचे प्रमाण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक आहे, ठाणे जिल्ह्यात स्त्री–पुरूषांचे प्रमाण कमी दिसते.

**आलेख क्रमांक ५.२**

**नमुना कुटुंबातील एकूण व्यक्तींचे वयोगटानुसार वर्गीकरण**




**३) कोकण विभागातील शैक्षणिक पातळीचे विश्लेषण :**

शैक्षणिक पातळीमध्ये प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, पदवी, तंत्र व व्यावसायिक शिक्षण यांचा समावेश असून कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेतले नाही असे निरक्षर या गटात समाविष्ट आहेत. शैक्षणिक स्तराच्या माध्यमातून शक्षैणिक असमतोल दिसून येतो. कोकण विभागातील एकूण लोकसंख्येचे शैक्षणिक पातळीनुसार केलेले वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.३ मध्ये दर्शविले आहे. .

## तक्ता क्रमांक ५.३

## कोकण विभागातील शैक्षणिक पातळीचे विश्लेषण

| जिल्हे | निरक्षर | | | प्राथमिक | | | माध्यमिक | | | पदवी | | | तंत्र / व्यावसायिक शिक्षण | | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष | |
| ठाणे | ४८<br>(१३.५) | ६८<br>(१९.९) | ११६<br>(३२.५८) | ३७<br>(१०.३) | ४७<br>(१३.२) | ८४<br>(२३.६०) | ३९<br>(१०.९) | ४१<br>(११.६) | ८०<br>(२२.४७) | १६<br>(४.४) | ३५<br>(९.८) | ५१<br>(१४.३३) | १२<br>(३.५) | १३<br>(३.६) | २५<br>(७.०२) | १५२<br>(४२.७) | २०४<br>(५७.३) | ३५६<br>(१००) |
| रायगड | ८४<br>(१३.३) | ७८<br>(१२.४) | १६२<br>(२५.८४) | ८३<br>(१३.) | ९६<br>(१५.३) | १७९<br>(२८.५५) | ८१<br>(१२.९) | ९४<br>(१४.९) | १७५<br>(२७.९१) | ३१<br>(४.९) | ३७<br>(५.९) | ६८<br>(१०.८५) | १९<br>(३.३) | २४<br>(३.९) | ४३<br>(६.८६) | २९८<br>(४७.६) | ३२९<br>(५२.४) | ६२७<br>(१००) |
| रत्नागिरी | ४६<br>(९.७) | ४७<br>(९.९) | ९३<br>(१९.५०) | ५४<br>(११.३) | ६४<br>(१३.४) | ११८<br>(२४.७४) | ६८<br>(१४.२) | ७३<br>(१५.३) | ११४<br>(२९.५६) | ३६<br>(७.६) | ३९<br>(८.२) | ७५<br>(१५.७२) | २३<br>(४.८) | २७<br>(५.६) | ५०<br>(१०.४८) | २२७<br>(४७.६) | २५०<br>(५२.४) | ४७७<br>(१००) |
| सिंधुदुर्ग | ३९<br>(१०.५) | ६३<br>(१६.८) | १०२<br>(२७.२०) | ८४<br>(२२.४) | ९२<br>(२४.५) | १७६<br>(४६.९३) | २७<br>(७.२) | ३६<br>(९.६) | ६३<br>(१६.८०) | ०७<br>(१.७) | १०<br>(२.८) | १७<br>(४.५३) | ०९<br>(२.४) | ०८<br>(२.१) | १७<br>(४.५३) | १६६<br>(४४.२) | २०९<br>(५५.८) | ३७५<br>(१००) |
| एकूण | २१७<br>(११.९) | २५६<br>(१३.९) | ४७३<br>(२५.७८) | २५८<br>(१४.०) | २९९<br>(१६.२) | ५५७<br>(३०.३५) | २१५<br>(११.८) | २४४<br>(१३.२) | ४५९<br>(२५.०१) | ९०<br>(४.९) | १२१<br>(६.६) | २११<br>(११.५०) | ६३<br>(३.४) | ७२<br>(४.१) | १३५<br>(७.३६) | ८४३<br>(४६.०) | ९९२<br>(५४.०) | १८३५<br>(१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शैक्षणिक स्तरानुसार एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.३ मध्ये कोकण विभागातील नमुना कुटुंबातील एकूण व्यक्तींचे शैक्षणिक स्तरानुसार वर्गीकरण केले आहे.

कोकण विभागात एकूण १८३५ व्यक्तींपैकी २५.८% व्यक्ती निरक्षर आहेत. निरक्षरतेचे प्रमाण ठाणे जिल्ह्यात ३२.६%, सर्वात कमी रत्नागिरी जिल्ह्यात १९.५% अहाढळून आले. कोकणातील ३०.३% व्यक्ती प्राथमिक शिक्षण पूर्ण केले असून २५.०१% व्यक्तींनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. पदवी शिक्षण घेतलेले ११.५% व्यक्ती, तंत्र व व्यवसाय शिक्षण घेतलेले ७.४% व्यक्ती असल्याचे आढळून आले, यावरून असे स्पष्ट होते, कोकणात निरक्षर व्यक्ती प्रमाण अधिक असून प्राथमिक आणि माध्यमिक पर्यंत शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. पदवी आणि तंत्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे प्रमाण खूपच कमी आहे, कारण उच्च व तंत्रशिक्षणाचा खर्च आर्थिकदृष्ट्या जास्त आहे. त्यामुळे कोकणातील व्यक्तींचे प्राथमिक आणि माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेण्याचे प्रमाण अधिक दिसून येते. कुटुंबातील आर्थिक सामाजिक परिस्थितीचा विचार करता उच्च शिक्षणाला फारसे प्राधान्य दिले जात नाही. कारण दहावी व बारावी नंतर लगेचच रोजगाराच्या शोधासाठी मुंबई व ठाणे या शहरी भागात कुटुंबातील तरूण व्यक्ती स्थलांतरीत होते. तसेच कौटुंबिक व सभोवतालचे वातावरणही उच्च शिक्षणाकडे जाण्यास प्रेरित करणारे नाही.

**४ )कुटुंबाच्या राहण्याच्या सुविधाबाबतची माहिती –**

प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी निवासाची सुविधा महत्त्वाची मानली आहे. कोकणातील घरांची सुविधा, घरांचा प्रकार, मालकी हक्क याबाबत प्रत्येक जिल्ह्यात तफावत दिसून येते. यावरून राहणीमानाच्या स्तराची कल्पना लक्षात येते. कुटुंबप्रमुखांच्या राहत्या घराच्या मालकीबाबतचे अध्ययन करण्यात आले आहे. घरांचे स्वरूप, प्रकार यांचे वर्गीकरण तक्ताक्रमांक ५.४ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.४

## कुटुंबाच्या राहण्याच्या सुविधाबाबतची माहिती


| जिल्हे | स्वत:च्या मालकीचे घर | | एकूण | घराचे स्वरूप | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे | नाही | | स्लॅबचे | पत्र्याचे | कौलारू | एकूण |
| **ठाणे** | ७२ (९०.०) | ०८ (१०.०) | ८० (१००) | ०८ (१०.०) | ०९ (११.२) | ६३ (७८.८) | ८० (१००) |
| **रायगड** | १५५ (९६.८) | ०५ (३.२) | १६० (१००) | ०२ (१.२) | ४५ (२८.१) | ११३ (७०.७) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | १११ (९२.५) | ०९ (७.५) | १२० (१००) | ०९ (७.६) | ३२ (२६.७) | ७९ (६५.७) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | ७४ (९२.५) | ०६ (७.५) | ८० (१००) | ०८ (१०.०) | १७ (२१.२) | ५५ (६८.८) | ८० (१००) |
| **एकूण** | ४१२ (९३.६) | २८ (६.४) | ४४० (१००) | २७ (६.१) | १०३ (२३.४) | ३१० (७०.५) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण
टीप – कंसातील अंक राहण्याच्या सुविधेबाबत एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.४ मध्ये कोकण विभागातील राहत्या घर सुविधा बाबतीत अध्ययन करण्यात आले आहे. सर्वेक्षित कुटुंबापैकी ९३.६% कुटुंबांकडे स्वतःचे मालकीचे राहते घर आहे तर ६.४% कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीचे घर नाही. कोकणातील नैसर्गिक परिस्थिती पाहता कोकणात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे कोकणातील सर्व घरांची रचना उतरत्या छपराची असते. कोकणात ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त कौलारू घरे आहेत तर रायगड जिल्ह्यात स्लॅबची १.२% सर्वात कमी घरे आहेत. यावरून असे स्पष्ट झाले की सर्वेक्षित कुटुंबांमध्ये मध्यम वर्गीय कुटुंबांची घरे कौलारू आहेत. गरीब कुटुंबांची घरे पत्र्याची आहेत तसेच समाजातील सदन कुटुंबांची घरे स्लॅबची आहेत.

## आलेख क्रमांक ५.३

## कुटुंबाच्या राहण्याच्या सुविधाबाबतची माहिती




### ५) घरातील खोल्यांची उपलब्धता –

कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या अध्ययनासाठी नमुना निवडलेल्या कुटुंब प्रमुखांकडे घरात उपलब्ध असणाऱ्या खोल्यांची माहिती संकलित केली. निवडलेल्या ४४० कुटुंबप्रमुखांमध्ये ३ पेक्षा आधिक खोल्या असलेले कुटुंबे १०.७% आह, ३ खोल्या असलेले कुटुंबे ५७.६% आहेत. २ खोल्या असलेले कुटुंबे २३.७% आहे तर १ खोली असलेले कुटुंबे ८.०% आहेत. रायगड जिल्ह्यात ३ पेक्षा जास्त खोल्या असलेले प्रमाण सर्वात जास्त म्हणजे १३.१% आहे तर सर्वात कमी सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८.८% आहे. दोन खोल्यांचे प्रमाण सर्वात जास्त ठाणे जिल्ह्यात २६.२% आहे. २ व १ खोल्यांचे प्रमाण सर्वात कमी रायगड जिल्ह्यात आहे. यावरून स्पष्ट होते की कोकणात आजही एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय ज्या कुटुंबांकडे आहे तिथे ३ व ३ पेक्षा अधिक खोल्या असलेल्या पहावयास मिळाल्या.

### ६) पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेची माहिती –

स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हा एक महत्वाचा निकर्ष प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी वापरला जातो. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्रमुख काम आहे. कोकण विभागातील

कुटुंब प्रमुखांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणाऱ्या स्त्रोतांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.५ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.५**
**पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतची माहिती**

| जिल्हे | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | नळ | सार्वजनिक विहार | नदी | |
| **ठाणे** | ५३ (६६.२) | २१ (२६.२) | ०६ (७.६) | ८० (१००) |
| **रायगड** | ११८ (७३.८) | १० (६.२) | ३२ (२०.०) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | ७५ (६२.६) | ३४ (२८.३) | ११ (९.१) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | ५५ (६५.८) | १७ (२१.२) | ०८ (१०.०) | ८० (१००) |
| **एकूण** | ३०१ (६८.४) | ८२ (१८.७) | ५७ (१२.९) | ४४० (१००) |

* **स्त्रोत –** सर्वेक्षण


टीप – कंसातील अंक पाण्याच्या उपलब्धतेबाबतची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.५ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतेचे अध्ययन करण्यात आले आहे. कोकणातील सर्वाधिक सर्वेक्षित ६८.४% कुटुंबांना पिण्याचे पाणी नळाद्वारे उपलब्ध झाले आहे. सार्वजनिक विहीरीद्वारे १८.७% कुटुंबांना आणि नदीद्वारे १२.९% मिळत असल्याचे दिसून आले आहे. रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त कुटुंबांना नळाद्वारे व नदीद्वारे पाणी उपलब्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सार्वजनिक विहीरीद्वारे सर्वात जास्त कुटुंबांना पाणी प्राप्त झाले आहे. याचे खरे कारण युतीसरकारने १९९५ ते १९९९ या काळात 'नळपाणी योजना' राबविली होती. या योजनेमध्ये १०% खर्च ग्रामपंचायती व ९०% खर्च राज्यशासनाने करणे अशी होती.

ही योजना यशस्वीपणे राबविली गेली त्यामुळेच बहुसंख्य गावांमधील कुटुंबांकडे नळपाणी योजना पोहचली आहे. कोकणात एक वाडी – एक विहीर अशी योजना पूर्वीपासूनच आहे. त्यामुळे काही भागात आजही सार्वजनिक विहीरीद्वारे वाडीतील सर्व कुटुंबांना पाणी मिळते. कोकणात नद्यांचे प्रमाण कमी आहे तसेच मोठी नदी नाही गावातील लहान नदींमधील पाणी जानेवारी नंतर कमी झालेले असते. त्यामुळे काही भागात जानेवारी ते मे या कालावधीत तीर्व पाणी टंचाई असते.

**आलेख क्रमांक ५.४**

**पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतची माहिती**




## ७) स्वच्छता सुविधाबाबतच्या माहितीचे विश्लेषण –

आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता सुविधा महत्त्वाच्या असतात. तसेच स्वच्छता सुविधांची उपलब्धता जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी महत्त्वाची असते. कोकण विभागातील कुटुंब प्रमुखांकडे उपलब्ध असणाऱ्या स्नानगृहे व शौचालये या स्वच्छता सुविधांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.६ मध्ये दर्शविले आहे.

### तक्ता क्रमांक ५.६

### स्वच्छता विषयक सुविधांची माहिती

| जिल्हे | स्नानगृह | | एकूण | शौचालय | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | | होय | नाही | |
| ठाणे | ८० (१००) | - - | ८० (१००) | ८० (१००) | - - | ८० (१००) |
| रायगड | १६० (१००) | - - | १६० (१००) | १६० (१००) | - - | १६० (१००) |
| रत्नागिरी | १२० (१००) | - - | १२० (१००) | १२० (१००) | - - | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ८० (१००) | - - | ८० (१००) | ८० (१००) | - - | ८० (१००) |
| एकूण | ४४० (१००) | - - | ४४० (१००) | ४४० (१००) | - - | ४४० (१००) |


*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक आडव्या ओळीतील एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.६ मध्ये स्वच्छता विषयक सुविधांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील ठाणे जिल्ह्यात नमुना १००%, रायगड १००%, रत्नागिरी १००%, सिंधुदुर्ग १००% कुटुंबाकडे स्नानगृह व शोचालयाची सुविधा असल्याचे दिसून आले आहे. एकूण नमुना ४४० कुटुंबाकडे दोन्ही प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. कोकणातील ग्रामीण भागातील लोक स्वच्छता सुविधेबाबत जागरूक आहेत.

**आलेख क्रमांक ५.५**

**स्वच्छता विषयक सुविधांचे वर्गीकरण**




### ८) भौतिक सुविधांबाबतचे विश्लेषण–

भौतिक सुविधांच्या उपलब्धतेमुळे कुटुंबाचा आर्थिक, सामाजिक स्तर समजतो. यामुळे विकसित व मागासलेपणा दिसून येतो.प्रादेशिक असमतोलाच्या अभ्यासासाठी कुटुंबाच्या दृष्टीने भौतिक सुविधांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोकणातील जनतेकडे उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये गॅस, टेलिफोन, मोबाईल, मोटारसायकल, ट्रॅक्टर, बैलगाडी यांचा समावेश आहे. भौतिक सुविधांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.७ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५.७**

**भौतिक सुविधांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण**

| जिल्हे | गॅस कनेक्शन | टेलिफोन | मोटार सायकल | ट्रॅक्टर | बैलगाडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | ३५ (४३.८) | २४ (३०.०) | ११ (१३.८) | ०१ (१.२) | ०९ (११.२) | ८० (१००) |
| **रायगड** | ७५ (४६.९) | ४४ (२७.५) | २२ (१३.८) | ०२ (१.२) | १७ (१०.६) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | ६० (५०.०) | २० (१६.७) | १७ (१४.१) | ०२ (१.७) | २१ (१७.५) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | ५२ (६५.०) | १० (१२.६) | ०९ (११.२) | ०१ (१.२) | ०८ (१०.०) | ८० (१००) |
| **एकूण** | २२२ (५०.४) | ९८ (२२.२) | ५९ (१३.४) | ०६ (१.३) | ५५ (१२.७) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक भौतिक सुविधांच्या उपलब्धतेचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र ५.७ मध्ये कुटुंबप्रमुखांकडे उपलब्ध असणाऱ्या भौतिक सुविधांचे अध्ययन करण्यात आले आहे. स्वयंपाकासाठीचा गॅस ५०.४% सर्वेक्षित कुटुंबांकडे उपलब्ध आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गॅस कनेक्शन सर्वात जास्त ६५.०% कुटुंबांकडे आहे. कोकणात टेलिफोनची सुविधा २२.२% कुटुंबप्रमुखांकडे असुन सर्वात जास्त सुविधा ठाणे जिल्ह्यातील कुटुंबांकडे आहे. मोटार सायकलची सुविधा चारही जिल्ह्यात सारखीच आहे. ट्रॅक्टर, बैलगाडी सुविधा अत्यंत अल्प प्रमाणात आहेत. यावरून असे स्पष्ट होते की कोकणातील भौतिक सुविधा उपलब्धतेमध्ये चारही जिल्ह्यामध्ये असमानता पहावयास मिळते.

### ९) शेती व्यवसायाबाबतच्या माहितीचे विश्लेषण –

कोकण विभागातील सर्वेक्षित कुटुंबाकडे उपलब्ध असलेली शेतजमीन तसेच ज्या कुटुंबप्रमुखाकडे शेती नाही असे भूमीहीन कुटुंबप्रमुख, लागवडीखालील क्षेत्र, पडीक क्षेत्र, डोंगराळ व खडकाळ क्षेत्र यांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.८ मध्ये करण्यात आले आहे.

## तक्ता क्रमांक ५.८

## शेतजमीनीची माहिती

(शेतजमीन एकरमध्ये)

| जिल्हे | आपली शेती आहे काय? | | लागवड योग्य क्षेत्र | पडीक क्षेत्र | डोंगराळ व खडकाळ | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | | | | |
| ठाणे | ७२ (९०.०) | ०८ (१०.०) | ९२.५ (५१.३) | ४५.५ (२५.२) | ४२.० (२३.५) | १८०.० (१००) |
| रायगड | १५४ (९६.२) | ०६ (३.८) | २१०.५ (६०.१) | ५७.५ (१६.४) | ८२.० (२३.५) | ३५०.० (१००) |
| रत्नागिरी | ११५ (९५.८) | ०५ (४.२) | १८०.० (६२.०) | ६०.५ (२०.८) | ४९.५ (१७.२) | २९०.० (१००) |
| सिंधुदुर्ग | ७२ (९०.०) | ०८ (१०.०) | ९२.५ (४६.१) | ४५.५ (२२.७) | ६२.५ (३१.२) | २००.५ (१००) |
| एकूण | ४१३ (९३.९) | २७ (६.१) | ५७५.५ (५६.४) | २०९.० (२०.४) | २३६.० (२३.२) | १०२०.५ (१००) |


* **स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शेतजमीनीशी एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.८ शेतजमीनीबाबतचे वर्गीकरण दर्शविले आहे. कोकणातील एकूण ९३.९% कुटुंबाकडे शेती असून एकूण १०२०.५ एकर क्षेत्र आहे. या क्षेत्रांपैकी लागवड योग्य ५६.४%, पडीक २०.४% डोंगराळ व खडकाळ २३.२% क्षेत्र आहे. सर्वेक्षित ६.१% कुटुंबे कोणतीही शेती क्षेत्र नसल्यामुळे भूमीहीन आहेत असे दिसून येते. कोकणातील एकूण उपलब्ध जमिनीपैकी लागवड योग्य जमिन ठाणे जिल्ह्यात ५१.३%, रायगड ६०.१%, रत्नागिरी ६२.०%, सिुधुदुर्ग ४६.१% इतके आहे. लागवडीखालील सर्वाधिक क्षेत्र रत्नागिरी जिल्ह्यात असून सर्वात कमी सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. कोकणातील शेती हंगामी असून केवळ उपजिविकेचे साधन म्हणून शेती करतात. शेतीत भांडवल गुंतवणूक कमी आहे. शेती क्षेत्र मोठ्या प्रमाणात पडीक आहे. शेतीत व्यापारी पिके घेतली जात नाहीत शेती पूरक उद्योगांची कमतरता असल्याचे आढळून आले आहे.

## आलेख क्रमांक ५.६

## शेतजमीनीबाबतचे वर्गीकरण




### १०) कुटुंबप्रमुखांच्या उत्पन्नाचे स्त्रोत –

प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करताना कुटुंबप्रमुखांना मिळणारे उत्पन्न महत्त्वाचे आहे. उत्पन्न प्राप्तीशिवाय कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे शक्य नाही. उत्पन्न प्रादेशिक असमतोलाच्या मोजमापाचा निकष आहे.कोकण विभागातील कुटुंबांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे मार्ग शेती, उद्यागे, नोकरी हे आहेत. या स्त्रोतांचा वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.९ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.९

## कुटुंब प्रमुखांच्या उपत्नाच्या मार्गाचे वर्गीकरण

| जिल्हे | शेती | उद्योग व्यवसाय | नोकरी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **ठाणे** | ३५<br>(४३.७) | २२<br>(२७.५) | २३<br>(२८.६) | ८०<br>(१००) |
| **रायगड** | ७३<br>(४५.६) | १९<br>(११.८) | ६८<br>(४२.६) | १६०<br>(१००) |
| **रत्नागिरी** | ५५<br>(४५.९) | १५<br>(१२.६) | ५०<br>(४१.५) | १२०<br>(१००) |
| **सिंधुदुर्ग** | ३८<br>(४७.५) | ९<br>(११.२) | ३३<br>(४१.३) | ८०<br>(१००) |
| **एकूण** | २०१<br>(४५.७) | ६५<br>(१४.७) | १७४<br>(३९.६) | ४४०<br>(१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण


टीप – कंसातील अंक कुटुंब प्रमुखांच्या उत्पन्नाच्या मार्गाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.९ मध्ये कुटुंब प्रमुखांच्या उत्पन्नाच्या मार्गाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित नमुना ४४० कुटुंबप्रमुखांपैकी शेतीपासून ४५.७% कुटुंबांना उत्पन्न प्राप्त होते. शेती या व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न सर्वच जिल्ह्यामध्ये जवळपास सारखेच उत्पन्न आहे. उद्योग व्यवसायापासून १४.७% कुटुंबांना उत्पन्न प्राप्त होते. तर नोकरी पासून ३९.६% कुटुंबांना उत्पन्न प्राप्तीचा स्त्रोत मिळाला आहे. ठाणे जिल्ह्यात उद्योग व्यवसायापासून २७.५% उत्पन्न मिळते कारण या जिल्ह्यात उद्योगांचा विकास झाल्यामुळे उत्पन्न जास्त पहावयास मिळते. रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यात उद्योगांपासून मिळणारे उत्पन्न सारखेच असल्याचे आढळुन आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात जास्त ४७.५% शेतीउत्पन्न प्राप्त होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेती हा उत्पन्नाचा प्रमुख भाग आहे असे दिसून आले आहे.

कोकणातील नमुना ४४० कुटंबप्रमुखांपैकी शेती व नोकरी करणारे प्रत्येकी २०१ कुटुंबांना ४५.७% तर व्यवसाय करणाऱ्या ६५ कुटुंबांना २०.४% उत्पन्न प्राप्त होते. नोकरी करणाऱ्या १७४ कुटुंबांना ४१.३% उत्पन्न प्राप्त होते असे दिसून आले आहे.

**आलेख क्रमांक ५.७**

**कुटुंब प्रमुखांच्या उपत्नाच्या मार्गाचे वर्गीकरण**




**११)शेती उत्पन्नाचे स्वरूप–**

कोकण विभागातील सर्वेक्षित कुटुंबांना शेती व्यवसायाशी निगडीत असणाऱ्या भात किंवा तांदूळ उत्पादन फळपिके, दुग्ध व कुक्कुटपालन या पूरक व्यवसायापासून आणि वनौषधी गोळा करण्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१० मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.१०

## कुटुंबप्रमुखांच्या शेती उत्पन्नाचे स्वरूप

(वार्षिक उत्पन्न लाखात)

| जिल्हे | भात | | फळपीके | | भात व फळपीके | | पुरक व्यवसाय | | भात व पुरक व्यवसाय | | वनौषधी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न | कुटुंबे | उत्पन्न |
| **ठाणे** | ३० | १.८० | १० | ०.८० | १० | १.०० | २० | ०.८२ | ०८ | ०.९५ | ०२ | ०.२० | ८० | ५.५७ |
| | | (३२.३२) | | (१४.३६) | | (१७.९५) | | (१४.७२) | | (१७.०६) | | (३.५९) | | (१००) |
| **रायगड** | ३० | ३.६० | ३५ | १.९० | २५ | १.४५ | २५ | ०.७५ | १२ | ६.६५ | ०३ | ०.४५ | १६० | ८.८ |
| | | (४०.९१) | | (२१.५९) | | (१६.४८) | | (८.५२) | | (७.३९) | | (५.११) | | (१००) |
| **रत्नागिरी** | ५५ | २.८० | २५ | ३.१० | २० | २.६५ | १० | ०.४५ | १० | ०.७० | ०० | ०० | १२० | ९.७ |
| | | (२८.८७) | | (३१.९६) | | (२७.३२) | | (४.६४) | | (७.२२) | | -- | | (१००) |
| **सिंधुदुर्ग** | ३० | २.२० | १० | २.० | २२ | १.८५ | ५ | ०.२८ | १० | १.२० | ०३ | ०.३० | ८० | ७.८३ |
| | | (२८.१०) | | (२५.५४) | | (२३.६३) | | (३.५८) | | (१५.३३) | | (२.९८) | | (१००) |
| **एकूण** | १७५ | १०.४० | ८० | ७.८० | ७७ | ६.९५ | ६० | २.३० | ४० | ३.५० | ०८ | ०.९५ | ४४० | ३१.९० |
| | | (३२.६०) | | (२४.४५) | | (२१.७९) | | (७.२१) | | (१०.९७) | | (२.९८) | | (१००) |


*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शेती उत्पन्नाचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१० मध्ये कुटुंबप्रमुखांच्या शेतीपासूनच्या उत्पन्नाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित कुटुंबप्रमुखांच्या पाहणीवरून असे दिसून येते की, शेती व शेतीशी निगडीत व्यवसायापासून एकूण ३१.९० लाख रू. वार्षिक उत्पन्न प्राप्त झाले असून त्यापैकी भात या पिकांपासून सर्वाधिक १०.४० लाख रू. उत्पन्न मिळाले आहे. फळपीकांपासून ७.८० लाख रू. उत्पन्न प्राप्त झाले आहे. भात व फळपिके या दोन्ही पासून ६.९५ लाख रू उत्पन्न मिळाले आहे. भात व पुरक व्यवसायांपासून ३.५० लाख रू. उत्पन्न मिळाले वनऔषधीपासून सर्वात कमी उत्पन्न प्राप्त झाले असून ते ०.९५ लाख रू. इतके आहे. या वरून असे आढळुन येते की भातापासून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होत असले तरी त्या खालोखाल कोकणातील महत्वाच्या असणाऱ्या फळपिकांपासून दुसऱ्या क्रमांकांचे उत्पन्न प्राप्त होते. कोकणामध्ये जैविक विविधता विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे वनऔषधीपासून उत्पन्न प्राप्त करण्यास मोठी संधी आहे. त्यासाठी योग्य नियोजन आणि बाजारपेठेची उपलब्धा होणे आवश्यक आहे. दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालनापासून १०८००० रू. (२७.१%), वन औषधीपासून ४१३७२ रू.(१०.४%) वार्षिक उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसून येते. ठाणे जिल्ह्यात चिकू, रत्नागिरीमध्ये हापूस आंबा, सिंधुदुर्गमध्ये नारळ, सुपारी या फळपिकापासून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होत असल्याचे स्पष्ट होते.

### आलेख क्रमांक ५.८

### कुटुंबप्रमुखांच्या शेती उत्पन्नाचे वर्गीकरण




## १२)कोकण विभागातील कुटुंबाच्या खर्चाबाबतची माहिती –

प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करताना विविध बाबींवरील कुटुंबाच्या खर्चाची पातळी गृहित धरली जाते. विकसित प्रदेशात खर्च करण्याची प्रवृत्ती अधिक दिसते. तर मागासलेल्या प्रदेशात कुटुंबाची खर्च करण्याची प्रवृत्ती कमी दिसून येते. कोकण विभागातील नमुना कुटुंबप्रमुखांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी विविध बाबींवरील खर्चाचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.११ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.११

## कोकण विभागातील कुटुंबाच्या खर्चाबाबतची माहिती

(सरासरी खर्च रूपयांत)

| जिल्हे | अन्नधान्य व किराणा | कपडे | वैद्यकीय खर्च | करमणूक खर्च | प्रवास खर्च | वीजबील | फोनबील | सण समारंभ होणारा खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | ४०१०० (३९.३) | ९००० (८.८) | ८४०० (८.२) | ३०५० (३.०) | ४०१० (३.९) | ५१०० (५.०) | २६०० (२.५) | ३०००० (२९.३) | १०२२६० (१००) |
| रायगड | ३६३०० (३७.६) | १०००० (१०.३) | ७२०० (७.५) | २३०० (२.४) | ५००० (५.२) | ६३६० (६.६) | ३१०४ (३.२) | २६२६० (२७.२) | ९६५२४ (१००) |
| रत्नागिरी | ३४२४० (३४.९) | ११००० (११.२) | ७०४० (७.२ | २९५० (३.१) | ४३०० (४.४) | ६९६० (७.०) | २८६० (२.९) | २८७५० (२९.३) | ९८१०० (१००) |
| सिंधुदुर्ग | २६६८० (३२.०) | १२५०० (१५.० | ६६०० (८.०) | २६४० (३.२) | ३६९० (४.४) | ६००० (७.२) | ३०१० (३.६) | २२२४० (२६.६) | ८३३६० (१००) |
| एकूण | १३७३२० (३६.११) | ४२५०० (११.२) | २९२४० (७.७) | १०९४० (२.८) | १७००० (४.५) | २४४२० (६.५) | ११५७४ (३.०) | १०७२५० (२८.२) | ३८०२४४ (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक कुटुंब खर्चाचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.११ मध्ये कुटुंबप्रमुखांच्या खर्चाचे अध्ययन करण्यात आले आहे. कोकणातील ४ ही जिल्ह्यांची सरासरी खर्चाची एकूण रक्कम ३८०२४४ रूपये आहे. कोकणातील कुटुंबप्रमुखांचा सरासरी खर्च ९५०६१ रूपये आहे. अन्नधान्य व किराणा १३७३२० रू. (३६.११%), कपडे ४२५०० रू. (११.२%), वैद्यकीय खर्च २९२४० रू.(७.७%), करमणूक खर्च १०९४० रू.(२.८%), प्रवास खर्च १७००० रू. (४.५%), वीजबील २४४२० रू. (६.५%), फोनबील ११५७४ रू.(३.०%), सण व उत्सवावर होणारा खर्च १०७२५० रू. (२८.२%) इतका खर्च असल्याचे आढळून आले आहे. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील सर्वच कुटुंबप्रमुख सर्वाधिक खर्च, किराणा मालाची खरेदी आणि त्या खालोखाल सण समारंभ साजरे करण्यासाठी करतात, असे दिसून आले आहे.

### १३) कोकणातील रस्त्याबाबतची माहिती –

आर्थिक विकासासाठी दर्जेदार रस्त्यांची उपलब्धता, वाहतूकीची साधने, महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. रस्त्यांचे जाळे विकसित नसेल तर मागासलेला प्रदेश समजला जातो. कोकण विभागातील नमुना कुटुंबांनी प्रादेशिक असमतोलाच्या अध्ययनाबाबत रस्त्यांच्या उपलब्धततेचा दिलेला प्रतिसाद तक्ता क्रमांक ५.१२ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१२**

**कोकणातील रस्त्याबाबतची माहिती**

| जिल्हे | पायवाट | खडीचे कच्चे रस्ते | एकेरी डांबरी रस्ते | दुहेरी डांबरी रस्ते | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | ११ (१३.८) | ०२ (२.६) | ५५ (६८.६) | १२ (१५.०) | ८० (१००) |
| **रायगड** | २ (१६.९) | ०६ (३.) | ११० (६८.८) | १ (१०.६) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | १४ (११.७) | ०६ (५.०) | ७७ (६४.१) | २३ (१.२) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | ०७ (८.८) | ०४ (५.०) | ५० (६२.६) | १ (२३.६) | ८० (१००) |
| **एकूण** | ५ (१३.४) | १८ (४.०) | २९२ (६६.३) | ७१ (१६.३) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक रस्त्यांचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१२ मध्ये कोकणात उपलब्ध असलेल्या रस्त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित नमुना ४४० कुटुंबांपैकी १३.४% कुटुंबांना पायवाट उपलब्ध आहे तसेच ४.०% लोकांना खडीचे कच्चे रस्ते उपलब्ध आहे. सर्वाधिक प्रमाणात ६६.३% कुटुंबांना एकेरी डांबरी रस्ते उपलब्ध झाले आहेत. सर्व जिल्ह्यात एकेरी डांबरी रस्ते उपलब्ध आहेत. दुहेरी डांबरी रस्ते १६.३% उपलब्ध झालेले आहेत. कोकणातील लोकसंख्या वाडी, वस्तीमध्ये विखुरलेली आहे. त्यामुळे सर्वच गावापर्यंत डांबरी रस्ते पोहोचले नाहीत त्या ठिकाणी पायवाट, खडीचे कच्चे रस्ते उपलब्ध आहेत, असे संशोधनातून आढळून आले आहे.

## १४) कोकण विभागातील रस्त्यांच्या देखभालीच्या कालावधीबाबतची माहिती –

प्रादेशिक असमतोलाच्या अध्ययनासाठी रस्त्यांच्या देखभालीच्या कालावधीचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.१३**

**कोकण विभागातील रस्त्यांच्या देखभालीच्या कालावधीबाबतची माहिती**

| जिल्हे | रस्त्यांची देखभालीचे स्वरूप | | | स्वातंत्र्यानंतर एकदाच | दर पाच वर्षांनी | दरवर्षी | एकदाही नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | एकूण | | | | | |
| ठाणे | ७४ (९२.५) | ०६ (७.५) | ८० (१००) | २३ (२८.७) | ३१ (३८.७) | २० (२५.०) | ०६ (७.६) | ८० (१००) |
| रायगड | १५१ (९४.३) | ०९ (५.७) | १६० (१००) | ५८ (३६.२) | ४२ (२६.२) | ५१ (३१.९) | ०९ (५.७) | १६० (१००) |
| रत्नागिरी | ११७ (९७.६) | ०३ (२.४) | १२० (१००) | ४५ (३७.६) | ४८ (४०.०) | २४ (२०.०) | ०३ (२.४) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ७५ (९३.७) | ०५ (६.३) | ८० (१००) | ३० (३७.६) | २० (२५.०) | २५ (३१.१) | ०५ (६.३) | ८० (१००) |
| एकूण | ४१७ (९४.८) | २३ (५.२) | ४४० (१००) | १५६ (३५.५) | १४१ (३२.०) | १२० (२७.३) | २३ (५.२) | ४४० (१००) |

* **स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक रस्त्यांच्या देखभालीची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१३ मध्ये रस्त्यांच्या देखभालीच्या कालावधीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित ९४.८% कुटुंबांनी रस्त्यांची देखभाल वेळेवर केली जाते असा प्रतिसाद मांडला आहे. स्वातंत्र्यानंतर एकदाच रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती करण्यात आली असा प्रतिसाद कोकणातील नमुना ३५.५% कुटुंबांनी व्यक्त केला आहे. दर पाच वर्षांनी रस्त्यांची देखभाल होते असे मत नमुना ३२.०%, कुटुंबांनी मांडले आहे. मात्र नमुना ५.२% कुटुंबांनी रस्त्यांची देखभाल वेळेवर केली जात नाही, असा प्रतिसाद नोंदविला आहे. दरवर्षी रस्त्यांची देखभाल करण्यात येते असा अभिप्राय नमुना २७.३% कुटुंबांनी मांडला आहे. मात्र नमुना ५.२% कुटुंबांनी अजुन एकदाही रस्त्यांची देखभाल करण्यात आली नाही असे मत मांडले आहे.

**१५)कोकणातील रस्ते विकासाचे फायदे–**

रस्त्यांमुळे नाशवंत पदार्थांची जलद वाहतूक झाली असे मत सर्वेक्षित १२.६% कुटुंब प्रमुखांनी मांडले असून त्यापैकी ठाणे ७.५%, रायगड १४.३%, रत्नागिरी १४.१%, सिंधुदुर्ग ११.२% या जिल्ह्यातील आहेत.शेजारील गावांशी व तालुक्यांशी संपर्क आला असे मत सर्वेक्षित ६८.४% कुटुंबप्रमुखांनी मांडले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ८०.०%, रायगड ६१.२%, रत्नागिरी ६८.३%, सिंधुदुर्ग ७१.२% कुटुंबे आहेत.रस्त्यांमुळे लोकप्रतिनीधींना निवडणूक प्रचारासाठी गावापर्यंत येणे शक्य झाले असा अभिप्राय ११.६% कुटुंबांनी मांडला असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील १०.०%, रायगड १२.६%, रत्नागिरी १०.०%, सिंधुदुर्ग १२.६% या जिल्ह्यातील आहेत. वाहतुकीची साधने वाढली असे मत सर्वेक्षित ७.४% कुटंबांनी मांडले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील २.५%, रायगड ११.९%, रत्नागिरी ६.७%, सिंधुदुर्ग ५.०% या जिल्ह्यातील आहेत.कोकणातील सर्वेक्षित ४४० कुटुंबप्रमुखांपैकी रस्ते सुविधेमुळे नाशवंत पदार्थांची जलद वाहतुक झाली. १२.६%, शेजारील गावांशी व तालुक्यांशी संपर्क आला ६८.४%, रस्त्यांमुळे लोकप्रतिनिधींना निवडणूक प्रचारासाठी गावापर्यंत येणे शक्य झाले. ११.६% वाहतूकीची साधने वाढली ७.४% या स्वरूपाचे फायदे झाल्याचे दिसून आले आहे. यावरून असे स्पष्ट होते की रस्त्यांच्या उपलब्धते मुळे काही प्रमाणात शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा तसेच बी–बियाणे, खते यांची वाहतूक सुलभ झाली आहे. फळबागा लागवडीतून उत्पदित होणाऱ्या फळांची विक्री करणे शक्य झाले आहे. दळवळणांच्या साधनांमुळे परस्पर संपर्क वाढला आहे. एकूणच अविकसित असणाऱ्या कोकणच्या आर्थिक परिस्थितीत बदल होण्यास सुरूवात झाली आहे. तसेच काही प्रमाणात पर्यटनाला चालना मिळाली आहे.

**१६) दळणवळण व संदेश वहन साधनांची उपलब्धतेबाबती माहिती –**

कोकणातील सर्वेक्षित कुटुंब प्रमुखांना दळणवळण किंवा संदेशवहन साधनांच्या उपलब्धतेचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.१४

## दळणवळण व संदेश वहन साधनांची उपलब्धता

| जिल्हे | दूरदर्शन | मोबाईल | इंटरनेट | वर्तमानपत्रे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १७<br>(२१.२) | ५१<br>(६३.८) | ०४<br>(५.०) | ०८<br>(१०.०) | ८०<br>(१००) |
| रायगड | १९<br>(११.९) | ६४<br>(४०.०) | ३०<br>(१८.८) | ४७<br>(२९.३) | १६०<br>(१००) |
| रत्नागिरी | २४<br>(२०.०) | ६१<br>(५०.९) | २०<br>(६.६) | १५<br>(१२.५) | १२०<br>(१००) |
| सिंधुदुर्ग | १५<br>(१८.८) | ४०<br>(५०.०) | २०<br>(२५.०) | ०५<br>(६.) | ८०<br>(१००) |
| एकूण | ७५<br>(१७.०) | २१६<br>(४९.०) | ७४<br>(१७.०) | ७५<br>(१७.०) | ४४०<br>(१००) |


*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक संदेश वहनांच्या साधनांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये दळणवळण किंवा संदेशवहन साधनांच्या उपलब्धतेचे अध्ययन करण्यात आले आहे. कोकणातील नमुना ४४० कुटुंबप्रमुखांपैकी दूरदर्शन या दळणवळण किंवा संदेशवहन साधनाची उपलब्धता १७.०%, मोबाईल टेलिफोन ४९.०%, इंटरनेट १७.०%, वर्तमानपत्रे १७.०% कुटुंबांना प्राप्त झाल्याचे दिसून आले आजही संदेशवहन किंवा दळणवळन साधनांशी कमतरता असल्याचे दिसून येते. दूरदर्शन या साधनाची उपलब्धता ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक असून सर्वात कमी प्रमाणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. मोबाईल सर्वाधिक प्रमाणात ठाणे जिल्ह्यात उपलब्ध असून रायगड जिल्ह्यात सर्वात कमी प्रमाणात झाल्याचे मत प्रत्यक्ष नमुना प्रतिसाद कर्त्यांनी नोंदविले आहे. इंटरनेट या सुविधेची उपलब्धता सिंधुदुर्ग सारख्या ग्रामिण भागात झाली आहे. मात्र अजूनही ठाणे जिल्ह्यातील आदिवासी पट्यात या सुविधेचा वापर अल्प आहे. वर्तमानपत्राची उपलब्धता रायगड जिल्ह्यात सर्वाधिक प्रमाणात असून सिंधुदुर्ग मध्ये अल्प प्रमाणात आहे. यावरून माहिती किंवा संदेश कोकणातील सर्व जिल्ह्यात सारख्याच प्रमाणात पोहचत नसल्याचे आढळुन आले आहे. यावरून स्पष्ट होते की दळवळण किंवा संदेशवहनाची साधने शासकीय स्तरावरील माहिती जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी कितपत समर्थ आहे याचे विश्लेषण करतात.

**आलेख क्रमांक ५.९**

**दळणवळण व संदेश वहन साधनांची उपलब्धता**




**१७) दळणवळण साधनांची उपलब्धता नसल्याची कारणे–**

कोकण विभागातील नमुना कुटुंबांना दळणवळण साधने समाधानकारकरित्या मिळाली नाहीत. दळणवळण साधनांची उपलब्धता समाधानकारक रितीने होत नसल्याचे अनेक कारणे आहेत.

कोकणातील सर्वेक्षित ६९.३% कुटुंबांनी दळणवळण सुविधेची साधने समाधानकारकरित्या मिळाली आहेत. असा प्रतिसाद मांडला असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ६०.०%, रायगड ६८.८%, रत्नागिरी ७८.३%, सिंधुदुर्ग ६६.२% कुटुंबे आहेत. मात्र अजूनही सर्वेक्षित ३०.७% कुटुंबांनी दळणवळणाची साधने समाधानकारकरित्या मिळाली नाहीत असा प्रतिसाद दर्शविला असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ४०.०%, रायगड३१.२%, रत्नागिरी २१.७%, सिंधुदुर्ग २३.८% असल्याचे दिसून आले आहे.

ग्रामीण भागापर्यंत ही साधने अजूनही पोहोचलीच नाहीत, असा प्रतिसाद सर्वेक्षित २०.०% कुटुंबांनी मांडला आहे. इंटरनेटची सुविधा उपलब्ध नाही असे मत सर्वेक्षित १४.९% कुटुंबांनी व्यक्त केले आहे. शासनाची उदासिनता सर्वेक्षित १७.८% कुटुंबांनी व्यक्त केली आहे. खाजगी क्षेत्रातील महाग सेवा २०.७% कुटुंबांनी व्यक्त केली आहे. कागदपत्रांची गुंतागुंत

ही अडचण सर्वेक्षित २६.६% कुटुंबांना जाणवली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, कोकणातील दुर्गम, मागास भागात अजूनही दळणवळण साधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत.

- **मोबाईल व इंटरनेट या सुविधांबाबतचे दोष** –

  कोकणातील सर्वाधिक सर्वेक्षित ७८.०% कुटुंबांना मोबाईल व इंटरनेट या सुविधांबाबत दोष असल्याचे आढळून आले आहे. मात्र सर्वेक्षित २२.०% कुटुंबांनी या सेवेत कोणतेही दोष नाहीत असे मत मांडल्याचे दिसून येते. परवडत नाही, महागड्या सेवा आहेत असा अभिप्राय सर्वेक्षित केलेल्या ३१.४% कुटुंबांनी दिला. कधीकधी रेंज नसते असे मत सर्वेक्षित ५३.३% कुटुंबांनी मांडले असून त्यात ठाणे जिल्ह्यातील ५०.०%, रायगड ६०.८%, रत्नागिरी ५३.७%, सिंधुदुर्ग ४४.२% कुटुंबांचा समावेश आहे. या सेवा माहितच नाहीत असे मत सर्वेक्षित १५.३% कुटुंबांनी मांडले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील १५.७%, रायगड १५.१%, रत्नागिरी १५.४%, सिंधुदुर्ग १४.४% या जिल्ह्यातील आहेत. इंटरनेट साठी आवश्यक असणारी पायाभूत सुविधा कोकणातील ग्रामीण भागापर्यंत पुरेशी पोहोचली नाही. यामुळे असे दोष दिसून येतात.

**१८) कोकण विभागातील वीज वापर –**

विजेचा वापर प्रामुख्याने घरगुती, कृषी, उद्योग व्यवसाय या कारणांसाठी होत असतो. कोकणातील सर्वेक्षित ४४० कुटुंबांपैकी वीजेचा घरातील दिव्यासाठी वापर करणारे ४५.२% सर्वेक्षित कुटुंब असल्याचे आढळुन आले. फ्रीज, टी.व्ही., फॅन यांच्या वापरासाठी ३१.६% सर्वेक्षित कुटुंबे आढळली आहेत. शेतीसाठी पाणीपुवरठा ६.२% सर्वेक्षित कुटुंबे वापरत असलेले आढळते यावरून स्पष्ट होते की कोकणातील शेती पारंपारिक पद्धतीने केली जाते. त्यामुळे शेतीसाठी विजेची मागणी चारही जिल्ह्यात कमी प्रमाणात आहे. व्यवसायासाठी विजेचा उपयोग करणारे १७% कुटुंब आढळले. ठाणे, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यात उद्योग व्यवसायाला विजेची मागणी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात उद्योगाचे अल्प प्रमाण असल्याने व्यवसायाला विजेची मागणी कमी आहे.

- **वीजेची उपलब्धता –**

कोकण विभागातील सर्वेक्षित ४४० कुटुंबांचा वीज उपलब्धतेबाबत अभिप्राय घेण्यात आला. त्यामध्ये १५.४% कुटुंबांनी विजेची उपलब्धता कमी आहे असा अभिप्राय दिला आहे. ग्रामिण भागात भारनियमन अधिक ३१.३% सर्वेक्षित कुटुंबांनी अभिप्राय दिला आहे. शेती उद्योग सेवा यासाठी वीज वितरण करताना दुजाभाव केला जातो असे २१.६% कुटुंबांनी अभिप्राय दिला आहे. शहरात भारनियमन कमी असते असा १२.८% कुटुंबांनी अभिप्राय दिला आहे. उपलब्धतेच्या काळातही वीज खंडीत पुरवठा होतो असा अभिप्राय १८.९% कुटुंबांनी दिला आहे. यावरून असे स्पष्ट होते की ग्रामिण भागात आजही अधिक भारनियमन होते. कोकणात विजेची उपलब्धता होण्यासाठी अनेक ठिकाणी नैसर्गिकरित्या पाणी अडवून जलविद्युत निर्माण करण्यासाठी अधिक संधी आहे. जून ते सप्टेंबर या काळात पडणाऱ्या पावसाचे पाणी धरणे नसल्यामुळे समुद्राला जाऊन मिळते या पाण्याचा उपयोग विजनिर्मिती करण्यासाठी होऊ शकतो हे संशोधनातून दिसून आले आहे.

**१९) आरोग्य सेवेची उपलब्धता –** कोकण विभागातील सर्वेक्षित कुटुंब प्रमुखांना खाजगी, शासकीय व दोन्ही प्रकारच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. आरोग्य सेवेच्या उपलब्धतेत ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात तफावत आहे. यातून आरोग्य सेवेबाबतचा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१५ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.१५
## आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण

| जिल्हे | खाजगी वैद्यकीय सुविधा | शासकीय सुविधा | खाजगी व शासकीय दोन्हीही आहेत | खाजगी व शासकीय दोन्हीही नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १६ (२०.०) | २२ (२७.५) | १४ (१७.५) | २८ (३५.०) | ८० (१००) |
| रायगड | ३७ (२३.२) | ५८ (३६.२) | ३१ (१९.३) | ३४ (२१.३) | १६० (१००) |
| रत्नागिरी | २३ (१९.१) | २९ (२४.१) | ५१ (४२.६) | १७ (१४.२) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ११ (१३.८) | १९ (२३.७) | १८ (२२.५) | ३२ (४०.०) | ८० (१००) |
| एकूण | ८७ (१९.८) | १२८ (२९.०) | ११४ (२६.०) | १११ (२५.२) | ४४० (१००) |


*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१५ मध्ये सर्वेक्षित ४४० आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कुटुंबांना मिळत असलेल्या आरोग्य खाजगी वैयक्तिक सुविधांची उपलब्धता नमुना १९.८%, कुटुंबांना लाभ मिळत आहे. शासकीय आरोग्य सुविधेचा २९.०% कुटुंबांना लाभ उपलब्ध झाला आहे. सर्वेक्षित २६.०% कुटुंबांना खाजगी व शासकीय दोन्ही प्रकारच्या आरोग्य विषयक सुविधा प्राप्त झाल्या आहेत. मात्र सर्वेक्षित २५.२% कुटुंबांना अजूनही खाजगी व शासकीय सुविधा प्राप्त झाल्या नाहीत असे दिसून आले. दोन्हीही सेवा नसल्याचे सर्वाधिक प्रमाण सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहे. रत्नागिरी जिल्ह्यात सवाधिक ४२.६% खाजगी व शासकीय दोन्ही सेवा असल्याचे आढळले आहे. रायगड जिल्ह्यात शासकीय सेवा ३६.२% कुटुंबांना उपलब्ध झाले आहेत.

**आलेख क्रमांक ५.१०**

**आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण**




- **शासकीय आरोग्य सेवा –**

शासकीय आरोग्य सेवेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रूग्णालये, फिरता दवाखाना यांची उपलब्धता केली जाते.शासकीय आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. शासकीय आरोग्य विषयक सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असते, असा अभिप्राय ५५.०% कुटुंबांनी मांडला असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ४५.०% रायगड ५५.७% रत्नागिरी ६६.६% सिंधुदुर्ग ४६.२% कुटंबे आहेत.

जिल्हा रूग्णालयात नमुना २३.०% कुटुंबांनी शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध असतात, असे मत मांडले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ३०.०%, रायगड १८.७%, रत्नागिरी १४.२%, सिंधुदुर्ग ३७.६% कुटुंबे आहेत.

फिरता दवाखाना ही सुविधा शासकीय आरोग्य सेवेमार्फत उपलब्ध असल्याचे नमुना २२.०%, कुटुंबांनी व्यक्त केले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील २५.०%, रायगड २५.६%, रत्नागिरी १९.२%, सिंधुदुर्ग १६.२% जिल्ह्यातील आहेत.

शासकीय आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असल्याचे नमुना ५५.०%, जिल्हा रूग्णालय २३.०% फिरता दवाखाना २२.०% याठिकाणी उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे.

शासकीय आरोग्य सेवा केंद्राची जनतेच्या आरोग्याचे रक्षण, जतन व सुधारणा करणे, पोषण विषयक, रोग प्रतिबंधक व रोग निवारक उपचार करणे ही उद्दिष्टे असतात. कोकणात शासकीय आरोग्य सेवा अधिक सक्षम होणे गरजेचे आहे. कारण ४५% लोकांना या सेवेचा लाभ मिळत नाही.

**२०) कोकण विभागातील शैक्षणिक सुविधाबाबतची माहिती –**

कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करताना शैक्षणिक सुविधांची उपलब्धता हा निकष महत्त्वाचा आहे. शैक्षणिक सुविधांमध्ये अंगणवाडीपासून ते उच्चशिक्षणापर्यंत सर्व घटकांचा समावेश होतो. शिक्षणाचा पाया अंगणवाडी व प्राथमिक शाळेपासून सुरू होतो. ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्राथमिक शाळेच्या उपलब्धतेत तफावत आहे. कोकण विभागात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.१६ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.१६

## शैक्षणिक सुविधांची उपलब्धता

| जिल्हे | अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आश्रमशाळा | माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय | पदवी महाविद्यालय | अभियांत्रिकी महाविद्यालय | वैद्यकीय महाविद्यालय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १८ (२२.६) | २७ (३३.७) | ३१ (३८.७) | ०२ (२.५) | ०२ (२.५) | ८० (१००) |
| रायगड | ८२ (५१.२) | ४० (२५.०) | २९ (१८.१) | ०८ (५.०) | ०१ (०.७) | १६० (१००) |
| रत्नागिरी | ५२ (४३.३) | ४२ (३५.०) | १९ (१५.९) | ०६ (५.०) | ०१ (०.८) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | २२ (२७.६) | २४ (३०.०) | २६ (३२.५) | ०७ (८.७) | ०१ (१.२) | ८० (१००) |
| एकूण | १७४ (३९.६) | १३३ (३०.२) | १०५ (२३.९) | २३ (५.२) | ०५ (१.१) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शैक्षणिक सुविधांचे एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१६ मध्ये सर्वेक्षित ४४० शैक्षणिक सुविधा उपलब्धतेचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित ३९.६% कुटुंबांना अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आश्रमशाळा आणि सर्वेक्षित ३०.२% कुटुंबांना माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, सर्वेक्षित २३.९% कुटुंबांना पदवी महविद्यालय, सर्वेक्षित ५.२% कुटुंबांना अभियांत्रिकी महाविद्यालय, १.१.% कुटुंबांना वैद्यकीय महाविद्यालय या शैक्षणिक सुविधांची उपलब्धता झाल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. प्राथमिक व माध्यमिक पर्यंतचे शिक्षण हे मोफत शिक्षण म्हणून शासनाकडून दिले जाते. ठाणा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात १२ वी पर्यंतच शिक्षण घेण्याचे प्रमाण जास्त आहे. उच्चशिक्षणाच्या सुविधा अल्प प्रमाणात असल्याचे संशोधनातुन आढळुन आले.

### २१)कोकण विभागातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक अडचणीबाबतची माहिती –

कोकण विभागातील कुटुंब प्रमुखांना शैक्षणिक सुविधेबाबत अडचणी आहेत. शैक्षणिक अडचणींचे वर्गीकरण तक्ता क्रमांक५.१७ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.१७

## कोकण विभागातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक अडचणीबाबतची माहिती

| जिल्हे | शैक्षणिक अडचणी आहेत काय? | | | पायाभूत सुविधांची कमतरता | शैक्षणिक सुविधांची कमतरता | अपुरे उत्पन्न | सभोवतालचे वातावरण | शासकीय धोरण | आवडीच्या शिक्षणाची कमतरता | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | एकूण | | | | | | | |
| ठाणे | ७८ (९७.६) | ०२ (२.४) | ८० (१००) | ०६ (७.६) | १३ (१६.६) | ०८ (१०.२) | ३० (३८.४) | ०४ (५.३) | १७ (२१.९) | ७८ (१००) |
| रायगड | १५२ (९५.०) | ०८ (५.०) | १६० (१००) | ११ (७.२) | ५७ (३७.६) | ०४ (२.७) | ४२ (२७.७) | ०९ (५.८) | २९ (१९.०) | १५२ (१००) |
| रत्नागिरी | ११४ (९५.०) | ०६ (५.०) | १२० (१००) | १३ (११.४) | ०२ (१.८) | ०७ (६.१) | ४४ (३८.६) | १८ (१५.८) | ३० (२६.२) | ११४ (१००) |
| सिंधुदुर्ग | ७३ (९१.२) | ०७ (८.८) | ८० (१००) | ०५ (६.९) | ०९ (१२.३) | ०९ (१२.३) | २४ (३२.९) | ०६ (८.२) | २० (२७.४) | ७३ (१००) |
| एकूण | ४१७ (९४.८) | २३ (५.२) | ४४० (१००) | ३५ (८.३) | ८१ (१९.४) | २८ (६.८) | १४० (३३.६) | ३७ (८.८) | ९६ (२३.१) | ४१७ (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शैक्षणिक अडचणींची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.


तक्ता क्रमांक १७ मध्ये कोकण विभागातील कुटुंब प्रमुखांच्या शैक्षणिक अडचणींचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित ९४.८% कुटुंबप्रमुखांनी शैक्षणिक अडचणी आहेत असा अभिप्राय दिला आहे. सर्वेक्षित कुटुंबातील ८.३% कुटुंबप्रमुखांनी पायाभूत सुविधांची कमतरता आहे असा अभिप्राय दिला आहे. सर्वेक्षित कुटुंबातील १९.४% कुटुंबप्रमुखांना शैक्षणिक सुविधांची कमतरता आहे असे म्हटले आहे. सर्वेक्षित कुटुंबातील ६.८% कुटुंबप्रमुखांचे अपुरे उत्पन्न असल्यामुळे शैक्षणिक सोयीचा लाभ घेता येत नाही असा अभिप्राय दिला आहे. सर्वेक्षित कुटुंबातील ३३.६% कुटुंबप्रमुखांनी समाजातील सभोवतालचे वातावरण पोषक नाही असा अभिप्राय दिला आहे. सर्वेक्षित कुटुंबातील ८.८% कुटुंबप्रमुखांनी शासकीय धोरणामुळे शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागते असा अभिप्राय दिला आहे. तसेच २३.१% कुटुंबप्रमुखांना आवडीच्या शिक्षणाची कमरतरता यासारख्या अनेक अडचणी

असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. मात्र सर्वेक्षित ५.२% कुटुंबप्रमुखांनी कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक अडचणी नसल्याचे मत मांडले आहे.

कोकणात शिक्षणासाठी असणाऱ्या पायाभूत सुविधा ग्रामिण भागात सर्वत्र सारख्या प्रमाणात नाहीत. शैक्षणिक सुविधांची कमतरता असल्याची दिसून आले असुन विद्यार्थ्यांना आवड निर्माण होईल असे पोषक वातावरणही कुटुंबात नसल्याचे आढळले. कोकणातील कुटुंबांमध्ये शैक्षणिक दृष्टीकोन पुरेसा विकसित झालेला नाही. शैक्षणिक बाबतीत कोकण इतर विभागांच्या तुलनेत मागासलेला आहे हे संशोधनातून दिसून आले.

**आलेख क्रमांक ५.११**

**कोकण विभागातील कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक अडचणीबाबतची माहिती**




## २२) कोकणातील गुंतवणुकीची क्षेत्रे :

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी विविध क्षेत्रांत गुंतवणूक केली जाते. नवीन प्रकल्पात गुंतवणूक केल्यामुळे रोजगार निर्मिती, उत्पन्न वाढ, आर्थिक विकास साध्य होऊन प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होते. कोकण विभागात अलिकडच्या काळात सर्वाधिक गुंतवणूक विविध क्षेत्रात केली जात आहे.

कोकणातील सर्वेक्षित १५.४% कुटुंब प्रमुखांनी शिक्षण क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक केली जात असल्याचे मत मांडले असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील १७.६%, रायगड १६.९%, रत्नागिरी १५.०%, सिंधुदुर्ग ११.२% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहे.

आरोग्य क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक होत असल्याचे मत सर्वेक्षित ८.१% कुटुंबप्रमुखांनी मांडले असून यापैकी ठाणे जिल्ह्यांतील ११.२%, रायगड ५.०%, रत्नागिरी १०.०%, सिंधुदुर्ग ८.८% कुटुंबप्रमुखांनाचा समावेश असल्याचे दिूसन येते.

वाहतूक साधने उदा. रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक इ. ही सर्वाधिक गुंतवणूकीची क्षेत्रे असल्याचा प्रतिसाद सर्वेक्षित ८.८% कुटुंबप्रमुखांनी नोंदविला असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील १०.०%, रायगड ५.६% रत्नागिरी ९.१%, सिंधुदुर्ग १२.६% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहे.

बँका व विमा व्यवसाय सर्वाधिक गुंतवणूकीची क्षेत्र असल्याचे मत मांडलेल्या एकूण ८.८% कुटुंबप्रमुखांपैकी ठाणे जिल्ह्यातील ८.८%, रायगड ८.८%, रत्नागिरी ७.६% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील १०.०% कुटुंबप्रमुखांचा समावेश असल्याचे दिसून येते.

वीजनिर्मिती क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक होत असल्याचे मत सर्वेक्षित ७.०% कुटुंबप्रमुखांनी मांडले असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील ६.२%, रायगड ५.६%, रत्नागिरी ९.१% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७.५% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहे.

अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनांमध्ये सर्वाधिक केली जात आहे असा प्रतिसाद सर्वेक्षित ५.६%, कुटुंब प्रमुखांनी नोंदविला असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील १०.०%, रायगड ३.८%, रत्नागिरी ५.०% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ६.२% कुटुंबप्रमुखांची समावेश आहे.

ऊर्जा साधनांमध्ये सर्वाधिक गुंतवणूक केली जात असल्याचे मत सर्वेक्षित ५.२% कुटुंबप्रमुखांनी व्यक्त केले असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील ७.५%, रायगड ३.१%, रत्नागिरी ५.८% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ६.२% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहेत.

शेती क्षेत्र हे सर्वाधिक गुंतवणुकीचे क्षेत्र आहे असा प्रतिसाद सर्वेक्षित ८.२% कुटुंबप्रमुखांनी नोंदविला असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील ६.२%, रायगड  ५.६%, रत्नागिरी ७.६% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १६.२% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहे.

उद्योग क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक केली जात असल्याचे मत सर्वेक्षित ८.९% कुटुंबप्रमुखांनी मांडले असून त्यापैकी ठाणे जिल्ह्यातील ३.८%, रायगड ८.८%, रत्नागिरी १०.८% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ११.३% कुटुंबप्रमुखांचा समावेश आहे.

पाणी योजना क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक होत असल्याचे मत सर्वेक्षित २४.०% कुटुंबप्रमुखांनी मांडले असून यापैकी ठाणे जिल्ह्यातील १८.७%, रायगड ३६.८%, रत्नागिरी २०.०% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १०.०% कुटुंबप्रमुखांचा समावेश असल्याचे दिसून येते. कोकणात शिक्षण, आरोग्य, वाहतूक सुविधा, बँका, वीज, उद्योग, पाणी या विविध क्षेत्रात गुंतवणूकीचे अतिशय अल्प प्रमाण असल्याचे संशोधनातून दिसून आले. कोकणात शिक्षण व्यवस्था बदलत्या काळानुसार नाही. पारंपारिक शिक्षण व्यवस्था आजही आहे. कोकणात वित्त व्यवस्थेसंदर्भात सहकारी पत पुरवठा सुविधा, शासकीय बँकांच्या सुविधा पुरेशा प्रमाणात पोहचल्या नाहीत. आजही ग्रामिण भागातील व्यक्तींना विमा व्यवसायाबद्दलची पुरेशी माहिती नाही. कोकणातील सर्वाधिक गुंतवणूक ही औद्योगिक, रस्ते, वाहतुक या सुविधांमध्ये दिसुन येते.

**२३) कोकणातील रोजगार संधीबाबतची माहिती –** कोकण विभागातील नमुना कुटुंब प्रमुखांनी रोजगार संधीबाबत दिलेला अभिप्राय तक्ता क्रमांक ५.१८ मध्ये दर्शविले आहे.

### तक्ता क्रमांक ५.१८

### कोकणातील रोजगार संधीबाबतची माहिती

| जिल्हे | शेती | उद्योग | सेवाक्षेत्र | वाहतूक व दळणवळण | माहित नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | २३ (२८.८) | १७ (२१.२) | २७ (३३.८) | ०४ (५.०) | ०९ (११.२) | ८० (१००) |
| रायगड | २९ (१८.२) | ३१ (१९.३) | ३९ (२४.३) | ३७ (२३.२) | २४ (१५.०) | १६० (१००) |
| रत्नागिरी | ५० (४१.७) | १९ (१५.९) | २५ (२०.८) | १७ (१४.१) | ०९ (७.५) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ४१ (५१.२) | ०९ (११.२) | १३ (१६.२) | १५ (१८.८) | ०२ (२.६) | ९० (१००) |
| एकूण | १४३ (३२.६) | ७६ (१७.२) | १०४ (२३.७) | ७३ (१६.५) | ४४ (१०.०) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक आडव्या ओळीतील एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१८ मध्ये कोकणातील रोजगार संधी बाबतची माहितीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. सर्वेक्षित ४४० कुटुंबप्रमुखांपैकी ३२.६% कुटुंबप्रमुखांनी शेती, १७.२% कुटुंबप्रमुखांनी उद्योग, २३.७% कुटुंबप्रमुखांनी सेवाक्षेत्र आणि १६.५% कुटुंबप्रमुखांनी वाहतूक व दळणवळण क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध असल्याचे मत व्यक्त केले आहे. मात्र सर्वेक्षित १०.०% कुटुंबप्रमुखांनी माहिती नाही असा प्रतिसाद नोंदविला असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

### २४ )कोकणातील स्थलांतराचे स्वरूप –

कोकण विभागात शेतीचा पुरेसा विकास झाला नाही. यामुळे शेतीत पुरेसा रोजगार प्राप्त होत नाही. म्हणून थोडेफार शिक्षण घेऊन रोजगाराच्या शोधासाठी संपूर्ण कोकणातील लोक ठाणे, मुंबई याभागात स्थायिक झाले आहेत. यामुळे लोकसंख्या ग्रामीण भागातून शहरी भागात वास्तव्य करण्यास जाते. हळूहळू ही प्रक्रिया अधिक वेगवान होत गेल्यामुळे आज काही खेडी ओस पडली आहेत. यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे. कोकण विभागातील कुटुंब प्रमुखांनी स्थलांतराच्या स्वरूपाबाबत दिलेला अभिप्राय तक्ता क्रमांक ५.१९ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता क्रमांक ५.१९

## स्थलांतराचे स्वरूप

| जिल्हे | ग्रामीण भागातून शहराकडे | शहराकडून ग्रामीण भागाकडे | ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी | एका शहरातून दुसऱ्या शहरात | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | ६१ (७६.२) | ०३ (३.८) | ०९ (११.२) | ०७ (८.८) | ८० (१००) |
| रायगड | १२१ (७५.७) | ०९ (५.७) | १५ (९.३) | १५ (९.३) | १६० (१००) |
| रत्नागिरी | ८५ (७०.९) | ०५५ (४.१) | २५ (२०.९) | ०५ (४.१) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ६५ (८१.२) | ०२ (२.६) | ०६ (७.५) | ०७ (८.७) | ८० (१००) |
| एकूण | ३३२ (७५.४) | १९ (४.३) | ५५ (१२.६) | ३४ (७.७) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक स्थलांतराच्या स्वरूपाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.१९ मध्ये कोकणातील सर्वेक्षित कुटुंबप्रमुखांच्या स्थलांतराच्या स्वरूपाचे अध्ययन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील एकूण ८० कुटुंबप्रमुखांपैकी ग्रामीण भागातून शहराकडे ७६.२%, शहराकडून ग्रामीण भागाकड ३.८%, ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी ११.२%, एका शहरातून दुसऱ्या शहरात ८.८% कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर होत असल्याचे मत व्यक्त केले आहे.

रायगड जिल्ह्यातील एकूण १६० कुटुंब प्रमुखांपैकी ग्रामीण भागातून शहराकडे ७५.७%, शहराकडून ग्रामीण भागाकडे ५.७%, ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी ९.३%, एका शहरातून दुसऱ्या शहरात ९.३% कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर होत असल्याचे मत मांडले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १२० कुटुंबप्रमुखांपैकी ग्रामीण भागातून शहराकडे ७०.९%, शहराकडून ग्रामीण भागाकडे ४.१%, ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी २०.९% आणि एका शहरातून दुसऱ्या शहरात ४.१% कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर होत असल्याचे मत व्यक्त केले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण ८० कुटुंबप्रमुखांपैकी ग्रामीण भागातून शहराकडे ८१.२%, शहराकडून ग्रामीण भागाकडे २.६%, ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी ७.५% आणि एका शहरातून दुसऱ्या शहरात ८.७% कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर झाल्याचे मत नोंदविले आहे.

कोकणातील एकूण ४४० कुटुंबप्रमुखांपैकी ७५.४% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागातून शहराकडे ४.३% कुटुंबप्रमुखांनी शहराकडून ग्रामीण भागाकडे, १२.६% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी आणि ७.७% कुटुंबप्रमुखांनी एका शहरातून दुसऱ्या शहरात स्थलांतर झाले आहे, असा प्रतिसाद नोंदविला असल्याचे संशोधनातून आढळून येते. यावरून असे स्पष्ट होते ठाणा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ४ ही जिल्ह्यातील सर्वेक्षित कुटुंबांचे शहराकडे जाण्याचे प्रमाण जास्त असल्याचे संशोधनातुन आढळुन येते.

- **स्थलांतराची कारणे –**

कोकणातील ग्रामीण भागातून मुंबई, ठाणे या शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे.कोकणातील सर्वच म्हणजेच ४४० कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर घडून येत असल्याचे मत व्यक्त केले आहे. यापैकी ६५.४% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागात रोजगाराचा अभाव, २०.०% कुटुंबप्रमुखांनी शहरात राहण्यासाठी आवडते आणि १४.६% कुटुंबप्रमुखांनी शहरात सर्व सोयी उपलब्ध असतात या कारणास्तव स्थलांतर होते असा प्रतिसाद नोंदविला असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. यावरून स्पष्ट होते की, कोकणातून मुंबईकडे रोजगारासाठी खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे. प्रत्येक कुटुंबातील एक व्यक्ती मुंबईमध्ये स्थायिक झाल्याचे आढळुन आले.

**२५) शेतीच्या मागासलेपणाचे स्वरूप –**

कोकण विभागात शेतीचा फारसा विकास झाला नाही. शेती हंगामी स्वरूपाची आहे. शेतीचे मागासलेले व पारंपारिक स्वरूप आहे. शेतीच्या मागासलेपणाची कारणे तक्ता क्रमांक ५.२० मध्ये दर्शविली आहेत.

## तक्ता क्रमांक ५.२०

## शेतीच्या मागासलेपणाचे स्वरूप

| जिल्हे | पारंपरिक दृष्टीकोन | मुंबईकडे जाण्याचा कल | काम करण्याची इच्छा नाही | पाणी टंचाई | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १२<br>(१५.०) | ३९<br>(४८.८) | १७<br>(२१.२) | १२<br>(१५.०) | ८०<br>(१००) |
| रायगड | ४१<br>(२५.७) | ६४<br>(४०.०) | ३२<br>(२०.०) | २३<br>(१४.३) | १६०<br>(१००) |
| रत्नागिरी | ३२<br>(२६.७) | ३६<br>(३०.०) | ४१<br>(३४.१) | ११<br>(९.२) | १२०<br>(१००) |
| सिंधुदुर्ग | १७<br>(२१.२) | ४१<br>(५१.२) | १०<br>(१२.६) | १२<br>(१५.०) | ८०<br>(१००) |
| एकूण | १०२<br>(२३.१) | १८०<br>(४०.९) | १००<br>(२२.८) | ५८<br>(१३.२) | ४४०<br>(१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक शेतीच्या मागासलेपणाच्या स्वरूपाची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.


तक्ता क्रमांक ५.२० मध्ये कोकणातील शेतीच्या मागासलेपणाच्या कारणांबाबत अध्ययन करण्यात आले आहे. शेतीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन यांमुळे शेती मागासलेल्या अवस्थेत राहिली असल्याचे मत एकूण २३.१% कुटुंबप्रमुखांनी व्यक्त केले आहे. लोकांचा कामानिमित्त मुंबईकडे जाण्याचा कल अधिक असल्याने शेती मागासलेल्या अवस्थेत आहे असे मत एकूण ४०.९% कुटुंबप्रमुखांनी मांडले आहे. काम करण्याची इच्छा नसणे हे देखील शेती मागासलेली राहण्याचे प्रमुख कारण आहे असे मत सर्वेक्षित २२.८% कुटुंबप्रमुखांनी व्यक्त केले आहेपाणी टंचाईमुळे शेती मागासलेली राहिली असल्याचे सर्वेक्षित १३.२% कुटुंबप्रमुखांनी नमुद केले आहे.

कोकणातील सर्व जिल्ह्यात आजही लोकांना पारंपारिक परिस्थिती कायम ठेवण्याचा दृष्टीकोन आहे. तसेच मुंबईसारख्या शहरांमध्ये कोकणातील सर्वेक्षित कुटुंबांपैकी किमान एक जण मुंबई मध्ये वास्तव्य करीत असतो. त्याच्या आधारे मुंबईकडे जाण्याचा कल वाढलेला आहे. सर्वेक्षणाच्या अंतिम असे लक्षात आले की ग्रामिण भागात व्यवसायाच्या किंवा रोजगाराच्या संधी उपलब्ध असूनही काम करण्याची किंवा श्रम करण्याची ईच्छा नसल्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होत नाही. भौगोलिक परिस्थिती मुळे डिसेंबर ते मे या कालावधीत

पाण्याची टंचाई जाणवत असते त्यामुळे शेती योग्य जमिनित पावसाळी शेती करण्याचे प्रमाण जास्त आहे.

**आलेख क्रमांक ५.१२**

**शेतीच्या मागासलेपणाची कारणे**




## २६) परिसराचा मागासलेपणा –

कोकण विभागातील नमुना कुटुंब ज्या खेड्यात परिसरात राहतात तो विभाग मागासलेला आहे. या मागासलेपणाच्या कारणांचे केलेले निरीक्षण तक्ताक्रमांक ५.२१ मध्ये दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक ५.२१

## परिसराच्या मागासलेपणाची कारणे

| जिल्हे | शासकीय विकासाचे प्रयत्न कमी | राजकीय इच्छाशक्तीचा अभाव | सहकारी संस्थांचा कमी विकास | ग्रामीण भागाकडे पाहण्याचा दृष्टीकोन | शेती उद्योगासाठी मागासलेपणा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **ठाणे** | १७ (२१.२) | २१ (२६.२) | ०९ (११.२) | १३ (१६.२) | २० (२५.२) | ८० (१००) |
| **रायगड** | ३२ (२०.०) | ३९ (२४.३) | ३४ (२१.२) | १७ (१०.७) | ३८ (२३.८) | १६० (१००) |
| **रत्नागिरी** | ३१ (२५.९) | ३६ (३०.०) | २४ (२०.०) | १० (८.३) | १९ (१५.८) | १२० (१००) |
| **सिंधुदुर्ग** | २० (२५.०) | २४ (३०.०) | ०६ (७.६) | ०५ (६.२) | २५ (३१.२) | ८० (१००) |
| **एकूण** | १०० (२२.८) | १२० (२७.२) | ७३ (१६.६) | ४५ (१०.२) | १०२ (२३.२) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण


टीप – कंसातील अंक मागासलेल्या कारणांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.२१ मध्ये कोकणातील सर्वेक्षित कुटुंब प्रमुखांच्या परिसराच्या मागासलेपणाची कारणे याबाबत अध्ययन करण्यात आले आहे. कोकणातील सर्वेक्षित कुटुंबप्रमुखांनी शासकीय विकासाचे प्रयत्न कमी आहेत असा अभिप्राय २२.८% यांनी दिला आहे. त्यांच्या मते कोकण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही मोठ्या प्रकल्पांची उभारणी केली गेली नाही. २७.२% कुटुंबप्रमुखांनी राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे आमचा परिसर मागासलेला आहे असा अभिप्राय दिला त्यांच्या मते कोकणात विकासाच्या प्रश्नाबाबत वेगवेगळ्या पक्षातील राजकीय नेत्यांचे मत भिन्न असल्यामुळे जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होतो. एखाद्या प्रकल्पाची दिशा व त्यापासून होणारे फायदे याबाबत योग्य ते मार्गदर्शन होत नाही. राजकीय नेत्यांनी सांगितले म्हणून काही प्रकल्पांना जनतेने विरोध केला आहे. कोकणात सहकारी संस्थांचा विकास कमी आहे म्हणून परिसराम मागासलेपणा आहे. असा अभिप्राय १६.६% कुटुंबप्रमुखांनी दिला आहे. त्यांच्या मते प्राथमिक सहकारी संस्थांचे जाळे कोकणातील ग्रामीण भागात झाल्यावर परिसरातील मागासलेपणा दूर होण्यास मदत होईल. ग्रामीण भागात अशाच सोयी सुविधा असतात, असा दृष्टीकोन असल्यामुळे हा परिसर मागासलेला आहे असा अभिप्राय १०.२% नी दिला आहे. कोकणात शेती आणि उद्योगांची

कमतरता असल्यामुळे परिसर मागासलेला आहे असा अभिप्राय २३.२% नी दिला आहे. संशोधनातून हे लक्षात आले की कोकणात ठाणा वगळता इतर ३ ही जिल्ह्यात ग्रामिण भागाचे प्रमाण जास्त आहे. जिल्ह्यातील तालुकेच शहर म्हणून ओळखले जातात. तालुक्याच्या सभोवतालचा जो परिसर आहे तो मागासलेला आहे. म्हणूनच कोकण अविकसित आहे असे म्हटले जाते आणि हे खरे आहे त्यासाठी जणतेने दिलेला अभिप्रायांचा विचार करून कोकण विकासासाठी योग्य ती पाऊल उचलणे गरजेचे आहे.

**आलेख क्रमांक ५.१३**

**परिसराच्या मागासलेपणाची कारणे**




## २७) कुटुंबप्रमुखांनी मांडलेल्या उपाययोजनांबाबतचा तपशील :

प्रादेशिक असमतोलाची समस्या कोकण विभागात आहे. ठाणे, मुंबई हा शहरी भाग वगळता ग्रामीण भागातही प्रादेशिक असमतोल कमी अधिक प्रमाणात सर्वत्र आहे. त्यांचा समावेश तक्ता क्रमांक ५.२२ मध्ये करण्यात आलेला आहे.

## तक्ता क्रमांक ५.२२

## प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना

| जिल्हे | प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना सांगाल काय? | | | स्थानिकांना प्राधान्य देणे | योजनांतर्गत निधी वाढविणे | सार्वजनिक क्षेत्रातील संपत्तीचा प्रभावी वापर करणे | खाजगी गुंतवणूक वाढविणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | एकूण | | | | | |
| ठाणे | ८० (१००) | – – | ८० (१००) | १९ (२३.७) | २७ (३३.८) | १० (१२.५) | २४ (३०.०) | ८० (१००) |
| रायगड | १६० (१००) | – – | १६० (१००) | ६१ (३८.२) | ४३ (२६.८) | १९ (११.८) | ३७ (२३.२) | १६० (१००) |
| रत्नागिरी | १२० (१००) | – – | १२० (१००) | ३२. (२६.६) | २१ (१७.५) | ४२ (३५.०) | २५ (२०.९) | १२० (१००) |
| सिंधुदुर्ग | ८० (१००) | – – | ८० (१००) | २७ (३३.८) | १५ (१८.७) | १३ (१६.२) | २५ (३१.३) | ८० (१००) |
| एकूण | ४४० (१००) | – – | ४४० (१००) | १३९ (३१.६) | १०६ (२४.०) | ८४ (१९.०) | १११ (२५.४) | ४४० (१००) |

*** स्त्रोत –** संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

टीप – कंसातील अंक उपाययोजनांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.२२ मध्ये कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना बाबत वर्गीकरण करण्यात आले. कुटुंबप्रमुखांनी कोकणात प्रादेशिक असमतोल आहे असा अभिप्राय १००% कुटुंबांनी दिला आहे. कोकणातील सर्वेक्षित ४४० कुटुंबप्रमुखांनी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविल्या असल्याचे दिसून येते.

कोकणातील उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभ्यास करून कोकणात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. कोकणामध्ये नवीन प्रकल्पात गुंतवणूक केली जाते. त्या प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे असा अभिप्राय ३१.६% कुटुंबप्रमुखांनी दिला आहे. त्यांच्या मते नविन उद्योगात स्थानिकांना रोजगाराची संधी नसते, जनतेला या उद्योगांबाबत जागृतीचा अभाव असतो.

कोकणातील २४.०% कुटुंबप्रमुखांनी योजनांतर्गत निधी वाढविणे असा अभिप्राय सुचविला आहे. कोकणच्या विकासासाठी असणारा योजनांतर्गत निधी किंवा वित्त आयोगाने मंजूर केलेला निधी त्याच क्षेत्रात आणि त्याच कारणांसाठी वापरावा अशी अपेक्षा आहे.

सर्वेक्षित कुटुंबांपैकी १९.०% कुटुंबांनी कोकणातील सार्वजनिक क्षैत्रातील संपत्तीचा प्रभावी वापर करावा असा अभिप्राय दिला आहे. कोकणात विविध नैसर्गिक खनिजे उपलब्ध आहेत त्या खनिजांच्या वापरासाठी कुशल नियोजन असणे गरजेचे आहे. साधन संपत्तीचा प्रभावी वापर करताना तीचा अपव्यय होणार नाही याची काळजी घ्यावी.

सर्वेक्षित कुटुंबांपैकी २५.४% कुटुंबांनी कोकणात खाजगी गुंतवणूक वाढविणे असा अभिप्राय दिला आहे. त्यांच्या मते कोकणात शेती उपजिवीकेचे साधन आहे मात्र कुटुंबातील सर्वच व्यक्ती शेती उत्पन्नावर दिनचर्या करू शकत नाही कुटुंबातील एखाद्या तरी व्यक्तीला नियमित रोजगार प्राप्त होणाऱ्या क्षेत्रात काम मिळाले तर आमचे राहाणीमान उंचावेल. खाजगी भांडवलदार मुंबई, ठाणे शहरातच गुंतवणूक करतात ती गुंतवणूक कोकणात केली जावी.

यावरून स्पष्ट होते की कोकणात प्रादेशिक असमतोल आहे. कोकणात ४ ही जिल्ह्यात रोजगाराच्या समान संधी उपलब्ध नाही. स्थानिकांना संधी न मिळण्याचे कारण म्हणजे त्या उद्योगांसाठी लागणारा कुशल, गुणवत्ता, प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव होय. त्यामुळे अतिशय अल्प लोकांनाच संधी मिळते उदा. ऍन्रॉन सारख्या वीज प्रकल्पात स्थानिकांचा सहभाग १% पेक्षाही कमी आहे. कोकणात खाजगी भांडवल दारांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होण्यासाठी शासनाने भांडवल दारांना काही सवलती द्याव्यात कोकणात गुंतवणूकीसाठी प्रेरित वातावरण नसल्याने गुतवणूक होण्याचे प्रमाण अल्प आहे. आजही येणाऱ्या नविन उद्योगाला मोठ्या प्रमाणात विरोध केला जातो.

### ५.२.२ कृषी अधिकाऱ्यांनी दिलेली माहितीचे विश्लेषण –

कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यातील २, रायगड जिल्ह्यातील ४, रत्नागिरी जिल्ह्यातील ३, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २ अशा एकूण ११ कृषी अधिकाऱ्यांच्या मुलाखती व प्रश्नावली भरून अभिप्राय घेण्यात आला. सर्वेक्षित ११ तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रगत व मागासलेली गावे, शेतीच्या मागासलेपणाची कारणे, प्रादेशिक असमतोलाची कारणे, ती कमी करण्यासाठी उपाययोजना इत्यादी बाबींचे मुलाखत व प्रश्नावलीतुन मिळालेल्या माहितीचे विवेचन खालील प्रमाणे विशद करता येईल.

### १) मागासलेल्या व प्रगत गावांची माहिती–

कोकण विभागातील कृषी अधिकाऱ्यांकडून मागासलेल्या व प्रगत गावांची माहिती मिळवित असताना असे स्पष्ट झाले की ठाणा वगळता इतर ३ ही जिल्ह्यात तेथील तालुक्यांचे ठिकाणच शहर आहे. तालुक्यातील काही गावांचाच विकास झाला आहे. ११ तालुक्यातील निवडलेल्या ११ कृषी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रगत व मागासलेल्या गावांचे वर्गीकरण तक्ता क्रमांक ५.२३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.२३**

**मागासलेल्या व प्रगत गावांची माहिती**

| जिल्हे | मागासलेली गावे | प्रगत गावे | एकूण |
|---|---|---|---|
| ठाणे | २१८<br>(४०.६) | ३१९<br>(५९.४) | ५३७<br>(१००) |
| रायगड | २७४<br>(४१.५) | ३८५<br>(५८.५) | ६५९<br>(१००) |
| रत्नागिरी | ४०९<br>(५७.२) | ३०६<br>(४२.८) | ७१५<br>(१००) |
| सिंधुदुर्ग | ३०९<br>(४५.६) | ३६८<br>(५४.४) | ६७७<br>(१००) |
| एकूण | १२१०<br>(४६.७) | १३७८<br>(५३.३) | २५८८<br>(१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक मागासलेल्या व प्रगत गावांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.२३ मध्ये कोकणातील नमुना कृषी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण गावांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. कोकणातील एकूण २५८८ गावांपैकी ४६.७% गावे मागासलेली आहेत. यापैकी ठाणे जिल्ह्यातील ४०.६%, रायगड ४१.५% , रत्नागिरी ५७.२% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.६% गावांचा समावेश असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. कोकणातील एकूण ५३.३% गावे प्रगत आहेत. यापैकी ठाणे जिल्ह्यातील ५९.४%, रायगड ५८.५%, रत्नागिरी ४२.८% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५४.४% गावांचा समावेश आहे.

कोकणातील नमुना कृषी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण २५८८ गावांपैकी ४६.७% गावे अजूनही मागासलेल्या अवस्थेत आहेत. मात्र ५३.३% गावे प्रगत असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

## २) कृषी अधिकाऱ्यांचे शेतीचा मागासलेपणा बाबतचे मत –

कोकणातील ११ तालुक्यातील सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांनी शेतीच्या मागासलेपणाची कारणे सांगितलेली आहेत. त्या कारणांचे अध्ययन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

- **शेतीत काम न करण्याची लोकांची प्रवृत्ती**

कोकणातील एकूण ११ कृषी अधिकाऱ्यापैकी १८.२% अधिकाऱ्यांनी शेतीत काम न करण्याची लोकांची प्रवृत्ती ही शेती मागासलेपणा असण्यास जबाबदार असल्याचे मत मांडले आहे. यापैकी रायगड जिल्ह्यातील ५०% आणि ठाणा जिल्ह्यातील ५०% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ठाणा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या मते या जिल्ह्यातील लोकांची शेतीत काम न करण्याची प्रवृत्ती आहे. कोकणातील शेतीचे धारण क्षेत्र, नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल यामुळे शेती उत्पादन कमी झाले आहे. अलिकडे काही प्रमाणात शिक्षण घेतलेल्या तरूणांमध्ये शेतीत काम करण्यापेक्षा कार्यालयीन कामकाज करण्याची मानसिकता वाढली आहे. कोकणातील तरूण वर्ग नोकरीसाठी शहरात स्थलांतर होत आहे.

- **पाणीपुरवठ्याची उपलब्धता**

सर्वेक्षित कृषीअधिकाऱ्यांपैकी ९.१% कृषी अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठ्याची उपलब्धता नाही म्हणून मागासलेली आहे. या घटकाला प्राधान्य दिले आहे. यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २५% अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त कोकणात सरासरी ३००० मि. मि. पाऊस पडतो. मात्र या पावसाचे पाणी अडवून कोणत्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही. कोकणात पाणी विपुल आहे. पाटबंधारे खात्यामार्फत निरनिराळे प्रकल्प राबवून पाण्याचा साठा करण्यात येत आहे. दुर्दैवाने या उपलब्ध पाण्याचा शेतकरी पूर्ण उपयोग करून घेत नाहीत त्यामुळे आज जवळजवळ ६० ते ७०% उपलब्ध पाणी वाया जात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सिंचन प्रमाण जास्त आहे. कल्याण जवळील बारवी धरणाचे पाणी फक्त पिण्यासाठीच वापरले जाते शेतीसाठी या पाण्याचा उपयोग केला जात नाही. कोकणातील काही भागात छोटी छोटी

धरणे बांधली आहेत मात्र त्या धरणातील पाणी फक्त पिण्यासाठी व घरखर्चासाठी वापरले जाते. त्याचा वापर कृषी उत्पादनासाठी केला जात नाही.

- **शाश्वत बाजारपेठ नाही**

सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांपैकी ९.१% अधिकाऱ्यांनी शाश्वत बाजारपेठ उपलब्ध नाही असा अभिप्राय दिला आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील २५% अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कोकणातील तालुक्याच्या ठिकाणी बाजारपेठ आहेत. ग्रामिण भागात बाजारपेठेचे आकारमान लहान आहे. कोकणात शाश्वत बाजारपेठांसाठी पायाभूत सोयी सुविधांचा विकास होणे आवश्यक आहे. आंबा, फणस, नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, ही कोकणातून निर्यात केली जाणारी पिके आहेत. शाश्वत बाजारपेठ नसल्यामुळे इतर जिल्ह्यातील लोक फळपिके खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात दलाली करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादित मालाची अल्प किंमत मिळते.

- **शेती क्षेत्राचा लहान आकार**

सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांपैकी ९.१% अधिकाऱ्यांनी शेती मागासलेली आहे कारण शेती क्षेत्राचा लहान आकार या घटकाला प्राधान्य दिले आहे. कुटुंबामध्ये दर पिढीगणीक शेतजमिनीची वाटप होऊन प्रत्येक शेतकरी अथवा कुटुंबांच्या वाट्याला येणाऱ्या शेतजमिनीचे आकारमान सतत कमी होत चालले आहे. विभाजन, तुकडीकरण व अपखंडन इत्यादी कारणांमुळे लागवडीखालील शेतजमिनीचे आकारमान इतके छोटे आहे की ते परवडेनासे झाले आहे. लहान आकारमानामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आकारमानाच्या अंतर्गत व बाह्य बचती प्राप्त होत नाहीत. लहान तुकड्यावर अधुनिक तंत्र वापरता येत नाही याचा परिणाम उत्पादक्ता कमी राहते.

- **शिक्षणाचा अभाव**

सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांपैकी ३६.४% अधिकाऱ्यांनी शिक्षणाचा अभाव हे शेती मागासलेपणास महत्वाचे कारण जबाबदार असल्याचे निर्दशनास आणून दिले आहे. कोकणात कृषी क्षेत्राच्या निगडीत आवश्यक असणाऱ्या शिक्षणाचा अभाव असल्याचे जाणवते असे मत ४ ही जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी मांडले आहे. त्यांच्या मते कोकणात दापोली कृषी विद्यापीठ आहे त्या

विद्यापीठातील नविन शेती संशोधनाचा उपयोग कोकणातील जनतेने करून घेण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक आहे.

- **कर्जपुरवठा होत नाही**

सर्वेक्षित अधिकाऱ्यांपैकी ९.१% कृषी अधिकाऱ्यांनी शेती मागासलेपणाला कर्जपुरवठा न होणे या घटकांना प्राधान्य दिले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील ३३.४% कृषी अधिकाऱ्यांचे मते शेतीला आवश्यकतो कर्जपुरवठा न होणे हे मागासलेपणाचे कारण आहे. कोकणातील शेतकरी गरीब व अशिक्षित आहे. त्यामुळे शेतकऱ्याला बी–बियाणे, खते, किटकनाशक औषधे, बांधबंदिस्ती इत्यादि शेतीविषयक सुधारणा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा तुटवडा असतो. शेतकऱ्यांना वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या ग्रामीण भागात अति अल्प आहे त्यामुळे शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन व्यावसायिक नाही. बहुतांश शेतकऱ्यांचा दृष्टीकोन कुटुंबातील सदस्यांचे वर्षभर पोट भरेल ऐवढेच उत्पादन करणे हा असतो.

- **सहकारी संस्थांचा अपुरा विकास**

सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांपैकी ९.१% अधिकाऱ्यांनी सहकारी संस्थांचा अपुरा विकास या घटकाला प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील ३३.४% अधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले आहे. शेती विकास जर वेगाने व्हायचा असेल तर त्यासाठी पतपुरवठाही त्याच प्रमाणात वाढला पाहिजे. कोकणात सहकारी संस्थांचा अपुरा विकास असल्यामुळे शेतकऱ्यांना सावकारावर अवलंबून रहावे लागते. ग्रामिण भागात सहकारी संस्था स्थापन होण्यासाठी समाजातिल व्यक्ती, सहकार खाते व जिल्हा परिषदांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.
कृषी अधिकाऱ्यांनी कोकणातील शेती मागासलेल्या अवस्थेत राहण्याची नमुद केलेली कारणे सत्य असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

**३) प्रादेशिक असमतोलाची कारणे –**

कोकणातील सर्वेक्षित ११ कृषी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने प्रादेशिक असमतोलाच्या कारणांचे अध्ययन करण्यात आले, त्याची कारणे पुढीलप्रमाणे,

- **मुंबईकडे रोजगारासाठी जाण्याचा कल –** कोकणातील एकूण ११ कृषी अधिकाऱ्यांपैकी ४५.४% कृषी अधिकाऱ्यांनी लोकांचा मुंबईकडे रोजगारासाठी जाण्याचा कल अधिक

असल्याने प्रादेशिक असमतोल वाढत जात असल्याचे मत व्यक्त केले आहे. यापैकी रायगड जिल्ह्यातील ५०.०% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ८६.७%, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.०% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

- **शेती क्षेत्रातील कमी गुंतवणूक** – कोकणातील ९.१% अधिकाऱ्यांच्या मते शेती क्षेत्रातील कमी गुंतवणुकीमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होत असल्याचे मत मांडले आहे. ठाणा जिल्ह्यातील ५०.०% कृषी अधिकाऱ्यानी मत व्यक्त केले आहे.
- **जलसिंचन व वीज सुविधांची कमतरता –** जलसिंचन व वीज सुविधांच्या कमतरतेमुळे प्रादेशिक असमतोल तयार होत असल्याचे मत सर्वेक्षित १८.२% कृषी अधिकाऱ्यांनी मांडले असून यांत ठाणे जिल्ह्यातील ५०.०% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ३३.३% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे.
- **निरक्षरता –** सर्वेक्षित १८.२% कृषी अधिकाऱ्यांच्या मते निरक्षरतेमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. यामध्ये रायगड जिल्ह्यातील २५.०% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.०% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश होतो.
- **लोकांची आळशी वृत्ती – कोकणातील ९.१% अधिकाऱ्यांच्या मते** लोकांच्या आळशी वृत्तीमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होत असल्याचे मत मांडले आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वेक्षित २५.०% कृषी अधिकाऱ्यानी हे मत व्यक्त केले असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

कोकणातील सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने प्रादेशिक असमतोलाची वरील कारणे लक्षात घेतली असता या कारणांमध्ये तथ्य असल्याचे संशोधनातून आढळुन आले आहे.

### ४) कृषी अधिकाऱ्यांचे प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाय –

कृषी अधिकारी हे जनता व शासन यांतील दुवा आहेत. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व त्यातील अडचणी शासनदरबारी मांडणे हे त्यांचे कार्य आहे. त्यामुळे मागासलेल्या प्रदेशाला विकासाचा न्याय मिळू शकतो. जलसंपत्ती , शेती, ग्रामीण पायाभूत सुविधा यांच्या अभावामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला असून विविध समस्यांचा

साकल्याने विचार करून प्रादेशिक समतलो कमी करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांची भूमिका उपयुक्त आहे. कोकणातील सर्वेक्षित कृषी अधिकाऱ्यांनी कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजनांचे अध्ययन करण्यात आले आहे.

- **जनतेच्या समस्यांचा सरकारकडे पाठपुरावा करणे**

  कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी जनतेच्या समस्यांचा सरकारकडे पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे मत सर्वेक्षित १८.२% कृषी अधिकाऱ्यांनी व्यक्त केले असून यामध्ये ठाणे जिल्ह्यातील ५०.०% आणि रायगड जिल्ह्यातील २५.०% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कोकणातील राजकीय नेत्यांनी सत्तेवर असलेल्या सरकारकडे जनतेच्या समस्या सादर करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. इतर प्रदेशातील राजकीय नेत्यांनी असे प्रयत्न केलेले आहेत. यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल.

- **ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे**

  ग्रामीण भागात रोजगारसंधी निर्माण केल्यास प्रादेशिक असमतोल कमी होऊ शकतो असे मत सर्वेक्षित १८.२% कृषी अधिकाऱ्यांनी मांडले असून यात रत्नागिरी जिल्ह्यातील ३३.३% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.०% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. कोकणात कृषीशी निगडीत प्रक्रीया उद्योगांमध्ये मोठी गुंतवणूक खाजगी व शासनाने केल्यास ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण होईल. त्यामुळे कृषी उत्पादन वाढीला चालना व प्रोत्साहन मिळेल. लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊन राहाणीमान ऊंचावेल व प्रादेशिक असमतोल दुर होण्यास मदत होईल.

- **शेतीत पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देणे**

  शेतीविषयक विकासाचा अभिप्राय नमुना ४५.४% कृषी अधिकाऱ्यांनी मांडला आहे. यात ठाणे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.०%, रायगड २५.०% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ६६.७% कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांसाठी गावपातळीवर पिक नियोजन करावे. कृषी विषयक अनुदान योजना, पिक विमा योजना, पुरक व्यवसायांना मिळणारे ५०% अनुदान, तुषार व ठिंबक सिंचन योजना या सर्व योजनांची अमंलबजावणी झाली

तरच कृषी विकास होईल शेतकऱ्यांपर्यंत या योजना पोहचवण्याचे काम अधिकारी वर्ग करीत आहेत.

- **शेतीत पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देणे**

  प्रादेशिक असमतोल कमी व्हावा यासाठी शेतीत पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे मत रायगड जिल्ह्यातील २५.०% कृषी अधिकाऱ्याने व्यक्त केले आहे. शेतीत पाणी, वीज, रस्ते, दळणवळण, या पाायाभूत सोयी कृषी विकासाला लागतात. अधिकाऱ्यांच्या मते पाणी व वीज या दोन्हीही सुविधा कोकणात १००% आहेत. कोकणातील शेतकऱ्यांनी त्याचे योग्य नियोजन करून उत्पादन वाढ करणे गरजेचे आहे.

- **संशोधन प्रत्यक्ष कृतीत आणणे**

  संशोधन प्रत्यक्ष कृतीत आणल्यास प्रादेशिक कमी होऊ शकतो, असे मत रायगड जिल्ह्यातील २५.०% कृषी अधिकाऱ्याने व्यक्त केले असल्याचे संशोधनातून दिसून येते. कोकणात दापोली येथे कृषी विद्यापीठ आहे. कृषी विद्यापीठात नवनवीन संशोधन होत असते त्याचा लाभ राज्यातील सर्वच जिल्हे घेतात. कोकणातील शेतकऱ्यांनी कृषी संशोधन कार्यक्रम धोरण प्रत्यक्ष कृतीत आणले तर प्रादेशिक असमतोल दुर होण्यास मदत होईल.

कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी सुचविलेल्या उपाययोजनांची अमंलबजावणी केली तर प्रादेशिक असमतोल दुर होण्यास मदत होईल.

### ५.२.३ उद्योजकांनी दिलेली माहितीचे विश्लेषण

सर्वेक्षित ११ तालुक्यातील उद्योजकांनी कोकणातील औद्योगिक क्षेत्र विकासासाठी आवश्यक असलेले उद्योग व त्याचे स्वरूप, प्रशिक्षित कामगार, रोजगार निर्मिती करणारे उद्योग, औद्योगिक प्रशिक्षिण संस्था, लागणाऱ्या पायाभूत सुविधा या विविधी घटकांना प्राधान्य दिले आहे. या घटकांच्या विकासातून प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी येणारे अडथळे व त्यावरील उपाययोजना या बाबतही चर्चा करून माहिती मिळवली आहे.

## १) औद्योगिक क्षेत्रातील उद्योग व स्वरूप

कोकणातील १० उद्योजकांकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील उद्योग व त्यांच्या स्वरूपाविषयी चर्चा करून अध्ययन करण्यात आले आहे. कोकणामध्ये रासायनिक, लोखंड व पोलाद, वाहतूक उद्योग, रंग निर्मिती, आणि कृषी आधारित उद्योग आहेत. ठाणा व रायगड जिल्ह्यामध्ये रासायनिक आणि लोखंड व पोलाद हे मोठे उद्योग आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये रासायनिक आणि रंगनिर्मिती हे मोठे उद्योग आहेत. सिंधुदुर्ग मध्ये कृषी आधारित आणि वाहतूक उद्योग आहेत. कोकणात ठाणा, रायगड, रत्नागिरी या तीनही जिल्ह्यात मोठ्या उद्योगांबरोबर लहान उद्योग आणि सेवा उद्योग विकसित झालेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मात्र उद्योगांचे अल्प प्रमाण आढळुन आले. यावरून असे स्पष्ट होते की कोकणात मोठे उद्योग स्थापन झालेले आहेत मात्र त्यांचे प्रमाण अल्प आहे. मोठे उद्योग स्थापन होण्यासाठी ठाणा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये नविन उद्योजकांना संधी आहे.

## २) कोकण विभागातील रोजगार तफावतीचा तपशील

कोकण विभागात औद्योगिक क्षेत्रात रोजगार तफावतीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे आढळुन आले. उद्योगातील रोजगाराच्या स्वरूपामध्ये कायम व रोजंदारीवर रोजगार हे प्रमुख स्वरूप पहावयास मिळाले. १० उद्योजकांची मते अभ्यासता ७०% उद्योजकांनी त्यांच्या उद्योगांमध्ये कायम रोजगारावर काम करणारे कर्मचारी असल्याचे मत व्यक्त केले आहे. ३०% उद्योजकांनी आपल्या उद्योगात रोजंदारी तत्वावर कर्मचारी काम करत असल्याचे सांगितले आहे. यावरून असे स्पष्ट होते की उद्योगाच्या गुंतवणूक, आकारमान यावर रोजगाराचे स्वरूप ठरत असते. ठाणा, रायगड, रत्नागिरी या तीनही जिल्ह्यातील उद्योग हे जुने व मोठे उद्योग आहेत. या उद्योगातून उत्पादित केलेला माल निर्यातही केला जातो. त्यामुळे या उद्योगात कायम रोजगार असणारे कर्मचारी जास्त आहेत. तसेच या उद्योगात कायम रोजगार मिळवणारे कर्मचारी हे परप्रांतातील आहेत. उद्योजकांच्या मते स्थानिक भागातून शिक्षित व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. सिंधुदुर्ग व रायगड मधील उद्योग हे कृषी व वाहतूक उद्योग आहेत. या उद्योगात रोजंदारीवर

काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण हे जास्त आहे. कोकणातील रोजगारांच्या तफावतीमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.

### ३) उद्योगक्षेत्रातील रोजगार संधी

उद्योगातील रोजगार संधीबद्दल उद्योजकांनी दिलेल्या मतांचे अध्ययन करताना असे आढळुन आले की, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील उद्योजकांच्या मते इथे असलेल्या उद्योगांना शिक्षित व कुशल कामगारांची मागणी असते. आज कोकणात नविन स्थापन होणारे उद्योग आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्थापन होतात. अशा उद्योगात कायम रोजगाराचे प्रमाण अल्पच असते. या उद्योगांशी पुरक उद्योग स्थापन होतात त्या उद्योगात अर्धकुशल कामगारांनी संधी असते त्याठिकाणी त्यांना कंत्राट व रोजंदारीवर रोजगार उपलब्ध होतो. आज सेवा उद्योग मोठ्या प्रमाणात स्थापन होत आहेत. या उद्योगांमध्येही कंत्राटी व रोजंदारीवर काम करणारे  कामगार असतात. यावरून स्पष्ट होते उद्योगक्षेत्रामध्ये रोजगार संधी मध्ये तफावत आहे. त्यामुळे ही प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.

### ४) प्रादेशिक असमतोल व रोजगार निर्मिती करणारे उद्योग

कोकणातील प्रादेशिक असमतोल दुर करण्यासाठी १० उद्योजकांनी रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांवर भर देणे गरजेचे आहे असे सुचविले आहे. त्यांच्या मते प्रादेशिक असमतोल दुर करण्यासाठी रोजगार निर्मिती ही महत्वाचे शस्त्र आहे.

- **कृषी उद्योग**

कोकणातील सर्वेक्षित एकुण १० उद्योजकांपैकी ३०% उद्योजकांनी शेतीवर आधारित उद्योगांमध्ये सर्वाधिक रोजगार निर्मिती होत असल्याचे मत व्यक्त केले आहे. संशोधनासाठी  निवडलेल्या सर्व तालुक्यांमध्ये डोंगराळ व ग्रामीण भागाचे प्रमाण जास्त आहे तसेच याठिकाणी अर्धकुशल कामगार ही जास्त आहेत. या कामगारांना कृषी उद्योगांमध्ये रोजगार मिळण्याची संधी आहे. मात्र कृषी उद्योगांना लागणारे भांडवल कोकणातील शेतकऱ्यांकडे नसल्यामुळे याठिकाणी खाजगी उद्योजक व शासनाने गुंतवणूक करून प्रादेशिक असमतोल दुर करण्यासाठी मदत करावी.

- **अवजड उद्योग**

कोकणातील सर्वेक्षित एकुण १० उद्योजकांपैकी ३०% उद्योजकांच्या मते ४ ही जिल्ह्यातील रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्या लोकांचे प्रमाण ७५% आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात औद्योगिक विकास फारच कमी आहे. येथील लोक मोठ्या प्रमाणात नोकरीसाठी स्थलांतर करतात त्यामुळे सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यात अवजड उद्योग स्थापन करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करता येतो. या उद्योगांमुळे तेथील प्रादेशिक असमतोल कमी करण्यास मदत होईल.

- **पर्यटन उद्योग**

कोकणात ४० % उद्योजकांच्या मते कोकणात येणाऱ्या नविन उद्योगांला स्थानिक लोकांकडून खूप मोठा विरोध होतो. तसेच आज अस्तित्वात असलेल्या रासायनिक उद्योगांनाही मोठा विरोध होत आहे. कोकणातील लोकांना पर्यावरण दुषित न करणारे उद्योग स्थापन व्हावेत असे वाटते. उद्योजकांच्या मते कोकणात गुंतवणूक करण्यासाठी अनुकूल वातावरण नाही त्यामुळे नविन उद्योजक गुंतवणूक करण्याचे धाडस करीत नाहीत. कोकणाला ७२० कि.मी. समुद्र किनारा व नैसर्गिक विपुल सृष्टी लाभलेली आहे. याचा पुरेपूर वापर करण्यासाठी कोकणात पर्यटन उद्योगाला मोठी संधी आहे. कोकणातील ग्रामीण भागातील व्यक्ती जुन ते सप्टेंबर या कालावधीत शेती कामासाठी व्यस्त असतो. ऑक्टोंबर ते मे या कालावधीत शेतीला पर्यायी, पुरक व्यवसाय म्हणजे पर्यटन उद्योग शेतकरी करू शकतो. या कालावधीत परप्रांतीय लोक कोकणातील निसर्ग पाहण्यासाठी येतील. या पर्यटन उद्योगांमुळे लोकांचे उत्पन्न वाढेल ग्रमीण विकास होऊन प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल.

- **सहकारी क्षेत्रातील उद्योग**

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात सहकारी क्षेत्राचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासाचा केंद्रबिंदू सहकारी साखर उद्योग आहे. कोकणातील सर्वेक्षित ५० टक्के उद्योजकांनी कोकणामध्ये सहकारी कृषी प्रक्रिया उद्योग स्थापन होण्यासाठी प्राधान्य दिले आहे. कारण त्यांच्या मते सहकारी कृषी उद्योगांना

आवश्यक असणारा कच्चा माल उपलब्ध आहे. उदा. आंबा प्रक्रिया उद्योग, काजू प्रक्रिया उद्योग या सहकारी उद्योगांना सहकारी कृषी पत पुरवठ्याची जोड देणे आवश्यक आहे. सहकारी उद्योगांमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल. पर्यटन उद्योगांना लागणाऱ्या सामाजिक सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थाही स्थापन होऊ शकतात. यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल.

### ५) कोकणातील औद्योगिक विभागातील शैक्षणिक संस्थांची माहिती

देशाचा, प्रदेशाचा आर्थिक विकास हा औद्योगिकीकरणाने होतो हे अनेक देशांनी सिद्ध करून दाखविले आहे. प्रादेशिक असमतोल दुरू करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रांची महत्वाची भुमिका असते. कोकणातील १० उद्योजकांनी कोकणातील औद्यागिक प्रशिक्षिण व शैक्षणिक संस्थांची संख्या अल्प आहे हे मत व्यक्त केले. सर्वेक्षित तालुक्यांमध्ये महाराष्ट औद्योगिक विकास महामंडळाचा कमी अधिक प्रमाणात विकास झाला आहे. उद्योजकांच्या मते औद्योगिक विकास करण्यासाठी प्रत्येक तालुका पातळीवर औद्योगिक प्रशिक्षण संस्था व उच्च शिक्षणाच्या संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. कोकणात पारंपारिक शिक्षण देणारी महाविद्यालय तालुकाच्या ठिकाणी आहे उद्योजकांच्या मते कोकणात तांत्रिक शिक्षण व व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्था अतिशय कमी प्रमाणात आहेत. कोकणात कृषी विद्यापीठ आहे. पण कोकणात इतर भागामध्ये या कृषी प्रशिक्षण संस्थांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. कोकणातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कृषी प्रशिक्षिण संस्था स्थापन झाल्या तरच कोकणात कृषी विकास होईल. उद्योजकांच्या मते अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या १% पेक्षा कमी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, कोकणातील उद्योजकांच्या मते कोकणात औद्योगिक प्रशिक्षण व शैक्षणिक संस्था यांचा विकास पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेने फारच कमी आहे.

### ६) प्रादेशिक असमतोल सर्वाधिक असणारी क्षेत्रे

सर्वेक्षित १० उद्योजकांच्या मुलाखतीतून कोकण विभागातील प्रादेशिक असमतोल सर्वाधिक असलेल्या क्षेत्रांबाबत उद्योजकांच्या प्रतिसादाचे अध्ययन करण्यात आले आहे.

कोकणातील प्रादेशिक असमतोल सर्वाधिक असणाऱ्य क्षेत्रांचे अध्ययन करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल दिसून येत असल्याचे मत ठाणे जिल्ह्यातील ३३.३% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०.०% उद्योजगकांनी व्यक्त केले आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल सर्वाधिक दिसून येत असल्याचे मत रायगड जिल्ह्यातील ३३.३% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ५०.०% उद्योजकांनी व्यक्त केले आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येकी ३३.४% उद्योजकांनी शेती व इतर क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल दिसून येत असल्याचे स्पष्ट केले आहे. रायगड जिल्ह्यतील ३३.३% उद्योजकांच्या मते सामाजिक क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल  आढळून येतो. आर्थिक क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल आढळून येत असल्याचे मत ठाणे जिल्ह्यातील ३३.३%, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी ५०.०% उद्योजकांनी व्यक्त केले आहे असे संशोधनातून दिसून येते.

कोकणातील प्रादेशिक असमतोल सर्वाधिक असणाऱ्या क्षेत्रांचा अभ्यास करता नमुना १० उद्योजकांपैकी नमुना २०.०% उद्योजकांनी शिक्षण, २०.०% उद्योजकांनी पायाभूत सुविधा , २०.०% उद्योजकांनी शेती व इतर क्षेत्र, १०.०% उद्योजकांनी सामाजिक क्षेत्र आणि ३०.०% उद्योजकांनी आर्थिक क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल दिसून येत असल्याचे मत मांडले आहे.

## ७) प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील अडथळे –

कोकण विभागातील औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यात अडथळे आहेत. प्रादेशिक असमतोल कमी करण्यावर मर्यादा पडतात. तक्ता क्रमांक ५.२४ मध्ये प्रादेशिक असमतोल कमी करण्यातील अडथळे दर्शविले आहेत.

## तक्ता क्रमांक ५.२४

## औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील अडथळे

| जिल्हे | शासनाची उदासिनता | भ्रष्टाचार | निधीचा अयोग्य वापर | कायद्यांची अयोग्य अमंलबजावणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ठाणे | ०१<br>(३३.४) | ०१<br>(३३.३) | ०१<br>(३३.३) | –<br>– | ०३<br>(१००) |
| रायगड | ०१<br>(३३.४) | –<br>– | ०१<br>(३३.३) | ०१<br>(३३.३) | ०३<br>(१००) |
| रत्नागिरी | ०१<br>(०.०) | –<br>– | ०१<br>(५०.०) | –<br>– | ०२<br>(१००) |
| सिंधुदुर्ग | ०१<br>(५०.०) | –<br>– | ०१<br>(५०.०) | –<br>– | ०२<br>(१००) |
| एकूण | ०४<br>(४०.०) | ०१<br>(१०.०) | ०४<br>(४०.०) | ०१<br>(१०.०) | १०<br>(१००) |

*** स्त्रोत –** सर्वेक्षण

टीप – कंसातील अंक अडथळ्यांची एकूणाशी टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्रमांक ५.२४ मध्ये कोकणातील औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील अडथळ्यांचे अध्ययन करण्यात आले आहे. कोकणातील एकूण १० उद्योजकांपैकी नमुना ४०.०% उद्योजकांच्या मते प्रादेशिक असमतोल कमी करण्यामध्ये शासनाची उदासिनता हा सर्वात मोठा अडथळा आहे. यामध्ये ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येकी ३३.३% रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी १०.०% उद्योजकाने भ्रष्टाचार प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील सर्वात मोठी अडचण असल्याचे स्पष्ट केले आहे. कोकणातील नमुना ४०.०% उद्योजकांच्या मते , निधीचा अयोग्य वापर केल्याने प्रादेशिक असमतोल कमी करण्यामध्ये अडथळे येतात. यात ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येकी ३३.३%, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी ५०.०% उद्योजकांचा समावेश आहे. प्रादेशिक असमतोल कमी करण्यामधील कागदपत्रांची अयोग्य अंमलबजावणी हा सर्वात मोठा अडथळा असल्याचे मत रायगड जिल्ह्यातील ३३.३% उद्योजकांनी मांडले आहे, असे संशोधनातून दिसून येते.

कोकणातील औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यामागे शासनाची उदासिनती ४०.०%, भ्रष्टाचार १०.०% निधीचा अयोग्य वापर ४०.०% आणि कागदपत्रांची अयोग्य अंमलबजावणी १०.०% ही अडथळे आहेत. यावरून स्पष्ट होते कोकणामध्ये करवयाच्या गुंतवणूकीबाबत शासन उदासिन आहे. सत्तेवरील शासन दरबारी कोकणातील राजकीय नेत्यांचा प्रयत्न अपुरा होत आहे. केंद्र व राज्य सरकार कडून योजनेमध्ये निधीची तरतुद केली जाते. तरतुद केलेल्या निधीचा वापर त्याच कालावधीत न केल्यामुळे निधी परत पाठविला जातो. ही एक कोकणातील मोठी विवंचना आहे. बहुतांशी भागात प्राप्त झालेला निधी खर्च झाला असे चित्र उभे केले जाते. मात्र वास्तवात कोकणातील प्रादेशिक असमतोल दुर होण्यास त्याची मदत झाली नाही हे स्पष्ट होते.

**८) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना –**

कोकणातील १० उद्योजकांनी कोकण विभागातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी दिलेल्या उपाययोजनांच्या प्रतिसादाचे अध्ययन पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

- **मागासलेल्या भागात उद्योगस्थापन करण्यास परवानगी देणे**

कोकणातील सर्वेक्षित १० उद्योजकांपैकी ३०.०% उद्योजकांनी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मागासलेल्या भागत उद्योग स्थापन करण्यासाठी परवानगी द्यावी असा उपाय सुचविला आहे. यामध्ये ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येकी ३३.४% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ५०.०% उद्योजकांचा समावेश आहे. उद्योजकांच्या मते कोकणातील ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची कमतरता आहे. मागासलेल्या भागात उद्योग स्थापन केले तर त्यासाठी लागणाऱ्या सुविधा उदा. पाणी, वीज, रस्ते या निर्माण होऊन मागासलेला भाग विकसित करण्यासाठी योग्य गुंतवणूक होईल. तसेच सेवा क्षेत्राचा ही विकास होईल यामुळे प्रादेशिक असमतोल दुर करण्यास मदत होईल.

- **मागासभागातील उद्योगांना कर सवलती देणे**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मागास भागातील उद्योगांना कर सवलत द्यावी असे मत नमुना ३०.०% उद्योजकांनी व्यक्त केले असून यात ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येकी ३३.३% आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ५०.०% उद्योजकांचा समावेश आहे.कोकणातील

उद्योजकांच्या मते मागास भागात उद्योग स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देणे तसेच त्या उद्योगांना करांमध्ये सवलती देणे असे सुचविले आहे.

- **कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे**

कुशल मनुष्यबळाचा पुरवठा केल्यास प्रादेशिक असमतोल कमी होण्यास मदत होईल असे मत रायगड जिल्ह्यातील नमुना ३३.३% उद्योजकांनी व्यक्त केले आहे. उद्योजकांच्या मते कोकणात कुशल मनुष्यबळाचा पुरवठा अतिशय अल्प आहे. कोकणात असलेल्या उद्योगांमध्ये उच्च अधिकारी वर्ग हा इतर प्रांतातील आहे.

- **उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे**

उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा केल्यास प्रादेशिक असमतोल कमी होवू शकतो असे मत रत्नागिरी जिल्ह्यातील ३३.३% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वेक्षित ५०.०% उद्योजकांनी नोंदविला आहे, असे संशोधनातून दिसून येते.

- **शाश्वत बाजारपेठांची निर्मिती करणे**

शाश्वत बाजारपेठेची निर्मिती केल्यानंतर प्रादेशिक असमतोल कमी होण्यासाठी मदत होऊ शकते असे मत ठाणे जिल्ह्यातील ३३.३% आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५०% उद्योजकांनी नोंदीवले आहे. उद्योजकांच्या मते शाश्वत बाजारपेठ निर्मिती करण्यासाठी कोकणात नविन उद्योग स्थापन होणे गरजेचे आहे. त्यातूनच प्रादेशिक असमतोल दूर होईल. नविन बाजारपेठेमुळे उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळेल.

कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मागासलेल्या भागात उद्योग स्थापन करण्यास परवानगी देणे ३०.०%, मागास भागातील उद्योगांना कर सवलती देणे ३०.०%, कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे १०.०%, उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे १०.०%, शाश्वत बाजारपेठांची निर्मिती करणे २०.०% या उपाययोजना करता येऊ शकतात असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे

## ५.३ निष्कर्ष

कोकणातील ४४० कुटुंबप्रमुख , ११ कृषी अधिकारी, १० उद्योजक यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे सूक्ष्म विश्लेषण या प्रकरणात मांडले आहे. कोकणातील कुटुंबप्रमुखांच्या पाहणीतून इतर मागास वर्ग आणि अनुसुचित जातीमध्ये सर्वाधिक कुटुंबे असल्याचे आढळुन आले. वयोगटांच्या पाहाणीत कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. कोकणातील शैक्षणिक पाहणीत असे निर्दशनास आले की प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. कोकणात निरक्षरांचे प्रमाण जवळपास २५% इतके असल्याचे संशोधनातून आढळुन आले असुन याचाच अर्थ साक्षरता ७५% इतकी आहे. स्वतःच्या मालकीचे घर असणारे सर्वाधिक कुटुंबे असुन सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असल्यामुळे ही कुटुंबे कौलारू घरात राहतात. कोकणातील सर्वाधिक कुटुंबांना पिण्याचे पाणी नळाद्वारे उपलब्ध झाले असुन स्थानगृह व शौचालये यांची सुविधा १००% कुटुंबात आहे. भौतिक सुविधांचा वापर कमी अधिक प्रमाणात सर्वच कुटुंबांकडे असुन त्यामध्ये मात्र तफावत आढळुन आली.

कोकणात ९४% कुटुंबांकडे शेती क्षेत्र असुन शेतीचा सरासरी आकार २.४ एकर इतका आहे. कोकणात ६% लोक भुमिहीन असल्याचे निर्दशनास आले. कोकणातील कुटुंबप्रमुखांच्या मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत शेती हा असुन या शिवाय जवळपास तितकेच प्रमाण नोकरी करणाऱ्यांचेही आहे. भात हे मुख्य पीक असुन त्यापासून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसुन आले मात्र अलिकडे फळपिकांचे उत्पादन घेण्याकडे लोकांचा कल दिसुन येत आहे. कोकण विभागात सर्वाधिक चैनीच्या वस्तूवर अधिक प्रमाणात खर्च होत असल्याचे नमुद केले आहे. रस्त्यांच्या बाबतीत कोकण सुसज्य समजले जाते. एकेरी डांबरी रस्ते सर्वाधिक प्रमाणात आहेत. रस्त्यांची देखभाल दरवर्षी करावी लागते. विविध प्रकारची सरकारी माहिती, योजना, जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य कमी अधिक प्रमाणात सर्व जिल्ह्यांमध्ये संदेश वहनाच्या माध्यमातून केले जाते. कोकणची भौगालिक रचनेमुळे डोंगरदऱ्या अधिक असुन सखल भाग कमी आहे. यामुळे टेलिफोन, इंटरनेट सारख्या सुविधा १००% गावापर्यंत पोहचल्या नाहीत.

कोकणात वीज, आरोगय, शिक्षण या सुविधा अलिकडच्या काळामध्ये उपलब्ध होत आहेत. मात्र या सुविधांमध्ये अडचणीही दिसुन आल्या आहेत. कोकणातील सर्वाधिक गुंतवणूक पाणीपुरवठा योजना, आणि शिक्षण यामध्ये झाली आहे. शेती क्षेत्रात सर्वाधिक रोजगारांच्या

संधी असल्या तरी बारामाही पाणी पुरवठा सोयी नसल्यामुळे ग्रमीण भागांकडून शहरांकडे स्थलांतर करणाऱ्या लोकांचे प्रमाण ७५% पेक्षा आधिक आहे. शेतीचे हंगामी स्वरूप, पारंपारिक पद्धतीची शेती, पाणीटंचाई, मुंबईकडे जाण्याचा कल या कारणामुळे शेतीत मागासलेपणा दिसुन येतो त्याचा परिणाम कोकणच्या प्रादेशिक असमतोलावर झाला आहे. शासकीय विकासाचे कमी प्रयत्न, राजकीय इच्छा शक्तीचा अभाव यामुळे कोकण मागासलेले दिसुन येते. कोकण विभागात जवळपास ४७% भाग मागासलेला असुन त्याला विविध कारणे कारणीभूत ठरली आहेत.

## ५.४ मूल्यमापन

कोकण विभागात १९९१ नंतरच्या काळात अनेक औद्योगिक वसाहती सुरू झाल्या त्यामुळे शिक्षण, रोजगार यामध्ये हळुहळु वाढ होत असुन प्रादेशिक असमतोल कमी होण्यास काही अंशी मदत झाली आहे. प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी कोकणातील स्थानिक लोकांना प्राधान्य देणे, विविध योजनांवर मुजूर केलेला निधी त्याच कामांसाठी वापरणे, अप्रगत गावांच्या विकासाला प्राधान्य देणे, शाश्वत बाजारपेठा कर्ज सुविधा, पायाभूत सुविधा या घटकांना प्राधान्य देऊन प्रादेशिक असमतोल कमी करता येऊ शकतो. तसेच लोकांचा असणारा दृष्टीकोन सुधारणे गरजेचे आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे कोकणचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी पर्यटनासारख्या घटकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

कोकणात प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यामध्ये प्रामुख्याने शेतीचा मागासलेपणा, उद्योगांचा अपूरा विकास, पायाभूत सुविधांची कमतरता, शिक्षणाची आवड अतिशय कमी, रोजगाराचा अभाव, चैनी प्रवृत्ती, शहराकडे राहण्याचा दृष्टीकोन ही कारणे कारणीभूत ठरली आहे. असे मत कृषी अधिकारी व उद्योजकांनी दिलेले आहे. या सर्वांमुळे अल्प दरडोई उत्पन्न, बेकारी, दारिद्र्य या समस्या जनतेच्या वाट्याला आल्याचे दिसून आले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. स्वत:पासून परिवर्तन सुरू केल्यास नक्कीच समतोल विकासासाठी मदत होईल.

# प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

## ६.१ प्रस्तावना :

कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल एक अभ्यास हा प्रस्तुत शोधप्रबंधाचा महत्त्वाचा भाग आहे. कोकणात नैसर्गिक, स्वाभाविक परिस्थिती असलीतरी खडकाळ, डोंगराळ भागात विकास प्रक्रियेचा वेग मंद असतो हे उघड आहे. कोकणातील ग्रामीण भागाचे प्रमाण जास्त असल्याने तेथे आर्थिक व सामाजिक सुविधा पोहोचल्या नाहीत, हे सर्वेक्षणातून निदर्शनास आले. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांच्या आर्थिक व सामाजिक रचनेच्या वैशिष्ट्यामध्ये तफावत आढळून आली.

प्रस्तुत प्रकरणात संशोधनातून मिळालेली प्रमुख निष्कर्ष व शिफारसी मांडण्यात आलेल्या आहेत. सदरच्या निष्कर्ष व शिफारशींची मांडणी करताना विविध तज्ज्ञांची व नमुना घटकांची मते विचारात घेतली आहेत.

## ६.२ गृहितकृत्यांची पडताळणी :

प्रस्तुत शोधप्रबंधात कोकण विभागाच्या प्रादेशिक असमतोलाचा एक अभ्यास करताना दोन प्रमुख गृहितके निश्चित करण्यात आली आहेत. सर्वेक्षित ११ तालुके व ४४ गावातील, ४४० कुटूंबप्रमुख, ११ कृषी अधिकारी व १० उद्योजक इत्यादी प्रतिसादकांकडून माहिती मिळविलेल्या संरचित प्रश्नावलीमधील विधानांची प्रतिसाधकांना जाणवणारी सत्यता पातळी जाणून घेण्यासाठी मांडलेल्या गृहितकांची पडताळणी करण्याचा प्रयत्न केला असून त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे –**

प्रस्तुत संशोधनाचे **'कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे'** हे पहिले गृहितक आहे. हे गृहितकृत्य तपासण्याचा प्रयत्न केला असून यावरून या गृहितकृत्याचा विचार करता ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितील तफावतीमुळे प्रादेशिक असमतोल दिसून येतो. ठाणे जिल्ह्यात शहरी भागात सर्वाधिक ७७% लोक राहतात. ग्रामीण भागात रायगड ६३.१%, रत्नागिरी ८३.६%, सिंधुदुर्ग ८७.४%, लोकसंख्या राहते. लोकसंख्येची सर्वाधिक घनता ठाणे जिल्ह्यात आहे. सर्वात कमी घनता सिंधुदुर्ग जिल्ह्याची आहे. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुक्रमे ११२२ व १०३६ इतके आहे. ठाणे व रायगड यांचे स्त्री–पुरुष प्रमाण ८८६ व ९१२ इतके आहे. यावरून लोकसंख्येच्या रचनेतील प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

दरडोई उत्पन्न ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक १.५७ लाख रू, रायगड १.३२ लाख , रत्नागिरी १.१० लाख रू, सिंधुदुर्ग ०.९९ लाख रू सर्वात कमी आहे. दारिद्ररेषेखालील कुटुंबे ठाणे जिल्ह्यात २.४४ सर्वात जास्त, रायगड १.१५, सर्वात कमी रत्नागिरी १.३०, सिंधुदुर्ग १.८३ आहेत. एकूण वीज वापर ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक असून कमीत कमी सिंधुदुर्ग जिल्ह्यात असल्याचे दिसून आले. ठाणे जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात कारखाने ७४०४, रायगड १२८०, रत्नागिरी ३७४, सिंधुदुर्ग १३५ आहेत. सर्वाधिक कामगार ३.९९ लाख ठाणे जिल्ह्यात असून सर्वात कमी ०.०४ लाख सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. मत्स्य उत्पादनात ठाणे व रत्नागिरी जिल्हे अग्रस्थानी आहेत. पशुधनाची उपलब्धता ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक असून सर्वात कमी सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. बँकांची कार्यालये, डाक कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक शाळांची महाविद्यालये उपलब्धता ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक आहे. मात्र याच बाबी सिंधुदुर्ग जिल्ह्यात अतिशय अल्प प्रमाणात आहेत. यावरून कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे हे स्पष्ट होते. हे गृहितकृत्य तक्ता क्रमांक ४.१, ४.३,४.४, ४.५, ४.६, ४.७, ४.८, ४.९, ४.१०, ४.११, ४.१२, ४.१३, ४.१४ यांच्या आधारे सत्य ठरते. पहिल्या गृहीतकृत्याची पडताळणी करताना भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, ग्रामीण शहरी, लोकसंख्येचे प्रमाण, जिल्ह्याचे एकूण दरडोई उत्पन्न इत्यादी निकष विचारात घेतले आहेत. या विविध निकषाबाबत ठाणे, रायगड,

रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये विविधता आढळून आल्याने कोकण विभागात प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला आहे, असे आढळून आले.

**२) कोकण विभागात आर्थिक व सामाजिक असमतोल आहे.**

प्रस्तुत संशोधनाचे '**कोकण विभागात आर्थिक व सामाजिक असमतोल आहे**' हे दुसरे गृहितक आहे. महाराष्ट्रात कोकणचे दरडोई उत्पन्न अधिक आहे. २००४–०५ मध्ये दरडोई उत्पन्न २९.०% इतके असून २०१३–१४ मध्ये २६.८% इतके झाले आहे. पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती यांचे दरडोई उत्पन्न कोकणपेक्षा कमी आहे. शेतकरी, शेतमजूर यांची शेतीवर अवलंबून असणारी कार्यशक्ती २९.१६ लाख आहे. एकूण सिंचन क्षेत्राची एकूण पेरणी केलेल्या क्षेत्राशी असलेली टक्केवारी ८.०९ इतकी असून सर्वाधिक पुणे विभागात २८.२% नागपूर मध्ये २५.६७% इतकी असून यावरून प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. प्राथमिक शेती क्षेत्रातून १०.८% उत्पन्न राज्याला कोकणातून मिळते. कोकणात जलाशयांची संख्या अधिक असली तरी उपयुक्त साठा कमी आहे. कोकणात २००४–०५ मध्य जलाशये ११२ , प्रकल्पीय साठा ५०५ दशलक्ष घनमीटर , उपयुक्त साठ ४८५ दशलक्ष घनमीटर इतका असून २०१३–१४ मध्ये जलाशये १५९, प्रकल्पीय साठा  १७३० दशलक्ष घनमीटर, उपयुक्त साठा १५३० दशलक्ष घनमीटर इतका आहे. पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर या विभागांशी तुलना करता जलाशये, प्रकल्पीय साठा, उपयुक्त साठा यामध्ये तफावत आढळून आली. कोकणात निर्माण केलेली सिंचन क्षमता महाराष्ट्राच्या १.०% इतकी आहे. अनुशेष २७१.९ लाख हेक्टर आहे. वित्तीय क्षमता ८१५८ कोटी (प्रति ३ हेक्टरप्रमाणे) रू इतका प्रचंड आहे. कोकणात मंजूर कार्यरत औद्योगिक वसाहती, रोजगार यांतही तफावत आढळून आली आहे. औद्योगिक विकास महामंडळाकडून केलेली गुंतवणूक मराठवाडा, विदर्भ यांच्या तुलनेत कोकणात अधिक आहे. औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीबाबतीतही असमतोलपणा दिसून येतो.

शिक्षण क्षेत्राचा विचार करता विद्यार्थी शिक्षक प्रमाण सर्वात कमी नागपूर मध्ये असून कोकणचे २८.५% आहे. महिलांची साक्षरता सर्वाधिक कोकणात ७९.१% इतकी आहे. रस्ते निर्मिती सर्वात कमी प्रमाणात कोकण विभागात झाल्याचे आढळून आले आहे. कोकणातील

७८% लोकसंख्या शहरी भागात राहते. उर्वरीत महाराष्ट्रात ग्रामीण भागात अधिक लोकसंख्या आहे. अनुसूचित जातीची लोकसंख्या ६.३% तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या ७.०% आहे. यावरून कोकण विभागात प्रादेशिक असमतोल आहे हे गृहितकृत्य तक्ता क्रमांक ३.३, ३.४, ३.६, ३.७, ३.९, ३.१०, ३.१२ यावरून सत्य ठरते.

दुसऱ्या गृहीतकृत्याची पडताळणी करताना कोकण विभागातील जलाशये त्यांचा उपयुक्त साठा, प्रकल्पीय साठा सिंचन, शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या, प्राथमिक क्षेत्राचा, हिस्सा, उद्योग, रोजगार, गुंतवणूक, शिक्षण, लोकसंख्या, मागासवर्गीय लोकसंख्या या सर्व बाबतीत प्रादेशिक विभागात असमतोल दिसून आला आहे.

## ६.३ प्रमुख निष्कर्ष

प्रस्तुत शोधप्रबंधातील महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१. कोकण विभागातील ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीचे, रायगड जिल्ह्यात भटके विमुक्त जमातीचे, रत्नागिरी जिल्ह्यात इतर मागासवर्गीय आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुसूचित जमातीची अधिक कुटुंबे दिसून आली असून यावरून जातीय रचनेत कोकण विभागात असमतोल दिसून येतो.

२. घराची सुविधा उपलब्ध असणारे रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त कुटुंबे आहे. मात्र ठाणे जिल्ह्यातील १०, रायगडमधील ५, रत्नागिरी मधील ९ आणि सिंधुदुर्ग मधील सहा कुटुंबांना घराची सुविधा उपलब्ध होऊ शकले नाही. कारण शहरीकरण जागेचे प्रश्न कुटुंबाचा आकार ही कारणे आहेत. यावरून प्रादेशिक असमतोल दिसून येतो. राहते घर असले तरी लोकांनी स्थलांतर केले आहे. वर्षातील दहा महिने घर बंद असते. कारण पाणी पुरवठ्याच्या अल्प सुविधा, शेतीचे हंगामी स्वरूप व शेती व्यवसाय निसर्गावर अवलंबून शेतीत आधुनिकीकरण कमी, व्यापारी पिके घेण्याचा कल कमी यामुळे कोकणातील लोक मुंबई–ठाणे या ठिकाणी रोजगारासाठी स्थलांतर करतात, असे असले तरी स्लॅबचे ६.१%, पत्र्याचे२३.४%, कौलारू ७०.५% घराची सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे.

३. कोकणातील नमुना कुटुंबांना पिण्याचे पाणी सर्वाधिक प्रमाणात नळाद्वारे ६८.४% कुटुंबांना प्राप्त झाले असून सार्वजनिक विहीरीद्वारे १८.७% नदीद्वारे १२.९% मिळत असल्याचे दिसून आले आहे.

४. कोकणातील नमुना ४४० कुटंबप्रमुखांपैकी शेती व नोकरी करणारे प्रत्येकी ३९.८% कुटुंबांना तर व्यवसाय करणऱ्या २०.४% कुटुंबांना उत्पन्न प्राप्त होते असे दिसून आले आहे.

५. कोकणातील नमुना ४४० कुटुंबांपैकी पायवाट१३.४%, खडीचे कच्चे रस्ते ४.०% , कुटुंबांना उपलब्ध झाले आहेत. सर्वाधिक प्रमाणात एकेरी डांबरी रस्त्यांची उपलब्धता झाली आहे. कोकणातील लोकसंख्या वाडी, वस्तीमध्ये विखुरलेली आहे. त्यामुळे सर्वच गावापर्यंत डांबरी रस्ते पोहोचले नाहीत त्या ठिकाणी पायवाट, खडीचे कच्चे रस्ते उपलब्ध आहेत, असे संशोधनातून आढळून आले आहे.

६. ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकेरी डांबरी रस्ते सर्वाधिक उपलब्ध असून, पायवाट, खडीचे रस्ते, दुहेरी डांबरी रस्ते यांच्या उपलब्धते बाबत मात्र प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.

७. कोकणातील नमुना ४४० कुटुंबप्रमुखांपैकी रस्ते सुविधेमुळे नाशवंत पदार्थांची जलद वाहतुक झाली. १२.६%, शेजारील गावांशी व तालुक्यांशी संपर्क आला ६८.४%, रस्त्यांमुळे लोकप्रतिनिधींना निवडणूक प्रचारासाठी गावापर्यंत येणे शक्य झाले. ११.६% वाहतूकीची साधने वाढली ७.४% या स्वरूपाचे फायदे झाल्याचे दिसून आले आहे.

८. शासकीय आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असल्याचे नमुना ५५.०%, जिल्हा रूग्णालय २३.०% फिरता दवाखाना २२.०% याठिकाणी उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे.

९. कोकणातील नमुना ३९.६% कुटुंबांना अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आश्रमशाळा नमुना ३०.२% कुटुंबांना माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नमुना २३.९% कुटुंबांना पदवी महविद्यालय ५.२% कुटुंबांना अभियांत्रिकी महाविद्यालय १.१.% कुटुंबांना वैद्यकिय महाविद्यालय या शैक्षणिक सुविधांची उपलब्धता झाल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

१०. कोकण विभागातील ठाणे व रायगड जिल्ह्यात रोजगाराच्या विविध संधी अधिक प्रमाणात आहे. या संधी औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात आहेत. मात्र रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा फारसा विकास झाला नाही. यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे, असे नमुना प्रतिसादकर्त्यांच्या पाहणीतून आढळून आले.

११. कोकणातील एकूण ४४० कुटुंबप्रमुखांपैकी ७५.४% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागातून शहराकडे ४.३% कुटुंबप्रमुखांनी शहराकडून ग्रामीण भागाकडे, १२.६% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी आणि ७.७%कुटुंबप्रमुखांनी एका शहरातून दुसऱ्या शहरात स्थलांतर झाले आहे, असा प्रतिसाद नोंदविला असल्याचे संशोधनातून आढळून येते.

१२. कोकणातील सर्वच म्हणजेच ४४० कुटुंबप्रमुखांनी स्थलांतर घडून येत असल्याचे मत व्यक्त केले आहे. यापैकी ६५.४% कुटुंबप्रमुखांनी ग्रामीण भागात रोजगाराचा अभाव, २०.०% कुटुंबप्रमुखांनी शहरात राहाणे आवडते आणि १४.६%कुटुंबप्रमुखांनी शहरात सर्व सोयी उपलब्ध असतात या कारणास्तव स्थलांतर होते असा प्रतिसाद नोंदविला असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

१३. कोकणातील एकूण ४४० कुटुंबप्रमुखांपैकी २३.१% कुटुंबप्रमुखांनी पारंपरिक दृष्टीकोन ४०.९% कुटुंबप्रमुखांनी मुंबई जाण्याचा कल, २२.८% कुटुंबप्रमुखांनी काम करण्याची इच्छा नाही आणि १३.२%कुटुंबप्रमुखांनी पाणी टंचाईमुळे शेती मागासलेल्या अवस्थेत राहिली आहे, असे मत व्यक्त केले आहे. असल्याचे संशोधनातून दिसून येते.

१४. कोकण विभागातील प्रादेशिक असमतोलाच्या नमुना पाहणीत शासकीय विकासाचे प्रयत्न, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, सहकाराचा कमी विकास, शेतीचा कमी विकास, यामुळे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात कमी प्रमाणात झालेला आहे. यामुळे आजही रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे प्रादेशिक असमतोलाच्या दृष्टीने मागासलेले दिसून येतात.

१५. कोकणातील एकूण ४४० कुटुंबप्रमुखांनी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाय सुचविले आहेत. यात स्थानिकांना प्राधान्य देणे ३१.६% , योजनांतर्गत निधी वाढविणे

१८.७% सार्वजनिक क्षेत्रातील साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करणे १९.०% आणि खाजगी गुंतवणूक वाढविणे २५.४% कुटुंबप्रमुखांनी प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाय सुचविल्याचे संशोधनातून आढळून आले.

१६. कोकणातील एकूण ११ कृषी अधिकाऱ्यांपैकी कृषी पदविका १८.२%आणि कृषी पदवी ८१.८% ही शैक्षणिक पात्रता मिळविलेल्या कृषी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. यापैकी ५४.५%कृषी अधिकाऱ्यांची नेमणूक पदोन्नती किंवा बढती पद्धतीने झाली असून ४५.५% कृषी अधिकाऱ्यांची नेमणूक महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झाली असल्याचे संशोधनातून आढळून येते.

१७. कोकणातील नमुना कृषीअधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण २५८८ गावांपैकी ४६.७% गावे अजूनही मागासलेल्या अवस्थेत आहेत. मात्र ५३.३% गावे प्रगत असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. परिणामी प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे.

१८. शेतीत काम न करण्याची लोकांची प्रवृत्ती ०२(१८.२%), पाणी पुरवठ्याची उपलब्धता ०१(९.१%) , शिक्षणाचा अभाव ०४(३६.४%) , कर्जपुरवठा होत नाही ०१(९.१%) आणि सहकारी संस्थांचा अपूरा विकास ०१(९.१%) या कारणामुळे कोकणातील शेती मागासलेल्या अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे असे मत कृषी अधिकाऱ्यांनी मांडले.

१९. कोकणातील नमुना कृषीअधिकाऱ्यांच्या दृष्टीने प्रादेशिक असमतोलाची कारणे लक्षात घेतली असता एकूण ११ कृषी अधिकाऱ्यांपैकी मुंबई रोजगारासाठी जाण्याचा काळ ४५.४%, शेती क्षेत्रातील कमी गुंतवणूक ९.१%, जलसिंचन व वीज सुविधांची कमतरता १८.२%, निरक्षरता १८.२% आणि आळशी वृत्ती ९.१% कृषी अधिकाऱ्यांनी प्रस्तुत कारणे नमुद केली आहेत. हा ही प्रादेशिक असमतोलाचा एक भाग आहे.

२०. कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी नमुना ११ कृषी अधिकाऱ्यांनी सुचविलेल्या उपाययोजनांमध्ये जनतेच्या समस्यांचा सरकारकडे पाठपुरावा करणे १८.२%, ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे १८.२%, शेती विषयक व विकासाच्या योजना १००% राबविणे ४५.४% शेतीत पायाभूत सुविधा वाढविण्यावर

भर देणे ९.१% आणि संशोधन प्रत्यक्ष कृतीत आणणे ९.१% उपाययोजनांचा समावेश असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

२१. कोकणातील उद्योजकांच्या नवीन उद्योग स्थापन करण्यामागील उद्दीष्टांचा विचार करता ३०% उद्योजकांनी आर्थिक विकास, २०.०% उद्योजकांनी सामाजिक विकास, ३०.०% उद्योजकांनी प्रादेशिक विकास आणि नमुना २०% उद्योजकांनी शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने नवीन उद्योग स्थापन केले असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

२२. कोकणातील प्रादेशिक असमतोल सर्वाधिक असणाऱ्या क्षेत्रांचा अभ्यास करता नमुना १० उद्योजकांपैकी २०.०% उद्योजकांनी शिक्षण,२०.०% उद्योजकांनी पायाभूत सुविधा, २०.०% उद्योजकांनी शेती व इतर क्षेत्र, १०.०% उद्योजकांनी सामाजिक क्षेत्र आणि ३०.०% उद्योजकांनी आर्थिक क्षेत्रात सर्वाधिक प्रादेशिक असमतोल दिसून येत असल्याचे मत मांडले आहे.

२३. कोकणातील औद्योगिक, आर्थिक, प्रादेशिक असमतोल कमी करण्यामागे शासनाची उदासिनता४०.०%, भ्रष्टाचार १०.०% निधीचा अयोग्य वापर ४०.०% आणि कागदपत्रांची अयोग्य अंमलबजावणी १०.०% ही अडथळे आहेत.

२४. कोकणातील उद्योजकांच्या मते कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी पुढील घटक महत्त्वाचे आहेत. मागासलेल्या भागात उद्योग स्थापन करण्यास परवानगी देणे ३०.०%, मागास भागातील उद्योगांना कर सवलती देणे ३०.०%, कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे १०.०% , उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करणे १०.०%, शाश्वत बाजारपेठांची निर्मिती करणे २०.०% या उपाययोजना करता येऊ शकतात असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

२५. कोकणातील नमुना कुटंबप्रमुखांच्या पाहणीवरून असे दिसून येते की, शेती व शेतीशी निगडित व्यवसायापासून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नांपैकी भात किंवा तांदुळ यापासून १८.६%, फळपिकापासून ४३.९%, दुग्ध व्यवसाय व कुटुंबपालनापासून २७.१%, वनौषधी गोळा करण्यापासून १०.४% उत्पन्न प्राप्त झाल्याचे दिसून आले आहे. ठाणे

जिल्ह्यात चिकू , रत्नागिरी मध्ये हापूस आंबा, सिंधुदुर्ग मध्ये नारळ, सुपारी प्रसिद्ध असल्यामुळे फळपिकापासून सर्वाधिक उत्पन्न प्राप्त होत असल्याचे स्पष्ट होते.

## ६.४ शिफारशी:

कोकण विभागातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी पुढील शिफारशी महत्त्वाच्या आहेत. सरकार, जनता, अधिकारी यांनी एकत्रित प्रयत्न करून प्रादेशिक असमतोल कमी करण्याची आवश्यकता आहे.

१) कोकणातील शेती व्यवसाय विकसित करण्यासाठी सरकारने शेतीत गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. शेतीमधील गुंतवणूकीतून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) कोकण विभागात सहकार चळवळीचा विकास घडवून आणणे आवश्यक आहे. यासाठी सहकारी पतसंस्था, सहकारी दुग्ध व्यवसाय, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी बँकांच्या शाखा यांचा विस्तार घडवून आणावा.

३) कोकणात प्रतिवर्षी जून ते सप्टेंबर या काळात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून शेती व्यवसायाला बारमाही पाणीपुरवठा होवू शकेल असे धोरण निश्चित करावे.

४) रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात मानव संसाधनातील आरोग्यवाढी साठी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय सुरू करावे. विविध व्यावसायिक व तंत्र शिक्षणाच्या अभ्यासक्रमांचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे.

५) जिल्हा सर्वोपचार रूग्णालयामध्ये १२ वी विज्ञाननंतर सामाजिक आरोग्य पाठ्यक्रम सुरू करावेत. या धोरणाचा स्थानिक उमेदवारांना फायदा होईल व प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता कमी होईल.

६) सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेतमजूर महिला प्रशिक्षण संस्था सुरू करावी आणि इतर कोकणात शाखा विस्तार करावा. आंबा, काजू, नारळ, सुपारी या फळ पिकांचे प्रशिक्षण महिलांना देण्यात यावे.

७) कृषी क्षेत्रातील विभागीय असमतोल दूर करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाच्या ५०% हापूस आंब्याच्या निर्यातीला परवानगी द्यावी. परकीय चलनाचा फायदा कोकणातील आंबा, काजू, चिकू उत्पादकांना होईल.

८) आंबा, फणस, चिकू, काजू या पिकांच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांनी लक्ष केंद्रित करावे. व्यापारी दृष्टीकोनातून शेती करावी.

९) कोकणातील प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी योजनांतर्गत निधी वाढविणे आवश्यक आहे.

१०) स्थानिक पातळीवर रोजगारांच्या संधी निर्माण करण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. यामुळे मुंबई–ठाणे या शहरी भागात स्थलांतर होणार नाही.

११) कोकण विभागातील ऐतिहासिक, धार्मिक पर्यटनस्थळांचा विकास करणे. विशेषत: दुर्लक्षित पर्यटन स्थळांची माहिती प्रसारमाध्यमांनी जनतेला उपलब्ध करून द्यावी. यामुळे पर्यटक आकर्षित होतील व कोकणच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

१२) संपूर्ण कोकण रेल्वेचे दुपदरीकरण आणि विद्युतीकरण करण्यासाठी सरकारने निधीची उपलब्धता करून द्यावी.

१३) कोकणातील मागास, आदिवासी, दारिद्र्यरेषेखालील सर्वात जास्त गरीब कुटुंबातील किमान एका व्यक्तीला दरमहा किमान २५००० ते ३०००० रू. पर्यंत वेतनाची नोकरी देणारे क्षेत्र निर्माण करावे. यामुळे गरीबी निर्मुलन होईल.

१४) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी सरकारने कोकणातील पर्यटन व्यवसायाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. पर्यटन ही एक तृतीय स्वरूपाची सेवा किंवा व्यवसाय आहे. यामुळे रोख किंवा नगद स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते. याचा परिणाम ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लागेल.

१५) कोकणातील फळ प्रक्रिया उद्योगाला प्राधान्य द्यावे. काजू व हापूस आंबे यांच्या निर्यातीसाठी विशेष निर्यात विभाग स्थापन करावा. यामुळे परकीय चलनाची प्राप्ती होऊन कोकणची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत होईल.

१६) सागरी संपत्तीमधील माशांची पैदास वाढविणे आवश्यक आहे. निर्यातक्षम माशांच्या जातीची जोपासना करणे आवश्यक आहे. मत्स्य विद्यापीठाने विकसित केलेल्या

जातीवर भर देणे आवश्यक आहे. तसेच सरकारने शीतगृहांची सुविधा मासेमारी व्यावसायिकांना पुरविण्यासाठी आर्थिक तरतूद करावी.

१७) मुंबई–गोवा या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम चालू असून भविष्यात तो सहा पदरी होईल. हा महामार्ग कोकणातील चारही जिल्ह्यातून जातो. याचा कोकणातील जनतेने आणि उद्योजकांनी फायदा घ्यावा.

## ६.५ मूल्यमापन

कोकण विभागातील चार जिल्ह्यातील सर्वेक्षित ४४ गावांमधील निवडलेल्या ४४० कुटुंबप्रमुख, ११ कृषी अधिकारी, १० उद्योजक यांच्याकडून प्रश्नावली भरून घेतली तसेच त्यांच्याशी केलेली चर्चा विचार–विनिमय आणि सखोल निरीक्षणांचा अवलंब करून माहिती गोळा केलेली आहे. ही माहिती गोळा करताना सर्वांनी दिलेल्या माहितीवरून निघालेले निष्कर्ष व संशोधिकेला आढळून आलेले निष्कर्ष यांचा अभ्यास करून शिफारशी सुचविल्या आहेत.

कोकण विभागातील आर्थिक व सामाजिक असमतोल दूर करण्यासाठी कृषी व उद्योग क्षेत्रात गुंतवणूक होणे आवश्यक आहे. कोकणात सर्वात जास्त पावसाचे प्रमाण आहे. या पावसाच्या पाण्याचे नियोजन करून लघु धरणे बांधणे आवश्यक आहे. याला कोकणातील जनतेने मान्यता दिली आहे. कृषी निगडीत पूरक व्यवसाय आणि कुटीर उद्योग, लघु उद्योग यांच्या साठी पूरक असे कोकणसाठी धोरण करणे आवश्यक आहे. हे केले तर कोकणातील कोकणातून होणारे स्थलांतर कमी होईल. जलसिंचन सुविधा व पायाभूत सुविधा या दोन प्रमुख क्षेत्रात गुंतवणूक होणे आवश्यक आहे. ही गुंतवणूक झाल्यानंतर कोकणातील सर्व प्रश्न सोडविणे सोपे होईल. कोकणातील पर्यटन स्थळे विकसित करण्यामध्ये जनता ही उत्सुक आहे. मात्र त्यासाठी लागणारे भांडवल प्रशिक्षण संस्था, मुलभूत सोयी, यामध्ये शासनाकडून तरतूद होणे गरजेचे आहे असे जनतेशी संवाद साधताना जाणवले. कोकण विभागात आर्थिक व सामाजिक असमतोल आहे. जनता, तज्ञ व्यक्ती, कृषी अधिकारी, उद्योजक यांनी हा असमतोल मान्य केला आहे. राजकीय आणि शासकीय तसेच सर्वांच्या प्रयत्नातूनच कोकणातील असमतोल निश्चितच दूर होईल.

# संदर्भग्रंथ सूची

## अ) संदर्भ पुस्तके


१) Datt Gaurav and Mahajan Ashwini (68th Edition 2013), 'Indian Economy', S. Chand Publication, New Delhi, Page No. 507

२) Fairchild : Dictionary of Sociology, Page No. 265

३) Good and Hatt (1981) ' Methods and Social Research' MacGraw Hill Internatioinal Book company, New Delhi, Page-133

४) Lundberg G.A. (1951), ' Social Research', Long Mans, Green and company, New York, Page No. 9

५) Ruddar Datt and K.P.M. Sundaram, 'Indian Economy', 60th Edition, S.Chand and Company Ltd., New Delhi

६) Seltiz C.M., Jahoda, Deutseh and Cook (1959), Research Methods in social relations', Richant and Winston Inc. Publication, New York, Page No. 38

७) Yaung Pouline V. (1982), 'Scientific Social Surveys and Research', Prentice Hall of India Private Limited, New Delhi, Page No. 9

८) अर्थविचार (२०१६), मराठी अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणे खंड–२, पृष्ठ क्र. ३९ ते ६०,

९) आगलावे प्रदीप (जानेवारी २०००), 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १३०

१०) कुलकर्णी प्रभाकर रामचंद्र (१९९९) भारतीय अर्थव्यवस्था विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र.१९७.

११) कविमंडन विजय (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. ५९२

१२) कद्रेकर श्रीरंग (माच २०१५), 'कोकणाचं पाणी समस्या आणि उपाय', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ५५ ते ५६

१३) कुरूलकर र.पु. आणि एकताटे अरविंद (प्रथमावृत्ती जून १९९१), 'विकासाचे अर्थशास्त्र', विद्याप्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. १ ते १५

१४) कुरूळकर र.पु., (२००६),'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', प्रथमावृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर

१५) खंदारे सुखदेव (प्रथमावृत्ती २०१३), 'आर्थिक व सामाजिक विकास' दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, पृष्ठ क्र. १०९

१६) डायमंड अर्थशास्त्र कोश (२००८), डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृष्ठ क्र. ६३६

१७) दत्त गौरव आणि महाजन आश्विनी, (५२ वी सुधारित हिंदी आवृत्ती २०१४), 'भारतीय अर्थव्यवस्था', एस.चन्द एण्ड कंपनी, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ४८६

१८) धुरी निलम, (जुलै २००८), 'संशोधन पद्धती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ६७ ते ६८

१९) बहिर लक्ष्मण भा. (डिसेंबर २००७) "महाराष्टातील आंतर प्रादेशिक औद्योगिक विषमता एक परिक्षण " योजना मुंबइ, पृष्ठ क्र. ७४

२०) बिराजदार माधव (जून २०१२) , 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृष्ठ क्र. १४–१५

२१) बिराजदार शैला (२०१४, 'भारीतय अर्थव्यवस्था', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, जळगाव, पृष्ठ क्र. १४३

२२) भट कमलाताई (२००३), 'मागास भागाचा आर्थिक विकास', सेंटर फॉर बिझनेस ॲण्ड इंडस्ट्री, आशीर्वाद शाहु कॉलेज रोड, पर्वती पुणे, पृष्ठ क्र. १४७

२३) रसाळ राजेंद्र (जानेवारी २०१०), 'भारतीय अर्थव्यवस्था', सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे पृष्ठ क्र. ३३० ते ३३४

२४) भोंग जंगले, आडक, आडदांडे (प्रथमावृत्ती २०१४), 'भारतीय अर्थव्यवस्था : समस्या आणि भवितव्य', इंटरनॅशनल बुक हाऊस, मुंबई, पृष्ठ क्र. ११४ ते ११७

२५) रायखेलकर दामजी (जानेवारी २०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद पृष्ठ क्र. ५७९

२६) रायखेलकर ए. आर. दामजी बी. एच. (२००५) औद्योगिक अर्थशास्त्र, विद्याबुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ११४

२७) संपादक जे.एफ. पाटील (मार्च २००४), ‘वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र’, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र. १८७

२८) संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र जोशी (२००८), ‘मराठी विश्वकोष’, खंड १०, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई पृष्ठ क्र.५७६ ते ५७८

## एम.फिल.

१) कानवडे वैशाली (ऑगस्ट २०१७), ‘संगमनेर तालुक्यातील प्रादेशिक अमसतोल – एक चिकित्सक अध्ययन’, एम.फिल. प्रबंधिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सादर पृष्ठ क्र. १२६

## पीएच.डी. प्रबंध

१) Adiwan Fahlan Aritenang (2012), ‘ The Impact of State Restructuring on Indonesia’s Regional Economic Convergence’, Ph.D. thesis submitted in University of London, Page No. 11

२) Deeba Jahangir (2011), ‘ Regional Disparities in Economics Development in the Post referm period, Ph.D. Thesis submitted Aligarh Muslim University Aligarch Page No. 162

३) Mangade Ganesh (2011), ‘ Human Development in Socially and Economically bakwarded Region - A Study of marathwada, Ph.D thesis submitted to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad Page no. 187

४) Muhammad Butt (2006), ‘ Impact of Tariff cuts on Pakistan : A Computable General Equilibrium analysis with particular focus on main export and regional disparities, Ph.D. Thesis submitted Griffith University Page no. 270 to 278

५) Ratul Mahanta (2003), An Analysis of Regional Disparities in Agricultural Development in Assam Ph.D. Thesis submitted to department of Humanities and social science, Indian Institute of Technologies Guwahati Page no. 11

६) तलवारे जितेंद्र (२०१०), ‘शहरी रोजगार योजनांचे आर्थिक व सामाजिक मूल्यमापन :खानदेश एक अभ्यास’, पीएच.डी. प्रबंध, उत्तरमहाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, पृष्ठ क्र. १५५ ते १५६

## अहवाल

१) Ministry of Finance, Indian Public Finance Statistics (2004-05), Statistical Abstract of India, 2007, Page No. 29

२) अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन (सुकथनकर) समिती १९७३, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. ३७२

३) उच्चस्तरीय समितीचा अहवाल (ऑक्टोबर २०१३) पान नं ५०४

४) केळकर विजय (२०१३), ‘ अध्यक्ष–प्रादेशिक अमसतोलाच्या संदर्भात उच्चस्तरीय समिती अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर पृष्ठ क्र. १ ते ६

५) कोकण बृहत आराखडा, स्वामीनाथन समिती (१९८१), महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ क्र. ३४२

६) कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती १९८०, बी.जी. खताळ, महाराष्ट्र शासन मुंबई , पृष्ठ क्र. ४२७

७) कोयना अवजल वापर अभ्यासगट (२००६), अहवाल महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. ३११

८) खारभूमी विकास समिती, श्री.रा. वि. बेलोसे (१९८१), महाराष्ट्र शासन मुंबई, पृष्ठ क्र. ३८५

९) जिल्हा आर्थिक–सामाजिक समालोचन (२०१२–१३) ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, माहिती व प्रकाशन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

१०) दुसरा सिंचन आयोग, डॉ. माधवराळ चितळे (१९९५), महाराष्ट्र शासन मुंबई, पृष्ठ क्र. ४२१

११) “प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल”, (एप्रिल १९८४), महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग मुंबइ, पृष्ठ. क्र २५

१२) “प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल”, (एप्रिल १९८४), तत्रैव पृष्ठ. क्र २०

१३) महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग, (श्री. स.गो. बर्वे आयोग)(१९६२), महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. ६४२

१४) “प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समीतीचा अहवाल”, (एप्रिल १९८४), तत्रैव पृष्ठ. क्र २४

१५) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१३-१४), अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई पृष्ठ क्र. १ व २

१६) प्रादेशिक-अनुशेष विषयक दांडेकर समिति (१९८४), महाराष्ट्र शासन मुंबई पृष्ठ क्र. ३७९

१७) महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समिती, विजय केळकर (ऑक्टोबर २०१३), महाराष्ट्र शासन मुंबई

## मासिके / वार्षिक अंक

१) Kurian N.J. (2000), ‘ Widening Regional Disparities in India’, Economical and Political weekly, Vol XXXV no.7, February 2000, Page no. 12 to 18

२) Samik Chowdhary (August 2014) , ‘ Regional Disparity in India A Study of Three Decades, Paper presented for IARIW 33rd General conference, Rotterdan Nethevlands Page No. 10 to 16

३) Satyaki Roy (2012), ‘ Regioanl Disparities in growth and human development in India, Research Paper prepared for the institute for studies in industrial development, new Delhi page no. 21 to 22

४) Somik V. Lall(March 1999), ‘ Economical and Political Weekly’, 20 march 1999, Page no. 717 to 725

५) इंगळे जे.एस. (एप्रिल २०१३), ‘योजना’, वर्ष २९, अंक ९, पृष्ठ क्र. ४४

६) केशवा एस.आर. (डिसेंबर २०१४), ‘योजना वर्ष ४२, अंक ५, पृष्ठ क्र. १८ ते २६

७) कुरलकर र.पु. (जानेवारी , मार्च २०१३), ‘अर्थसंवाद’, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, खंड ३६, अंक. ४ पृष्ठ क्र.३३१ ते ३३८

८)	घाटगे, वावरे (२०१०), ‘अर्थमंथन’, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३४ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन कुळगाव बदलापूर येथे शोधनिबंध सादर, पृष्ठ क्र. १३१ ते १३४
९)	चौधरी दिपक व खाचणे अशोक (एप्रिल जून २०१४), ‘अर्थसंवाद’, खंड ३८, अंक १ पृष्ठ क्र. ४८
१०)	धेंडे धर्मा (एप्रिल जून २००९), ‘अर्थसंवाद’, खंड ३३ अंक १, पृष्ठ क्र.१० ते १७
११)	बागवाले विनोद (२०२०), पूर्वोक्त ‘अर्थमंथन’, पृष्ठ क्र. १७९–१८०
१२)	भांडवलकर रामदास (एप्रिल जून २०१५), ‘अर्थसंवाद’, खंड ३९, अंक १ पृष्ठ क्र. ५०–५१
१३)	भिसे रामेश्वर (जानेवारी २०१०), ‘अर्थशलाका’ मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३३ वे राष्ट्रीय अधिवेशन, बारामती पृष्ठ क्र. १३४ ते १३५
१४)	मुजावर रमजान (२०१०), पूर्वोक्त ‘अर्थमंथन’, पृष्ठ क्र. १७९–१८०
१५)	सोनवणे बच्छाव (मे २००९), ‘विकास समर्पित योजना’, मासिक वर्ष ३६, अंक १०, प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पृष्ठ क्र. २१

## शोधनिबंध

१)	B.B. Bhattacharya and S. Sakthivel (2005), ‘ Regional Growth and Disparity in India : A comparision of Pre and post reform decades’ , Research paper prepared Institute of Economic Growth, University of New Delhi, Enclave , Page no. 14-15

## वेबसाईट

१)	www.mahades.maharashtra.
२)	www.gov.ac.in
३)	www.regionalimbalance.com
४)	www.thane.org
५)	www.raigad.org
६)	www.sindhudurga.org
७)	www.ratnagiri.org
८)	www.india.gov.in/sector_php.

# परिशिष्ट –१

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## ''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४ ते २०१४''

### प्रश्नावली –१

### अ) कुटुंबप्रमुखासाठी प्रश्नावली

**सर्वसाधारण माहिती :**

१) पूर्ण नाव : ---------------------------------

पत्ता : ---------------------------------

मोबाईल नं. : ----------------------------------

२) धर्म जात

अ) खुला ☐ ब) इतर मागासवर्ग ☐ क) अनुसूचित जाती ☐

ड) अनुसूचित जमाती ☐ इ) भटके विमुक्त ☐

३) कुटुंबातील एकूण व्यक्तीचे वयोगटानुसार वर्गीकरण

| **वयोगट** | **स्त्री** | **पुरूष** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **० ते १४** | | | |
| **१५ ते ५९** | | | |
| **६० च्या पुढे** | | | |
| **एकूण** | | | |

**४) कुटुंबातील एकूण व्यक्तींचे शैक्षणिक स्तरानुसार वर्गीकरण**

| **शैक्षणिक स्तर** | **स्त्री** | **पुरूष** | **एकूण** |
|---|---|---|---|
| निरक्षर | | | |
| प्राथमिक | | | |
| माध्यमिक | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| पदवी | | | |
| तांत्रिक/ व्यावसायिक शिक्षण | | | |
| एकूण | | | |

५) राहते घर आपल्या मालकीचे आहे काय?

होय ☐ नाही ☐

घरांचे स्वरूप

अ) पक्के (स्लॅबचे) ☐

ब) कच्चे (पत्र्याचे) ☐

क) साधे (कौलारू) ☐

**६) घरातील खोल्यांची संख्या**

अ)१ ☐ ब) २ ☐ क) ३ ☐ ड) ३ पेक्षा अधिक ☐

**७) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था**

अ) नळ ☐ ब) सार्वजनिक विहिर ☐ क) नदी ☐

८) घरातील स्वच्छता विषयक सुविधांची उपलब्धता

१) स्नानगृह असल्यास अ) होय ☐ ब) नाही ☐

२) शौचालय असल्यास अ) हाय ☐ ब) नाही ☐

९) आपल्याकडील भौतिक सुविधा

अ) गॅस कनेक्शन ☐ ब) टेलिफोन ☐

क) मोटार सायकल ☐ ड) ट्रॅक्टर ☐

इ) बैलगाडी ☐

१०) आपली शेती आहे काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) भूमीहिन ☐

असल्यास शेतीचे स्वरूप

अ) लागवड योग्य ☐ एकर ब) पडीक ☐ एकर

क) डोंगराळ व खडकाळ ☐ एकर

११) उत्पन्नाचे प्रमुख मार्ग

अ) शेती ☐ ब) उद्योग ☐ क) नोकरी ☐

१२) शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नांची माहिती

| पिके | उत्पन्न (दरवार्षिक) रूपयांत |
|---|---|
| भात पिकापासूनचे उत्पन्न | |
| फळपीकापासूनचे उत्पन्न | |
| पुरक व्यवसाय | |
| वन औषधी पासून मिळणारे उत्पन्न | |

१३) कुटुंबाचा वार्षिक खर्च (रूपयांत)

अ) अन्नधान्य व किराणा ☐ ब) कपडे ☐ क) वैद्यकिय खर्च ☐

ड) करमणूक खर्च ☐ इ) प्रवासखर्च ☐ ई) वीज बील ☐

उ) फोन बील ☐ ए) सण, उत्सवांवर होणारा खर्च ☐

१४) आपल्या परिसरात खालीलपैकी कोणत्या प्रकारचे रस्ते उपलब्ध आहेत?

अ) पायवाट ☐ ब) खडीचे कच्चे रस्ते ☐ क) एकेरी डांबरी रस्ते ☐

ड) दुहेरी डांबरी रस्ते ☐

१५) रस्त्यांची देखभाल वेळेवर केली जाते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

असल्यास त्याचे स्वरूप,

अ) एकदाच ☐ ब) दर पाच वर्षांनी ☐ क) दरवर्षी ☐

ड) अजून एकदाही नाही ☐

१६) रस्त्यांच्या सुविधांमुळे आपल्या परिसराला पुढील कोणते फायदे झाले?

अ) नाशवंत पदार्थाची जलद वाहतूक झाली ☐

ब) शेजारील गावांशी व तालुक्याशी संपर्क आला ☐

क) रस्त्यांमुळे लोकप्रतिनिधींना निवडणूक प्रचारासाठी गावापर्यंत येणे शक्य झाले ☐

ड) वाहतूकीची साधने वाढली ☐

१७) आपणांकडे दळणवळण व संदेशवहनाची कोणती साधने उपलब्ध आहेत?

अ) दूरदर्शन ☐ ब) मोबाईल ☐ क) इंटरनेट ☐

ड) वर्तमानपत्रे ☐

१८) आपल्याला दळवळणाची साधने समाधानकारकरित्या सेवा देतात का?

होय ☐ नाही ☐

नसल्यास कारणे

१) ग्रामीण भागापर्यंत पोहचलीच नाहीत ☐

२) इंटरनेट उपलब्ध नाही ☐

३) शासनाची उदासिनता ☐

४) खाजगी क्षेत्रातील महाग सेवा ☐

५) कागदपत्रांची गुंतागुंत ☐

१९) टेलिफोन, मोबाईल व इंटरनेट या सुविधांबाबत आपल्याला काही दोष दिसतात काय?

होय ☐ नाही ☐

२०) वीजेचा उपयोग खालीलपैकी कशासाठी केला जातो?

अ) घरातील दिवे ☐

ब) फ्रीज, फॅन, टि.व्ही. इ. वस्तूंचा वापर ☐

क) शेतीसाठी पाणीपुरवठा करणे ☐

ड) व्यवसायासाठी उपयोग ☐

२१) वीज उपलब्धेबाबत आपला अभिप्राय सांगू शकाल काय?

अ) कमी उपलब्धता ☐ ब) खेड्यात भारनियमनच अधिक ☐

क) शेती, उद्योग व सेवा यांसाठी वीज वितरण करताना दुजाभाव ☐

ड) शहरात भारनियमन कमी ☐

इ) उपलब्धतेच्या काळातही खंडीत पुरवठा ☐

२२) आरोग्याच्या कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत?

अ) खाजगी वैद्यकिय सुविधा ☐ ब) शासकीय सुविधा ☐

क) खाजगी व शासकीय दोन्हीही आहेत ☐ ड) खाजगी व शासकीय दोन्हीही नाहीत ☐

२३) खालीलपैकी शासकीय आरोग्य सेवा कोणत्या उपलब्ध आहेत?

अ) प्राथमिक आरोग्य केंद्र ☐ ब) जिल्हा रूग्णालय ☐

क) फिरता दवाखाना ☐

२४) आपल्या परिसरात शैक्षणिक सुविधा कोणत्या आहेत?

अ) अंगणवाडी, प्राथमिक शाळा आणि आश्रमशाळा ☐

ब) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय ☐

क) पदवी महाविद्यालय ☐

ड) अभियांत्रिकी महाविद्यालय ☐

इ) वैद्यकिय महाविद्यालय ☐

२५) शैक्षणिक अडचणी आहेत काय?

होय ☐ नाही ☐

१) पायाभूत सुविधांची कमतरता ☐

२) शैक्षणिक सुविधांची कमतरता ☐

३) अपुरे उत्पन्न ☐

४) सभोवतालचे वातावरण ☐

५) शासकिय धोरण ☐

६) आवडीच्या शिक्षणाची कमतरता ☐

२६) आपल्या भागात अलिकडच्या काळात सर्वाधिक गुंवतणूक कोणत्या क्षेत्रात होते?

१) शिक्षण ☐ २) आरोग्य ☐

३) वाहतूक साधने–रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक ☐ ४) बँका व विमा व्यवसाय ☐

५) वीज निर्मिती ☐ ६) अत्याधुनिक दळणवळणाची साधने ☐

७) उर्जा साधने व इतर ☐ ८) शेती ☐ ९) ☐

१०) पाणी योजना ☐

२७) आपणास पुरेशा रोजगार संधी मिळाल्या आहेत का?

१) शेती ☐ २) उद्योग ☐ ३) सेवा क्षेत्र ☐

४) वाहतूक व दळणवळण ☐ ५) माहित नाही ☐

२९) स्थलांतराचे स्वरूप

१) ग्रामीण भागातून शहराकडे ☐ २) शहराकडून ग्रामीण भागाकडे ☐

३) ग्रामीण भागातून दुसऱ्या ठिकाणी ☐ ४) एका शहरातून दुसऱ्या शहरात ☐

३०) स्थलांतराची कारणे सांगू शकाल काय?

होय ☐ नाही ☐

असल्यास कारणे

१) ग्रामीण भागात रोजगाराचा अभाव ☐

२) शहरात राहण्यासाठी आवडते ☐

३) शहरात सर्व सोयी उपलब्ध असतात ☐

३१) शेतीच्या मागासलेपणाची कारणे

१) पारंपारिक दृष्टीकोन ☐ २) मुंबईकडे जाण्याचा कल ☐

३) काम करण्याची इछा नाही ☐ ४) पाणी टंचाई ☐

३२) आपला भाग मागासलेला असल्याची कारणे

१) शासकीय विकासाचे प्रयत्न कमी ☐

२) राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ☐

३) सहकारी संस्थांचा कमी विकास ☐

४) ग्रामीण भागाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ☐

५) शेती, उद्योग यांचे मागासलेपण ☐

३३) आपल्या भागाचा प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना सांगू शकाल काय?

होय ☐ नाही ☐

३४) उपाययोजना

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

**कुटुंब्रप्रमुखाची नाव व सही**

## प्रश्नावली २

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

## ''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४ ते २०१४''

## ब) कृषी अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली

१) पूर्ण नाव : -----------------------------------------

कार्यालयीन पत्ता : ---------------------------------------

मोबाईल नं. : ------------------------------------------

२) आपली शैक्षणिक पात्रता कोणती आहे?

१) कृषी पदविका ☐ २) कृषी पदवी ☐

३) आपल्या नेमणूकीचे स्वरूप

१) पदोन्नती ☐

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत ☐

४) आपल्या कार्यक्षेत्रातील एकूण गावे

| | |
|---|---|
| मागासलेली गावे | |
| प्रगत गावे | |
| एकूण | |

५) आपल्या कामाचे स्वरूप कसे आहे?

१) शेतीविषयक योजनांची माहिती पुरविणे ☐

२) मागास भागाला भेट देणे ☐

३) मागास भागातील लोकांच्या अडचणी माहित करून घेणे. ☐

४) शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे. ☐

६) शेतीच्या मागासलेपणाचे कारणे कोणती आहेत?

१) शेतीत काम न करण्याची लोकांची प्रवृत्ती ☐

२) पाणी पुरवठ्याची उपलब्धता ☐

३) शाश्वत बाजारपेठ नाही ☐

४) शेती क्षेत्राचा लहान आकार ☐

५) शिक्षणाचा अभाव ☐

६) कर्जपुरवठा होत नाही. ☐

७) सहकारी संस्थांचा अपूरा विकास ☐

७) प्रादेशिक असमतोलाची कारणे कोणती आहेत?

१) मुंबईकडे रोजगारासाठी जाण्याचा काळ ☐

२) शेती क्षेत्रातील कमी गुंतवणूक ☐

३) जलसिंचन व वीज सुविधांची कमतरता ☐

४) निरक्षरता ☐

५) आळशी वृत्ती ☐

८) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी आपले प्रयत्न

१) जनतेच्या समस्यांचा सरकारकडे पाठपुरावा करणे. ☐

२) ग्रामीण भागात रोजगार संधी निर्माण करणे. ☐

३) शेतीविषयक व विकासाच्या योजना १००% राबविणे ☐

४) शेतात पायाभूत सुविधा वाढविण्यावर भर देणे. ☐

५) संशोधन प्रत्यक्ष कृतीत आणणे. ☐

## प्रश्नावली ३

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

## ''कोकण विभागाच्या विकासातील प्रादेशिक असमतोल – एक अभ्यास २००४ ते २०१४''

## क) उद्योजकांसाठी प्रश्नावली

१) उद्योजकाचे नाव: ---------------------------------------

२) उद्योगाचे नाव व पत्ता : -----------------------------------

३) आपण उद्योग सुरू केल्याचे वर्ष : ------------------------------

४) उद्योग स्थापन करण्यासाठी प्रेरणा कोणाकडून मिळाली?

अ) वडिल ☐

ब) शासन ☐

क) इतर उद्योजक ☐

५) उद्योग स्थापन करताना आपली कोणती उद्दिष्टे होती?

अ) आर्थिक विकास ☐ ब) सामाजिक विकास ☐

क) प्रादेशिक विकास ☐ क) शैक्षणिक विकास ☐

६) आपला उद्योग कोणत्या भागात आहे?

अ) ग्रामीण ☐ ब) शहरी ☐ क) निम शहरी ☐ ड) शहरालगत ☐

७) आपल्या उद्योगाचे स्वरूप

अ) कृषी आधारित ☐ ब) रासायनिक ☐

क) यांत्रिक (लोखंड व पोलादाशी निगडीत) ☐ ड) रंगनिर्मिती ☐

इ) खत निर्मिती ☐ फ) वाहतूक उद्योग ☐

८) आपल्या उद्योगासाठी आवश्यक कर्मचारी उपलब्ध होतात काय?

होय ☐ नाही ☐

रोजगाराचे स्वरूप

अ) कायम ☐ ब) रोजंदारी / मजूरी ☐

१०) आपल्या विभागात उद्योगक्षेत्रात किती रोजगार संधी निर्माण झाल्या?

| रोजगार निर्मिती | संख्या |
|---|---|
| रोजंदारीवरील कामगार | |
| कंत्राटी कामगार | |
| कायम कामगार | |
| कुशल कामगार | |
| अर्धकुशल कामगार | |

११) कोणत्या उद्योगात रोजगार निर्मिती जास्त आहे?

अ) शेतीवर आधारित ☐ ब) अवजड उद्योग ☐

क) रासायनिक प्रक्रिया उद्योग ☐ ड) सहकारी तत्त्वावरील उद्योग ☐

इ) वाहतूक उद्योग ☐

१२) आपल्या भागात उद्योगामुळे स्थलांतर कमी झाले आहे काय?

होय ☐ नाही ☐

असल्यास स्थलांतर कोणत्या प्रकारचे आहे?

अ) ग्रामीण भागातून शहराकडे ☐ ब) शहरातून ग्रामीण भागाकडे ☐

क) अविकसित प्रदेशाकडून विकसित प्रदेशाकडे ☐

ड) यापैकी नाही ☐

१३) आपल्या औद्योगिक प्रदेशात कोणते महाविद्यालय आहे?

अ) पारंपरिक शिक्षण (कला, वाणिज्य व विज्ञान) ☐

ब) कृषी पदविका ☐ क) अभियांत्रिकी पदविका व पदवी ☐

ड) वैद्यकिय ☐

१४) उद्योगामुळे परिसरात कोणत्या पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या ?

अ) शिक्षण ☐ ब) पिण्याचे पाणी ☐ क) आरोग्य-दवाखाने, मेडिकल ☐

ड) रस्ते वाहतूक व दळणवळणाची वाढती साधने ☐ इ) वीजेचे उपलब्धता ☐

ई) रोजगार ☐ उ) बँका ☐ ई) पोस्ट ऑफिस ☐

१५) आपल्या भागात उद्योगामुळे प्रादेशिक असमतोल कमी झाला आहे काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐

१६) आपल्या भागात प्रादेशिक असमतोल कोणत्या क्षेत्रात अधिक आहे?

अ) शिक्षण ☐ ब) पायाभूत सुविधा ☐ क) शेती व इतर क्षेत्रे ☐

ड) सामाजिक ☐ इ) आर्थिक ☐

१८) औद्योगिक, आर्थिक प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी कोणते अडथळे येतात?

अ) शासनाची उदासिनता ☐ ब) भ्रष्टाचार ☐

क) निधीचा अयोग्य वापर ☐ ड) कायद्यांची अयोग्य अंमलबजावणी ☐

१९) प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी उपाययोजना सांगू शकाल काय?

अ) होय ☐ ब) नाही ☐

२०) आपल्या काही सूचना

अ) ----------------------------------------------------

ब) ----------------------------------------------------

क) ----------------------------------------------------

**उद्योजकाची सही**

# परिशिष्ट –२

## नकाशा

## महाराष्ट्रातील प्रादेशिक विभाग

